# प्रबोधन विचार

डॉ. यशवंत मनोहर

महाबोधी सिद्धार्थ प्रकाशन



डॉ. यशवंत मनोहर : ग्रंथ संपदा

अ : कविता :

१. उत्थानगुंफा - १९७७/१९८०
२. डॉ. आंबेडकर एक चिंतनकाव्य- १९८२
३. मूर्तिभंजन - १९८५

आ : साहित्य विचार व समीक्षा :

१. स्वाद आणि चिकित्सा - १९७८
२. दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप - १९७८
३. बाळ सीताराम मर्ढेकर - १९८७
४. दलित साहित्य चिंतन - १९८८
५. निबंधकार डॉ. आंबेडकर - १९८८
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्धधम्म - १९८८
७. आंबेडकरवाद आणि विद्यार्थी क्रांती - १९८८

इ : प्रवासवर्णन :

१. स्मरणांची कारंजी - १९८७

ई : भाषणांच्या पुस्तिका :

१. डॉ. आंबेडकर यांची राम-कृष्णविषयक कोडी - १९८७
२. आपल्या शिक्षणाची दिशा - १९८८
३. दलित साहित्य : १९८८
४. आंबेडकरी समाजवाद - १९८८
५. प्रबोधनकार आंबेडकर - १९८८

उ : संपादित :

१. दलितांचे विद्रोही वाङ्मय (वामन निंबाळकरांच्या सहकार्याने) १९८१
२. स्मरणिका : पहिले दलित साहित्य संमेलन नागपूर - १९७६

# प्रबोधनविचार

डॉ. यशवन्त मनोहर

महाबोधी सिद्धार्थ प्रकाशन
नागपूर

PRABODHANVICHAR
DR YASHWANT MANOHAR

आवृत्ती पहिली :
धम्मचक्रप्रवर्तन दिन, १० आक्टोबर, १९८९

© सौ. पुष्पलता मनोहर, एम्. ए.
अ / २ विद्यापीठ प्राध्यापक निवास
अमरावती मार्ग, नागपूर 440 010

प्रकाशक : सौ. सुषमा रमेश जनबंधु, सौ. निमा अशोक खंडाळे
महाबोधी सिद्धार्थ प्रकाशन,
२०३, ठवरेनगर कॉलनी, पो. जरीपटका नागपूर 440 014

मुखपृष्ठ : अनिल ढेंगळे
द्वारा / प्रकाश नगरकर, गुरुद्वारच्या मागे, पंजाबी लाइन
कामठीरोड, नागपूर–440 004

मुद्रक : म. पां. अनहट्टी, नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर 440 012

मुखपृष्ठ छपाई : मधुकर आर्टस्, नागपूर–440 012

मूल्य : ५० रुपये

यशोधरा, सावित्रीबाई आणि रमाई
या आपल्या तीन मातांना
अर्पण

# प्रकाशकीय निवेदन...

डॉ. यशवंत मनोहर यांच्या प्रबोधनविचार या वैचारिक ग्रंथाने आमच्या प्रकाशनाचा प्रारंभ होत आहे. त्यामुळे अम्हाला मनस्वी आनंद होतो आहे. प्रबोधनविचार या ग्रंथात डॉ. यशवंत मनोहर यांचे वेगवेगळ्या विषयांवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना पायाभूत मानून लिहिलेले लेख आहेत. आज समाजप्रबोधनाच्या दृष्टीने या विषयांचे अत्यंत मोल आहे. डॉ. मनोहरांनी आपल्या या अभ्यासपूर्ण लेखांमध्ये मूलभूत विश्लेषण केलेले आहे.

सदर विचार-ग्रंथाने आम्ही प्रकाशनाच्या क्षेत्रात पदार्पण करीत आहोत. प्रकाशनाच्या माध्यमातून आंबेडकरी विचार हा सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचविण्याचा आमचा संकल्प आहे. अर्थात या तारेवरच्या कसरतीची आम्हाला जाणीव आहेच. वाढत्या महागाईत ग्रंथाचे निर्मितीमूल्य वाढलेले असताना कमीतकमी किंमतीत हे विचारधन वाचकांपर्यंत पोहचविण्याचा आमचा प्रयत्न राहील.

आमचे प्रकाशन महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत बुद्ध, शाहू महाराज इत्यादी तत्त्ववेत्त्यांचे विचार घेऊन वाटचाल करणार आहे. अर्थात वाचकांच्या सहकार्याशिवाय आमचे प्रयत्न अपूर्ण राहणार आहेत. 'प्रबोधन विचारांनी' आरंभलेली ही वाटचाल निश्चितच ध्येयापर्यंत जाईल अशी खात्री आहे.

'प्रबोधनविचार' हा आपला ग्रंथ आमच्या प्रकाशनाला दिल्याबद्दल या ग्रंथाचे लेखक डॉ. यशवंत मनोहर यांच्याबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच या ग्रंथाचे अत्यंत सुबक मुखपृष्ठ करून दिल्याबद्दल आमच्या घरातीलच कुटुंबीय म्हणून वावरणारा श्री. अनिल ढेंगळे यांनेही आभार मानणे अप्रस्तुत होणार नाही. मुखपृष्ठाची अल्पावधीत सुंदर छपाई करून दिल्याबद्दल मधुकर आर्टस्चे मधुकरराव वैद्य यांचे आम्ही हार्दिक आभार मानतो.

अत्यंत कमी वेळात या पुस्तकाची अत्यंत सुंदर छपाई करून दिल्याबद्दल नारायण मुद्रणालयाचे श्री. मधुसूदन बनहट्टी आणि श्री. श्रीकृष्ण बनहट्टी व सर्व कर्मचाऱ्यांचे आम्ही आभार मानतो.

**सौ. सुषमा जनबंधू** **सौ. निमा खंडाळे**

# प्रास्ताविक

मागील १०–१२ वर्षांमध्ये मी जे वैचारिक लेखन केले ते एकत्रित रूपात प्रथमच 'प्रबोधनविचार' या पुस्तकात येत आहे. अनेक विषयांवरील वेळोवेळी प्रकाशित झालेले लेख असे या पुस्तकाचे स्वरूप आहे. असे असले तरी 'प्रबोधन' हीच या सर्व लेखांमागील प्रेरणा आहे. निरीश्वरवाद हा पाया आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय हा इमला असे स्वरूप आपल्या भारतीय समाजाला प्राप्त व्हावे असे या सर्व लेखनामागचे प्रयोजन आहे.

भारतीय समाजापुढला मागल्या हजारो वर्षांमधला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आपल्या नैतिक मूल्यांचा पाया बदलणे हाच होता. भारतीय समाजाच्या वर्तमानाला छळणारे आणि त्याच्या भवितव्याला जाळणारे पेच भारतीयांनी हा अत्यंत विघातक पाया अंगिकारल्यामुळेच निर्माण झाले आहेत. भारतीय प्रबोधनाला आता हा विघातक वैचारिक पाया बदलून घेण्यासाठी प्राधान्याने आणि सर्वशक्तिनिशी प्रयत्न करायला हवे आहेत. यातच आपल्या पुढल्या प्रबोधनाची यथार्थता दडलेली आहे.

आपली लोकशाही धर्मान्धतेच्या गळफासाने आज मरणोन्मुख झाली आहे. अंधश्रद्धांनी येथील माणसांचे जगणे निरक्षर करून टाकले आहे. दैनंदिन जीवनात भारतीय समाज रूढींचा आणि परंपरांचा इतका अंधभक्त आहे की संस्कृती-दृष्ट्या आणि प्रबोधनदृष्ट्या हा समाज ठार अशिक्षित आहे याबद्दल संशय उरत नाही. हा अशिक्षितपणा आता अधिक तीव्र, अधिक कडवा, अधिक आंधळा आणि अधिक अमानुष होतो आहे. हा अशिक्षितपणा प्रतिक्रांतीवादी आहे. त्याला धक्का लावण्याचा ज्या ज्या वेळी प्रयत्न झाला त्या त्या वेळी हा अशिक्षितपणा अधिकच वेडयावाकडया पद्धतीने पिसाळला. संस्कृतीच्या नावाखाली संस्कृती मेली. राष्ट्राचे नाव घेतच राष्ट्र

मारले गेले. हा अशिक्षितपणा ज्या ‘संस्कृतीच्या’ नावाखाली संस्कृती मारतो त्या संस्कृतीचे स्वरूप आपण समजावून घ्यायला हवे. ही संस्कृती विषमताग्रस्त समाजरचनेचा पाया झालेली आहे आणि हा पाया वरील अशिक्षितपणाला आणि हा अशिक्षितपणा त्या पायाला अंधसामर्थ्य देत या देशातील माणुसकीला देशोधडीला लावीत आलेले आहेत. हा अशिक्षितपणा व त्याने पूजनीय मानलेला पाया आपल्या प्रबोधनापुढला ज्वलंत प्रश्न आहे. हा प्रश्न टाळून प्रबोधनाची वा क्रांतीची सुरवात कोणालाही इथे करता यायची नाही. हे सूत्र या लेखनाच्या मुळाशी आहे. वाचकांनी अत्यंत गंभीरपणे हे लेखन विचारात घ्यावे अशी विनंती मी करतो.

हे पुस्तक अगत्याने प्रकाशित केल्याबद्दल महाबोधी सिद्धार्थ प्रकाशनाच्या सौ. सुषमा रमेश जनबंधु आणि सौ. निमा अशोक खंडाळे, यांचे मी मनापासून आभार मानतो.

स्नातकोत्तर मराठी विभाग
नागपूर विद्यापीठ (परिसर)
नागपूर 440 010

**यशवंत मनोहर**

---

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा | १ |
| | ■ | |
| २. | प्रबोधनकार आंबेडकर | २२ |
| ३. | आंबेडकरी समाजवाद | ३२ |
| ४. | आंबेडकरवाद आणि विद्यार्थीक्रांती | ४० |
| | ■ | |
| ५. | रिडल्स : राम आणि कृष्ण : १ | ५७ |
| ६. | रिडल्स : राम आणि कृष्ण : २ | ७४ |
| ७. | रिडल्स : राम आणि कृष्ण : ३ | ८४ |
| | ■ | |
| ८. | आपल्या शिक्षणाची दिशा | ९१ |
| ९. | आपल्या शिक्षणाचा आशय | १०१ |
| | ■ | |
| १०. | समता | १०७ |
| ११. | राष्ट्रीय एकात्मतेपुढील आव्हान आणि आवाहन | ११३ |
| १२. | आंबेडकरवाद हा आमूलाग्र क्रांतीचा जाहीरनामा | ११६ |
| १३. | सामाजिक विषमता आणि धर्मान्तर | १२१ |
| १४. | राष्ट्रीय एकात्मता : एक अन्वयार्थ | १२४ |
| | ■ | |
| १५. | प्राध्यापकांचे रामचंद्राला साकडे | १३० |
| १६. | विशाल हिंदू संमेलन, हिंदु व्होट बँक | १३४ |
| १७. | आंबेडकरी चळवळ | १४१ |
| | ■ | |
| १८. | पँथर | १५० |
| | ■ | |
| १९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गीता | १५४ |
| २०. | डॉ. आंबेडकर आणि सावरकर | १५६ |
| | ■ | |
| २१. | दलितांवरील अत्याचार | १६१ |
| २२. | आता, आधी सामाजिकच ! | १६५ |
| २३. | नवे प्रबोधन आणि नवी संस्कृती | १६७ |

# सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा

"ब्राह्मणेतर वर्गाने महात्मा जोतीराव फुले यांची स्मृती सर्वस्वी पुसूनच टाकली आहे असे नसून या वर्गाने त्यांच्या तत्त्वज्ञानास निर्लज्जपणे दगा दिला आहे. सत्यशोधक समाजाचे कार्य अखिल भारतात पोहचले पाहिजे."

**–डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

(म. जोतीराव फुले : कीर १९७५ पृ. ३१६,१७)

सत्यशोधक समाजाचे कार्य अखिल भारतात पोचले पाहिजे असे ज्याच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले त्या सत्यशोधक समाजाचा जन्महेतू काय होता ? आजच्या जीवनातील सांस्कृतिक संकटातून बाहेर पडण्याच्या संदर्भात सत्यशोधक समाजाची अन्वर्थकता काय संभवू शकते ? आणि आजच्या समाजापुढे विद्यमान अर्थरचनेने, धर्मान्धतेने, राजकीय घडामोडींनी आणि जातिव्यवस्थेने उभ्या केलेल्या भयानक समस्या सोडविण्यासाठी सत्यशोधक समाज कोणता मार्ग देऊ शकतो ? त्यासाठी त्याचे आजचे स्वरूप काय असले पाहिजे ? त्याची मार्गदर्शक मूलतत्त्वे आणि मार्गदर्शक कार्यक्रम काय असू शकेल याचा विचार करायची आवश्यकता प्राप्त परिस्थितीत अधिकच आहे.

२४ सप्टेम्बर १८७३ रोजी जोतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या स्थापनेमागे पुढील तीन प्रमुख उद्देश होते.–

१. शूद्र व अतिशूद्र यांची ब्राह्मण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद करणे.

२. त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची व अधिकारांची शिकवणूक देणे, आणि–

३. ब्राह्मणी शास्त्रांच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून त्यांना मुक्त करणे.

या उद्देशांमधून आपल्या समाजक्रांतीची मूलतत्त्वे स्पष्टपणे विशद केली गेली आहेत. तपशीलात क्वचित बदल होऊ शकला तरी जोतीराव फुल्यांनी वरील उद्देशांमधून गोवलेली मूलतत्त्वे आमूलाग्र क्रांतीकडेच झेपावत आहेत हे स्पष्ट आहे.

खरे तर असे आहे की जोतीराव फुले यांचे समग्र वाङ्मय म्हणजे सत्य-शोधक समाजाचा विस्तृत आणि निर्णायक जाहीरनामाच होय. हा निर्णायक जाहीरनामा फुल्यांनी एकोणिसाव्या शतकात सिद्ध केला. हा जाहीरनामा आमूलाग्र समाजक्रांतीचा होता आणि पुढल्या काळात हा वारसा चालविणे वा तो पुढे नेणे ही बाब आंबेडकर वजा जाता कोणालाही शक्य झाली नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धासोबत जोतीराव फुल्यांना आपले गुरू मानले आणि कोणाला करता येणार नाही असा त्यांचा महान सन्मान केला. त्यांचा समाजक्रांतीचा वारसा समर्थपणे पुढे नेला. आपल्या समाजातील समग्र अन्यायग्रस्तांनी हा ऐतिहासिक सांधा आणि त्याचा अंतर्गत हेतू काळजीपूर्वक समजावून घेण्याची गरज आहे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उभे राहून एकविसाव्या शतकाची बंद दारे ठोठावणारा आपला समाज आज परस्पर द्वेषाच्या सर्वंकष आगीत सापडलेला आहे. फुले–आंबेडकरांच्या या समाजात जातीजातीत **द्वेषाची** आग भडकलेली आहे. धर्मान्धतेने अत्यंत गर्वनि खुळचट आणि अमानुष रूप धारण केले आहे. अंधश्रद्धेचा आणि बुवाबाजीचा भस्मासूर मोकाट सुटला आहे. असंख्य पातळ्यां-वरून आर्थिक आणि मानसिक शोषण अनिर्बंधपणे सुरू आहे. सर्व प्रकारच्या विषमतांची विसाव्याची आणि संवर्धनाची भूमी असे स्वरूप आपल्या समाजाला आले आहे. विषमतेचा घृणास्पद आविष्कार सतत आणि चढत्या श्रेणीने होतो आहे. दलित, आदिवासी, भटके–विमुक्त आणि स्त्रिया हे घटक या विषमतेचे शिकार ठरत आहेत.

या देशातला नागवलेला समाजही जुने विषमतेचे संस्कार सोडत नाही. माणसे जातीत जन्मतात. जातीत जगतात. जातीत मरतात. माणसे हे सर्व केवळ जाती जगवण्यासाठी करतात. या देशातील झाडेझुडपे आणि पशुपक्षी सुद्धा येथील माणसांच्याइतके अमानुष नाहीत. काय झाले आहे या समाजाला ? याने फुले–आंबेडकरांचे ऐकले नाहीच पण निदान लोकहितवादी–आगरकर यांचेही काही ऐकले नाही. उलट धर्मान्धता सांगणारा आत्मघातकी शब्द, जातिद्वेष सांगणारा

बदमाश शब्द, आणि परंपरावाद सांगणारा प्रतिगामी शब्द या समाजाने जिवाचा पदर करून झेलला. उजेडाच्या विरोधी हा समाज सतत कां वागतो आहे ? समतेचा त्याने शतकानुशतके असा दुस्वास का केला आहे ? मी माणूस आहे असे गर्वाने म्हणायचे त्याला का शक्य झाले नाही ? या प्रश्नांनी निर्माण केलेल्या संकटात आज आपला समाज सापडलेला आहे.

सत्यशोधक समाजाचा आजचा जाहीरनामा मागल्या शे–दीडशे वर्षांच्या आपल्या सामाजिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवरच उभा करायला हवा. आपल्या धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वाङ्मयीन इत्यादी समग्र जीवनांगांमध्ये जी घटिते घडली त्यांची साधकबाधक चिकित्सा केल्याशिवाय आज सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा लिहिता यायचा नाही.

फुल्यांच्या काळातील सर्वंकष शोषणव्यवस्थेविरुद्ध झालेला यथोचित आणि सर्वश्रेष्ठ विद्रोह असे जोतीराव फुल्यांच्या क्रांतिकार्याचे वर्णन करायला हवे. या विद्रोहाची इतिहासदत्त प्रकृती आज काय संभवते ? या उठावाचा आजच्या शोषणव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर काय आशय संभवतो आणि आजच्या सांस्कृतिक अनुबंधात आजउद्याच्या समाजक्रांतीचे तत्त्वज्ञान काय असावे, हे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आणण्यासाठी कोणता कार्यक्रम आवश्यक आहे असे या जाहीरनाम्याचे स्वरूप असायला हवे.

सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा आजच्या समाजक्रांतीचा मार्गदर्शक विचार म्हणून सिद्ध करीत असताना आजच्या समाजवास्तवाला घट्ट चिकटून बसलेले आणि त्याची माणुसकी प्रश्नार्थक करून टाकणारे भूतकालीन अनुबंध लक्षात घ्यायला हवेत.

वैदिक धर्म वर्णसमाजाचा संस्थापक आणि चालक धर्म आहे. पुरोहितशाही, अंधश्रद्धा आणि ब्राह्मणवर्चस्व ही वैदिक समाजसंस्थेची अधिष्ठानभूत तत्त्वे होती.

वैदिक समाजसंस्थेच्या या अधिष्ठानभूत तत्त्वांवर प्रथम बुद्धाने सर्वथा मूलगामी हल्ला केला. बुद्ध ईश्वर, परलोक आणि वेद यांच्याविरुद्ध विद्रोह करून उठला कारण या तत्त्वांवरच विषमता व ब्राह्मणवर्चस्व चिरंतन मानणारी वैदिक समाजसंस्था उभी होती. परस्पर बंधुत्वालाच सर्वश्रेष्ठ नीती म्हणून गौरविणारा बुद्ध या देशात निरीश्वरवाद आणि बंधुत्व ही पायाभूत तत्त्वे अपर्यायी स्वरूपात स्थापित करून नव्या समतासमाजाचा आशय घडवीत होता.

या काळी सामाजिक विषमतेत जातीय विषमता शिरली. वैदिक धर्मानेच या जातीय विषमतेचेही नेतृत्व केले. वैदिक धर्माने बुद्धधम्माच्या पराभवानंतर जातीयता अधिकच कडेकोट केली. ती घट्ट अपरिवर्तनशील केली गेली. आठव्या नवव्या शतकानंतर शांकरवेदान्ताने या माणुसकीला काळिमा लावणाऱ्या समाज-संस्थेचे नेतृत्व केले.

सामाजिक जीवनात मूठभर स्वार्थांधांच्या हातात सत्ता आणि बहुसंख्य कनिष्ठ जाती शासित असे चित्र भारतीय समाजाचे मागील हजारो वर्षांत राहिलेले आहे. उच्च जातींनाही स्वजातीचा अहंकार आणि इतर जातींचा द्वेष तसेच शासित जातींनाही स्वजातीचा आंधळा अहंकार आणि परजातीचा द्वेष असे या समाजाचे स्वरूप हजारो वर्षे अबाधित राहिलेले आहे. प्रत्येकाच्या लेखी आपल्या जातीला पावित्र्य आहे. अध्यात्माची मयसभा उभारून हिंदूधर्माने हे विषारी पावित्र्य प्रत्येक जातीला दिलेले आहे. ह्या विषम समाजवास्तवाला समतावास्तव करण्याचा महान क्रांतिकारी प्रयोग बुद्धाने केला.

भारतीय समाजेतिहासात अब्राह्मणांचा ब्राह्मणांविरुद्ध संघर्ष आहे की ब्राह्मण्याविरुद्ध अब्राह्मण्याचा संघर्ष आहे ? वस्तुस्थिती अशी आहे की ब्राह्मणी संस्कृती विरुद्ध अब्राह्मणी संस्कृती किंवा ब्राह्मणी जीवनमूल्ये विरुद्ध अब्राह्मणी जीवनमूल्ये असा तो संघर्ष आहे.

या संघर्षाच्या संदर्भात आपण स्पष्ट भूमिका घ्यायला हवी. कोणी असे म्हणेल की मी ब्राह्मण आहे पण माझ्यात ब्राह्मण्य नाही तर हे म्हणणे केवळ आत्मविसंगतच नाही तर ते पूर्णतः दांभिक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कारण एखाद्या व्यक्तीत ब्राह्मण्य नाही याचा अर्थ ती व्यक्ती ब्राह्मणही नाही किंवा इतरही कोणती 'जात' ती नाही असा आहे. तेव्हा ब्राह्मण्यरहित 'ब्राह्मण' संभवत नाही. ब्राह्मण्यरहित जात संभवत नाही. कारण जे जात मानते, स्वतःला इतरांहून श्रेष्ठ मानते ते ब्राह्मण्य. स्वतःची व इतरांची जात गृहीत धरते ते ब्राह्मण्य. स्वतःच्या व इतरांच्या जातींना आधार असलेली संस्कृती, रूढी वा मूल्य-व्यवस्था प्रमाण मानते ते ब्राह्मण्य. हे ब्राह्मण्य ब्राह्मण कुणबी, माळी, महार अशा कोणत्याही नावाने वा कोणत्याही वेषात वावरो ते नष्ट व्हायलाच हवे. हे मानायला हवे की ब्राह्मण्य उच्च जातींच्या नावाने वावरत असेल तर तो धूर्तपणाचा भाग आहे आणि ते खालच्या जातींच्या नावाने वावरत असेल तर तो मूर्खपणाचा भाग आहे. अशा वेळी धूर्तपणाला धडा शिकविणे आणि मूर्खपणाला मूर्खपणाची जाणीव करून देणे आवश्यक असते.

ब्राह्मण्य आणि अब्राह्मण्य या लढाईत आपण कोणाच्या बाजूचे व कोणाच्या विरोधात ते स्पष्ट व्हायला हवे. ब्राह्मण्य ही सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्वत:ला श्रेष्ठ व इतरांना कनिष्ठ मानणारी मानसिकता होय. वरील सर्व पातळ्यांवर इतरांचे शोषण करणारी मानसिकता म्हणजे ब्राह्मण्य होय. चार्वाक या ब्राह्मण्याविरुद्धच विद्रोह करीत होते. बुद्धाचा त्याविरुद्धच उठाव होता. जोतीराव फुल्यांनी हे ब्राह्मण्यच मुळापासून उपटून टाकण्याचा प्रयत्न केला.

वैदिकांचे समाजशास्त्र या ब्राह्मण्यावरच उभारले गेले आहे. चातुर्वर्ण्याच्याद्वारा विषमतेची व अहंकाराची पूजा बांधणारे ते समाजशास्त्र आहे. या ब्राह्मणी संस्कृतीचा उच्छेद करून समता संस्कृतीचा ध्यास घेतलेली भौतिकवादी परंपरा इथे आहे. चार्वाक–बुद्ध हे या थोर परंपरेचे नेते आहेत. म्हणूनच जोतीराव फुल्यांनी चार्वाकांना महासत्पुरुष, महाविद्वान शोधक सज्जन म्हटले (महात्मा फुले : समग्र वाङ्मय, संपा. कीर, मालशे; मुंबई १९६९, पृ. ३७०, ४३८) आणि चार्वाकासंबंधी आदर व्यक्त केला. तर "बुद्धांनी भटांची खोड मोडिली" (उक्त. पृ. ४८८), "...चार निःपक्षपाती पवित्र विद्वानास ब्राह्मणकपटाविषयी बरे न वाटून त्यांनी बौद्धधर्माची स्थापना करून आर्य ब्राह्मणांच्या कृत्रिमी धर्माचा बोजवारा करून या गांजलेल्या अज्ञानी शूद्र शेतकऱ्यास आर्यभटांचे पाशातून मुक्त करण्याचा सपाटा चालविला..." (उक्त. पृ. २०१) असे गौरवोद्‌गार बुद्धासंबंधी काढले. What is living in Indian Philosophy ? या प्रश्नाला फुल्यांचे स्पष्ट उत्तर चार्वाक–बुद्ध हेच आहे. हे त्यांच्या वरील भूमिकेवरून दिसते.

ब्राह्मण्यपुरस्कारक वैदिक–हिंदू संस्कृतीच्या विरोधात दंड थोपटून फुले उभे राहिले आणि ब्राह्मण्यभंजक समतावादाशी व भौतिकवादाशी त्यांनी नाते जोडले. भारतीय परंपरेतील हा विचारवारसाच या देशातील शोषितांना गुलामगिरीतून मुक्त करू शकतो ही खात्री जोतीराव फुल्यांना होती.

प्राचीन व मध्ययुगीन ब्राह्मण्यविरोधी जीवनविचारच समता आणि बुद्धिप्रामाण्य यांच्याशी नाते सांगू शकतो. बंधमुक्त होऊ इच्छिणाऱ्या सर्वांनी या ब्राह्मण्यभंजक तत्त्वज्ञानाचीच कास धरायला हवी. हिंदुधर्म व त्याची विचारसरणी परिवर्तनाच्या, समतेच्या आणि बुद्धिप्रामाण्यवादाच्या संदर्भात केवळ विघातक ठरली आहे. म्हणून फुल्यांनी चार्वाक–बुद्धाचे गोडवे गाईले. प्राचीन भारतीय संचिताची कठोर समीक्षा करताना चार्वाक–बुद्ध हीच काय ती त्यांना वंदन करावी अशी आदरणीय ठिकाणे वाटली.

सत्यशोधक समाजाचा जनक याप्रकारे प्राचीन भारतातील अत्यंत यथोचित वारसा स्वीकारीत होता. बुद्धिप्रामाण्यवादाची प्रेरणाच या प्रामाणिक व साध्या शेतकऱ्याच्या रक्तातून धावत होती. त्यामुळेच त्याने स्थापन केलेला सत्यशोधक समाज अन्यायग्रस्तांचा क्रांतिकारी आवाज ठरू शकला. "जर ईश्वराने सर्व मानवी प्राण्यांचा उद्धार करण्यासाठी चार वेद तयार केले होते, तर भटब्राह्मणांनी हिंदूंपैकी शूद्रादि अतिशूद्रास चार वेदांचे अध्ययन करण्याची मनाई केली नसती. यावरून त्यांनी ईश्वराचे आज्ञेचा भंग केल्यामुळे वेदकर्ता उगीच कसा एकीकडे लपून असला व त्यांपासून शूद्रादि अतिशूद्र लोकांचे थोडे का नुकसान होत आहे? वास्तव **त्यांनी वेदकर्त्या ईश्वरासहित चार वेदांवर भरवसा ठेवून आपल्यास हिंदू तरी कशाकरिता म्हणवून घ्यावे?**" (उक्त. पृ. २७०) इथेही हिंदूधर्मत्यागाची त्यांची भूमिका जशी स्पष्ट दिसते त्याप्रमाणे मोरो बाळबेकर या त्यांच्या ब्राह्मण मित्राने लिहिलेल्या "विद्यार्थी असतानाच आमची हिंदुधर्मावरील श्रद्धा उडून ख्रिस्ती धर्माकडे वळली." (उनि, कीर, पृ. १७) या वचनावरून हिंदूधर्मत्यागाचा त्यांचा विचार स्पष्ट होतो. अर्थात त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला नाही. पण हिंदूधर्माचा त्याग मात्र केला. सार्वजनिक सत्यधर्म हा नवाच धर्म स्थापन केला. 'गर्वसे कहो हम हिंदू है' म्हणणारांनी फुल्यांनी केलेला हिंदूधर्मत्याग फुल्यांच्या अनुयायांपासून लपवून ठेवू नये. अर्थात त्यांनी स्थापन केलेला नवधर्म चैतन्यवादी परंपरेतील असला तरी कीरांनी म्हटल्याप्रमाणे "जोतीरावांचा भर प्रार्थनेवर नव्हता किंवा आध्यात्मिक उन्नतीवरही नव्हता. जोतीराव हे भगवद्भक्तीत धुंद झालेले देवभक्त नव्हते." (उक्त. पृ. १४७) ही गोष्ट त्यांच्या वाङ्मयात हिंदू देवदेवतांची, धर्माची व श्रद्धांची जी कठोर चिकित्सा त्यांनी केली तीवरूनही आपल्या लक्षात येते.

तेव्हा ब्राह्मण्य विरुद्ध अब्राह्मण्य, धार्मिक अंधश्रद्धा विरुद्ध बुद्धिप्रामाण्यवाद, विषमता विरुद्ध समता असा महासंगर फुल्यांच्या वाङ्मयाने मांडलेला आहे.

जोतीबा फुल्यांच्यानंतर सत्यशोधक समाज हा आशय गमावून बसला. तो पुढे परंपरावाद्यांच्या हातात गेला. ब्राह्मण्ययुक्त ब्राह्मणेतरांच्या मर्यादा त्याला पडल्या. भारतीय संदर्भातील अत्यंत सूक्ष्म, अत्यंत अचूक ब्राह्मण्य–अब्राह्मण्य अशी ही वर्गजाणीव दुर्लक्षिली गेली आणि जातिसंस्थेविरुद्धच्या या बंडाला जातीत कोंडले गेले.

ब्राह्मणेतर पक्षाच्या मार्गदर्शनानुसार सत्यशोधक समाज ब्राह्मण्याचा पूजक बनला. व्यवस्थेच्या पूजनात तो दंग झाला. ब्राह्मणेतर चळवळ राष्ट्रीय चळवळीत

व काँग्रेसमध्ये समाविष्ट झाली. तिने गांधींचे नेतृत्व स्वीकारले. आर्य ब्राह्मणी धर्माचे व तत्त्वज्ञानाचे कट्टर विरोधक असलेल्या फुल्यांचे नाव सांगणारी ब्राह्मणेतर चळवळ फुल्यांच्या विरोधी तत्त्वज्ञानपरंपरेत म्हणजे वेदान्ताच्या परंपरेत सामील झाली.

जोतीरावांचा लढा ब्राह्मण्याशी होता म्हणून ब्राह्मणेतर सावकार, जमीनदार, मारवाडी यांच्यावरही त्यांनी हल्ला चढविला. पुढल्या ब्राह्मणेतर चळवळीने मात्र ब्राह्मणांचाच द्वेष करायचे धोरण अंगीकारल्याने ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मणेतर सावकार, जमीनदारांना चळवळीने मित्र मानले.

जोतीरावांनी अस्पृश्यांना मराठे, क्षत्रिय म्हटले. पुढली ब्राह्मणेतर चळवळ ब्राह्मण्यपूजक झाल्याने अस्पृश्यांना विसरलीच. एवढेच नव्हे, तर मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या आंदोलनात ब्राह्मणेतरांची भूमिका ब्राह्मण्यपूजक होती आणि शिवसेना, छत्रपतीसेनाही नावे घेऊन दलितांवर गावोगावी अत्याचार करणाऱ्या ब्राह्मणेतरांची भूमिकाही ब्राह्मण्यपूजकच होती. ब्राह्मणेतर समाजाने असे करून जोतीराव फुल्यांच्या विचारावर आणि कार्यावर गावोगावी अत्याचार केले. ब्राह्मणेतर समाज आज तर अधिकच आक्रमक व अंध पद्धतीने फुल्यांच्या ब्राह्मण्यनिर्मूलनाच्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानाची गावोगावी होळी करीत सुटलेला आहे. ब्राह्मणेतरांनी हिंदुत्ववाद्यांचे, संघवाल्यांचे मित्र होणे म्हणजे ज्योतीराव फुल्यांशी घोर द्रोह करणे होय.

फुल्यांनी पुरोहितशाहीच्या विरोधात विद्रोह केला पण क्षत्रिय शंकराचार्य निर्माण करून ब्राह्मणेतर चळवळीने पुरोहितशाहीलाच उचलून धरले. यात तपशील बदलला असला तरी तत्त्वाचा बळी दिला गेला. सामाजिक समतेचा ध्येयवाद बजा झाला. फुलेच वजा केले गेले. राजकीय सत्तासंपादन हे ब्राह्मणेतरांचे ध्येय झाले. आजपर्यंतही आपणास हे दिसते. ब्राह्मणेतर श्रीमंत शेतकरी व मध्यमवर्ग यांतून आलेल्या नेतृत्वाने १९३० नंतर चळवळ काँग्रेसमध्ये नेली. त्यामुळे समाजक्रांतीचे ध्येय मरून गेले. आधी सामाजिक क्रांती म्हणणाऱ्या सुधारणावाद्यांचा पक्ष सोडून आधी राजकीय क्रांती म्हणणाऱ्या परंपरावादी हिंदू वेदान्ताच्या पक्षाशी चळवळ एकरूप झाली. हे सत्यशोधक समाजाला मूठमाती देणेच होते.

सरंजामी वृत्तीच्या ब्राह्मणेतरांनी सत्यशोधक समाजाला कधीच आपले म्हटले नाही. ते त्यांच्या हितसंबंधांना परवडणार नव्हतेच. सत्यशोधक समाज धर्मान्धांचा, जातिवाद्यांचा व जमीनदार, सावकारांचा वर्गशत्रू होता.

१९२० सालानंतर सत्यशोधक समाज परत एकदा वादळ झाला आणि आपल्या समाजातील ब्राह्मण्य त्याने जेरीस आणले. या क्रांतिकारी समाजाने ग्रामीण जीवनात विद्रोहाचे तुफान पेटवले. आपला गरीब, कष्टकरी, बहिष्कृत आणि शोषणग्रस्त समाज क्रांतीच्या रणमैदानावर एकत्र आणण्यासाठी सत्यशोधक समाज कार्य करीत होता.

सावकार आणि जमीनदार यांना सत्यशोधक समाजाने आपले असली शत्रू मानले, कारण ते गरीब माणसांची अत्यंत निर्दयपणे आर्थिक पिळवणूक करीत होते. समाजाने सावकार–जमीनदारांच्या मग्रुरीला अगतिक केले. धर्माच्या, देवाच्या आणि दैवाच्या नावाखाली इथे सामाजिक विषमता वंदनीय मानली जाते. पिळवणूक करण्याचे हत्यार म्हणून शोषणकर्ते धर्माचा उपयोग करतात. धर्म हर-घडी गरीब माणसाला लुटतो आणि अत्याचाराविरुद्ध कोणता आवाजच निघू देत नाही. सत्यशोधक समाजाने या धर्माच्या पायात सुरुंग पेरला.

गरिबांना या ना त्या प्रकारे लुटणारा वरिष्ठ माणूस ब्राह्मण असो की ब्राह्मणेतर असो तो सत्यशोधक समाजाला मानवतेचा दुष्मन वाटतो. आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांमध्ये ब्राह्मण, मारवाडी यांच्यापासून मराठ्यांपर्यंत अनेक असतात. जातीय आणि धार्मिक अत्याचार करणारात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांचाही समावेश असतो. यामुळे जाती निर्मूलनाचा आणि आर्थिक विषमतेच्या निर्मूलनाचा लढा सत्यशोधक समाज एकसाथ करू इच्छित होता.

सत्यशोधक समाजाने भारतीय समाजक्रांतीची अचूक दिशा अंगिकारिली होती. ती जाती–वर्गविहीन समाजाकडे जाणारी होती. ही दिशा बुद्धिप्रामाण्य-वादाच्या मार्गदर्शनाखाली कवटाळावी हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

सामाजिक स्वातंत्र्याची चळवळ फुल्यांच्या हयातीतच टिळकांच्या ब्राह्मणी नेतृत्वाने दुर्लक्षिली. धार्मिक अंधश्रद्धा, आर्थिक विषमता आणि जातीय विषमता या गोष्टी नष्ट करण्याऐवजी त्यांना मजबूत करण्याची भूमिकाच स्वातंत्र्यवाद्यांनी घेतली. ही ब्राह्मणशाहीकडे वाटचाल व लोकशाहीशी फारकत होती. समाज-प्रबोधनाशी कट्टर बेईमानी होती.

स्वातंत्र्यचळवळीचे नेतृत्व पुढे गांधीजींकडे गेले. हे नेतृत्वही बुद्धिप्रामाण्य-वादी नव्हते आणि ब्राह्मणी धर्माच्या कक्षेतच ते वावरत होते. गांधींनी वर्गसमन्व-याचा अत्यंत अतार्किक पुरस्कार केला. चातुर्वर्ण्याला त्यांनी आदर्श मानले. चातुर्वर्ण्य टिकविले पाहिजे आणि वर्णसंस्थेतील शूद्र वर्णात अस्पृश्यांचा अंतर्भाव

केला पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन होते. टिळकांप्रमाणे त्यांनीही गीतेतील व पुढल्या ज्ञानेश्वरीतील स्वधर्माची–वर्णधर्माची कल्पनाच उचलून धरली. "ही सकळ लोकसंस्था रक्षणीय गा सर्वथा म्हणौनिया" वंशपरंपरागत व्यवसाय संततीने त्यागू नये असे त्यांना वाटे. रामभक्त गांधीजींचे नेतृत्व समाजाला रामराज्याचा विचार देऊ इच्छिणारे होते आणि हिंदूवेदान्ताचाच वारसा चालविणारे होते.

स्वराज्याची चळवळ उच्चवर्णियांच्या हिताची होती. ब्राह्मण्यपूजन हाच तिचा ध्येयवाद होता. गांधीजींनी ब्राह्मणेतरांना या चळवळीत कोंडले. अस्पृश्यांनाही शूद्रांमध्ये कोंडण्याची भूमिका घेऊन त्यांनाही वरील प्रकृतीच्या स्वातंत्र्य चळवळीला बांधण्याचा प्रयत्न गांधीजींचा होता. थोड्या प्रमाणात हेही त्यांना शक्य झाले. एकूण एरवी समाजक्रांतीच्या युद्धभूमीवर गेले असते ते गट गांधीजींनी प्रतिक्रांतिवादाच्या दावणीला बांधले.

काँग्रेसमध्ये नेहरूंमुळे एक डावी आघाडी तयार झाली होती. पण फुल्यांना वा पुढे आंबेडकरांना अपेक्षित असलेली मूलगामी समाजक्रांती या मार्गाने सर्वथा अशक्य होती. याही आघाडीने आर्थिक आणि जातीय प्रश्न मूलभूत पातळीवरून हाताळलेच नाहीत. आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जी राजवट इथे सुरू झाली ती भांडवलदारांचीच राजवट होती. अर्थात ती त्यांच्या संपूर्ण नियंत्रणात होती. 'घटनेचा मसुदा करणाऱ्या माझ्या समितीने ३१ वे कलम घेतले नव्हते. मला विचाराल तर भारतीय राज्यघटनेत हे एकतिसावे कलम काँग्रेसजनांनी घटनासमितीद्वारे घुसडलेले असून अत्यंत गलिच्छ आहे. माझा त्याच्याशी काही संबंध नाही. मला त्याकडे पाहावेसेही वाटत नाही ' असे खाजगी संपत्तीचा अधिकार बहाल करणाऱ्या एकतिसाव्या कलमाच्या संदर्भात बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. एव्हढेच नव्हे तर संसदीय लोकशाही श्रीमंत व भांडवलदार यांची बटीक राहणार नाही यासाठी समाजवाद घटनेतच अपरिवर्तनीय रूपात मांडला जावा ही बाबासाहेबांची क्रांतिकारी मांडणी होती. आधी समाजवाद आणि त्यासोबत लोकशाही हे बाबासाहेबांचे म्हणणे होते. खऱ्याखुऱ्या आर्थिक समतेशिवाय राजकीय समता कधीच खरीखुरी असू शकत नाही. आर्थिक विषमता असेल तर राजकीय सत्ता ही आर्थिक सत्तेची बटीक होणारच, हा बाबासाहेबांचा क्रांतिकारी प्रस्ताव होता. नेहरूंनी व त्यांच्या शासनाने आंबेडकरी अर्थरचनेचे उद्दिष्ट घटनेत व मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट करायला नकार दिला. या प्रकारे देशातील सर्व पातळ्यांवरील आर्थिक विषमता नष्ट करू शकणारा हा आंबेडकरी आर्थिक लोकशाहीचा विचार नाकारला गेला.

आंबेडकरांच्या आर्थिक लोकशाहीबरोबरच काँग्रेस शासनाने सामाजिक लोकशाहीचा दस्तऐवज असलेल्या आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलाचीही वासलात लावली. काँग्रेसी परंपरावाद्यांनी समाजक्रांतीकडे जाणारे हे द्विविध मार्ग बंद केले. परंपरावादी व आंबेडकर या लढाईत पंडित नेहरूंनाही परंपरावाद्यांचीच बाजू घेणे उचित वाटले. यामुळे–

(१) "राज्य हे दुर्बलतर जनवर्ग, आणि विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील, आणि सामाजिक अन्याय व **सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे संरक्षण करील.**" (भारतीय संविधान, अनुच्छेद : ४६)

(२) "ज्या समाज–व्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय हा राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था होईल तितक्या परिणामकारक रीतीने प्राप्त करून देऊन व तिचे संरक्षण करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील." (अनुच्छेद, ३८. [१] )

"राज्य हे विशेषत: केवळ व्यक्तीव्यक्तींमध्येच नव्हे तर निरनिराळ्या व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकसमूहांमध्येदेखील, उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी झटून प्रयत्न करील आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील." (अनुच्छेद, ३८ [२])

(३) "जनसामान्याच्या हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्वाधिकार व नियंत्रणाधिकार यांचे वाटप व्हावे !" (अनुच्छेद–३९ [ख])

"आर्थिक यंत्रणा राबवताना परिणामी धनदौलतीचा व उत्पादनसाधनांचा जनसामान्यास अपायकारक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी संचय होऊ नये."

(अनुच्छेद ३९ [ग])

(४) "राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही." (अनुच्छेद १५ [१])

(५) "अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे..." (अनुच्छेद, १७)

(६) "विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे." (अनुच्छेद : ५१[ज्])

या कलमांच्याद्वारा भारतीय संविधानाने भारतीय समाजाला आर्थिक व सामाजिक समतेचा ध्येयवाद दिला. जातीविहीनतेचा ध्येयवाद दिला, विज्ञान-निष्ठेचा ध्येयवाद दिला तो शासनातील परंपरावादी मानसिकतेमुळे, भांडवली आणि जातीय धर्मांध मानसिकतेमुळे नाकारला गेला. हे राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांकडून स्वातंत्र्यपूर्व काळात घडले आणि स्वातंत्र्योत्तर काळात सत्ताधाऱ्यांच्या हातून घडले. कारण ही चळवळ व सत्ताचालक हे भांडवलदार व जमीनदार यांच्या नियंत्रणाखाली होते.

क्रांतिकारी चळवळीला खरे नेतृत्व एतद्देशीय साम्यवादी नेते देऊ शकत होते काय ? देऊ शकतील काय ? साम्यवादी नेते बहुतांशी ब्राह्मण आहेत. हे ब्राह्मण नेतृत्व नेहमीच शंकास्पद राहिले. हे नेतृत्व सुखवस्तू मध्यमवर्गीय होते. वृत्तीने परंपरावादी होते. या नेतृत्वाला येथील आध्यात्मिक व धार्मिक परपरेचा अभिमान होता. सावकार, जमीनदार, भांडवलदार आणि वर्ण–जातिवादी धर्म–परंपरा यांच्याशी बांधिलकी असणारी एतद्देशीय विचारधारा ब्राह्मण कम्यु-निस्टांना सोडता आली नाही. ते मनाने कट्टर हिंदू होते. परंपरावादी होते. भारता-तील कोणा कम्युनिस्टाने हिंदू धर्माचा त्याग केल्याचे उदाहरण नाही. स्वत: हिंदू धर्माभिमानी असल्याने आणि येथील सामाजिक विषमता हिंदू धर्माशी निगडीत असल्याने सामाजिक विषमतेच्या निर्मूलनाच्या संदर्भात कम्युनिस्ट नेते कधी बोलले नाहीत. ती त्यांची अडचण आजही कायम आहे. म्हणून आर्थिक संदर्भात चालणारे कामगार लढे या संदर्भात सोयीचे म्हणून त्यांनी चालविले. सत्यशोधक चळवळीच्या ध्येयधोरणाशी तर सोडाच पण ब्राह्मणेतर चळवळीच्याही धोरणाशी साम्यवादी चळवळ नाते जोडू शकली नाही.

साम्यवादी चळवळीने फुले–आंबेडकरांचा क्रांतिविचार लक्षातच घेतला नाही. कारण हा विचार भारतीय सरंजामशाहीच्या (आणि भांडवलशाहीच्याही) निर्दय चिकित्सेचा विचार होता. येथील ब्राह्मण्यग्रस्त साम्यवाद्यांना तो सहन होण्यासारखा नव्हता. येथील साम्यवादी चळवळ आपल्या पोथीच्या तोऱ्यात त्यामुळे क्रांतीला कन्फ्युज करण्याचे कार्य तेवढे करीत राहिली. या साम्यवादी नेतृत्वाने लो. टिळकांचा वारसा वंदनीय मानला. त्यांची प्रेरणा स्वीकारली पण या देशातील सांस्कृतिक शोषणाविरुद्ध जिहाद पुकारणारी भौतिकवादी विचार-परंपरा कम्युनिस्टांनी बुद्धयाच दुर्लक्षिली. त्यामुळे मुळात कम्युनिस्ट तत्त्वज्ञान

क्रांतिकारी पण येथील कम्युनिस्ट नेतृत्व मुख्यत्वे प्रतिक्रांतिकारी छावणीतच कायम बांधलेले राहिले. अस्पृश्यता, जातीयता यांच्या निर्मूलनाची मीमांसा कम्युनिस्टांनी केली नाही. त्यामुळेच डांगेसारख्यांचे ब्राह्मणी नेतृत्व कॉंग्रेस क्रांतिकारी आहे, असे सांगू शकले आणि भारतात क्रांत्युत्तर काळात भांडवलदार व कामगार यांच्या संयुक्त शासनाची आंधळी कल्पना करू शकले. बी. टी. रणदिवे यांच्यासारखे कम्युनिस्ट नेते क्रांत्युत्तर काळात इथे कामगार व शेतकरी यांच्या संयुक्त शासनाची कल्पना मांडतात. वरील दोन्ही उत्तरांमध्ये या देशातील जातिसंस्थेचा विचार नाही. या दोन्ही नेत्यांचा हा कल्पनाविलास पाहिला तर परकीय माणसाला वाटेल की जातीचे क्रौर्य, धर्मान्धता आणि अस्पृश्यता या भयानक गोष्टी इथे नव्हत्याच! या पातळ्यांवर या देशात हजारो वर्षे अव्याहतपणे शोषण सुरू आहे. आजही ते अधिक तीव्र रूपात सुरू आहे. या शोषणाचा विचार न करण्याइतके हे बिनमहत्त्वाचे आहे असे कम्युनिस्टांना वाटणे शक्य असले तरी ही चूक या देशात क्रांती करू इच्छिणारांना करता यायची नाही. या ब्राह्मणी नेतृत्वाने या शोषणावर लक्ष केंद्रित केले असते तर त्यांना फुले–आंबेडकर या ब्राह्मण्यभंजक नेतृत्वाचा अंगिकार करावा लागला असता आणि त्यांच्यातील ब्राह्मण्याचा अहंकार त्यामुळे भयंकर दुखावला असता. परदेशातला नेता पुरवला, येथील अब्राह्मणी सरणीचा नेता नको या धारणेमुळे फुले–आंबेडकरांना दुर्लक्षिण्याचा दांभिकपणा येथल्या कम्युनिस्ट नेतृत्वाने केला. या संदर्भात या नेतृत्वाने केवळ क्रांतिरोधनाचे कार्य केले असेच म्हटले पाहिजे. डॉ. आंबेडकर म्हणाले होते, "लेनिन हिंदुस्थानात जन्मला असता तर प्रथम त्याने जातिभेद व अस्पृश्यता यांना साफ गाडून टाकले असते व तसे केल्याखेरीज क्रांतीची कल्पना त्याने मनातही आणली नसती." सरंजामी जातीय मानसिकतेने या देशाचे वाटोळे केले आहे आणि संपत्तीच्या विषम वाटणीमुळे कोटयवधींचे जीव मूठभर लुटारूंच्या हातात पडले आहेत. यातून समाज मुक्त व्हावा हे तर खरेच पण इथला कामगार व या कामगारांचे नेते हे करू शकतील काय? कारण आपला कामगार सरंजामी संस्कारातून वा क्रांतिविरोधी पारंपरिक संचितातून बाहेर पडला नाही. कामगार नेतृत्वही असेच आहे. याचा फायदा क्रांतिविरोधी शक्ती घेतात. इतके अजागळपणे–भोंगळपणे सर्व चालल्यानंतर इथे क्रांती होण्याची भीती कोणाही क्रांतिविरोधकाने बाळगायला नको. या देशात क्रांती करू पाहणाऱ्या लोकांच्या मनातील धर्मान्धता व जातीयता नष्ट झाली नाही तर क्रांत्युत्तर काळात येथील गरीब आणि तळागाळातील लोक जातिवाद्यांच्या जुलमाला बळी पडणे अटळ आहे. अशी क्रांती कोणासाठी? कशासाठी? ती होऊन उपयोग काय? या क्रांतीला क्रांती तरी कशासाठी म्हणायचे?

ब्राह्मण्यग्रस्त कम्युनिस्ट नेतृत्वाने खालच्या जातीतील लोकांना अनुयायी म्हणून केवळ वापरले. क्रांतीची गरज असणाऱ्यांमधून नेतृत्व फुलवलेच नाही. असे झाले असते तर देश आजवर कदाचित क्रांतीच्या केंद्राकडे वेगाने सरकला असता. खालच्या जातीतून उगवलेले नेतृत्व कदाचित पंडित वा पढिक असले नसते पण यथार्थ असले असते. प्रामाणिक असले असते. त्याच्या बोलण्याला इथल्या मातीचा वास असला असता. त्याच्या विश्लेषणाला झेंड्याची लाली असण्यापेक्षा त्याच्या रक्ताची लाली असली असती.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याच्या निमित्ताने भयानक हत्याकांड झाले. घरे जाळली, माणसे जाळली. मारहाण तर ठिकठिकाणी अत्यंत क्रूरपणे झाली. दलितांच्या बंधमुक्तीवरचा खूप दिवसांचा साचलेला राग या निमित्ताने परंपरावाद्यांनी काढला. मराठवाड्यात दलितांच्या विरोधात दंगली पेटवण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पुढाकार घेतला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या दोन्ही पक्षांचे नेते नामांतर विरोधकांमध्ये सहभागी झाले. दलितांच्या विरोधात दंगली करणाऱ्यांमध्ये ते सामील झाले. त्यांचे ते दोस्त झाले. कम्युनिस्ट नेतृत्व या देशात परंपरावाद्यांची पाठराखण करते हे या निमित्ताने सिद्ध झाले. जातीयवाद्यांचे हात बळकट करून येथील शोषितांवर जाहीरपणे अन्याय करायला ते पुढे येते हे स्पष्ट झाले. ते आर. एस. एस. शी युती करते त्याला कारण 'ब्राह्मण्य'. त्यामुळेच एखादा कट्टर हिंदुत्ववादी कम्युनिस्ट कार्यकर्ता आर. एस. एस. आणि कम्युनिस्ट यांच्या एकत्र येण्यानेच केवळ या देशात क्रांती होऊ शकते असे म्हणू शकतो. हे 'ब्राह्मण्य' व त्यात अंतर्भूत असलेली जात व धर्म याविषयीची कडवी ममता या गोष्टी कम्युनिझमच्या मूलतत्त्वाविरोधी आहेत असे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे होते. हे सत्य होते–

या देशातला हा कम्युनिस्ट नेता समाजक्रांतीला नेतृत्व वा विचार देऊ शकत नव्हता. या देशातील राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व जसे प्रतिगामी व उच्च-वर्ण, भांडवलदार–जमीनदार यांचे हस्तक होते तसे या देशातील कम्युनिस्ट नेतृत्वही प्रतिगामी आणि क्रांतिविरोधीच होते.

राष्ट्रीय चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, कम्युनिस्ट चळवळ एवढेच काय आपल्या प्रबोधनाची चळवळही सत्यशोधक समाजाचा आशय पेलू शकली नाही. सत्यशोधक समाजाचा पराभव झाला याला कारण येथील वेगवेगळ्या संदर्भातील नेतृत्वाने आणि पर्यायाने त्यांच्या अनुयायांनी क्रांती हे ध्येय नाकारण्याचेच कार्य केले हे आहे असे म्हणायला हवे. सत्यशोधक चळवळीला पुढे खरे क्रांतिकारी

नेतृत्वच मिळाले नाही. त्यामुळे ती काँग्रेसमध्ये गेली. शरद जोशींची शेतकरी चळवळ परत सत्यशोधक समाजाचा आशय नाकारून शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांपुरतीच मर्यादित झाली. सत्यशोधक समाजाचे ध्येय जातिसंस्थेचा उच्छेद आणि आर्थिक विषमतेचा उच्छेद असे दुहेरी होते. ती चळवळ खऱ्या अर्थाने जनतेच्या शत्रूंना अधोरेखित करीत होती आणि क्रांतीच्या शत्रूंना अनावृत्त करीत होती. त्यामुळे वरिष्ठ वर्णीयांनी व श्रीमंतांनी या चळवळीला मनोमन शत्रू मानले.

क्रांतीचे शत्रू कोण ? या प्रश्नाचे अत्यंत अचूक उत्तर सत्यशोधक फुल्यांनी दिले होते. हे शत्रू होते–

१. जमीनदार सावकार, आणि

२. धर्मान्ध स्थितिवादी उच्च वर्ण

हे दोन्ही शत्रू आर्थिक आणि सामाजिक विषमतेच्या आगीत गोरगरिबांना जाळत असतात. हे दोन्ही शत्रू आपापल्या जातीच्या लोकांच्या मनातील धार्मिक व जातीय अंध ममत्वाचा उपयोग करून शोषण निर्विघ्न करीत असतात. हे शोषण चिरंतन चालावे यासाठी धार्मिक व जातीय अंध ममत्व कायम राहील याची काळजी साहित्य आणि इतर सर्व प्रचारमाध्यमांच्या द्वारा ते घेत असतात.

आपला ग्रामीण विभाग अजूनही सांस्कृतिकदृष्टया काळझोपेत आहे. तो धर्मान्ध बनविला जातो आहे. त्याने प्रबोधनाला बगलच दिली आहे. गर्वसे तो काहीबाही म्हणत प्रबोधनाला आणि माणुसकीला लाज आणतो आहे.

आजचे चित्र भयंकर यातनादायी आहे. हिंदूधर्मात गुलामीचे जिणे बिनबोभाट जगणारा लाचार अडाणी दलित ते ओझे झुगारून देऊन माणुसकीच्या हक्कांसाठी युद्धाला सिद्ध होताच हिंदूधर्मव्यवस्था त्याच्यावर गरळ ओकीत आहे. हा बंधमुक्तीचा तिरस्कार आहे. स्वातंत्र्याचा द्वेष आहे. ही माणुसकीचीच भीती आहे. सर्वसामान्य गरीब ब्राह्मण वा ब्राह्मणेतर मनुष्य, ब्राह्मण–मराठा नेत्यांच्या भूलथापांना बळी पडून माणुसकीच्या अभियानाला विरोध करतो आहे. वस्तुतः त्यालाही ब्राह्मण–मराठा शोषणकर्त्या शक्तींनी आपल्या वेडया स्वार्थाच्या गाडयाला जुंपले आहे. धर्म व जात यांची मादक द्रव्ये चारून जुंपले आहे.

अंधश्रद्धांचा तर आज सुळसुळाट झाला आहे. या बाबतीत शहरी, बुद्धिजीवी, सुशिक्षित आणि खेडयातील अडाणी माणूस यांच्यात कोणताही गुणात्मक फरक नाही. हे सर्वच सरंजामी संस्कारशाळेचे किंवा अंधश्रद्धेच्या गर्दचे बळी

आहेत. पुरोहितशाही ब्राह्मणांमध्ये व बहुजन समाजामध्ये तर आहेच पण भिक्षूंच्या रूपाने तिचा दलितांमध्येही भयानक प्रकर्ष झाला आहे.

दलित, आदिवासी, स्त्रिया, कामगार, भटके विमुक्त यांना या शोषक समाजसंस्थेचे बळी म्हणून एका भूमिकासूत्रात गुंफणे आवश्यक आहे. फुल्यांचा आणि नंतर आंबेडकरांचा लढा आर्थिक व सामाजिक समतासंपादनाच्या हेतूने पण मुलत: वरील दोन्ही क्षेत्रातील ब्राह्मण्यनिर्मूलनासाठी चाललेला लढा आहे. कोणा एका जातीविरुद्धचा हा झगडा नसून कोणती जातच उरू नये यासाठी जातीय मानसिकतेच्या आमूल नि:पाताचा तो लढा आहे. कोणा एका जातीतील जमीनदार, भांडवलदार यांच्याविरुद्धचा हा झगडा नसून जमीनदारी आणि भांडवली सैतानव्यवस्थाच अस्तित्वात असणार नाही यासाठी तो लढा आहे. कोणत्याही शोषणाविरुद्धचा झगडा हा प्रकृतीत: झगडा म्हणून उभा राहिला की तो वर्गलढा होतो. चार्वाक, बुद्ध–फुले–आंबेडकर यांनी उभारलेले झगडे या संदर्भात वर्गीयच असतात. झगड्याला वर्गीयत्व येण्यासाठी वा तसे ते असते ते हे कळण्यासाठी कोणा मार्क्सने होऊन जाण्याची गरज नसते. आपण विचार करायला सुरवात केली की आपण वर्गीय होतोच. कारण विचारप्रक्रियाच प्रकृतीत: वर्गीय असते.

या सर्व पार्श्वभूमीवर आज सत्यशोधक समाज आमूलाग्र समाजक्रांतीसाठी आपली विचारसंहिता आणि आचारसंहिता मांडत आहे. सत्यशोधक समाज आपले क्रांतीतत्त्वज्ञान आज आंबेडकरवादात पूर्ण विकसित रूपात मांडले गेले आहे असे मानतो. त्यामुळे लोकशाही समाजवादी क्रांती हे सत्यशोधक समाजाचे ध्येय आहे. या क्रांतीशिवाय मनुष्याला मनुष्य, समाजाला समाज, राष्ट्राला राष्ट्र म्हणता येणार नाही. ही क्रांतिदिशाच या समाजाला अमानुषतेच्या संकटातून मुक्त करू शकते. क्रांती व्हावी आणि क्रांती होईलच ही खात्री सत्यशोधक समाजाला आहे. याला कारण त्याची पुढील भूमिका.–

**सत्यशोधक कोण** ? ज्याने स्वत:ला जाती–धर्मविहीन करून घेतले आहे आणि जो सर्व समाजाला जाती–धर्मविहीन म्हणजे 'ब्राह्मण्यविहीन करण्यासाठी सर्वशक्तीनिशी प्रयत्नशील आहे असा बुद्धिप्रामाण्यवादी आणि समतावादी मनुष्य सत्यशोधक होय.

**सत्यशोधकाचे मित्र कोण ?** : कोणतीही जात व धर्म असलेला मनुष्य सत्यशोधकाचा मित्र नव्हे. बुद्धिप्रामाण्य व समता या दिशेने धावणारी परिवर्तनाची जाणीव ज्याचे जन्ममूल्य झाली आहे असा मनुष्य सत्यशोधकाचा मित्र होय.

वर्णव्यवस्था, जातीसंस्था, धर्मसंस्था व वर्गव्यवस्था नष्ट करू पाहणारे सर्व लोक सत्यशोधकाचे मित्र होत. बुद्धिप्रामाण्यवादी म्हणजे ईश्वर, आत्मा, स्वर्ग, मोक्ष, परलोक, पुर्वजन्म, पुनर्जन्म, बाबाबुवा, अंधश्रद्धा व चमत्कार इत्यादी न मानणारा मनुष्य—हा सत्यशोधकाचाच मि होय.

आर्थिक, सामाजिक विषमतेला आणि धार्मिक व राजकीय दडपशाहीला जाणता अजाणता बळी पडलेला व या खातेऱ्यातून मुक्त होण्यासाठी क्रमाने आमच्या भूमिकेकडे यायला लागलेला मनुष्य सत्यशोधकाचा मित्र होय.

**सत्यशोधकाचे शत्रू कोण ?** : जमीनदार, सावकार, भांडवलदार आणि यांची भाटगिरी करणारे शासन, साहित्य. वरिलांचे हस्तक व त्यांच्या सर्व प्रचारयंत्रणा.

जात मानणारे व तिचा गर्व बाळगणारे, धर्म मानणारे व त्याचा गर्व बाळगणारे, ईश्वर—अध्यात्म मानणारे, या ना त्या प्रकारे इतरांना लुबाडण्याची व तुच्छ मानण्याची वृत्ती बाळगणारे.

धर्म व जात या मादक द्रव्यांच्या नावे राजकारण खेळणारे, बुवाबाजी व अंधश्रद्धा पसरवणारे लोक, पक्ष आणि त्यांना स्वातंत्र्य देणारे शासन, हे सर्वच सत्यशोधकाचे शत्रू होत.

**आजचे प्रश्न** : जातीसंस्था, अंधश्रद्धा, स्त्री, देवदासी, आदिवासी, भटके-विमुक्त, कुटुंबनियोजन, धर्मान्धता, शिक्षण, बेकारी.

**जातिसंस्था** : जातिसंस्थेने आणि अस्पृश्यतेने भारतीयांची माणुसकी प्रश्नार्थक केली आहे. वर्णसंस्थेनेही विषमतेचाच शाप या देशाच्या आयुष्यात पेरला. वरील सर्व गोष्टींनी भारतीय समाज दरिद्री आणि प्रगतीविन्मुख राहिला. पोटजातींनीही समाजाचे आणखी उपविभाग पाडले. भारतीय समाजातील ही भयंकर प्रक्रिया समाजाच्या विघटनाचीच प्रक्रिया आहे. या देशाच्या मातीतच विघटनाचे क्षार असावेत. ते आपल्या दिव्य परंपरेनेच पेरून ठेवले असावेत. विविधतेत एकता ही समजूत केवढी निरर्थक असू शकते त्याचे प्रत्यंतर इथे हरघडीला येत आहे. या देशाच्या आळघातच प्रतिगामी परंपरांनी असे विष ओतून ठेवले आहे की या देशाच्या झाडाला राष्ट्रीय एकात्मतेचे फळ येणे अशक्यच ठरावे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी बुद्धिप्रामाण्यवाद व समता यांची गरज असते पण नेमक्या या गोष्टी टाळल्या आणि या देशाने विषमतेच्या तत्त्वज्ञानाचा व आचारांचा ईश्वरप्राप्तीशी संबंध सांगून देशात एकात्मतेचे अशक्य स्वप्न पाहिले. राष्ट्र

एकात्म व्हावे, समाज एकात्म व्हावा आणि मनुष्य एकात्म व्हावा यासाठी व माणुसकीचे पर्व सुरू करण्यासाठी या घृणास्पद जातिसंस्थेचा उच्छेद करणे हे सत्यशोधक समाज आपले आद्य कर्तव्य मानतो.

**धर्मांधता व अंधश्रद्धा :** हिंदूधर्माच्या शिकवणुकीचा परिणाम म्हणून आपला समाज विज्ञानविरोधी व अंधश्रद्ध बनला. ब्राह्मण्याने त्याची गती व सर्जनशीलता मारली. धर्माने माणसामाणसातील संबंधांविषयी जे नियम सांगितले त्यांना नैतिकता म्हणता येत नाही तर अनैतिकता असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. नंतरच्या सर्व उपअंधश्रद्धा देव मानणे या मुख्य अंधश्रद्धेतून जन्माला येतात. सतीप्रथा, देवदासी, नवस, भक्ती–पूजा, मोक्ष, दैव, भूत, बुवा, सटीमाय, बाबा, जात, असेच इतर भेदभाव व मंगळागौर, हरतालिका, वटसावित्री आणि अशीच सर्व व्रतवैकल्ये या सर्व अंधश्रद्धांचे निर्मूलन व्हावे ही समाजाची आग्रही भूमिका आहे.

**आदिवासी :** यालाही संस्कृतीने कक्षेबाहेरच ठेवले. जंगलातल्या अंधारात व डोंगरदऱ्यात त्याला जणू गाडले. त्याच्या जमिनी इतर हुशारांनी बदमाषीने हिसकावून घेतल्या, त्या त्याला शासनाने परत मिळवून द्याव्यात. त्याला आता त्यांच्या जमिनीवर गुलामाप्रमाणे राबावे लागते. त्याचे व आदिवासी स्त्रीचे शारीरिक मानसिक शोषण होते. आदिवासी हा काळोखाचा कैदी आहे. त्याच्या शोषणाची कहाणी त्याला समजावून सांगून, शिक्षणाने व प्रबोधनाने त्याला दलितांशी जाणिवेने जोडले पाहिजे. उद्याच्या क्रांतीचा दलितांसोबत तोही एक कर्णधार असणार आहे.

**भटके–विमुक्त** : हेही शिक्षणापासून आणि माणुसकीपासून वंचित राहिले आहेत. त्यांना गाव नाही, घर नाही. १९५१–५२ मध्ये गुन्हेगारांच्या वसाहतीचा कायदा रद्द होऊनही भटक्या–विमुक्तांच्या जगण्यात नवा दिवस उगवला नाही. जुनीच रात्र सुरू राहिली. इतरांच्या डोळ्यात तो गुन्हेगारच आहे. पोलिसही त्याला जुन्या समजुतींच्या हातांनीच बेदम मारतात. या भारतमातेच्या औरस-पुत्रांचे भटके–विमुक्तपण संपले पाहिजे. त्यांना विशेष सवलती देऊन संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. त्यांच्या शिक्षणाची, प्रबोधनाची विशेष व्यवस्था व्हायला पाहिजे. यापुढे 'देशात जन्माला येणारे कोणतेही मूल आदिवासी, भटके विमुक्त, दलित असणे ही बाब देशाच्या माणुसकीला लांच्छनास्पद वाटली पाहिजे.' म्हणून या दुर्बळ घटकांच्या उत्थानासाठी समाजाला व शासनाला प्रयत्न करायला सत्यशोधक समाज भाग पाडील.

**स्त्रियांची** मानसिक जागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. परंपरेच्या जोखडात स्त्री स्वतःही जखडून राहण्यात पुण्य मानते. स्त्रिया या मोठ्या प्रमाणात परंपरावादाच्या रखवालदार आहेत. मुलांमध्ये विषारी संस्कृतीचा प्रवेश मुख्यत्वे त्यांच्याद्वारा होतो. अर्थात त्या विज्ञाननिष्ठ झाल्या तर त्या क्रांतीच्या पाठशाळांचे महनीय कार्य करू शकतात. नवरा व्यसनी, दुष्ट, मूर्ख असणे या स्त्रियांच्या ज्वलंत समस्या होत. हुंडा, सतीप्रथा, बालविवाह, दोनपेक्षा अधिक मुले, घटस्फोट, पोटगी असे अनेक प्रश्न तिच्या जीवनात निर्माण होणार नाहीत, ती सन्मानाने, समतेने समाजात जगू शकेल यासाठी सत्यशोधक समाज सर्वप्रकारचे प्रयत्न करील. मुस्लिम भगिनींच्या समस्याही खूपच जीवघेण्या आहेत. निराळ्या आहेत. समान नागरी कायद्यामुळे या समस्यांचे निराळेपण संपुष्टात आणणे निकडीचे आहे. स्त्रीच्या माणुसकीच्या निर्मितीसाठी, सत्यशोधक समाज शासनाच्या व स्त्रीमुक्ती कार्य करणाऱ्या भगिनींच्या सहकार्याने मूलगामी योजना राबवील. १९३४ च्या कायद्यानुसार देवदासी प्रथा बंद करण्यात आली; पण धर्माच्या नावाने आजही हे सुरूच आहे, हे बंद करणे सत्यशोधक समाज आपले आद्य कर्तव्य मानतो.

**शेतीच्या** व उद्योगधंद्यांच्या संबंधात सत्यशोधक समाज डॉ. आंबेडकरांचा स्टेट अँड मायनॉरिटीज मधील दृष्टिकोण पुरस्कारील. आज समाजवादाच्या आडोशाने जातिसंस्था व आर्थिक विषमता यांचे संगोपन होत आहे. ही अर्थव्यवस्था मक्तेबाज भांडवलदारांची आहे. जमीनदार व बडे शेतकरी हे भांडवलदारांइतकेच या देशातील सामाजिक व आर्थिक विषमतेचे रखवालदार आहेत. नवा माणूस व माणुसकी निर्माण करण्यासाठी शेती व इतरही सर्व उत्पादन साधनांची मालकी समाजाच्या हाती देणे आवश्यक आहे. भांडवलशाही, सामंतशाही, संमिश्र अर्थव्यवस्था व भांडवलशाही अर्थनियोजन याविरुद्ध लढा संघटित करणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय आहे.

याप्रकारे क्रांतीच्या मार्गात अडथळे ठरणाऱ्या सर्व समस्यांचे निराकरण व्हावे, त्यातून जाती–वर्ण–धर्मविहीन म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व बुद्धिप्रामाण्यावर आधारलेला समाज निर्माण व्हावा (तपशील खूप नोंदविता येईल. पण त्यापेक्षा तत्त्वे निश्चित झाली की तपशीलासंबंधीचा निर्णय लागू शकेल.) हे ध्येय सत्यशोधक समाजाचे आहे. या ध्येयाची यशस्विता आणि क्रांती या गोष्टी दोन गोष्टी नव्हत.

## प्रतिज्ञा

१. मी प्रतिज्ञा करतो की, मी सत्यशोधक आहे, आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि विज्ञाननिष्ठा या पंचशीलाच्या पायावर नवा समाज निर्माण करणे हे माझे परम ध्येय आहे.

२. जाती–धर्मविहीन व लोकशाही समाजवाद अर्थात धम्मराज्य स्थापन करण्यासाठी मी सर्व प्रकारांनी माझी कृतीशक्ती व उक्तीशक्ती पणाला लावीन.

३. मी मला परंपरेने चिकटलेली जात सोडतो आहे आणि मला भेटलेला न भेटलेला मनुष्य माझ्यासाठी केवळ मनुष्य आहे आणि त्याची कोणतीही जात माझ्यासाठी इत:पर उरलेली नाही.

४. मला परंपरेने चिकटलेल्या धर्मांचा मी मनापासून त्याग करून स्वत:ला धर्मविहीन करून घेतो आहे. त्याऐवजी समतादर्शी व बुद्धिप्रामाण्यदर्शी अशा सत्यशोधक जीवननीतीचा जीवनशैली म्हणून मी अंगिकार करतो. आंबेड-करांचा धम्म याहून वेगळा नाही, हे मी मानतो.

५. ईश्वर ही वस्तुस्थिती नसून ती केवळ संकल्पना आहे. अंधश्रद्धांचा व सामाजिक आणि आर्थिक विषमतेचा आधार असलेली ही संकल्पना अत्यंत विघा-तक म्हणून मी तिचा त्याग करतो.

६. दैववाद हे शोषितांना दुबळे ठेवणारे व क्रांतिभान जन्माला येऊ न देण्याची खबरदारी घेणारे शोषकांचे तत्त्वज्ञान असते. माणसाला गुलाम करणाऱ्या या दैववादाला मी शत्रू मानतो आणि त्याचा त्याग करतो.

७. कर्मविपाकाच्या धूर्त सिद्धान्तामुळे पूर्वजन्म–पुनर्जन्म व मोक्ष या कल्पा सिद्ध होतात. समाजाला गतिशून्य करणारे हे ब्राह्मणी तत्त्वज्ञान होय. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या गब्बर असलेल्यांना आपल्या हितासाठी परिवर्तन टाळणे भागच असते. वरील सर्व ब्राह्मणी विचारांचा शोषणाचा विचार म्हणून मी त्याग करतो.

८. विवाह किंवा असेच कोणतेही विधी धार्मिक पद्धतीने करणे मला अमान्य आहे. मी स्वत: ते या पद्धतीने करणार नाही व कोणी केले तर त्यात सहभागी होणार नाही.

९. कोणतीही धार्मिक व्रतवैकल्ये मी करणार नाही. नवस–सायास कर-णार नाही. पूजा करणार नाही. कोणत्याही देवी–देवतांचे फोटो घरात ठेवणार

नाही. बाबा बुवांना मानणार नाही व त्यांचे फोटो घरात ठेवणार नाही. कुणा बाबाबुवांच्या यात्रेला मी जाणार नाही.

१०. कोणत्याही जातिवादी संस्थेशी मी संबंध ठेवणार नाही. तिच्या कार्यक्रमांना जाणार नाही.

११. मी स्वत:च्या लग्नात वा मुलांच्या लग्नात हुंडा घेणार नाही. दुसरे कोणी घेणार नाहीत यासाठी प्रयत्न करीन. विवाहादी विधी कोणताही डामडौल न करता अत्यंत साध्या पद्धतीने करीन. हे सर्व विधी मी पारंपरिक पद्धतीने करणार नाही.

१२. ज्यांनी बुद्धिप्रामाण्यवाद सांगितला, जाती निर्मूलनासाठी प्रयत्न केले, समतेचा पुरस्कार केला व बंधुत्वालाच नीती मानले त्यांनाच केवळ मी आदरणीय महापुरुष मानीन. बुद्ध, फुले, आंबेडकर हे असे महापुरुष होत असे मी मानतो व कोणत्याही सभासमारंभात, लग्न वा नामकरणादी सोहळ्यात त्यांचीच छायाचित्रे लावीन.

१३. दारू, सिगारेट, बिडी, तंबाखू, पान यांचे वा इतर कोणत्याही अमली पदार्थांचे सेवन मी करणार नाही. त्यांचे उत्पादन वा आयात बंद करण्यास संबंधित यंत्रणेला भाग पाडीन. वरील व्यसनापासून भेटेल त्याला मुक्त करण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन.

१४. होळीला मूर्खपणे लाकडे जाळणे वा रंगपंचमी खेळून लाखो रुपयांचा रंग विनाकारण व्यर्थ वाया घालणे आणि बदल्यात खून – भांडणे करणे या मूर्खपणाच्या गोष्टी मी करणार नाही. इतरांना त्यापासून मी परावृत्त करीन.

१५. रावणदहनासारखे कार्यक्रम करणे अनुचित होय. तसेच दिवाळी-सारख्या सणाला देशात कोटयवधी रुपयांचे फटाके फोडले जाणे, काही ठिकाणी त्यामुळे लागणाऱ्या आगींनी देशाची सम्पत्ती जळणे योग्य नव्हे. तेव्हा या विघा-तक मिजाशीत भाग घेणार नाही व कोणी तो घेणार नाही यासाठी प्रयत्न करीन.

१६. शासनाने घटनेच्या धोरणानुसार लोकांना बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञानवादी व सुधारणावादी करावे. शासनातील कोणीही व्यक्ती मंदिरात जाणार नाही वा बाबाबुवांच्या यात्रेत सामील होणार नाही, यासाठी घटनेला साक्ष ठेवून प्रयत्न करीन.

१७. कोणाही बुद्धिप्रामाण्यवादी व समतावादी माणसाच्या व संस्थेच्या प्रयत्नांच्या पाठीशी मी उभा राहीन.

१८. सत्यशोधक समाजाच्या निशाणाखाली सर्व दलित आदिवासी, कामगार, भूमिहीन शेतमजूर गरीब शेतकरी, कनिष्ठ मध्यमवर्ग, विद्यार्थी आणि तरुण वर्ग यांना एकत्र आणून समाजक्रांतीसाठी त्यांची लढाऊ संघटना उभारण्यासाठी सक्रीय राहीन.

१९. ब्राह्मणी संस्कृती मनात मुरलेल्या सर्वांचे मानसिक प्रबोधन करून तिच्या मगरमिठीतून त्यांना मुक्त करण्याचा प्रयत्न करीन. सर्वसामान्य माणसाला जातिद्वेष, धर्मान्धता वा अंधश्रद्धा पाजणारे कोणीही असोत, त्यांना समाजात कोणतीही प्रतिष्ठा मिळणार नाही असे वैचारिक वातावरण निर्माण करण्याचा मी प्रयत्न करीन.

२०. सत्यशोधक समाजाची प्रतिज्ञा गुंडाळून स्वार्थासाठी फुले-आंबेडकरांच्या नावाचा उपयोग निवडणुकादी प्रसंगी कोणाला मी करू देणार नाही.

२१. सेवाभाव, त्यागभाव अंगी बाणवण्याचा आणि अभ्यासू वृत्ती व नवनिर्मितीक्षम वृत्ती यांची वाढ करण्याचा प्रयत्न मी करीन.

२२. जबाबदारीने व गांभीर्याने जगण्याचा, तसेच ऐहिक पातळीवरील मैत्री व करुणा यांनी युक्त जीवन जगण्याचा निर्धार मी करतो.

२३. कोणताही भ्रष्टाचार मी स्वतः करणार नाही आणि इतरांना माझ्यापरीने त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीन.

२४. चित्रपट, दूरदर्शन, आकाशवाणी व कीर्तन अशा प्रचारमाध्यमांद्वारा होणारा प्रतिगामित्वाचा आणि भोगवादी संस्कृतीचा प्रचार सत्यशोधक म्हणून मला विषारी वाटतो. समाजक्रांतीसाठी हे सर्व बंद करण्याचा मी व्यक्तिगत व सामूहिक पातळीवरून प्रयत्न करीन.

२५. जाती-वर्ण-वर्ग-धर्मविहीन म्हणजे समता स्वातंत्र्य बंधुता न्याय व बुद्धिप्रामाण्य यावर आधारलेला समाजच माणुसकीच्या निर्मितीसाठी, रक्षण व संवर्धनासाठी आवश्यक आहे. त्यामुळे अशा समाजाची निर्मिती हे मी माझे परम कर्तव्य मानतो.

□ □

# प्रबोधनकार आंबेडकर

इंग्रजी सत्तेसोबत पाश्चात्य संस्कृती आली. ही संस्कृती इहवादी, उद्योग-प्रधान आणि विज्ञाननिष्ठ होती. या राजकीय स्थित्यंतराने भारतीय समाज आधुनिकतेच्या प्रवाहात सापडला. मानवत्वाच्या प्रतिष्ठेसाठी एक संघर्ष सुरू झाला. व्यक्तिस्वातंत्र्य, ऐहिकनिष्ठा, न्याय आणि बुद्धिप्रामाण्य या नव्या मूल्यांच्या प्रस्थापनेची प्रक्रिया सुरू झाली. या समाजाने हजारो वर्षे कवटाळलेली खुळचट विचारपद्धती संपू लागली. त्याचे व्यक्तित्वांतर होऊ लागले. अपौरुषेय मानली गेलेली अमानुष समाजतत्त्वे आधुनिक मूल्यांपुढे करपू लागली. मध्ययुगीन जुनाट-पणा अस्ताला जाऊ लागला. हजारो वर्षांच्या नकारांशी भांडत आधुनिकत्वाची आराधना सुरू झाली. या प्रक्रियेला आपण प्रबोधन या नावाने ओळखतो. मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांचा अंगिकार म्हणजे प्रबोधन. बुद्धिवाद आणि बंधुता यांच्या प्रकाशात जीवन नवनव्याने मांडण्याची गतिमान प्रक्रिया म्हणजे प्रबोधन. अंधारा-तून प्रकाशमूल्यांकडे जाण्याचे पर्व म्हणजे प्रबोधन. आपल्या समाजात मागील अनेक शतकांनी विषमतेचा, अंधश्रद्धांचा आणि दैववादाचा अभेद्य अंधार निर्माण केला होता. हा गोठलेला, गती हरवलेला आणि जडमूढ अवस्थेत पडून असलेला समाज इंग्रजी सत्तेसोबत आलेल्या आधुनिक मूल्यांमुळे प्रबोधनाच्या वाटा चालू लागला.

त्यापूर्वी या समाजात सरंजामशाही आणि चातुर्वर्ण्य, ग्रामसंस्था आणि जातिसंस्था यांचेच राज्य सुरू होते. हिंदूसमाजरचनेची ही मूलतत्त्वे हजारो वर्षे अबाधित राहिली. कूळ, जात आणि वतन यांनीच समाज नियंत्रित होत होता. धर्मभोळेपणा, रूढीदास्य, देवखुळेपणा व दैवखुळेपणा, मंत्रतंत्र, कर्मकांड, जारण-मारण, शकुनापशकून आणि नाना श्रद्धांनी या समाज पोखरून टाकला होता. 'जैशी स्थिती आहे तैशापरी राहे, कौतुक तू पाहे संचिताचे' किंवा 'ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असो द्यावे समाधान' या शिकवणीने जीवनाची गतीच मारून टाकली होती. सामाजिक विषमतेच्या वणव्यात या देशातली माणुसकी हजारो वर्षे मुकाट जळत होती. मानवत्वाच्या प्रचीतीलाच हा समाज पार पारखा झाला होता.

ब्राह्मणांना भूदेव मानण्याची प्रथा पाडली गेली होती. पुरुषसूक्ताने या समाजरचनेचे दैवी व अपरिवर्तनीय रूपच सांगून ठेवले होते. सांस्कृतिक साधने केवळ मूठभरांच्या हातात होती. दळणवळणाची साधने जुनाट आणि तीही मर्यादित होती. सावकारांना 'राज्याची शोभा' मानण्याची अद्‌भुत रूढी होती. उच्चवर्णीय सुखस्वर्गाच्या वाटा चालत होते त्यावेळी बहुजन, दलित, आदिवासी हे अज्ञानात खितपत पडले होते. विषमतेत अजाणता जळत होते. सर्वंकष शोषणाने हवालदिल झालेली ही समाजसंस्था ईश्वरकृत आहे ही श्रद्धा लोकमानसावर वज्रलेप झाली होती. संस्कृतीवर अमंगलाची अशी हिडीस छाया पडली होती. आणि हरवू नयेत म्हणून आपली सगळी वैगुण्ये, लांच्छने उराशी कवटाळून हा समाज हजारो वर्षें एका ठिकाणीच थांबला होता. येथील प्रज्ञांनी आणि प्रतिभांनी या हिडीस वास्तवाची स्तोत्रे गाऊन त्याच्या गतिहीनतेला नैतिकता आणि मौलिकता बहाल केली होती.

इ. स. पूर्व काळात चार्वाक आणि बुद्ध यांनी या देशात जडवादी प्रबोधन साकार केले. पुरोहित, ब्राह्मण वर्चस्व, संस्कृत वर्चस्व, वर्णव्यवस्था, देवदैववाद, अंधश्रद्धा, अध्यात्म आणि परलोक या शोषणव्यवस्थेच्या सर्वंकष आचारविषयक सामग्रीविरुद्ध ही आंदोलने होती. मनुष्याचे इहलोकीचे भौतिक व नैतिक उन्नयन हा त्यांचा ध्येयवाद होता. हे दोन्ही वैचारिक उठाव नीतिनिष्ठ—नास्तिक होते. वेद, परलोक आणि ईश्वर हे शोषणव्यवस्थेचे बालेकिल्ले त्यांना उद्‌ध्वस्त करायचे होते. पण आजच्यासारखेच त्याकाळीही घडले. शोषितांना गुलामगिरीचाच मद इतका चढविला गेला होता की, या गुलामांना आपले उद्‌धारक नेते आणि तत्त्वज्ञाने लक्षातच घेता आली नाहीत. या देशातील काळोखाच्या कैद्यांना त्यांच्यासाठी जन्माला आलेला उजेड विषारी संस्कारांमुळे उरी कवटाळता आला नाही. वैदिकांनी ही क्रांतिदर्शने विकृत करून लोकांना सांगितली. सत्याची अशी बेअब्रू करून या राष्ट्राच्या भौतिक व नैतिक विकासाचे सर्व मार्ग बंद केले. समतेचा दिवस बुडवला. आजवर या चुकीचे परिणाम हे राष्ट्र भोगत आहे. चार्वाका—बुद्धाचे या राष्ट्राने ऐकले असते तर हे राष्ट्र रशियाआधी रशिया आणि अमेरिकेआधी अमेरिका झाले असते.

तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत इथे चैतन्यनिष्ठ धर्मक्षेत्रात काही घडामोडी घडल्या. तेरा चौदाव्या शतकात भक्तिसंप्रदायांनी सामान्यांसाठी परमार्थाची दारे उघडून दिली. पुढे अकबराने हिंदू—मुस्लिमांच्या सांस्कृतिक सहजीवनासाठी प्रयत्न केले. इस्लामी धर्माला व सत्तेला शिवाजीरायांनी पराक्रमी

उत्तर दिले. या घडामोडींना नवजागरणे वा प्रबोधनाच्या चाहुली मानले जाते. पण या प्रयत्नांना प्रबोधन म्हणणे रास्त ठरत नाही. या प्रयत्नांमधून चार्वाका–बुद्धाचा जडवाद पुनरुज्जीवित झाला नाही. धर्मसंस्थेची, पारमार्थिक आणि दैववादी मूल्यांची चिकित्सा त्यातून शक्य झाली नाही. इहवाद, विज्ञानदृष्टी व व्यक्तिस्वातंत्र्यवाद या तत्त्वांचा उद्‌भव झाला नाही. समता, स्वातंत्र्य, बंधुता, विज्ञानदृष्टी आणि न्याय या गोष्टी ऐहिक पातळीवर सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात निर्माण झाल्या नाहीत. सरंजामी समाजसंस्था, पारंपरिक वर्णव्यवस्था व अर्थव्यवस्था होती तशीच राहिली. समाज जातीपावित्र्य, अंधश्रद्धा, अज्ञान, रूढी व दैववाद यांनाच चिकटून राहिला. संतांनी पारमार्थिक आणि सामाजिक या दोन क्षेत्रांसाठी वेगवेगळा आचारविचार सांगितला. भक्तिसंप्रदायांनी वैदिक हिंदू राजसत्तांना जवळ केले.

इंग्रजी राजवटीने इथे प्रबोधनाचे महाद्वार उघडून दिले. पण बहुतांशी आपल्या मानसिकतेला शक्य तेवढेच आपण या महाद्वारातून गेलो. त्याप्रमाणातही आपल्या समाजाचा चेहरामोहरा बदलू लागला. ज्याप्रमाणात इंग्रजी राजवटीमुळे इथे काही वाईट गोष्टी घडल्या (त्या तत्पूर्व एतद्देशीय राजवटीतही कितीतरी अमानुषपणे घडत होत्या) तरी येथील शोषितांच्या दृष्टीने कितीतरी पटींनी इथे चांगल्या गोष्टी घडल्या. येथील गुलामांच्या स्वातंत्र्यचळवळीला व बुद्धांच्या मुक्तिपर्वाला प्रारंभ झाला. जातिविहीन संस्कृती व व्यक्तिस्वातंत्र्याचे महातत्त्व मिळाले. एकसंध स्थिर प्रशासन, शांतता व सुव्यवस्था, कायद्याचा अंमल, आधुनिकीकरणाची प्रक्रिया, मजबूत आर्थिक पायाची उभारणी, रोग व दुष्काळाविरुद्ध उपाय, समान भारतीय राष्ट्रीयत्व, समान शासनसंहिता, नागरी स्वातंत्र्याचा उद्‌घोष, मतपरिवर्तनाद्वारे शासनसंस्थेतील बदल, सार्वत्रिक मतदानावर आधारलेल्या निवडणुका, इहवादी–बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टी, समानदर्जा देणारे व्यवहारोपयोगी नव्या ज्ञानविज्ञानाचे शिक्षण, आधुनिक उद्योगधंद्यांची स्थापना, भांडवलशाहीच्या उदयाने जन्माला आलेला नवा वर्ग, शेतमजुरांची वाढ, रयतवारी पद्धतीत वाढलेल्या शेतकऱ्यांमध्ये राष्ट्रीय जाणिवेचा उदय या गोष्टी इंग्रजी राजवटीने भारताला दिल्या. त्यामुळे मानसिक मूल्यक्रांती घडून आली. संस्कृतीची दिशा बदलली. आचार–विचारस्वातंत्र्याचे नवे युग निर्माण झाले. १८२९ साली इंग्रजांनी सतीची चाल बंद केली. १८३७ साली ठकांचा धंदा व १८४३ साली गुलामांचा व्यापार बंद केला. हिंदुधर्मातील अमानुष आचारविचारांवर ख्रिश्चनांनी हल्ले चढवले. लोक धर्मांतर करू लागले. त्यामुळे विविध 'समाजां'नी व नेत्यांनी

हिंदूधर्म सुधारणेला प्रारंभ केला. या घटनेला 'खरीखरी सामाजिक क्रांती' असे मार्क्सने म्हटले तर 'सती जाण्याची चाल, मुले मारावयाची चाल, तीन वर्णांची नीच स्थिती, ब्राम्हणांचे महात्म्य, विद्या क्षणिक, अतिशय गर्व, संपूर्ण देशाचे लोक आम्हापुढे तुच्छ व आम्ही श्रेष्ठ तेव्हा हा भाव हिंदू लोकांचा मोडण्यास व त्यास ताळ्यावर आणण्यास परदेशातील सुधारलेले लोक यांची गाठ घालून देण्यापेक्षा उत्तम उपाय दुसरा काही आहे, असे वाटत नाही. यास्तव ईश्वराने या देशात इंग्रजांची प्रेरणा केली आहे, असे लोकहितवादींनी म्हटले. फुल्यांना समाज-परिवर्तनासाठी ही मोलाची पर्वणी वाटली. रानडयांनी तिला ईश्वरी वरदान म्हटले. आगरकरांना ही घटना विचारकलह सुरू करणारी प्रगतीप्रेरक वाटली. तर 'ब्रिटिशांचे हिंदुस्थानातील आगमन हे या देशाला वरदान मानावे लागेल' असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले.

राजाराममोहन रॉय (१७७२–१८३३) भारतीय प्रबोधनाचे प्रवर्तक मानले जातात. त्यांच्या प्रबोधनाचे संतांच्या कार्याशी नाते पोचते. कलकत्याला १८२८ साली त्यांनी **ब्राह्मो समाज** स्थापन केला. निराकार परमेश्वराची सर्वांचा पिता म्हणून स्थापना, मूर्तिपूजेला विरोध, वेदोपनिषदिक उपासना, सर्वधर्मसम-भाव, जुन्या रूढींचा व कर्मकांडांचा त्याग, कोणताही भेद व अस्पृश्यता पाळू नये. गरिबांना शिक्षण, धर्मभोळेपणाचे निर्मूलन पारलौकिक व ऐहिक कल्याणाची साधना, पूर्वपरंपरेशी सख्य, सतीप्रथा बालविवाह व कन्याविक्रयाला विरोध, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार असे ध्येय ब्राम्हण ब्राम्हो समाजाचे होते. ख्रिस्ती धर्माचे हल्ले परतवून लावावे, हिंदू धर्माची सुधारणा करावी हे रॉय यांचे ध्येय होते. त्यासाठी ख्रिश्चन धर्माचेच बळ त्यांनी वापरले.

**प्रार्थनासमाजाची** स्थापना १८६७ साली आत्माराम दादोबा आणि भास्कर या तर्खडकर भावांनी मुंबईत केली. विश्वबंधुत्वाच्या भावनेने केलेली पीडितांची व अनाथ अपंगांची सेवा हीच ईश्वरसेवा व खरा धर्म होय. भागवतधर्मी संतांचा वारसा चालवीत मूळ हिंदूधर्मात शिरलेल्या विकृतींचा त्याग करणे, हिंदूधर्माचे मूळ स्वरूप प्रकट करणे, त्याला प्रगतीशी जोडून प्रबुद्ध करणे हे समाजाचे ध्येय होते. हे एक उपासनापीठ होते. समाजाने अस्पृश्यांसाठी शाळा काढणे, अनाथालये चालविणे, रात्रीच्या शाळा चालविणे, विधवाविवाहसंघ व विधवाश्रम चालविणे परस्पर भेद न पाळणे या दिशेने कार्य केले. शहरी पांढरपेशांपुरताच त्याचा आवाका राहिला. ग्रामीण व सामान्य या आवाक्याबाहेरच राहिले. जुन्या रूढी

परंपरांचा त्याग समाज करू शकला नव्हता. त्याने हिंदूधर्माच्या पुनरुज्जीवनाचेच कार्य केले.

आर्यसमाज १८७५ मध्ये स्वामी दयानंद सरस्वतींनी पंजाबात स्थापन केला. ईश्वर एक असून सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आहे. भक्तीसाठी मध्यस्थाची गरज नाही. वेदच सत्यज्ञान देऊ शकतात म्हणून वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवन व वेदाध्ययन हे प्रत्येक आर्याचे कर्तव्य आहे. गुणधर्मानुसार चार वर्ण मानावेत. जाती व अस्पृश्यता पाळू नये. वैदिक धर्म व हिंदूधर्म वेगवेगळे आहेत. अवतार, दैवी सामर्थ्य व विभूतिपूजा मानू नये. व्यक्तीला त्यामुळे स्वकर्तृत्वाचा विसर पडतो. जग सत्य आहे. लोकांचा ऐहिक उत्कर्ष झाला पाहिजे. विज्ञानोपासना व वैदिक जीवनदृष्टी यात विसंगती नाही. आधुनिक विद्यांचा प्रसार झाला पाहिजे. सर्वांनी न्यायाने व स्नेहाने वागावे. स्त्रीशिक्षण, प्रौढशिक्षण, जोडीदाराची निवड अशा सुधारणांचे परंपरेशी नाते जोडावे. हे सांगणारा हा समाज वेदप्रामाण्यवादी होता. परधर्मात गेलेल्यांचे शुद्धीकरण, हिंदूधर्मियात अस्मिता, विश्वास व आक्रमकता निर्माण करणे ही कामे समाजाने केली. राष्ट्रवादाच्या उभारणीत वाटा उचलला. वरील सर्व समाज हिंदुत्वाच्या संगोपनार्थ कार्य करीत होते. धर्मसुधारणा असे त्यांचे रूप होते. संतकार्याशी त्यांचे नाते आहे.

१८७३ साली फुल्यांनी स्थापन केलेला **सत्यशोधक** समाज मात्र काहीसा वेगळा आहे. फुले भारतीय समाजक्रांतीचे जनक मानले जातात. गुणावरून व्यक्तीची प्रतिष्ठा, सर्वांना माणुसकीचे हक्क यासाठी फुल्यांनी जातीसंस्था, वर्णव्यवस्था व ब्राम्हणवर्चस्वावर चौफेर हल्ले केले. स्त्रियांसाठी–अस्पृश्यांसाठी शाळा, बालहत्या–प्रतिबंधकगृह, कृषीजीवन, जातीसंस्था, भटांनी चालविलेले शोषण यासंबंधी फुल्यांनी क्रांतिकारक चिंतन मांडले. चळवळी उभारल्या. आधुनिक भारतातला हा पहिला एवढा तडफदार मनुष्य होय. ते महाराष्ट्राचे पहिले कर्ते सुधारक होत. स्त्री–शूद्रातिशूद्र यांची सर्वंकष गुलामीतून मुक्तता करणे, समाजात आमूलाग्र क्रांती करणे या ध्येयासाठी ईश्वर एक आहे, तो निर्गुण, निराकार, निर्विकार व सत्स्वरूप आहे. तो सर्व मानवाचा पिता आहे. त्याच्या प्रत्येक पुत्राला त्याची भक्ती करण्याचा हक्क आहे. देव व भक्त यात कोणी मध्यस्थ असू नये. कोणताही ग्रंथ ईश्वरप्रणित नाही. परमेश्वर सावयव स्वरूपात अवतार घेत नाही. पुनर्जन्म, कर्मकांड, जपतप या गोष्टी मूर्खपणाच्या होत. सत्य हाच धर्म होय हे ध्येय असलेला सत्यशोधक समाज फुल्यांनी स्थापन केला.

आडमार्गाने फुले ईश्वर मानतात. तरी फुल्यांनी विघातक रूढीवर प्रहार केले. शोषितांना शोषकांचा समर्पक परिचय करून दिला. चातुर्वर्ण्य, जाती, स्वर्ग, नरक, आत्म्याचे अस्तित्व या गोष्टी त्यांनी धुडकावून लावल्या. फुल्यांचे प्रबोधन हिंदूधर्माबाहेर पडले; पण ईश्वरनिष्ठ धर्मसंस्थेबाहेर पडले नाही.

आंबेडकरपूर्व काळात आपल्याकडे प्रबोधनाचे वेगवेगळ्या पातळ्यांवरून स्वागत करणारे तीन प्रवाह होते. एक : धार्मिक प्रबोधनकारांचा. यात ब्राह्म, आर्य व प्रार्थना हे समाज व न्या. रानडे, भांडारकर, मोडक, वि. रा. शिंदे, न्या. चंदावरकर या मंडळींचा समावेश होतो. दुसरा अज्ञेयवादी गो. ग. आगरकरांचा आणि तिसरा फुल्यांनी ब्राम्हणी संस्कृतीविरुद्ध उभारलेल्या सत्यशोधक चळवळीचा. आपल्या वैचारिक प्रबोधनात अध्यात्मनिष्ठ व बुद्धिप्रामाण्यवादी हे दोन पक्ष आहेत. त्यातला पहिला पक्ष परंपरानिष्ठ वा समन्वयवादी म्हणून ओळखला जातो. जांभेकर, लोकहितवादी, फुले, रानडे, शाहू महाराज, वि. रा. शिंदे हे ईश्वरास्तित्व मानतात. फुल्यांना त्यांचा निर्मिक, पिंडदान, लग्नविधी व अंत्य-विधीतील प्रकार व देवतांची पूजा या अंधश्रद्ध गोष्टी बुद्धिप्रामाण्यवादापासून दूर नेतात. प्रबोधनकारांच्या दुसऱ्या वर्गाची बुद्धिवादी मांडणी मोठ्या प्रमाणात आगरकर करतात. आंबेडकर या अज्ञेयवादी वारशाला बुद्धाच्या साह्याने निरी-श्वरवादाचे विशुद्ध रूप देतात. शुद्ध जडवादाचा, बुद्धिप्रामाण्यवादाचा सर्वांगपरी-पूर्ण आशय आंबेडकरच आपल्या प्रबोधनाला देतात. आंबेडकरांच्या जडवादाशी काही प्रमाणात तरी आगरकरच नाते जोडतात. 'ईश्वर–जीव–जगत' यांच्या स्वरूपाचे तत्त्वज्ञान व आदितत्त्व यांना हिंदूचा सनातन धर्म मानणारे, कृतार्थपणे देह सोडताना 'परलोकाचे देवद्वार स्वेच्छाबलाने उघडून स्वर्गी प्रवेश करीत आहोत' असे म्हणणारे आणि '...गुणांवरच ज्याची त्याची उच्चनीयता ठरवि-णारी समाजव्यवस्था चालू झाल्यास, कोणत्याही जातीस आणि विशेषत: तुम्हा ब्राम्हणजातीस भिण्याचे काही एक कारण नाही. जर तुमच्यात बुद्धी नि पराक्रम असेल तर मग गुणांवरच श्रेष्ठता मिळणाऱ्या घटनेत तुम्ही अधिक सुलभतेने श्रेष्ठच ठरावे' (उद्धृत, सूर्यबिंबाचा शोध. पृ. १०१) या निसरड्या पातळी-वरून गुणजात जातिसंस्थेचे समर्थन करणारे सावरकरही आंबेडकरी जडवादाजवळ फिरकू शकत नाहीत.

तिकडे लोकहितवादी श्रुतिस्मृती पुराणांचे प्रामाण्य नाकारतात. ऐहिक जीवननिष्ठा व मानवतावाद यांचा पुरस्कार करतात. शास्त्री–पंडित, भट–भिक्षुक, जहागिरदार–इनामदार हे ऐतखाऊ लोक, निरुपयोगी संस्कृत विद्या, धर्मश्रद्धा,

जातिभेद यावर लोकहितवादींनी निकराचा मारा केला. 'मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो, ब्रम्हदेवाचे का असेना. 'बुद्धिरेव बलीयसी' असे आहे. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा. विचार करून पाहा. जे घातुक ते टाकले पाहिजे, 'आपण नवे ग्रंथ केले तर आपण ऋषी होऊ' असा बुद्धिवाद सांगणारे लोकहितवादी ईश्वरवादीही होते. त्यांनी १६ कलमी ईश्वर-निष्ठ धर्मच स्थापन केला. फुल्यांनीही नवा पण ईश्वरनिष्ठच धर्म स्थापन केला. हे दोघेही आधुनिक महाराष्ट्रातील नवधर्मसंस्थापक मानायला हवेत. पण हे दोन्ही धर्म चैतन्यनिष्ठच होते. आगरकरांच्या अज्ञेयवादाशी नाते सांगण्याची त्यांची ताकद नाही, आंबेडकरांच्या जडवादाशी तर नाहीच नाही.

न्या. रानडे विधायक पिंडाचे प्रबोधनकार आहेत. परंपरानिष्ठा, समन्वय, तडजोड ही त्यांची व्यक्तित्वलक्षणे होत. चिकित्सा आणि श्रद्धा, पारंपरिक मूल्ये आणि नवमूल्ये, इतिहासपूजन आणि भविष्याकांक्षा, अध्यात्मवाद आणि भौतिक-वाद अशी बिळघाभोपळघांची मोट रानडे बांधू इच्छित होते. अशी बांधणी विघातक आणि जीर्णांशाला औचित्याने सत्कारणारी होती. 'दैववादाकडून मानवी प्रतिष्ठेच्या जाणिवेकडे आपला हा नवीन बदल झाला पाहिजे' हीच सामाजिक क्रांती रानडघांना अपेक्षित होती, आंधळा दैववाद त्यांना नको होता. दैव, पूर्वजन्माचे पापपुण्य अशा कल्पनांनी माणूस गुलाम होतो. या कल्पनांनी आपल्या समाजाचे तेज नष्ट केले आहे. या कल्पना म्हणजे आपल्या समाजाला लागलेली कीड होय. इतर समाजात बायका जी रडगाणी गातात ती आपले मोठमोठे पंडितही गात बसतात. याचे रानडघांना दुःख होत असे; पण त्यांना निरीश्वरवाद मान्य नव्हता. ते एकेश्वरवादी होते. मानवाच्या आध्यात्मिक प्रगतीवर त्यांची श्रद्धा होती. ही प्रगती जडाजडात भरून असलेल्या ईश्वराला शरण जाऊनच साध्य करता येते. लोकहितवादी, रानडे या ईश्वरनिष्ठ प्रबोधनकारांनी संतांनी (परमार्थ क्षेत्रात पुरस्कारिलेला मानवतावाद) सामाजिक क्षेत्रात टाळला होता, तो मानवतावाद सामाजिक क्षेत्रातही पुरस्कारला.

आगरकरांनी मात्र मनुष्यतेच्या ऐहिक सुखवर्धनालाच धर्म म्हटले. मोक्ष, परलोक नाकारला. त्यांनी अज्ञेयवादगर्भ बुद्धिवाद पुरस्कारला. अज्ञेयवाद म्हणजे जडवाद नव्हे, हे खरे असले तरी आधीच्या चार्वाका–बुद्धाशी व नंतरच्या एम. एन. रॉय व आंबेडकर यांच्या जडवादी प्रबोधनाशी केवळ आगरकरांचे नाते जोडता येते. फुल्यांचे कार्य प्रचंड मौलिक, छत्रपती शाहू व वि. रा. शिंदे यांचे प्रत्यक्ष कार्यही तेवढेच मौलिक. ही नावेही महाराष्ट्रीय प्रबोधनातील परम

आदरणीय तेजोगोलांची नावे आहेत. पण त्यांचे वैचारिक उड्डाण विशुद्ध बुद्धिवादापर्यंत पोचू शकत नाही. आगरकरी प्रेरणेने प्रथम नास्तिक झालेले शिंदे पुढे आध्यात्मिक झाले. शाहू महाराज मुळात कडवे परंपरावादी. पुढे आर्यसमाजिस्ट झाले नि मौलिक प्रबोधनकार्य केले.

आपल्या प्रबोधनात आंबेडकरांचे कार्य सर्व दृष्टींनी अनन्य आणि कळसासारखे होते. आंबेडकर प्रज्ञाशाली विचारवंत होते. विश्वविख्यात संशोधक पंडित होते. त्यांच्या या युगंधर प्रज्ञेची प्रभा त्यांच्या कृतीउक्तीमधून झळाळताना दिसते. आपल्या प्रबोधनातील फुल्यांची आंदोलनशक्ती त्यांनी पुढे नेली. आधुनिक भारतातील बुद्धिवादाचे जनक असलेल्या आगरकरांचा अज्ञेयवाद त्यांनी जडवादापर्यंत नेऊन पोचविला. आगरकर अनेक कारणांनी ग्रंथातच राहिले; पण आंबेडकरांनी बुद्धिवादाला आंदोलनांचे प्रकाशनपीठ प्राप्त करून दिले. इथे निरीश्वरवाद चळवळ झाला. जडवाद मासमुव्हमेंट झाला. एम्. एन. रॉय यांनी रॅडिकल ह्युमॅनिझम मांडला. आंबेडकरी लोकशाही समाजवादात किंवा लोकशाही मानवतावादात रॅडिकल ह्युमॅनिझमसकट समाजक्रांतीच्या सर्वच अंगोपांगांचे पूर्णप्रकाशन झाले आहे. फुल्यांसकट सर्वच प्रबोधनकारांना ईश्वर वा धर्म यांच्यापासून प्रबोधनाला वेगळे करता आले नाही. सामाजिक नीती आणि धर्मश्रद्धा या भिन्न गोष्टी आहेत. सामाजिक व्यवहारातील धर्माचे वर्चस्व झुगारून द्यायला हवे असे आगरकर म्हणतात. व्यक्तिगत जीवनात ते धर्माला मान्यता देतात. या संदर्भात प्रबोधनाला आंबेडकरांचे अनन्यसाधारण योगदान आहे. ते धर्म वा अध्यात्मनिष्ठ प्रबोधनकार नाहीत. त्यांच्या भूमिकेत 'धर्म' आणि 'धम्म' या दोन संकल्पनांमध्ये मूलभूत तफावत आहे. त्यांनी समाजाला धर्ममुक्त करणारा, धर्मविहीनतेची गाठ घालून देणारा 'धम्म' सांगितला. त्यांच्या नीतिविचाराच्या प्रज्ञा आणि करुणा या दोन कोनशिला आहेत. प्रज्ञा म्हणजे विवेकवाद आणि करुणा म्हणजे प्रेम किंवा बंधुता. या बंधुतेवरच आंबेडकरी प्रबोधन उभारलेले आहे. इथे ईश्वर, आत्मा, पूर्वजन्म–पुनर्जन्म यांना जागा नाही. प्रार्थना, परलोक, तीर्थयात्रा, कर्मकांड, विधी, यज्ञ यांना स्थान नाही. हा नीतिविचार जडवादाशी प्रतिबद्ध आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, प्रज्ञा (बुद्धिवाद) यांच्या घटनेचे नाव धम्म आहे. तो life–breath for man and society असतो. धम्म म्हणजे बुद्धिवाद. विज्ञान हे बुद्धिवादी प्रक्रियेचेच नाव आहे. बाबासाहेबांनी धम्माला विज्ञानाच्या प्रकाशात अन्वर्थक करून दाखविले. प्रज्ञा=बुद्धिवाद व करुणा=बंधुता.

असा जडवादी बंधुत्वविचार आंबेडकर सांगतात. त्यांनी असे करून धर्मसंस्थेशीच फारकत घेतली. अध्यात्म, दैवीशक्ती, स्वर्ग या कल्पनांशी फारकत घेतली. खरे तर त्यांनी हिंदूधर्माचा त्याग केला, धर्मांतर केले नाही. त्यांच्या मतानुसारच त्यांनी एखाद्या 'धर्माचा' स्वीकार केला नाही. जडवादी नैतिकतेचा अंगिकार केला (भ. बुद्ध आणि त्यांचा धम्म : पृ. २४३-२५२) आगरकरांच्या रूपाने आपल्या प्रबोधनाने अज्ञेयवादापर्यंत मजल मारली होती, आंबेडकरांनी त्याला निरीश्वर-वादाने परिपूर्ण केले, आपल्या प्रबोधनाने धर्माशी आंबेडकरांपूर्वी अशी स्वच्छ फारकत घेतली नव्हती.

मनुष्याच्या अर्थपूर्ण आणि दैदिप्यमान अस्तित्वाचे प्रकाशन आणि न्यायनिष्ठ समाजसंस्थेचे प्रवर्तन हा आंबेडकरी प्रबोधनाचा ध्येयवाद आहे. समग्र उपेक्षितांचा कैपक्ष घेऊन भारतीय समाजसंस्थेचे त्यांनी बिनतोड मंथन केले. राजकीय, सामाजिक, आर्थिक अशी सर्वंकष क्रांतीकडे जाणारी लोकशाही-संकल्पना त्यांनी मांडली. प्रबोधनाची अपूर्व क्रांतिघटना साकार केली. जीवनाची सर्वांगे बंधुत्वाने नियंत्रित करणाऱ्या प्रबोधनाच्या रूपात त्यांना लोकशाही भावली होती. माण-साची प्रतिष्ठा हाच त्यांच्या प्रबोधनाचा ध्येयवाद आहे. 'Worth, not birth, is the measure of man' असे ते म्हणतात. संसदीय लोकशाही, शेती-विमा व उद्योगधंदे यांचे राष्ट्रीयीकरण सांगणारा समाजवाद, बंधुता आणि बुद्धिप्रामाण्य यातून बाबासाहेबांचे अभिनव प्रबोधनदर्शन साकार झाले. बेडेकरांनी दुसऱ्या प्रबोधनाची भाषा केली आहे. डॉ. आंबेडकरांनी या दुसऱ्या किंवा खऱ्या अर्थाने कोणत्याही मूलभूत आणि सर्वंकष प्रबोधनाचे सौंदर्यशास्त्र अत्यंत रेखीवपणे मांडले आहे. या प्रबोधनाचे परिशीलन केल्यावर भा. शं. भणगे म्हणाले होते त्याप्रमाणे, आपले प्रबोधन नेहमीच कोवळे राहिले असे आता कोणाला म्हणता यायचे नाही. ते धर्म, अध्यात्म आणि अंधश्रद्धा यांच्याबाहेर आले नाही असेही कोणाला म्हणता यायचे नाही. आंबेडकरी प्रबोधनाने जीवनाच्या सर्व पैलूंना बुद्धिवादाच्या आणि बंधुत्वाच्या उज्ज्वल कक्षेत आणून सोडले आहे. या राष्ट्राच्या ऐक्याची काळजी या प्रबोधनकाराच्या चिंतनाचा केंद्रबिंदू आहे. या राष्ट्राच्या अभंगतेची, त्याच्या वैभवशाली भवितव्याची मांडणी करणारे आंबेडकर म्हणाले होते.- 'आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल, तर ती जनतेच्या मनात एकराष्ट्रीय-त्वाची भावना निर्माण करण्याची होय. आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदू, मुसलमान, सिंधी वा कानडी अशी भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमतः भारतीय व नंतरही भारतीयच आहोत अशी भावना निर्माण केली पाहिजे. हा

आदर्श दृष्टीसमोर ठेवावयाचा असेल तर ज्यामुळे संकुचित प्रांताभिमानाची व पक्षाभिमानाची वाढ होईल अशा सर्व गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत.' ते म्हणाले होते : 'भारतीय व्यक्ती दोन विरोधी ध्येयवादांनी नियंत्रित होत आहे.' राज्यघटनेच्या प्रस्तावातील ध्येयवाद व धर्माचा सामाजिक ध्येयवाद हे त्यांना परस्परविरोधी वाटत. राजकीय ध्येयवादाने स्वातंत्र्य, समता व सहभाव या जीवनमूल्यांना मान्यता मिळाली तरी प्रचलित सनातनी वृत्तीच्या ध्येयवादामुळे ती व्यवहारात नाकारली गेली आहेत.

आजही विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही भारतात प्रबोधनविरोधी वृत्ती उफाळून येत आहेत, हे आपण बघतो. परंपरेने अडाणी व गरीब ठेवलेल्या सामान्य माणसाच्या अज्ञानाचा वापर करून या प्रतिगामी शक्ती आज प्रबोधनाला विद्रूप करू पाहत आहेत. जाती आणि वर्णाहंकार, कडवी धर्मांधता आणि अंधश्रद्धा, लाचारी आणि अज्ञान, परस्परद्वेष आणि देवभोळेपणा, भक्ती आणि दैववादी वृत्ती, पूजाप्रार्थना आणि नवससायास, बुवाबाजी आणि भ्रष्टाचार यांच्या खाई-मध्ये या प्रतिगामी शक्ती समाजाला ढकलीत आहेत. आजच्या चमत्कारिक स्थितीला जुनाट संस्कार आणि विषारी रूढीपरंपरा कारण आहेत. लोकांच्या मनांवर त्यांची सत्ता कायम राहील असेच प्रयत्न या संघटना करीत आहेत. देव, दैववाद, मोक्ष, आत्मा, परलोक बुवा, चमत्कार, अंधश्रद्धा यांना लोकप्रिय केले जात आहे. लोकांच्या दैन्य–दारिद्र्याच्या खतावर प्रतिगामित्व मयूर होत आहे. यावेळी या देशाने आंबेडकरी प्रबोधनाच्या प्रकाशातून स्वतःला नेणे हिताचे आहे. या सर्वच आजारांमधून आंबेडकरी प्रबोधनच राष्ट्राला सोडवू शकते. जडवाद आणि बंधुता हा गाभा असलेल्या आंबेडकरी प्रबोधनाशिवाय या देशातील पीडितांना गत्यंतर नाही. परिवर्तनाशी रक्ताची बांधिलकी असणारा, जडवादाशी इमानदार असलेला आणि समता–स्वातंत्र्य–बंधुता–न्याय आणि बुद्धिप्रामाण्य या दिशेने झेपावणारा विचारच आजच्या भारतीय परिस्थितीचे क्रांतीशी स्वयंवर लावू शकतो. या देशालाच नव्हे तर मानवतेलाही सर्वांगीण प्रबोधनाचे, संपूर्ण क्रांतीचे संविधान तो देऊ शकतो. त्यासाठी आंबेडकरी प्रबोधनविचार या राष्ट्राची श्वसनक्रिया व्हायला हवा.

□ □

# आंबेडकरी समाजवाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आयुष्य हे न्यायासाठी दिलेल्या अखंड संघर्षाचे प्रतीक आहे. तत्त्वज्ञान आणि चळवळी अशी दुहेरी शक्ती पणाला लावून आंबेडकरांनी या पुराणदेशाच्या दिशा बदलण्याची पराकाष्ठा केली. या देशातील दुःखी मानवतेला बाबासाहेब आंबेडकरांनी सर्जनशील शब्दांची दौलत दिली. या देशातील मानवतेला लाभलेले खग्रास ग्रहण अधोरेखित केले आणि या मानवतेला मरणमुक्त करणारी तत्त्वज्ञानातील आंबेडकर-योजना सिद्ध केली.

आंबेडकरांच्या कर्तृत्वामुळे ज्ञानमीमांसेला नवे आव्हान मिळाले. भारतीय ज्ञानमीमांसेला आंबेडकर हा स्वतःचा गौरव वाटला. येथील जडवादी चिंतन-परंपरेने आंबेडकरांच्या रूपात आपल्या विकासप्रक्रियेमधला कळस पाहिला. येथील जडमूढतेला स्वप्न मिळाले आणि स्वप्नाला पोलादाचे पंख भारतीय साहित्याला नवी दाहक आणि मोहक प्रेरणा मिळाली आणि बहिष्कृत भारताला विश्वासार्ह सूर्य मिळाला. माणूसकीचे दिवाळे निघालेल्या या समाजासाठी समता, स्वातंत्र्य व बंधुतेची राखरांगोळी करणाऱ्या समाजासाठी, बुद्धिवादाला भयंकर अपमानित करणाऱ्या या अंधश्रद्ध गर्दीसाठी आणि मनुष्यता जन्माला घालण्याची आपली योग्यता गमावून बसलेल्या इथल्या समाजासाठी बाबासाहेबांनी एक नवी योजना सिद्ध केली. या आंबेडकरी योजनेचे नाव लोकशाही समाजवाद असे आहे. मनुष्याच्या प्रतिष्ठेच्या प्रेरणेने या योजनेतील शब्दप्रपंच स्पंदित झालेला आहे. मनुष्याच्या अर्थपूर्ण अस्तित्वाचे आणि त्याच्या दैदिप्यमान अस्मितेचे प्रकाशन हेच आंबेडकरी तत्त्वचिंतनाने ध्येय होते.

आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात मानवी जीवनाची नवी मांडणी करण्याची क्षमता आहे. व्यक्ती, समाज, अर्थ, राज्य, धर्म, परंपरा, परिवर्तन या सर्वच संदर्भात हे तत्त्वज्ञान नवी मांडणी सादर करते आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या उन्नत जीवनमूल्यांची प्रस्थापना करू पाहणारा नैतिकविचार ते आपल्या हवाली करते.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ज्या समाजजीवनात नांदतात ते जीवन सामाजिक लोकशाही होय. असे असले तरी अमर्याद स्वातंत्र्याने समतेचा नाश

होतो. आणि निर्भेळ समता स्वातंत्र्याला वाव ठेवीत नाही. समतेवाचून स्वातंत्र्य आले म्हणजे मूठभर लोकांचे अनेकांवर राज्य येते. स्वातंत्र्यावाचून समता म्हणजे व्यक्तीच्या स्वयंप्रेरणेचा नाश होय. बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य आणि समता यांची वाढ होणार नाही. स्वातंत्र्य आणि समता यांची पायमल्ली होऊ नये यासाठी संरक्षण म्हणून कायदा हवा असतो. पण कायदा स्वातंत्र्य आणि समता यासंबंधी होणाऱ्या उल्लंघनाविरुद्ध हमी देऊ शकत नाही. म्हणून बंधुतेला फार उच्च स्थान द्यावे लागते. अनिर्बंध स्वातंत्र्य व निर्भेळ समता याविरुद्ध बंधुभावनेचेच संरक्षण आहे. या बंधुतेचेच दुसरे नाव मानवता असून मानवता हेच धर्माचे दुसरे नाव आहे. कायदा निधर्मी असल्याने एखाद्याला तो मोडता येतो; परंतु बंधुता म्हणजे मानवता, हा पवित्र धर्म आहे अशी सामाजिक लोकशाहीची रूपरेषा बाबासाहेबांनी मांडली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही हा केवळ शासनप्रकार नव्हे, तर ती एक विवक्षित समाजरचना होय. जीवनप्रणाली होय. ते मनुष्यवादी तत्त्वज्ञान होय. माणसाच्या प्रतिष्ठेच्या ध्येयाने स्पंदित झालेली लोकशाही त्यांना राजकीय लोकशाही, सामाजिक लोकशाही, आर्थिक लोकशाही अशा समग्र जीवनांगांना बंधुत्वाने नियंत्रित करणाऱ्या जीवनपद्धतीच्या रूपात भावली होती. बंधुता हे त्यांना सर्व जीवनसत्त्वांचे जीवनसत्त्व वाटत होते. त्यावर व्यक्तीचे माणूसपण, समाजाचे समाजपण आणि राष्ट्राचे राष्ट्रपण डौलाने फडकत उभे राहत असते.

संविधानाच्या सरनाम्यात खालील मूल्यांचा निर्देश आलेला आहे. तो असा: (१) कायदा लोकांच्या हितासाठी असतो. (२) ही स्वच्छंदी किंवा जुलमी अशी शक्ती नसते. (३) कायदा धर्मनिरपेक्ष असतो आणि सर्वांना लागू असतो. (४) तो ईश्वराने प्रेरणा दिलेला नसतो. माणसाने प्रेरणा दिलेला अर्थात मानवपुरस्कृत असतो.(५)गरजेनुसार तो बदलता येतो. या मूल्यांमध्ये बुद्धिप्रामाण्यवाद-लोकोत्थान, परिवर्तन आणि लोकशाही समाजवाद हा आंबेडकरी तत्त्वचिंतनाचा आराखडा रेखांकित झाला आहे. या आराखड्याचे विस्तृत विशदीकरण म्हणजेच आंबेडकरवाद होय. आर्थिक लोकशाहीचा पैलू या सर्वंकष तत्त्वज्ञानात बाबासाहेबांनी राज्यसमाजवाद या नावाने मांडला आहे. राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाहीकडे हा आंबेडकरवादाचा ध्येयवाद आहे. तसे 'आर्थिक लोकशाही' हे आमचे ध्येय आहे असेही त्यांनी म्हटले आहे आणि सामाजिक व आर्थिक या द्विविध लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही अस्तित्वात असू शकत

नाही असे बाबासाहेबांचे म्हणणे आहे. राजकीय, सामाजिक अशा द्विविध लोकशाहीचा केंद्रीय घटक असलेला आंबेडकरवादाचा एक पैलू म्हणून समाजवादाचा विचार इथे विशद करायचा आहे.

सामाजिकदृष्ट्या आपला समाज श्रेणीयुक्त विषमता या तत्त्वावर आधारलेला आहे. या विषमतेतून येथील शोषित मानवतेला मुक्त करण्याचा एक हमखास व विवेकनिष्ठ उपाय असे बाबासाहेबांच्या समाजवादाचे स्वरूप आहे. श्रीमंत आणि गरीब, उच्च आणि नीच, मालक आणि मजूर अशी या समाजाची विभागणी झालेली आहे. ही हजारो वर्षे चालत आलेली समाजरचना अन्याय्य आहे. ही अन्याय्य रचना आमूलाग्र बदलण्यासाठी या देशातील अर्थव्यवस्थेची पुनर्रचना केली पाहिजे असे बाबासाहेबांना वाटते.

"लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करण्याचे बंधन सरकारवर आणणे हा सदर (४) कलमाचा मुख्य उद्देश आहे. खाजगी उद्योगधंद्यांना प्रत्येक मार्ग बंद न करता जास्तीत जास्त उत्पादकता निर्माण होईल आणि त्याचवेळी संपत्तीचे न्याय्य वाटप होईल अशाप्रकारे आर्थिक जीवनाचे नियोजन करण्याचे बंधन राज्यावर आहे." हा ध्येयवाद मध्यवर्ती ठेवून बाबासाहेबांनी स्टेट अँड मायनॉरिटीजमध्ये सांगितले की खालील क्षेत्रे राज्याच्या मालकीची राहतील.

ही क्षेत्रे अशी : (१) विमा
(२) उद्योगधंदे
(३) शेती उद्योग

(१) **विमा** : (अ) राष्ट्रीयीकृत विमा खाजगी विमाकंपनीपेक्षा व्यक्तीला अधिक सुरक्षितता देतो. कारण विमापॉलिसीची अंतिम रक्कम देण्याच्या संदर्भात सरकारच्या सर्व साधनसामग्रीची हमी असते.

(ब) सरकारला आर्थिक नियोजनासाठी भांडवल उभारण्यासाठी आवश्यक साधन प्राप्त होते. भांडवल उभारणीच्या अशा साधनाअभावी राज्याला व्याजाच्या मोठ्या दराने कर्ज घ्यावे लागेल.

एका बाजूने या प्रक्रियेत खाजगी मालमत्तेची दडपणाही टळते आणि व्यक्तीलाही आवश्यक ते संरक्षण लाभते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीकडून तिच्या मिळकतीच्या प्रमाणात राज्याने जीवनविमा उतरून घ्यावा. राज्याच्या आणि व्यक्तीच्याही ते हिताचे आहे.

**(२) उद्योगधंदे :** लोककल्याणासाठी आणि राज्याच्या संपन्न अर्थव्यवस्थेसाठी डॉ. आंबेडकरांना जलद औद्योगीकरणाची आवश्यकता वाटते. त्यासाठी

ते आधुनिक औद्योगिक संस्कृतीचा आणि यंत्रसंस्कृतीचा पुरस्कार करतात. गांधीजींसारखी प्राचीन भारतीय संस्कृतीची अभिमानी मंडळी औद्योगीकरणाला विरोध करीत होती; परंतु विद्यमान समाजातील विषमता किंवा इतरही अनिष्ट परिणामांना यंत्रसंस्कृती जबाबदार आहे, असे समजून यंत्रसंस्कृतीला विरोध करणे आंबेडकरांना चुकीचे वाटले. जाती आणि गरिबी, असुरक्षितता आणि अन्याय यावर आधारलेली ही समाजरचना आमूलाग्र बदलणे हे बाबासाहेबांचे ध्येय आहे. मनुष्य हा संस्कृती जन्माला घालणारा आणि सांस्कृतिक जीवन जगणारा प्राणी आहे. पशू संस्कृतीशिवाय असू शकतो, पण संस्कृतीविहीन मानवाची कल्पना करता येत नाही. सुसंस्कृत जीवनाची निर्मिती ही मनुष्यत्वाची अट आहे. शारीरिक गरजांसोबत त्याच्या मनाचेही उन्नयन व्हावे लागते. त्यासाठी श्रमाच्या काळाव्यतिरिक्त त्याला भरपूर फावला वेळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यंत्र यासाठी माणसाला वरदान ठरू शकते. पशुपातळीवरील कष्टांच्या रगाड्यातून यंत्र माणसाला मुक्त करू शकते. समाजातील मूठभर निवडकांचा कष्टाशी संबंध नाही आणि बहुसंख्यांकांचा कष्टाशिवाय इतर कशाशी संबंध नाही. अशा अन्याय्य स्थितीतून यंत्रसंस्कृती माणसाला मुक्त करू शकते. त्यासाठी आंबेडकर जलद औद्योगीकरणाची गरज प्रतिपादन करतात. असे औद्योगीकरण भांडवलशाही वा खाजगी उद्योजक करू शकणार नाहीत आणि ते शक्य झाले तरी त्यातून युरोपमध्ये निर्माण झाली तशी तीव्र आर्थिक विषमता इथे निर्माण होईल. ही विषमता वा यंत्रसंस्कृतीचे दोष टाळण्यासाठी खाजगी मालमत्ता हा समाजाचा आधार नष्ट केला पाहिजे. यंत्रयुगाचे लाभ केवळ मूठभरांच्या हातात न जाता सर्वांच्या पदरात पडतील याची काळजी घेतली पाहिजे. आधुनिक यंत्रसंस्कृती मानवाला उपकारकच ठरली आहे. लोकशाही समाजाची घोषणा 'यंत्रे, अधिक यंत्रे' आणि 'सुधारणा, अधिक सुधारणा' हीच असली पाहिजे. हे शक्य होण्यासाठी खुद्द राज्याने जलद औद्योगीकरणाची हमी स्वीकारावी असे बाबासाहेबांचे म्हणणे आहे.

यासोबतच धनसंपन्न वर्गाच्या मानवविषयक दृष्टिकोणात मूलगामी बदल घडवून आणायला हवा. या वर्गाला आपल्या मालमत्तेची अमर्याद जाणीव असते, तिचा लोप होणे आवश्यक आहे. कामगार हे धनवंतांचे नोकर असतात ही जाणीव समूळ नष्ट होण्यासाठी समाजवादी अर्थरचनेची नवी मांडणी आंबेडकर करतात. गरजेपेक्षा जास्त संपत्ती असणाऱ्या श्रीमंतांनी आपण या संपत्तीचे विश्वस्त आहोत या भावनेने वागले पाहिजे व उर्वरित पैसा समाजहितासाठी दिला

पाहिजे अशी विश्वस्ताची कल्पना आंबेडकरांना मान्य होण्यासारखी नव्हती. कारण हा धनवान वर्ग आपल्या श्रीमंतीचे आणि गरिबांच्या दैन्य–दारिद्र्याचे समर्थन अध्यात्मातील कर्मविपाकाच्या सिद्धांताने करतो. मागल्या जन्मातील पापपुण्याच्या थापा मारून तो स्वत:च्या शोषकवृत्तीला न्यायाच्या सिंहासनावर बसवीत असतो. त्यामुळे 'खाजगी संपत्तीचा मूलभूत हक्क देणारे' संविधानातील ३१ वे कलम गलिच्छ असून माझा त्याच्याशी काहीही संबंध नाही असे बाबासाहेबांनी चौथ्या घटनादुरुस्तीवर भाषण करताना १९ मार्च १९५५ रोजी म्हटले होते.

वरील धोरणानुसारच बाबासाहेबांनी महत्त्वाच्या आणि मूलभूत उद्योग-धंद्याचे राष्ट्रीयीकरण प्रदिपादिले.

(१) महत्त्वाचे उद्योगधंदे राज्याच्या मालकीचे असावेत आणि ते राज्यानेच चालवावेत.

मूलभूत स्वरूपाचे उद्योगधंदेही राज्याच्याच मालकीचे असावेत आणि तेही राज्याने स्वत: चालवावेत किंवा स्वायत्त महामंडळांच्याद्वारे चालवावेत.

या आंबेडकरी योजनेत केवळ पूरक असे किरकोळ उद्योगधंदे खाजगी मालकीवर सोपविलेले आहेत. या प्रक्रियेने आर्थिक शोषणाला आळा बसेल. उत्पादनही वाढू शकेल आणि त्याची न्याय्य विभागणीही करता येईल असे त्यांचे प्रतिपादन आहे. हा विचार म्हणजे 'एक मनुष्य एक मूल्य'कडे जाणारा, समान मानवी प्रतिष्ठेशी जोडणारा म्हणजे सकल भेदातीत मानवी समाजाच्या निर्मितीची यंत्रणा होय.

(२) **शेती उद्योग :** वरील यंत्रणेचाच एक भाग म्हणून त्यांचे शेतीविषयक चिंतन लक्षात घ्यावे लागते.

(अ) शेती हा राजाचा उद्योग असावा म्हणजे शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण व्हावे.

(ब) मालक, कूळ किंवा गहाणवट घेणारा धनको या नात्याने खाजगी व्यक्तीच्या ताब्यात असलेले उद्योगधंदे, विमा आणि शेतीची जमीन यांच्या बहि-वाटीचे हक्क राज्याकडे असावेत. या खाजगी व्यक्तींना जमिनीच्या मूल्याइतकी भरपाई सरकारी कर्जरोख्याच्या रूपात दिली जावी. सक्तीने ताब्यात घेण्यासाठी जमीन वा कारखाना यांचे मूल्य निश्चित करताना आणीबाणीमुळे येणारी वाढ, भावी काळातील संभाव्य किंवा अनार्जित मूल्य किंवा सक्तीने ताब्यात घेण्यासाठीचे कोणतेही मूल्य यांची दखल राज्याने घ्यायची गरज नाही.

(६) कर्जरोखा धारण करणाराला रोख रक्कम मिळण्याचा हक्क कोणत्या प्रकारे आणि केव्हा असेल ते राज्य ठरवील.

(३) सदर रोख्याचा विनिमय करता येईल आणि त्यावर वारसाहक्क राहील. तरी मूळ रोखाधारक वा मूळ रोखाधारकाकडून ज्याला रोखा मिळाला ती व्यक्ती मूळ रोखाधारकाचा वारस यांना सरकारने ताब्यात घेतलेली जमीन किंवा कोणत्याही औद्योगिक कंपनीस हितसंबंध परत मिळण्याची मागणी करता येणार नाही. अथवा त्या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करता येणार नाही.

(इ) कायद्याने ठरविल्यानुसार रोखाधारकास रोख्यावर व्याज मिळण्याचा हक्क राहील. हे व्याज रोखरूपाने वा वस्तुरूपाने वा योग्य वाटेल त्या पद्धतीने सरकार घेईल.

(२) शेतकी उद्योग पुढील पायावर संघटित केला जाईल.

(अ) ताब्यात घेतलेल्या जमिनीची प्रमाणबद्ध आकारांच्या शेतांमध्ये सरकार विभागणी करील. खेड्यातील कुळांना म्हणजे काही कुटुंबांच्या गटांना पुढील अटींवर शेते लागवडीसाठी दिली जातील.

(आ) शेताची लागवड सामुदायिक पद्धतीने केली जाईल.

(इ) सरकारने जारी केलेल्या नियमांनुसार आणि आदेशानुसार शेतीची लागवड केली जाईल.

(ई) शेतीवर निश्चित केलेली आकारणी दिल्यानंतर शेती उर्वरित उत्पन्न राज्याने ठरविलेल्या नियमांनुसार कुळे वाटून घेतील.

(३) जात, पंथ असा भेद न करता गावातील रहिवाशांना जमीन भाड्याने दिली जाईल. या पद्धतीत कुणी जमीनदार असणार नाही. कुणी जमीनदाराचे कूळ असणार नाही आणि कुणी भूमीहीन वा मजूर असणार नाही.

(४) शेतीसाठी पाणी, जनावरे, अवजारे, खत, बियाणे इत्यादींचा पुरवठा करून सामुदायिक शेतांची लागवड करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे राज्यावर बंधनकारक राहील.

(५) राज्याला पुढील बाबतीत हक्क राहतील.

(अ) शेती उत्पन्नावर पुढीलप्रमाणे आकारणी करता येईल.

(i) जमीन महसुलासाठी एक भाग.

(ii) कर्जरोखे धारकांना परतफेड करण्यासाठी एक भाग

(iii) पुरवठा केलेल्या भांडवली वस्तूंच्या वापरासाठी एक भाग.

(आ) जी कुळे कूळकायद्याच्या नियमाचा भंग करतील किंवा राज्याने दिलेल्या लागवडीच्या साधनांचा योग्य उपयोग न करता हेळसांड करतील किंवा सामुदायिक शेती योजनेला बाधा येईल अशी कृती करतील त्यांना राज्य योग्य ती शिक्षा करू शकेल.

ही समाजवादाची संकल्पना मांडून बाबासाहेब चातुर्वर्ण्य आणि जातीरचना मोडीत काढीत होते. व्यक्तीची प्रतिष्ठा आणि व्यक्तीची सामाजिक जबाबदारी यात ते समतोल निर्माण करीत होते. भारतात समाजवादाचा प्रश्न हा आर्थिकतेपेक्षा मूलत: सामाजिक आहे असे त्यांचे मत होते.

वरील संकल्पना ही बाबासाहेबांची आर्थिक लोकशाहीची संकल्पना होय. सामाजिक लोकशाहीचे ते एक केंद्रीय अंग आहे. या समाजवादाची प्रस्थापना घटनेच्या कायद्याने अंमलात आणावी. ती अपरिवर्तनीय असावी. सांसदीय बहुमतालाही ती बदलता येऊ नये. असे झाले तर बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे– It is only by this that one can achive triple object, namely, to establish. Socialism retain Parliamentary Democracy and avoid Dictatorship."

या आंबेडकरी समाजवादानुसार राज्यातील सर्वच उत्पादनसाधने राज्यमालकीची होतात. सत्ताधारी पक्ष या अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करणार नाही याची काळजी ते घेतात. समाजवाद स्थापन करण्याची जबाबदारी ते संसदेवर– लोकप्रतिनिधींवर सोपवीत नाहीत. मार्क्सप्रमाणे समाजवादाच्या स्थापनेच्या प्रक्रियेतील एक कडी म्हणून आंबेडकर कामगारांच्या हुकुमशाहीला मान्यता देत नाहीत. साम्यवाद ही मार्क्सची अंतिम व्यवस्था तर लोकशाही समाजवाद ती आंबेडकरांची अंतिम व्यवस्था ठरते. संसद आणि कामगार या दोन्ही घटकांना भारतासारख्या देशात सार्वभौमत्व द्यावे असे आंबेडकरांना वाटत नाही. कारण वरील दोन्ही घटकांची परंपरावादी व जातीय मानसिकता. जातीमनस्क बहुसंख्येने शासन हे लोकशाही होणार नाही. विद्यमान राज्यघटना 'राक्षसांचे आश्रयस्थान' झालेली आहे असे म्हणूनही बाबासाहेबांनी राज्यघटनेवरच विश्वास टाकला आहे. याला कारण येथील सामान्य उपेक्षित मनुष्य क्रमाने या घटनेला राबविणारा होऊ शकतो हे होते. विद्यमान सांसदीय लोकशाहीत भांडवलदार आणि प्रतिगामी यांचेच प्रतिनिधी बहुसंख्य असल्यांचे संसदही समाजवादी समाज निर्माण करू शकत नाही, त्यामुळे श्रीमंतांची अर्थसत्ताच काढून घ्यायला हवी नि दुसऱ्या बाजूने बुद्धिप्रामाण्यवादी व विज्ञाननिष्ठ दृष्टी समाजात निर्माण

करावी. त्यामुळे संसद उपेक्षितांच्या हितासाठी झटणारी होईल. घटनेच्या मार्गात आंबेडकर हा समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि विज्ञाननिष्ठ जीवनप्रणालीचा प्रयोग या परंपरावादी, जातीवादी आणि अंधश्रद्ध देशात करू इच्छितात. इतर प्रयोगांनी देश मागे जाऊ शकेल. पुढे तर नक्कीच जाणार नाही. आंबेडकरांचा प्रयोग यशस्वी झाला तर देश मनुष्यतेची जन्मभूमी होईल. कर्तृत्वाची कर्मभूमी होईल. समृद्धीची मातृभूमी होईल आणि बंधुत्वाची संगोपनभूमी होईल.

लोकशाही जगातील विद्यमान घटनांपेक्षा बाबासाहेबांची ही 'मनुष्य-निर्माण योजना' अत्यंत आगळी आहे. ती एक मौलिक नैतिक सिद्धान्त आहे. या देशातील सर्वच सामान्य माणसांच्या उत्थानाची हमी त्यात आहे. भारतीय समाजाला मूल्यात्मक परिवर्तनाशी जोडणारे, बुद्धिप्रामाण्यवादी मानवतावादाशी सांधणारे आणि सर्व जगाचाही मार्गदर्शक ठरणारे असे हे तत्त्वज्ञान आहे. घटने-द्वारे देशातील उपेक्षितांच्या हिताची अर्थव्यवस्था निश्चित करणारे लोकशाही घटनांच्या जगातले हे पहिले अभिनव तत्त्वज्ञान आहे. विश्वजीवनविचाराला किंवा जग बदलू पाहणाऱ्या ज्ञानपरंपरेला डॉ. बाबासाहेबांचे हे नवे–निराळे योगदान आहे.

□ □

# आंबेडकरवाद आणि विद्यार्थी क्रांती

> "उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाचे अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो" – डॉ. आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील सर्व अन्यायग्रस्तांना निर्वाणीच्या शब्दात "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." हा सर्जनशील संदेश दिला. हा त्यांचा संदेश कोणत्याही क्रांती करू इच्छिणाऱ्या समाजाने आपला जाहीरनामा मानावा असाच आहे. डॉ आंबेडकर हे नाव एका अंतहीन संघर्षाचे नाव आहे. बाबासाहेबांचे आयुष्य समताधिष्ठित समाजाची जडणघडण करताना प्रखर प्रज्ञासूर्य झाले. अशा आमूलाग्र नव्या समाजासाठी त्यांनी आपली तत्त्वज्ञानशक्ती आणि आंदोलनशक्ती वापरली. या देशाच्या समाजव्यवस्थेतील कमाल विषमतेचा, तुच्छतेचा आणि अपमानाचा त्यांनी जीव रक्तबंबाळ होईपर्यंत अनुभव घेतला. विविध अपमानांनी दाहक झालेल्या डोळ्यांनी त्यांनी आपल्या समाजाचे अवलोकन केले. विषमतेचे हलाहल पचवीत त्यांच्या प्रज्ञेने भारतीय समाजात निघालेले माणुकीचे दिवाळे पाहिले. इंग्रजी राजवट पाश्चात्य ज्ञान–विज्ञान घेऊन इथे येते. आधुनिक मूल्यांची रुजवात होऊन एका प्रबोधनाची प्रक्रिया इथे अर्धे पाऊण शतक चालू राहते. डॉ. आंबेडकर हे ज्या समाजात वावरत असतात तो समाज विसाव्या शतकातला समाज असतो. त्याच्या पाठीशी एक प्रबोधन, एक सुधारणेचे आंदोलन उभे असते. तरीही काही वरवरचे दर्शनी बदल सोडले तर हा समाज मनुष्यता फुलविण्यास अजूनही असमर्थ समाज आहे हेच त्यांच्या अनुभवास येते. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता आणि अशाच सगळ्या जहरी विषमतांचे फड निबडूंग इथे धर्मव्यवस्थेने आणि उच्चवर्णीयांनी पोसलेले असतात. याचा परिणाम म्हणून, येथील समाज समाज म्हणून अस्तित्वात असण्याची योग्यताच गमावून बसलेला होता. इथे व्यक्तीला व्यक्ती म्हणून अस्तित्वात असणे अशक्य होऊन बसलेले होते. त्यामुळे हे राष्ट्र, अर्धांगवायू झाल्याप्रमाणे दुबळे आणि निकामी झालेले होते. इथे वर्णांची उतरंड होती आणि या वर्णांची

उपवर्गवारी म्हणून जातींची उतरंड होती. इथे अस्पृश्य होते, आदिवासी होते, भटकेविमुक्त होते आणि स्त्रिया होत्या, आणि हे सर्वच निर्दय सामाजिक गुलामगिरीचे अगतिक बळी होते. माणुसकी इथे मोडून पडली होती. न्याय इथे मरून पडला होता. समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांची इथे राख केली गेलेली होती. आणि बुद्धिवादाला इथे भयंकर अपमानित–बहिष्कृत केले गेले होते. ही समाजरचना मनुष्यता जन्माला घालण्याच्या दृष्टीने केवळ वांझ झाली होती आणि माणुसकी मारणाऱ्या हत्यारांची श्रेष्ठ जीवनमूल्ये म्हणून येथील मूठभर उच्चवर्णीय लोक पूजा करीत बसले होते. आंबेडकरी जीवनदर्शन आणि हे जीवनदर्शन प्रत्यक्षाच्या भूमीत साक्षात करू पाहणारी आंदोलने वरील दुराग्रही, हटवादी किंवा अमानुष जीवनमूल्यांच्या दिंडीत रंगलेल्या समाजवास्तवाच्या संदर्भात साकार होतात.

मनुष्याच्या अस्तित्वाचे, त्याच्या अर्थपूर्ण आणि दैदिप्यमान अस्मितेचे प्रकाशन आणि एका न्यायनिष्ठ समाजव्यवस्थेचे प्रवर्तन हा ध्येयवाद आंबेडकरवादाच्या अंगप्रत्यंगातून उसळताना दिसतो. या ध्येयासाठी डॉ. आंबेडकरांनी जगात कुणीही केली नसेल तेवढ्या खोलात जाऊन भारतीय समाजसंस्थेची सर्वांगीण चिकित्सा केली आणि या समाजसंस्थेची अत्यंत शक्तिशाली विघातकता, अनैतिकता व मानवताशून्यता बुद्धिप्रामाण्यवादाच्या जळत्या रेषांनी अधोरेखित करून या अभद्र समाजसंस्थेचे बळी असलेल्या बहुजनसमाजासकट दलित, आदिवासी आणि स्त्रिया यांच्या बंधमुक्तीचे एक सर्वंकष दर्शन साकार केले. सामाजिक नीतीसिद्धांत असे या दर्शनाचे स्वरूप आहे. सांसदीय लोकशाही आणि राज्यसमाजवाद यांच्या संमीलनातून बाबासाहेबांचा लोकशाही समाजवाद साकार होतो. जगातील सर्व लोकशाही तत्त्वज्ञाने आणि समाजवादी तत्त्वज्ञाने तपासून बघितली तर लोकशाही समाजवाद हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान मानवमुक्तीचे एक नवे निराळे तत्त्वज्ञान ठरते. या लोकशाही समाजवादाचा अंगिकार आणि प्रयोग आपल्या समाजाने आणि शासनाने करावा. हा लोकशाही समाजवाद बाबासाहेबांनी विशुद्ध ऐहिक आणि बुद्धिप्रामाण्यवादी मूल्यांवर उभा केला. अध्यात्मनिष्ठ जीवनमूल्यांशी आपल्या लोकशाही समाजवादाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्णतः फारकत करून घेतली. निरीश्वरवादी आणि अनात्मवादी बुद्ध तत्त्वज्ञान त्यांनी या लोकशाही समाजवादाच्या जडणघडणीसाठी आणि यशस्वितेसाठी उपयुक्त म्हणून या देशापुढे ठेवले. या आंबेडकरवादाचा हेतू उज्ज्वल मनुष्याचे निर्माण आणि आदर्श मानवत्वाची सर्जना हे आहे.

भारतीय समाजाचा हजारो वर्षांचा सर्वंकष गुलामगिरीचा इतिहास आणि गुलाम असण्याची लांच्छनास्पद सवय पूजनीय मानणारा हा समाज लक्षात घेता या समाजाला माणुसकीच्या प्रकाशदिशेने न्यायचे असेल तर संसदीय लोकशाही हाच अधिक फलदायी मार्ग होय असे बाबासाहेबांना वाटते. अन्यायाच्या चिख-लात फसलेली, सामाजिक विषमतेच्या आणि आर्थिक विषमतेच्या वणव्यात जळणारी मानवता निर्विघ्न, सुंदर आणि समर्थ करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीचा अंगिकार केला. निरक्षरता, जातीभेद, गरिबी यांनी सडलेला समाज तेजस्वी करायचा असेल तर लोकशाहीचीच कास धरायला हवी. आपण लोकशाही स्वीकारली तर या समाजातील गटांचे आणि व्यक्तींचे हजारो वर्षांपासून चालत आलेले पारंपरिक संबंध रद्दबातल ठरतील आणि नवे समता–संबंध, बंधुतासंबंध, स्वातंत्र्य आणि न्यायसंबंध जन्माला येतील. भारतीय समाज ज्या जातीपावि-त्र्याच्या पायावर उभारलेला आहे, तो पायाच लोकशाहीमुळे उखडला जातो. लोकशाही हा केवळ शासनप्रकार नव्हे, ती जीवनप्रणाली आहे असे ते मानतात. गरीब व श्रीमंत, उच्च–नीच मालक–मजूर ही मांडणी लोकशाहीमुळे बदलू शकते. कोणत्याही पातळीवरचे शोषण लोकशाहीला मंजूर नसते. मानवी हक्क, व्यक्तीची व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा, समाजपरिवर्तन, राजकीय स्वातंत्र्य या अंगाने मुक्त मनुष्य आणि न्यायाधिष्ठित समाज निर्मिणे हा लोकशाहीचा ध्येयवाद असतो. कोणत्याही समाजाने अंगिकारलेली मूल्ये त्या समाजाचा दृश्य पातळीवरील चेहरा प्रकाशित करीत असतात. मनुष्यमारक असलेल्या पायाभूत तत्त्वांनाच लोकशाही मोडीत काढीत असते. एखाद्या शासनाने लोकशाहीचा अंगिकार अशा सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी करावयाचा असतो. एक व्यक्ती–एक मूल्य ही जाणीव प्रस्थापित करण्यासाठी आंबेडकरांना लोकशाही आवश्यक वाटते. प्रत्येक व्यक्तीला अशा समाजव्यवस्थेतच आपण उपरे नाही, 'एलिनेटेड्' नाही असे वाटू शकते. त्यामुळे प्रत्येकच व्यक्ती राष्ट्राचा केंद्रीय घटक होऊ शकते. लोक-शाहीच्या यशस्वितेसाठी सत्तेचे पक्षांतर होणे आवश्यक असते. अशा सत्तांतरा-साठी समर्थ विरोधी पक्षाची गरज आंबेडकर प्रतिपादितात. त्यामुळे शासन हुकूम-शाहीकडे वाटचाल करणार नाही आणि वेगवेगळ्या पक्षांकडे सत्ता जात राहि-ल्याने लोकशाही सतत तेजस्वी, वाहती आणि कर्तृत्वगामी राहील. लोकशाही यशस्वी होण्यासाठी जातीय मानसिकता नष्ट केली पाहिजे. कुणालाही अमर्याद स्वातंत्र्य लाभता कामा नये. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था निर्माण करून

लोककल्याणासाठी तिचे संवर्धन केले पाहिजे. ही सामाजिक नैतिकता डॉ. आंबेडकरांच्या लोकशाहीचा प्राण आहे.

आधी समाजवाद आणि त्यासोबत लोकशाही हा या संदर्भातला बाबासाहेबांच्या अवघ्या जगाला मार्गदर्शक ठरू शकेल असा विचार आहे. आर्थिक आणि सामाजिक संबंध व्यक्तींना आणि राष्ट्राला हितावह ठरतील अशा प्रकारची साऱ्या लोकशाही जगातील आणि समाजवादी जगातील ' लोकशाही समाजवाद ' ही पहिली संकल्पना आहे. या क्रांतिकारक संकल्पनेचे, या अभिनव तत्वज्ञानाचे बाबासाहेब प्रवर्तक ठरतात. महत्त्वाच्या आणि मूलभूत उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करावे आणि शासनानेच ते चालवावेत. मूलभूत असलेले उद्योगधंदेही शासनाने स्वतःच्या अख्त्यारीत चालवावे वा शासननियुक्त महामंडळाद्वारे चालवावेत असे हा समाजवाद मांगतो.

विमा व्यवसाय ही सरकारची मक्तेदारी असावी. कोणत्याही प्रौढ नागरिकाला त्यांच्या वेतनाच्या प्रमाणात पॉलिसी घेण्याची सक्ती शासनाने करावी. शेती हा शासनाचा उद्योग असावा. मालक, कूळ किंवा गहाणवट घेणारा धनको यांच्या ताब्यातील उद्योगधंदे, विमा व शेती यांच्या वहिवाटीचे हक्क शासनाकडे असावेत. या खाजगी व्यक्तींना त्यांच्या हक्कांच्या मूल्याइतकी भरपाई सरकारी कर्जरोख्याच्या स्वरूपात दिली जावी. या प्रकारे जवळ जवळ सर्वच उद्योगधंद्यांचे आणि शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करताना भरपाईची भरमसाट व रोख रक्कम देण्याची तरतूदही बाबासाहेबांनी ठेवली नाही. ताब्यात घेतलेल्या जमिनीची विशिष्ट आकारात शेते पाडली जावीत. आणि खेडुतांना कुळे म्हणून लागवडीसाठी दिली जावीत. शेतीची लागवड सामुदायिक पद्धतीने व सरकारी नियमानुसार केली जावी. शेतावर योग्य ती आकारणी केली जावी आणि उरलेले उत्पन्न कुळांनी सरकारने ठरविल्याप्रमाणे वाटून घ्यावे. जात, पंथ असा भेद न करता भाडेपट्टीने जमीन दिली जावी. त्यामुळे कुणीही जमीनदार, कुळ किंवा भूमिहीन मजूर राहणार नाही. शासनाने शेतीसाठी पाणी, जनावरे, अवजारे, खत, बियाणे याबरोबर आर्थिक तरतूदही करावी. शासनाला पुढील हक्क असावेत — शेती उत्पन्नावर जमीन महसुलासाठी एक भाग, कर्जरोखेधारकांना परतफेड करण्यासाठी एक भाग आणि पुरवठा केलेल्या भांडवली वस्तूंच्या वापरासाठी एक भाग असे आकार (charges) लावता यावेत. कूळकायद्याच्या नियमांचा भंग करणाऱ्यांना, लागवडीच्या साधनांची हेळसांड करणाऱ्यांना किंवा सामुदायिक शेती योजनेला बाधक कृती करणाऱ्यांना शासनमुक्रर केलेली शिक्षा करावी. या राज्य

समाजवादाच्या संकल्पनेला बाबासाहेबांनी संसदीय लोकशाहीची जोड देऊन लोकशाही समाजवादाचे अभिनव स्वरूप सिद्ध केले आहे. विषमतेवर आधारलेली समाजरचना बदलण्यासाठी व राज्यसमाजवादाच्या यशस्वितेसाठी डॉ. आंबेडकर औद्योगिकरणाचा पुरस्कार करतात. आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी, त्याला तेजस्वी अर्थ देण्यासाठी आणि समतासंस्कृतीच्या संवर्धनासाठी व्यक्तीला कमीत कमी तास काम करावे लागावे. पशूप्रमाणे तिला सारखे कष्टाला जुंपू नये. कला व ज्ञानसाधना करण्यासाठी तिला भरपूर फावला वेळ असावा. बाबासाहेबांचा लोकशाही समाजवाद व्यक्तीला ही हमी देऊ शकतो.

व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि समाजवाद यांच्यात परस्पर विरोध नाही. समाजात असूनही व्यक्तीचे जीवन स्वतंत्र असते. व्यक्तीला अर्थपूर्ण अस्तित्वनिर्मितीचे हक्क असावेत. यामुळेच कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राला व्यक्तीत कोणी गुलाम करू शकत नाही. व्यक्तीला गौण लेखणारा व वर्णात कोंडणारा धर्म बाबासाहेबांना मान्य नाही. समाजवाद हे बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान व्यक्तीच्या विकासाचेच तत्त्वज्ञान आहे. एका विशिष्ट मर्यादेत खाजगी मालमत्तेची आणि भांडवलशाहीची उपयोगिता त्यांनी मान्य करून वरील दोन्ही बाबींमधील समाजविघातक गोष्टींवर मात करण्याचे आवाहनही केले. पण या अवस्थेपेक्षाही बाबासाहेबांना लोकशाही समाजवादच आदर्श वाटत असे. भांडवलदार औद्योगिकरण करू शकत नाहीत म्हणूनही समाजवाद त्यांना आवश्यक वाटतो. प्रचलित संस्कृतीत श्रमिकांचीही विभागणी झाली होती. बाबासाहेबांनी श्रमविभागणी पुरस्कारिली. श्रमिकांची विभागणी ही विषमतेला पोषक मानली.

डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही समाजवादात एका श्रेष्ठ सामाजिक नैतिकतेचा उद्घोष होताना दिसतो. ह्यात बुद्धिप्रामाण्यवाद आहे. मैत्री आणि करुणा आहे. ऐहिकता आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आहे. समग्र ग्रामीण समाज या लोकशाही समाजवादानुसार जीवन जगायला लागावा ही तरतूद त्यात आहे. त्यातून या देशातील उपेक्षित माणूस उन्नत व्हावा, तो दास्य, दारिद्र्यातून मुक्त व्हावा, राष्ट्रजीवनाशी तो समरस व्हावा, त्यामुळेच राष्ट्र स्वतंत्र होईल आणि त्याला राष्ट्रपण लाभेल असे हा समाजवाद मानतो. जात, वर्ण आणि संप्रदायविहीन सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे; समाजातील सर्व घटकांमध्ये सुसंवाद निर्माण करणे म्हणजे राष्ट्रवाद होय असे बाबासाहेबांना वाटते.

राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्ष आणि बुद्धिप्रामाण्यवादी असावा. प्रतिगामित्वाचे पुनरुज्जीवन होऊ नये. लोकसंख्येच्या बळावर एखाद्या राष्ट्राला नाव देऊ नये.

असा धर्मवाद व राष्ट्रवाद राष्ट्रविघातकच असतो. तो राष्ट्रवादी पिसाटपणा होय. कोणताही धर्म या राष्ट्राचे उपरोक्त राष्ट्रवादी धर्मनिरपेक्ष स्वरूप शबलित करणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. राष्ट्रवादाच्या नावाखाली जुन्या विषमसमाजसंस्थेचे पुनरुज्जीवन करणे इष्ट नव्हे, असा आंबेडकरांच्या लोकशाही समाजवादाचा प्रस्ताव आहे.

मनुष्याच्या न्याय हक्कासाठी ते संघर्ष पुरस्कारतात. "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा." किंवा "बळी वाघाला देत नसतात शेळीला देत असतात." किंवा "शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन जगा." असा त्यांच्या विधानांमधून शक्तीची उपासना, सामर्थ्याची आराधना आणि संघर्षाचे महिमान व्यक्त होते. या लोकशाही समाजवादाला आंबेडकरांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दिलेले आहे. त्यांच्या या जडवादी लोकशाही समाजवादात अध्यात्माला, ईश्वराला वा आत्म्याच्या संकल्पनेला अस्तित्व नाही. ८-५-१९५५ च्या 'जनते'त त्यांनी बुद्धधम्माची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ईश्वर नाही, ईश्वर हा सृष्टीचा निर्माता नाही. आत्माही नाही असे सांगणारा बुद्धधम्म लोकशाही समाजवादाच्या यशस्वितेसाठी आवश्यक अशी बुद्धिप्रामाण्यवादी मानसिकता घडविणारी शक्ती म्हणून त्यांना आवश्यक वाटतो. संविधानामध्येही (५१-ज) त्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद, शोधकबुद्धी आणि सुधारणावाद यांचा पुरस्कार केला. याप्रकारे लोकशाही समाजवाद हे त्यांचे एक उन्नत जीवनदर्शन साकार झाले. घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांनी या दर्शनाची तेजोगर्भता वृद्धिगत केली. या दर्शनात भांडवलशाहीला व हुकूमशाहीला जागा नाही. या सर्वच अनिर्बंध व व्यक्तिवादी गोष्टी टाळून आंबेडकर आपले चिंतन मांडतात. हा लोकशाही समाजवाद, मानवी मुक्तीचे हे दर्शन, ही आंबेडकरी नवनैतिकता जागतिक संदर्भात एक नवे योगदान, एक नवी निर्मिती ठरते हाच आंबेडकरवाद होय.

आंबेडकरवाद हा प्रचलित भारतीय समाजरचनेला एक पर्यायी समाजरचना देणारा विचार आहे. विद्यार्थी ही शक्यतांची घटना असते. तरुण विद्यार्थी हे उफाळत्या शक्तीचे नाव असते. तो समतेचा सखा आणि सौंदर्याचा सांगाती असतो. त्याच्या जवळ सृजनशील संवेदनशीलता असते. ही संवेदनशीलता स्वभावाने उत्कट आणि तीव्र असते. भल्याबुऱ्याचा अत्यंत पोटतिडकीने ती निर्णय घेऊ शकते. भारतीय समाजात ही शक्ती ज्या दिशेने पाहील, त्या दिशेने केव्हाही सूर्य

उगवू शकेल. ही शक्ती कुठल्याही शक्तीला प्रकाशित करू शकते. जसा विद्यार्थ्यांचा चेहरा असेल तसाच चेहरा राष्ट्रीय भवितव्याला लाभतो. विद्यार्थी ही ही एक उर्जा आहे. या उर्जेच्या पंखावर बसूनच समाज वर्तमानाचा निरोप घेत भवितव्याच्या हातात हात गुंफीत असतो. समाजासाठी त्याचे जाणीवविश्व सर्वच संदर्भात निर्णयशाली ठरत असते. ते समाजाच्या विकासाचे मापक यंत्र असते. अत्यंत तरल, तीव्र व स्वतंत्र अशी ही घटना असते. डोळ्यात तेल घालून अत्यंत नाजूक व जबाबदार हाताने या विद्यार्थ्यांच्या जाणीवविश्वाच्या तारा छेडाव्या लागतात. त्यातून फुलणारे स्वरलाघव राष्ट्राच्या सौंदर्यस्वरांशी जुळवून घ्यावे लागते. प्रतिगामी समाजरचनेचे रखवालदार विद्यार्थ्यांची ही विद्युत्शक्ती प्रतिगामित्वाच्या पूजेला लावीत असतात. परंपरावाद, विषमता ह्यांची ओझी त्याच्यावर लादून प्रतिगामी समाज निर्विघ्न होतो. अनेकदा आपला दुरुपयोग केला जातो आहे हेच त्यांना कळत नाही. "नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभाखाली, निर्मितो नवक्षितिजे पुढती" अशी ऊर्जा असलेले त्याचे कोलंबसपण प्रतिगामी समाज परंपरेच्या वीतभर डबक्यात सडवून टाकतो हे त्याच्या लक्षातच येत नाही. हा त्याच्या नवनिर्माणशक्तीचा, युवकपणाचा घोर अपमान असतो हे त्याला कळतच नाही.

विद्यार्थीपणाला ज्ञानसाधनेशी जोडणारे आणि या राष्ट्राच्या उज्ज्वलतेचा जिता जागता सौंदर्यविचार देणारे आंबेडकर देशातील सर्व स्तरातील युवकांना दीपस्तंभाप्रमाणे वाटले पाहिजेत. लोकशाही समाजवाद भारतात युवकांनी आदर्श म्हणून स्वीकारला तर या राष्ट्राला माणुसकीचा अत्यंत उन्नत आविष्कार करणे सहजच शक्य होईल. महाराष्ट्रात ही प्रक्रिया सुरू झाली आहे.

आजन्म विद्यार्थी असलेल्या बाबासाहेबांना विद्येचे दांडगे व्यसनच जडले होते. बुद्धिमत्ता हीच युगाचा अंधार चिरून नवा समतेचा दिवस जन्माला घालू शकते ही खात्री होती म्हणूनच "बुद्धीचा प्रभाव पाडल्याशिवाय नुसत्या शिक्षणाने चीज होणार नाही..." "आजच्या जीवनकलहाच्या दंगलीत पुढारलेल्या लोकांपेक्षा आम्ही निकृष्ट ठरलो तर आमची धडगत होणार नाही" असे बाबासाहेब नेहमी सांगत. शिक्षणाने शील निर्माण केले नाही तर राष्ट्राचा नाश अटळ आहे असे म्हणणारे बाबासाहेब विद्यार्थ्यांच्या शीलाचा संबंध राष्ट्राचा उज्ज्वल जगण्याशी लावीत होते हे या देशातील शिक्षणतज्ज्ञांनी व समाजधुरिणांनी लक्षात घ्यायला हवे. राष्ट्रजीवन उज्ज्वल करू इच्छिणाराने स्वत: सुधारले पाहिजे.

अन्यथा विलायतेलाही जाऊन आलेल्या भारतीयांमध्ये वर्णाश्रम, जाती व अंधश्रद्धा ही पाण पूज्य असतेच. हे मोठ्या उपरोधाने ते सांगत. 'ब्राह्मण्य हे महाभयंकर विष आहे. ते हलाहलापेक्षाही भयंकर असल्याने शंकरासदेखील ते पचवि‑ता येणार नाही' हे सर्व अल्पसंख्यांकांनी ओळखावे असे त्याचे सांगणे आहे. सर्व अल्पसंख्यांकांनी एकत्र यावे. संघटना उभारावी. 'आपल्यापुरतेच पाहत राहणे हा अल्पसंख्यांकांचा दोष आहे' आपल्या समाजातील सर्व उपेक्षित गटातील तरुणांनी व विद्यार्थ्यांनी प्रथम लक्षात घ्यायला हवे.

यापुढल्या काळात लहान माशांनी विखुरलेल्या अवस्थेत राहणे घातकी-पणाचे ठरेल. त्यामुळे काळाची पावले ओळखून अभ्यास, चिंतन, वादविवाद, व्याख्याने यांच्याद्वारा विद्यार्थ्यांनी स्वतःस तेजस्वी व धारदार बनवले पाहिजे. त्यांनी केवळ परीक्षार्थी होऊ नये तर रचनात्मक कार्यालाही वाहून घ्यावे. विद्या माणसाला अन्नाप्रमाणे आवश्यक आहे. **विद्या** हे दुधारी शस्त्र आहे. ते दुष्टांचा संहार करते व दुष्टांपासून आपले रक्षणही करते. या विद्येसोबत पुढील गोष्टी असल्या तरच विद्या विधायक ठरू शकते. **प्रज्ञा :** म्हणजे शहाणपणा, **शील :** सदाचारसंपन्न आचरण, **करुणा :** सर्व मानवजातीसंबंधी प्रेम आणि **मैत्री :** सर्व प्राणीमात्राविषयी आत्मीयता. याप्रकारे विद्या, प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या पंचशीलानुसार विद्यार्थ्यांनी आपले चारित्र्य घडवले पाहिजे. वेळ पडली तर सत्यासाठी एकट्यानेही लढायची तयारी ठेवली पाहिजे असे बाबासाहेब सांगतात. निर्भय माणसाचे कोणी वाकडे करू शकत नाही. त्यामुळेच "**निर्भय व्हा व जगाचे राज्य मिळवा**" हे मोठ्या कळकळीने त्यांनी तरुणांना सांगितले आहे. सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवून संघटित होणे, डोळसपणे व जिद्दीने अभ्यास करणे, आत्मविश्वास प्रज्वलीत करणे, दीर्घोद्योगाने पराक्रमी व बुद्धिमान होणे, शिस्त आणि सदाचार (शील) अंगी बाणविणे या त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितलेल्या गोष्टींची गरज खरे तर आदर्श भारतीय नागरिकत्व घडविण्यासाठीच आहे.

बाबासाहेबांनी विद्यार्थ्यांपुढे परिवर्तनशील नैतिकतेचा आदर्श ठेवला आहे. विद्यार्थ्यांनी सतत प्रवाही, नवनवोन्मेषशाली असावे असे बाबासाहेबांना वाटे. "मानवी जीवनातील वैचारिक आणि नैतिक मूल्ये कधीच स्थिर राहत नाहीत. ती कालमानानुसार प्रत्यही बदलतच नाहीत तर प्रगतही होत जातात. भारतीय विद्यार्थ्यांनी निर्माण होणाऱ्या या नवनव्या जीवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे, ती आचरणात आणण्यास सिद्ध राहिले पाहिजे," या सोबतच त्यांनी विद्यार्थ्यांची

बौद्धिक व वैचारिक पातळी रोडावत चालल्याची खंतही व्यक्त केली. आजच्या विद्यार्थी–जगाने या गोष्टीकडे विशेष ध्यान द्यायला हवे. विद्यार्थ्यांना अभ्यासाने नवी दृष्टी लाभली पाहिजे व त्यादृष्टीने त्यांनी खऱ्या जीवनमूल्यांचा शोध घेतला पाहिजे. "पण आजचे विद्यार्थी क्रीडेच्या आणि राजकारणाच्या फंदात ती दृष्टीच प्राप्त करून घेत नाहीत," याचे त्यांना अतोनात दुःख होत असे.

जाती–वर्णविहीन बुद्धिप्रामाण्यवादी समाज हे बाबासाहेबांचे ध्येय आजच्या विद्यार्थ्यांचे व प्रत्येक तरुणाचे ध्येय झाले पाहिजे. धर्म, वंश व लिंगभेद यांना जाळून पुरून टाकणारे अखिल भारतीय नागरिकत्व हीच आजच्या पिढीची आदरणीय आकांक्षा झाली पाहिजे. वरील भेदांनी आपल्या समाजाचे रक्ताभिसरण थांबले आणि परिणामी या समाजाला मरणकळा आलेली आहे. बाबासाहेबां-प्रमाणेच या स्थितीने आपले माथे भडकले पाहिजे. वरील भेदांनी चिंध्या झालेला हा समाज राष्ट्र व्हावा यासाठी आपल्या प्रत्येकाच्या मनात आपण आंबेडकर प्रज्वलीत करणे ही काळाची गरज आहे.

बाबासाहेब म्हणाले होते, "खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले, तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाजपद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्याचे त्यांच्या स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे." (जमता २२–९–५१) या देशातील पीडितांना मानवता मिळवून देण्यासाठी शिक्षण हाच उपाय आहे हे याप्रकारे बाबासाहेबांना बालंबाल पटले होते. बाबासाहेबांच्या या भूमिकेचे महत्त्व आपल्या समाजाच्या विषमतेच्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर विशेषत्वाने लक्षात येते. आपल्या समाजातील ब्राह्मण वर्गाने शिक्षण आपल्यापुरतेच सीमित ठेवले. उरलेल्या सर्वांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले. त्यामुळे केवळ शिक्षणाला वंचित राहिलेल्यांचीच आयुष्ये विद्रूप झालीत, त्यांचीच अस्तित्वे संपुष्टात आलीत असे नाही तर एकूण या राष्ट्राचीच वाटचाल थांबली. थांबलेल्या, गती हरवलेल्या ब्राह्मण वर्णाभोवती हे राष्ट्र फिरत राहिले. त्यामुळे त्याचा विकास खुंटला. हजारो वर्षे हा शिक्षणाचा कोरडा दुष्काळ इथे कोट्यवधींचे जन्म निरर्थक करीत बसला होता. मूठभरांपुरते शिक्षण मर्यादित करून बहुसंख्यांकांना अज्ञानात, अंधारात आणि अभावात हजारो

वर्षे दाबून ठेवणे हा अपराध मानवतेच्या दृष्टीने जसा भयानक आहे तसा राष्ट्राच्या दृष्टीनेही अमानुष आहे. हे कृत्य मानवताद्रोही आहे पण ते राष्ट्रद्रोही आणि जीवनद्रोही कृत्यसुद्धा आहे. या स्थितीत वर्णव्यवस्थेमुळे हजारो वर्षे बदल झाला नाही. बाबासाहेब सांगतात, "ब्राह्मणाच्या पदाची अभिलाषा धरून क्षत्रियांनी त्यांच्यावर मात करू नये. क्षत्रिय होण्याची महत्त्वाकांक्षा धरून वैश्यांनी व शूद्रांनी त्यांच्याशी झगडा करू नये व अतिशूद्रांनी तर देतील त्यावर आपले कार्य भागवावे. एकमेकांच्या पदाला एकमेकांकडून धक्का लागू नये व त्याचे पद अचल व अढळ रहावे हाच वर्णाश्रम धर्माचा मुख्य हेतू आहे." (ब. भा. १५–७–१९२७) आणि त्यामुळेच मानवतेला अशी अपमानित करणारी, या देशाला देश म्हणून पांगळे करणारी व या देशातील जिवंतपणाला ठेचून काढणारी ही अन्याय्य समाजरचना उलथून टाकायची असेल तर शिक्षण हे क्रांतीच्या पहिल्या प्रकरणाचे पहिले वाक्य आहे असे बाबासाहेबांना वाटते. सर्व प्रकारची विषमता आजवर मानवतेच्या व देशाच्या गुन्हेगारांनी टिकवून ठेवली ती आता नष्ट होण्याची वेळ आलेली आहे. त्यासाठी बाबासाहेब सत्तासंपादनाचा मार्ग सांगतात. तो मार्गही अर्थात शैक्षणिक विकासाच्या पोटातूनच जन्माला येतो. राजसत्ता दलितांच्या हातात आली तर सर्व विषमतेवर मारा होईल कारण त्या विषमतेने दलित भाजून पोळून निघालेला आहे. त्यामुळेच बाबासाहेब म्हणतात, "दलित वर्गाच्या हाती सत्ता गेली की ही चातुर्वर्ण्य विषमता धुळीला मिळालीच असे समजावे. आजवर ती टिकली याचे कारण राजसत्तेचा तिच्यावर कधीच मारा झाला नाही. राज-सत्तेची तिच्यावर नेहमीच कृपा होती" (ब. भा. १–१–१९२९) समतेसाठी बाबासाहेबांनी या देशात आकाशपाताळ एक करणारे संगर उभारले. या संगरात शिक्षणाची शक्ती त्यांना विजय मिळवून देणारी शक्ती वाटत होती. त्यांनी समतेचे अर्थात अनोखे असे स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणतात–"समतावाद्यांचे ध्येय सर्वांना समतेने वागविणे हे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे. हे ध्येय साध-ताना सर्वांना समतेने वागवून चालणे शक्य नाही. जेथे सर्व व्यक्ती समान आहेत तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागविल्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारख्या लेखून चालणे म्हणजे समताप्रस्था-पनेच्या ध्येयाला विरोध करणे होय. या बाबतीत रोगी माणसाचे उदाहरण बरोबर लागू पडते.

सुदृढ माणसाला जाडेभरडे अन्न चालते, पण सुदृढ माणूस व रोगी माणूस हे दोघेही सारखे मानून जर एखादा वेडगळ 'समतावादी' ते जाडेभरडे अन्न

रोग्याला देईल तर तो रोग्याचा प्राणदाता होण्याऐवजी प्राणहर्ता होईल. त्याप्रमाणे श्रीमंतांवर जितका कर असतो तितकाच गरिबांवर ठेवावा कारण तसे न केल्यास असमानता होईल असे जर कोणी म्हणेल तर लोक त्याला वेड्यात काढतील. सारखा कर देण्याची ऐपत असलेल्या श्रीमंतांपैकी काहींवर कमी व काहींवर जास्त असा जर कर लादला किंवा सुदृढ माणसाला पचण्याजोगे अन्न दिले तर मात्र विषमता होईल. या उदाहरणावरून तात्पर्य घ्यावयाचे ते हे की, समानांना असमानतेने व असमानांना समानतेने न वागविणे हा समतावाद्यांचा दस्तुर आहे." (ब. भा. १–१–१९२९) आणि ही जाणीव शैक्षणिक प्रगतीने प्रज्वलीत होऊ शकते हे बाबासाहेबांना ज्ञात होते. समतेसाठी व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यकता असते. आणि स्वातंत्र्यरक्षण करण्याची शक्ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही असे बाबासाहेबांना वाटते. त्यामुळेच शिक्षक प्राध्यापक व विद्यापीठे यांच्यावर बाबासाहेबांनी मोठी जबाबदारी टाकली आहे. 'शिक्षकवर्ग हा राष्ट्रातील सारथी वर्ग आहे. कारण त्याच्या हाती शिक्षणाच्या दोऱ्या असतात' म्हणून ही समाजरचना बदलण्याची प्रेरणा शिक्षकांनी व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांमध्ये चेतवावी असे बाबासाहेबांना वाटते. महाविद्यालये व विद्यापीठे कारकून काढण्याचे कारखाने होऊ नयेत. राष्ट्राचे आदर्श नागरिक त्यांनी तयार करावे. अध्ययन, अध्यापन व क्रांतीप्रेरणा–प्रवर्तन हा त्यांचा धम्म व्हावा असे त्यांना वाटते. त्यातून समाजक्रांती फुलविणारे विद्यार्थी–मन जन्माला येऊ शकेल.

"कोणताही मनुष्य सतत दीर्घोद्योगानेच पराक्रमी व बुद्धिमान होऊ शकतो. कोणीही मनुष्य उपजत बुद्धिमान अगर पराक्रमी निपजू शकत नाही." असा प्रेरक संदेश बाबासाहेबांनी दिला आहे. त्यांनी चोवीस तासांपैकी एकवीस तास अभ्यास केला आहे. विद्येनेच माणुसपण लाभते म्हणून आपण बाबासाहेबांप्रमाणे जन्मभर विद्यार्थी असलो पाहिजे. त्यांनी म्हटले आहे की, "विद्या हे एक शस्त्र आहे. ज्याच्याजवळ विद्येचे शस्त्र असेल व तो शीलवान असेल तर त्यायोगे तो एकाचे संरक्षण करील. तोच इसम शील नसेल तर विद्येच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करील. शीलाशिवाय शिकले सवरलेले लोक निपजू लागले तर त्यांच्या शिक्षणातच समाजाचा व राष्ट्राचा घात आहे." विद्यार्थ्यांनी संघटनेच्या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतली पाहिजे. व्यक्तिगत स्वार्थापेक्षा समाजाच्या फायद्याकडे लक्ष दिले पाहिजे. ते म्हणतात : आपण एकजुटीने वागाल तर निश्चितच काही करू शकाल. आपल्या समाजावर हजारो वर्षांपासून होत असलेला जोरजुलूम व अन्याय निवारण करण्याचे कार्य आपण स्वखुशीने आपल्या शिरावर घ्यावयास

हवे. त्यासाठी संघटना, शील व शिस्त वाढवा व समाजउन्नतीस त्याचा फायदा द्या हे बाबासाहेबांचे विद्यार्थ्यांना कळकळीचे सांगणे आहे.

साहित्य एका बाजूने संस्कृतीचा पाया आणि दुसऱ्या बाजूने संस्कृतीचा कळस असते. ज्या समाजाची प्रतिभा आपल्या युगाची नवनवोन्मेषशाली स्पंदने साहित्यांकित करते तो समाजच आपल्या ध्येयवादाला संस्कृतीरूपात सादर करू शकत असतो. आजची साहित्यनिर्मिती उद्यासाठी संस्कृतीनिर्मिती ठरत असते. आज साहित्यात ज्या विचाराचे अधिराज्य असते तो विचारच उद्याच्या संस्कृतीचे नेतृत्व करीत असतो. यामुळेच तर साहित्यात मूल्यांच्या झुंजी चालतात. साहित्याचा निर्माता काळाला आणि इतिहासालाच आपल्या प्रतिभेपुढे नम्र करतो असे नाही तर आपल्या जाणिवेला येत्या संस्कृतीची नियंत्रक शक्ती म्हणूनही स्थापित करीत असतो. साहित्य ही महाशक्ती आहे. या शक्तीची अत्यंत जबाबदारीने विद्यार्थ्यांनी आराधना केली पाहिजे. इतरांना दिसणार नाहीत ते आजारही तरुण प्रतिभेला दिसू शकतात. या तरुणांच्या प्रतिभांनी आपल्या पारंपरिक समाजरचनेने दिलेल्या आजारांपासून मात्र मुक्त झाले पाहिजे. ही बाब सोपी नाही. ही गोष्ट भल्याभल्यांच्या दुटप्पीपणाच्या गहन पुराव्यांवरून आपण लक्षात घेऊ शकतो. तेव्हा तुम्ही दुर्गंधी प्रसवणाऱ्या संदर्भांशी फारकत घेतली पाहिजे. वाढळलेल्या उष्ण रक्ताने लिहिले गेलेले साहित्यच आपल्या समाजाची बंद मजल्यांची अमानुष इमारत जमिनदोस्त करू शकते. शिक्षणयंत्रणा आज उच्चांच्या हातात असल्याने बंधमुक्तीसाठी आटापिटा करणाऱ्या विद्यार्थ्यांची व तरुणांची भविष्ये प्रवेश, प्रॅक्टिकल्स, मुलाखती, परीक्षा, सिलेक्शन, कन्फर्मेशन, प्रमोशन या सर्वच पातळ्यांवर मारली जाताहेत. "दोन माणसे सुदृढ असतील तर एकाला मलिदा व दुसऱ्याला कोंडा देणे केव्हाच रास्त होणार नाही. पण एक रोगी व दुसरा निरोगी असला तर निरोग्याला कोंडा व रोग्याला मलिदा हीच व्यवस्था प्रशस्त राहील" असे बाबासाहेब म्हणाले होते. पण प्रायमरी ते विद्यापीठ या सर्वच पातळ्यांवर आरक्षणाला अत्यंत शिताफीने बगल दिली जाते. चित्रपट, टी. व्ही. या माध्यमांद्वारा भोगवादाचे नि प्रतिगामित्वाचे मोहक पिंजरे प्रक्षेपित केले जातात. भांडवली संस्कृती व्यसनांची मरणोत्पादक गटारे निर्माण करते. उच्चांच्या घरातील सर्व बाया–माणसे नोकरीला नि खालच्या वर्गातील एखादा मनुष्यही नोकरीला नसणे ही परिस्थिती इतिहासभर ज्यांची सांस्कृतिक उपासमार झाली त्या विद्यार्थ्यांनी लक्षात घेतली पाहिजे. इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर यांची लाखवी निमंत्रणे येतात पण जोतिबा फुल्यांना ब्राह्मण मित्राच्या लग्नातून हाकलले

जाते त्याप्रमाणे हा गरीब विद्यार्थी त्या निमंत्रणाचा उपभोग घेऊ शकत नाही. हे बदलले नाही तर या बंधमुक्त होऊ पाहणाऱ्या तरुणांच्या वर्तमानाहून त्यांचे भवितव्य अधिक क्रूरकर्म असेल हे निश्चित. या तरुणांनी आपल्या बौद्धिक कर्तृत्वाने आता इतिहासाला धडा शिकविणे, त्याला नव्या संस्कृतीचे डिक्टेशन देणे आवश्यक आहे.

बाबासाहेब म्हणाले होते, "जीवनात भेद न राखला जावा व सदैव दक्ष व जागृत राहून कल्याण साधलं जावं असंच वाङ्मय किंवा साहित्य निर्माण व्हायला पाहिजे... उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका, ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरतीच बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं फार मोठं जग आहे हे विसरू नका. त्यांचं दुःख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचं जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे." आपल्या कोणत्याही विद्यार्थ्याने वा तरुणाने बाबासाहेबांच्या वरील महावाक्याला आपल्या साहित्यनिर्मितीचा मॅनिफेस्टो मानले पाहिजे. पुराण परंपरांनी आपल्यावर लादलेला हा जखमांचा भारत पाहून आपले मन पेटले पाहिजे. वेगळ्या आशयाचा, वेगळ्या आकृतीचा, वेगळ्या माणसाचा भारत तरुण स्वप्नांना दिसायला हवा. "गर्वसे कहो हम भारतीय है", "गर्वसे कहो हम धर्मातीत है", "गर्वसे कहो हम नास्तिक है", "गर्वसे कहो हम पीडितों के साथी है", ही घोषवाक्ये आपल्या सर्वांच्या ओठी असली पाहिजेत. तुमच्या नव्या तेजस्वी साहित्याचा जन्म याच भूमिकेच्या पोटी होईल.

अखिल भारतीय पातळीवर आंबेडकरवाद प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सर्व स्तरातील युवकांनी आपल्या मनातील मानवताविरोधी आणि दैववादी संस्कार गाडून पुढे यायलाच हवे. आंबेडकरवाद युवकांचा क्रांतीचा जाहीरनामा असला पाहिजे. युवकांनी संघटित पातळीवर आपली आंबेडकरी मानसिकता प्रयत्नपूर्वक व नियोजनपूर्वक घडविली पाहिजे.

आंबेडकरवाद या देशाला नवजीवन देऊ शकतो. भांडवली आणि सरंजामी अशी संयुक्त 'जैसे थे'वादी शक्ती आंबेडकरवादाच्या विरोधी असणे भाग आहे. आपल्या समाजाची वृत्ती वरील दुहेरी तुरुंगात अडकलेली असल्याने

आंबेडकरवाद पुस्तकात राहण्याची भीती आहे. केवळच दलित युवक त्याला प्रत्यक्षात उतरवू शकणार नाहीत. यावेळी एकूण भारतीय युवकांचे मन क्रांती-विरोधी संस्कारांमधून बाहेर काढण्यासाठी व्यापक प्रबोधनाचा कार्यक्रम आपण हाती घ्यायला हवा. त्यासाठी आधी आपण शिक्षण ही परिवर्तनाच्या प्रक्रियेतील पहिली पायरी मानायला हवी. ज्ञानसाधना व साहित्यसाधना ही संस्कृतीनिर्माणाची साधना असते. बी. ए., एम्. ए. या पदव्यांपाशी शिक्षण संपत नाही. शिक्षण ही अंतहीन प्रक्रिया आहे. शिक्षण परिवर्तनाची दारे उघडून देते. विकासाचा पथ स्वच्छ करते. शिक्षणाने नवे मन लाभते. नव्या जाणिवा उरात धावायला लागतात. शिक्षणाने दुनियेचा स्वभाव कळतो, समाजाच्या रचनेचा वृत्तान्त हाती येतो. शिक्षणाशिवाय आपल्याला तारणारे आज मोठे कोणतेच साधन नाही, आणि दलित नेतृत्व तर शिक्षणाकडे पुरेशा उदासीनतेने पाहते. अशावेळी आपल्यासाठी "**शिक्षण हेच आंबेडकर**" झाले पाहिजे. तेच आपले जगणे झाले पाहिजे. घरा-झोपड्यांमधून केवढा मोठा, कितीतरी प्रकारचा अंधार शिक्षणाची वाट पाहत बसलेला आहे. आपल्यावर आज नवसंस्कृती निर्माणाची ऐतिहासिक जबाबदारी आहे. आंबेडकर हा ज्ञानसंपादन, चारित्र्य, शिस्त आणि कर्तृत्व या सर्वच बाबतीत आपला दीपस्तंभ आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी जबाबदार, चारित्र्यसंपन्न आणि ज्ञानोपासक असलेच पाहिजे. पान-तंबाखू, सिगारेट, मद्य आणि अशाच इतरही मादक पदार्थांपासून दूर असणे हा आपल्या विद्यार्थ्यांसाठी व युवकांसाठी "**आंबेडकरधम्म**" असायला हवा. इतरांबरोबर भोगयात्रेत व उठवळ मजामौजेत सहभागी होणे आंबेडकरी नीतिशास्त्रात बसत नाही. बाबासाहेबांनी म्हटल्या-प्रमाणे, "स्वत:ला निर्माण करणे" हा आपल्यापुढचा एकमेव कार्यक्रम आहे हे विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यायला हवे. आपण आंबेडकरी प्रेरणेने पेटून उठायला हवे. बेगावध, आळशी आणि कर्तव्यचुकार असणे म्हणजे आंबेडकरी युवक असणे नव्हे. आंबेडकरवादी युवती बुद्धिमान ज्वालेसारखी असावी. ती विद्युत्वेल असावी. ती आंबेडकरी प्रेरणेचा पुरावा ठरावी. बाबासाहेब तिच्या मनातून कल्लोळत असायला हवेत. तिच्या डोक्यात विचारांचे मोहोळ उठले पाहिजे. विद्येसाठी तिने तपस्या मांडली पाहिजे. तिच्या वागण्या-बोलण्यातून आंबेडकरी ठिणग्या फुलाव्यात. आंबेडकरवाद युवतीच्या मनाचा एकमेव ध्यास व्हावा. आणि या तरुणीने वक्तृत्वाची, विचाराची आणि क्रांतीची साधना तरुणांच्या खांद्यास खांदा भिडवून करायला हवी. स्त्री ही क्रांतीची पाठशाळा असते. ती मनात आणील तर क्रांतीचे संस्कार घडवून ती नव्या समाजाची शिल्पकार होऊ शकते.

विद्यार्थ्यांव्यतिरिक्तचा मिळवता युवक ही सुद्धा एक मोठी शक्ती आहे. मिळवते युवक आंबेडकरी क्रांती–अभियानाला मोठे आर्थिक योगदान देऊ शकतात. 'थेंबे थेंबे तळे साचे' प्रमाणे कणकण गोळा केला तरी पैशांचा डोंगर उभा करता येईल. बाबासाहेब आंबेडकरांच्यासाठी पान, सिगारेट, दारू ही व्यसने त्यागून वाचलेला पैसा संघटनेला दिला तर आंबेडकरी संघटनेचे पोलादी स्वरूप सिद्ध करता येईल. आंबेडकरी युवकाचे मन एक सुसंस्कृत, बहुश्रुत आणि कला–साहित्याचे जाणते मन असले पाहिजे. जागतिक क्रांत्यांचे नकाशे व भारतीय क्रांतीचे वेळापत्रक खिशात बागवणारे ते मन असले पाहिजे. जीवन हे युद्ध आहे, क्रीडा नव्हे. जीवन हा संघर्ष आहे, निद्रा नव्हे. जीवन ही साधना आहे, भोगवाद नव्हे हे लक्षात ठेवायला हवे. साहित्यनिर्मिती हे उन्नत पातळीवरचे जगणे होय. ज्ञानोपासना ही उज्ज्वल पातळीवरची अस्तित्वसंपादना होय. भोवतीच्या जीवनाचा अभ्यास, त्यातील विविध व्यवहारांचा अभ्यास, वक्तृत्वाचा अभ्यास या गोष्टी युवकांनी मनापासून केल्या पाहिजेत. आपण कुठेही राहू पण पुस्तकांसोबत राहू. आपण विद्यागृह झाले पाहिजे. सर्वांना एकच ध्यास, सर्वांना एकच ध्येय असावे ते म्हणजे आंबेडकरवाद. वैयक्तिक स्वार्थ, प्रसिद्धीचा मोह, अहंकार आणि गब्बर होण्याची क्रूर लालसा यापासून युवकांनी दूर असले पाहिजे. संघटना ही शिस्त, शील आणि चारित्र्य यावर उभी राहायला हवी. आंबेडकरी नीतीचे आचरण हाच संघटनेचा आधार असावा.

अशी संघटनाच संघर्ष करू शकते. संघर्षात यशस्वी होऊ शकते. संघटित झाल्याशिवाय यशस्वी संघर्ष करता यायचा नाही. शिक्षणाशिवाय जबाबदार व विवेकनिष्ठ संघटना बांधता यायची नाही. तेव्हा **शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.** या नव्या त्रिशरणातील कड्या एकमेकीच्या पोटी जन्माला येणाऱ्या कड्या आहेत. एक घटना दुसरीला जन्म देते हे लक्षात घ्या. प्रत्येक युवकाने पहिल्या पातळीवर आंबेडकरवादाच्या विरोधी असलेल्या आपल्याच मनातील कुसंस्कारांशी दारुण संघर्ष करायला हवा. ही पहिली लढाई जिंकूनच त्याला नंतरच्या युद्धासाठी रणात प्रवेश मिळू शकेल. आपल्या मनातील जातीयवृत्ती स्वार्थी–व्यक्तिकेंद्रित वृत्ती, व्यसनी वृत्ती, आत्मसमर्थक वृत्ती, बेजबाबदारपणा देव–दैववादी वृत्ती, अविवेकी अंधश्रद्ध वृत्ती, शब्दप्रामाण्यवादी वृत्ती, आळशी आणि तृप्त वृत्ती, मूर्ख–उथळ गोष्टींमध्ये रस घेणारी वृत्ती यांच्यावर विद्यार्थी-युवकाने प्रथम विजय मिळवायला हवा. असे झाले तरच पुढे प्रत्यक्ष समाजातील वरील रोगांशी युवकाला युद्ध करता येईल. ब्राह्मणांपासून–आदिवासींपर्यंतच्या

सर्व स्तरातील युवकांना वरील कुप्रवृत्तींवर विजय मिळवावा लागेल. वरील सर्व कुप्रवृत्तींनी आपला समाज आसन्नमरण झाला आहे, आपल्या देशातील ज्या धर्मांचा पाठिंबा वरील कुप्रवृत्तींना असेल त्यांचीही चांगली ओळख युवकांनी करून घ्यायला हवी. इतिहासभर आणि वर्तमानकाळातही या कुप्रवृत्ती नष्ट करू पाहणारे ग्रंथ, महापुरुष आणि धर्म कोणकोणते आहेत आणि त्या कुप्रवृत्तींना पोसणारे ग्रंथ, महापुरुष आणि धर्म कोणकोणते आहेत याचा स्वच्छ तपशील युवकांजवळ असायला हवा. या पातळीवरून इतिहास आणि वर्तमान समजावून घेतल्याशिवाय निभ्रांत मनाने परिवर्तनाच्या प्रक्रियेत उडी घेता येणार नाही. वरील गोष्टी समजावून न घेता, त्यांच्या संदर्भात स्वच्छ निर्णय न घेता विद्यार्थ्यांचे व तरुणांचे क्रांतीप्रक्रियेत सामील होणे क्रांतीचा विचका करणारे ठरेल. त्यामुळे क्रांतीच पांगळी होईल. प्रबोधनच कुरूप होईल. हे विपरीत घडू नये यासाठी आपण आपल्या मनातील मनूचे विनाशकारी अस्तित्व उद्ध्वस्त केले पाहिजे.

आपली भूमिका स्वच्छ हवी. विसंगतीने आपल्या चिंध्या होणार नाहीत याची काळजी आपण घ्यायला हवी. वैचारिक पातळीवर अंर्तविरोधांनी ग्रस्त नाहीत अशी माणसे आपल्या देशात फारच कमी आहेत. अगदी फायद्यापुरते वरवर नवे घरात घ्यायचे आणि सर्व जुन्याचा फायदा घेत त्यांचे मनातील मंदिर पवित्र मानायचे हे भारतीय मनाचे आजचे सर्वमान्य स्वरूप आहे. ओठात समता ओठांपुरती आणि पोटात विषमता ठासून भरलेली असे आजच्या भारतीय माणसाचे ध्यान आहे. विषमतेची इमारत बांधणारे सर्व विचार, श्रद्धा, ग्रंथ, परंपरा, सर्व सणवार आजचा माणूस समतेची इमारत बांधण्याचा अभिनय करताना उपयोगात आणीत आहे. त्या विषाने मागल्या हजारो शतकात मानवता जगू शकली नाही, तेव्हा आजही ती त्या विषाने जगू शकणार नाही हे या अद्भुत माणसाला कळतच नाही. मागले हजारो वर्षांचे अवशिष्ट मन कायम ठेवून हा मनुष्य समतेला सामोरा कसा काय जाऊ शकतो? समता पाळणाऱ्या व पुरस्कारणाऱ्या नव्या समता–मानवाचे व बुद्धिप्रामाण्यवादी मनुष्यत्वाचे तो स्वागत कसा काय करू शकतो? हा पेचच घातकी आहे. तो नष्ट व्हावा, भारतीय मनुष्याचे हे दुभंगलेपण संपावे असे बाबासाहेबांना मनापासून वाटे. हा Problem त्यांना "Problem of Humanity" वाटे. बाबासाहेबांचा प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती या महाप्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्रतिज्ञेवार जन्माला आली आहे. ते म्हणाले होते, "भारतीय व्यक्ती आज दोन परस्पर-विरोधी ध्येयवादांनी नियंत्रित आहे. राज्यघटनेच्या प्रस्तावात सूचित केलेला

आणि धर्मात अंतर्भूत केलेला सामाजिक ध्येयवाद हे परस्पर विसंगत ध्येयवाद आहेत. राजकीय ध्येयवादामुळे स्वातंत्र्य, समता व सहभाव या जीवन-मूल्यांना मान्यता मिळाली आहे. तथापि प्रचलित सनातनी वृत्तीच्या सामाजिक ध्येयवादामुळे ही तत्त्वे व्यवहारात नाकारली गेली आहेत." ही समाजाला कुरूप करून टाकणारी घोर विसंगती भारतीय जीवनातून समूळ नष्ट व्हावी ही आंबेडकरांची ध्येयाकांक्षा सर्व विद्यार्थ्यांनी व तरुणांनी प्राणपणाने प्रत्यक्षात उतरवण्यासाठी झटायला हवे.

तेव्हा युवक नव्या निरोगी संकल्पांनी मोहरून यायला हवेत. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळुनी किंवा पुरुनी टाका' असे आपले क्रांतिकारी कवी केशवसुत म्हणाले होते. परिवर्तनाला अडथळा करणारी प्रत्येक धोंड तरुणांनी पोलादी पायांनी नष्ट करायला हवी आहे. युवक ही सुरूपतेची कांक्षा आहे. अशा युवकाच्या डोळ्यांनी राष्ट्र भवितव्य बघत असते. आंबेडकरवाद माथ्यात घेतलेला युवक हाच उद्याच्या भारताचा शिल्पकार ठरू शकतो. त्यालाच प्रचलित समाज-रचनेतील अमंगलाची आणि मंगलाची स्पष्ट निश्चिती करता येणे शक्य आहे. आंबेडकरवाद मोघम नाही, अंधूक नाही, निसरडा नाही. तो स्पष्ट, निर्भ्रम आहे. तो निश्चित आणि सर्जनशील आहे. तो लवचिक आणि परिवर्तनशील आहे. तारुण्याचा सर्वार्थांनी सन्मान करणारे हे दर्शन आहे. अवघ्या राष्ट्रालाच तरुण, विद्यार्थी व सुंदर असण्याची गुरुकिल्ली देऊ शकणारे हे तत्त्वज्ञान आहे. ते आधुनिक भारतातले सूर्यकुलाचे आमचे सर्वश्रेष्ठ दर्शन आहे. या देशाला, येथील समाजाला प्रकाशाच्या वाटेवर चालण्याची शक्ती देणारे आजचे ते सर्वश्रेष्ठ दर्शन आहे. युवकांनी या दर्शनाचा अंगिकार करून स्वतःच्या विवेकनिष्ठ सर्जनशक्तीचा सन्मान जाहीर करायला हवा. स्वतःचे क्रांतिकारत्व जाहीर करायला हवे. स्वतःचे तरुण विद्यार्थीपण आणि स्वतःच्या राष्ट्राचे शक्तिसुंदर राष्ट्रपण बेलाशक निर्विघ्न करायला हवे.

बाबासाहेब म्हणाले होते– "**सध्याच्या युगात ज्या देशातील बहुजनसमाज निरक्षर आहे अशा देशाचा जीवनकलहात टिकाव लागावयाचा नाही.**" त्यांची ही दृष्टी राष्ट्राच्या सर्वांगीण उत्थानाचा ध्यास घेणारी आणि सर्व उपेक्षित–बहुजनांच्या उत्थानात राष्ट्राचे उत्थान पाहणारी आहे. शिक्षण म्हणजे शक्तीची शक्ती, शस्त्राचे शस्त्र. म्हणूनच "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." हे आंबेडकरवादी समाजक्रांतीचे बीजवाक्य "**शिका**" या पहाटपदाने सुरू होते.

□ □

# रिडल्स : राम आणि कृष्ण १

बंधूनो आणि भगिनींनो;

यावर्षी आपण मला या यवतमाळ शहरात भाषणासाठी पाचारण केले आणि मागील दीड-दोन महिन्यांपासून महाराष्ट्रभरच नव्हे तर भारतभर तीव्र वैचारिक वादळ उठविणाऱ्या राम आणि कृष्ण यांच्यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अधोरेखित केलेल्या कोड्यांच्या अनुषंगाने मला बोलायची संधी मिळाल्याबद्दल मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंचच्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानतो.

**१. प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य प्रकाशन मालेतील 'रिडल्स इन हिंदुइझम' म्हणजे हिंदु धर्मातील कूटे हा ग्रंथ चौथा खंड म्हणून महाराष्ट्र शासनाने १४ ऑक्टोबर १९८७ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवरील सोहळ्यात लाखो आंबेडकरवाद्यांच्या साक्षीने प्रकाशित केला. महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री मा. शंकररावजी चव्हाण यांच्या हस्ते या खंडाचे प्रकाशन झाले. हा ग्रंथ डेमी साईज तीनशे साठ पृष्ठांचा असून परिशिष्ट म्हणून शेवटी तीनशे तेवीस पानापासून तीनशे त्रेचाळीस पानापर्यंत राम आणि कृष्ण यांच्यासंबंधीची कोडी छापली गेली आहेत. सुरवातीच्या तीनशे बावीस पानांमध्ये बाबासाहेबांनी हिंदुधर्मातील अशीच वेगवेगळी असंख्य कोडी मांडलेली आहेत. कोडे म्हणजे गौडबंगाल, खोटे, लबाडीचे, अतार्किक, भोंगळ किंवा तर्काच्या कसोटीवर जे उतरत नाही ते. कोडे म्हणजे संदर्भात अंधश्रद्धा.

ही कोडी बाबासाहेब कां अधोरेखित करीत आहेत ? ही कोडी ते का निदर्शनास आणून देत आहेत ? बाबासाहेबांच्या शब्दात सांगायचे तर–

"This book is an exposition of the beliefs by propunded what might be called Brahmanic theology. It is intended for the common mass of Hindus who need to be awakened to know in what quagmire the Brahmins have placed them and to lead them on to the road of rational thinking...But the time has

come when the Hindu mind must be freed from the hold which the silly ideas propagated by the Brahmins, have on them. Without this liberation India has no future. I have undertaken this tast knowing full well what risk it involves. I am not afraid of the consequences. I shall be happy if I succeed in stirring the masses."

(बाबासाहेब आंबेडकर : रिडल्स इन हिंदुइझम, प्रस्तावनेतून पृ. ५ व ९) याचा अर्थ असा की "ब्राह्मण धर्माने रूढ केलेल्या समजुतींचा दंभस्फोट म्हणजे हे पुस्तक होय. ब्राह्मणी धर्माने हिंदु जनसामान्यांना सुटका करून घेता येणार नाही अशा भयावह स्थितीत कसे रुतवले आहे हे कळावे यासाठी त्यांचे मानसिक प्रबोधन करावे आणि त्यांना विवेकनिष्ठ जीवनमार्गावरून चालण्यास प्रवृत्त करावे हे या ग्रंथलेखनामागील प्रयोजन आहे. ब्राह्मणांनी सांगितलेल्या मूर्ख समजुतींच्या मगरमिठीतून हिंदूंनी मुक्त होण्याची वेळ आता आलेली आहे. त्यापासून मुक्त झाल्याशिवाय भारत देशाला कोणतेही भवितव्य नाही. सर्व संभाव्य धोक्यांचे भान ठेवून मी हिंदू समाजाला ब्राह्मणी समजुतींच्या कैदेतून मुक्त करायची जबाबदारी पत्करली आहे. मी परिणामांना घाबरत नाही. भारतीय जनजीवन घुसळून काढण्यात मला यश मिळाले तर मला खूप आनंद होईल." या निवेदनातून बाबासाहेबांनी आपल्या समाजक्रांतीचा मूलमंत्रच सांगितला आहे. ज्योतिराव फुल्यांनी, लोकहितवादींनी आणि आगरकरांनी मागच्या शतकात हेच कार्य आपापल्या परीनी केले आहे. सर्वसामान्य हिंदूंच्या मुक्तीसाठी, त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी बाबासाहेब कोणताही धोका पत्करायला तयार आहेत ही बाब हिंदू बांधवांनी गंभीरपणे विचारात घ्यावयास हवी.

## २. **राम आणि कृष्ण यांच्या कोड्यासंबंधी उठलेले वादळ**

"रिडल्स् इन हिंदुइझम" हा बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रंथ १४ ऑक्टोबर १९८७ रोजी प्रकाशित झाला आणि ३० ऑक्टोबर १९८७ रोजी "राम आणि कृष्ण' यांचा उद्धार करणारे सरकारी प्रकाशन" या नावाचा विरोधाच्या वादळाचे उद्घाटन करणारा पहिला लेख लोकसत्तेचे संपादक माधव गडकरी यांनी लोकसत्तेच्या 'चौफेर' या सदरात प्रकाशित केला. १ नोव्हेंबर १९८७ रोजी अमरावती येथे मराठा महासंघाचा विदर्भ विभागातील कार्यकर्त्यांचा मेळावा होता. तिथे माधव गडकऱ्यांचा वरील लेख वाचून मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांमध्ये एक अस्वस्थता निर्माण झाली आणि तीव्र अशी प्रतिक्रिया निर्माण झाली. याच मेळाव्यात बाबासाहेबांच्या

ग्रंथातील आक्षेपार्ह भाग शासनाने वगळावा आणि जाहीर माफी मागावी, कारण शासनाने सरकारी प्रकाशनात ही चूक करून आमच्या धार्मिक भावना दुखावल्या असे शशिकांत पवारांनी सांगितले. शशिकांत पवार मराठा महासंघाचे अध्यक्ष आहेत. आणि या वेळीच रिडल्स् इन हिंदुइझम् हा ग्रंथ जाळण्यात आला असे वर्तमानपत्रामधून जाहीर झाले. पण ५ डिसेंबर १९८७ च्या 'ब्लिट्झ'च्या अंकात शशिकांत पवारांनी सांगितल्याप्रमाणे "सर्वात गमतीची गोष्ट म्हणजे जे पुस्तक कार्यकर्त्यांनी जाळले तो आंबेडकरांचा ग्रंथ नव्हताच. अमरावतीमधील मराठा महासंघाचे कार्यकर्ते डॉ. मुरके यांनी तो ग्रंथ ऐनवेळी कार्यकर्त्यांना दिलाच नाही त्यामुळे त्यांनी घाईघाईने दुसरेच पुस्तक आणून जाळले व आंबेडकरांचाच ग्रंथ जाळल्याचा प्रचार केला. प्रत्यक्षात मात्र ग्रंथ जाळण्यात आलाच नाही" हे शशिकांत पवारांचे म्हणणे लक्षात घ्यायला हवे आणि ज्या पुराव्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांनी रामावर टीका केली ते मूळ वाल्मिकी रामायणातील पुरावे किंवा मूळ वाल्मिकी रामायण बहुजन समाजाला कुणी सांगितलेच नाही. "रामायणातील काही चांगल्या आणि उदात्त गोष्टीच सांगितल्या आणि सामान्य बहुजन समाजाला धर्माकडे आकृष्ट केले आणि धर्मातील विकृत गोष्टी या समाजाला आजवर कुणी सांगितल्याच नाही. हा समाज अंधश्रद्धेकडे जाईल एवढ्याच गोष्टी कीर्तनातून बहुजन समाजाच्या मनात रुजवल्या गेल्या. त्यामुळेच राम व कृष्ण यांना देवपण प्राप्त झाले. लोकांची त्यांच्यावर श्रद्धा बसली आहे. आणि आता ती घालविणे कठीण." असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. हेच ते रिडल्स् इन हिंदुइझम या ग्रंथाच्या प्रस्तावनेतील बाबासाहेबांची भूमिकाच बोलून दाखवीत आहेत. हिंदू बहुजनसमाज ब्राह्मणी अपसमजुतीच्या कोंडवाड्यातून बाहेर पडावा, तो जागा व्हावा, त्याच्यावर लादलेल्या गुलामगिरीची त्याला जाणीव व्हावी, त्याच्यावर ब्राह्मणांनी लादलेल्या खुळचट समजुती त्याने झुगारून द्याव्यात आणि त्याला उन्नत, विवेकी जगायला प्रवृत्त करावे हेच तर बाबासाहेबही म्हणतात. शशिकांत पवार बाबासाहेबांची भूमिका मान्य करतात या गोष्टीचे स्वागत बहुजन-समाजाने करायला हवे.

### १. न्यायालयात फिर्याद

डॉ. मुरके, हरिभाऊ दातेराव, सतीश संगई आणि ॲड. आचलिया या अमरावतीच्या मंडळींनी रिडल्स् इन हिंदुइझम या ग्रंथातील राम आणि कृष्ण या परिशिष्टाविरुद्ध उच्च न्यायालयात फिर्याद दाखल केली असून न्यायालयाने या संदर्भात शासनाला नोटीस दिल्याचे वृत्त १०-११-८७ च्या लोकमतात आले.

८-१२-८७ च्या लोकसत्तेच्या अंकात रामासंबंधीच्या कोड्याचा पूर्वार्ध व १५-१२-८७ च्या अंकात उत्तरार्ध प्रकाशित झाला.

१६-११-८७ रोजी महाराष्ट्र शासनाने बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथातील राम आणि कृष्ण यांच्यासंबंधीचे कोडे वगळून टाकण्याचा निर्णय घोषित केला.

परिशिष्ट वगळू नये म्हणून नागपूरच्या मा. डॉ. पंचभाईंनी कोर्टात याचिका दाखल केली.

**४. पतित पावन संघटनेची भूमिका :**

घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र साहित्यातून राम व कृष्ण यांच्याविषयीचे परिशिष्ट वगळणे हा विचारस्वातंत्र्यावर घाला आहे.

डॉ. आंबेडकरांच्या समग्र साहित्यात राम व कृष्ण यांच्यासंबंधीचे परिशिष्ट राहिले तर हिंदू समाजाच्या भावना दुखावतील हा दावा समर्थनीय नाही. भावना आणि अभिनिवेश याऐवजी तत्त्व आणि मूल्यांच्या आधारावर या प्रश्नांचा सखोल विचार होणे आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकर यांनी राम व कृष्ण यांच्यासंबंधी व्यक्त केलेली मते संशोधनाच्या आधारे खोडून काढणे हा त्यावर एक उपाय आहे. केवळ संबंधीत परिशिष्ट वगळून हेतू साध्य होणार नाही. न पटणारे पण समाजहितासाठी व्यक्त केलेले विचार मुक्तपणे मांडण्याचे स्वातंत्र्य असलेच पाहिजे. डॉ. आंबेडकरांच्या समग्र लिखाणाला ऐतिहासिक महत्त्व आहे. त्यांचे लेखन केवळ जतन करणेच महत्त्वाचे नाही तर त्याने निर्माण झालेल्या वादातून दलित आणि जातीय व धार्मिक अस्मिता हे संघर्षाचे कारण बनणार नाही याची सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. ही केसरीच्या (पुणे) २४ नोव्हें. १९८७ च्या अंकात प्रसिद्ध झालेली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विचाराशी विचारानेच झुंज दिली पाहिजे हे म्हणणे हिंदु बांधवांनी लक्षात घेतले पाहिजे. अशीच भूमिका भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार श्री. जगन्नाथराव जोशी यांनीही घेतली आहे. ३० नोव्हें. ८७ च्या केसरीच्या अंकात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, " डॉ. आंबेडकरांना जे वाटले ते त्यांनी लिहिले. ज्यांना ते चुकीचे वाटते त्यांनी तसे लिहावे. विचाराचा सामना विचारांनीच केला पाहिजे. कुणाच्या तरी दडपणाने वादग्रस्त प्रकरण काढण्याचा सरकारी निर्णय म्हणजे प्रत्यक्ष हस्तक्षेपाचाच प्रकार होय. हा निर्णय लोकशाही संकेताशी विसंगत आहे.'

सुप्रसिद्ध समाजवादी विचारवंत नानासाहेब गोरे यांना परिशिष्ट वगळण्याचा निर्णय फॅसिस्ट वृत्तीचा द्योतक वाटला. (लोकसत्ता : १३-१२-१९८७)

१६-११-८७ रोजी नागपूर विधानसभेत सदर परिशिष्ट वगळण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला तेव्हा सदानंद वर्दे हे प्रथम सभागृहाच्या बाहेर पडले. नंतर दलितांचे नेते आर. एस. गवई बाहेर पडले. या परिशिष्टाच्या संदर्भात आज बाबासाहेब असते तर त्यांनीच हे लेखन छापू दिले नसते असे गवईंनी म्हटले. गवईंनी या सर्वच संदर्भात अशी बोटचेपी भूमिका का घेतली ? गवई याहीवेळी वाईट पद्धतीने अनुत्तीर्ण झाले. एकूण दलित नेतृत्वाने विचार-अभ्यास हा आपला प्रांत नव्हे हेच यानिमित्ताने कबूल करून टाकले हे बरेच झाले.

या प्रकरणात मुंबईपासून नागपूरपर्यंत दलितांचे लाखोंनी मोर्चे निघाले. आंबेडकरसमाज पुन्हा एकदा एकीच्या जळत्या जाणिवेने पेटून उठला. सर्व गटोपगट यानिमित्ताने एकत्र आले. पँथर, कवाडेंची दलित मुक्ती सेना, मास मुव्हमेंट, रिपब्लिकन गट अशा सर्वच आघाड्या सळाळून मैदानात आल्या. परिशिष्ट वगळण्याच्या निर्णयाच्या विरोधात असे प्रचंड रान उठले. महाराष्ट्र अंतर्बाह्य घुसळून निघाला. भारतभर या घटनेने चर्चा सुरू केली आणि जगभर तिचे पडसाद उमटले.

मुंबईच्या लोकसत्तेने विरोधकांना समर्थ व्यासपीठ मिळवून दिले. आणि नागपूरच्या तरुण भारतानेही अनुकूल प्रतिकूल असे दोन्ही बाजूचे लेखन मोठ्या प्रमाणात प्रकाशित केले. नागपूरच्या लोकमतनेही एक जागृत विचारमंथन यानिमित्ताने आरंभले. वेगवेगळ्या संघटनांनी आणि विचारवंतांनी या वादळात भाग घेतला. य. दि. फडके, चंद्रकांत घोरपडे, वाणी देशपांडे, माधव गडकरी, अरुण कांबळे, भालचंद्र फडके, मा. गो. वैद्य, रूपा कुळकर्णी, वि. भि. कोलते; भा. ल. भोळे, यशवंत मनोहर, श्री. मा. कुलकर्णी, शशिकांत पवार, दुर्गा भागवत, ना. ग. गोरे, ही त्यातील काही महत्त्वाची नावे होत. शिवाय ब्लिट्झने (५-१२-८७) विशेषांक काढला व सर्वच दैनिकांनी अग्रलेख प्रसिद्ध केले.

वस्तुत: हा वैचारिक क्षेत्रातला लढा होता. तो विचारांनीच लढायला हवा. पण दोन्ही बाजूंनी आंदोलनाच्या धमक्या दिल्या गेल्या. परिशिष्ट गाळण्याचा शासनाने निर्णयही घेतला. या सर्वच गोष्टी घडायला नको होत्या. विचारमंथन व्हायला हवे होते. त्यातून आपल्या समाजाला निश्चितच नवा उजेड मिळाला असता.

२५ नोव्हेंबर ८७ रोजी शासनाने परिशिष्ट गाळण्यासंबंधी १५ जानेवारी ८८ पर्यंत फेरविचार करण्यात येईल असे जाहीर केले. आता १५ जानेवारीकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

### ५. ग्रंथकार बाबासाहेब आंबेडकर आहेत !

सदर ग्रंथ आणि ते परिशिष्ट प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहे. गौतम बुद्ध हे भारतीय करुणेने जगावर धरलेली सावली. ज्योतिराव फुले हा येथील शोषितांच्या राखेतून उसळलेला विद्रोहाचा झंझावात. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे या देशातील शोषितांच्या जगाने प्रकाशाने पेट घेतलेल्या बाहूमध्ये कवळलेले क्रांतीचे आभाळ. बुद्ध हे तत्त्वज्ञानाच्या एका घराण्याचे नाव आहे. फुले हे नव्या भारताला घातलेल्या हाकेचे नाव आहे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशाला क्रांतीनेच दिलेल्या आमंत्रणाचे तत्त्वज्ञ नाव आहे. लोकहितवादी, फुले आणि आगरकर ही आपल्या प्रबोधनातील नेतृत्वनामे होत. या विशेषनामांचे सूर्यमंडळ आपल्या प्रबोधनाने मस्तकी धारण केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या प्रबोधनाला फुले–आगरकरांच्यानंतर नवे तत्त्वज्ञान दिले आहे. या देशाला समतेचा ध्येयवाद देणाऱ्या संविधानाचे ते शिल्पकार आहेत. आपल्या विचारपरंपरेला नवे विद्रोही आयाम देणारे आणि उजेडाची नवनवी क्षितिजे उघडून देणारे ते सर्जनशील तत्त्वज्ञानी आहेत. आपल्या देशात घडलेल्या प्रबोधनाचे ते बेस्ट प्रॉडक्ट आहेत. उपेक्षित भारताने उरीपोटी बाळगावे असे दर्शन–दिग्दर्शन ते आहे. एकविसाव्या शतकाच्या दारात उभ्या असलेल्या या देशाने पुढे जाण्यासाठी सोबतीला विश्वासाने घ्यावे त्या पाथेयाचे नाव आंबेडकर आहे. समतापूजन, स्वातंत्र्यपूजन, बंधुतापूजन विवेकपूजन आणि विकासपूजन ही पंचप्रकाशपूजने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वावर तळपणारी पंचशिले होत. या देशाला ते सांगताहेत तो मंत्र विकासाचा आहे. भौतिक विकास आणि नैतिक विकास हा आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा दैदिप्यमान ध्येयवाद आहे. या देशाला ते अपसमजुतींच्या काळोखातून बाहेर काढण्याचा कार्यक्रम प्रभावीपणे सांगताहेत. डॉ. आंबेडकर हे एका निकराच्या संघर्षाच्या इतिहासाचे नाव आहे. आंबेडकर हे एका भयानक अशक्यातून शक्य झालेल्या अभूतपूर्व पराक्रमाचे नाव आहे. या देशाला त्यांनी देखण्या मानवतेचे स्वप्न दिले आणि मराठी साहित्याला त्यांनी विद्रोहाचे वैभवी लावण्य दिले. आंबेडकर ही नव्या सुंदर मनुष्यनिर्मितीची प्रक्रिया आहे. आंबेडकर हे समतासंस्कृतीचे संविधान आहे. आंबेडकरवाद हा भारतीय ज्ञानपरंपरेचा गौरव आहे. या देशातील बुद्धिवादी परंपरेचा तो महनीय ठेवा आहे.

### ६. रिडल्स इन हिंदुइझमचे आभार

या ग्रंथाचे आज देशभर वादळ धावू लागले आहे. 'I shall be happy if I succeed in stirring the masses' या बाबासाहेबांच्या इच्छेनुसार देश

ढवळून निघत आहे. एखाद्या ग्रंथाने एखादा देश सामर्थ्याने इतका उस्कटून यावा हे जगात क्वचितच कुठे घडले असेल. म्हणूनच या युगंधर ग्रंथाचे आभार मानले पाहिजेत.

फुले–आगरकरांच्या नंतर या ग्रंथाने आपल्या समाजाची परंपरावादी आणि प्रबोधनवादी अशा दोन गटांमध्ये स्पष्टपणे विभागणी केली आहे. आपल्या पुरोगाम्यांना, बुद्धिप्रामाण्यवाद्यांना आणि क्रांतीवाद्यांना या ग्रंथाने आमूलाग्र क्रांतीचे रसायनशास्त्र मूलभूत पातळीवरून समजावून दिले आहे. प्रबोधनाचा एक हात संस्कृतीमंथन करीत असतो. आणि दुसरा हात भविष्याच्या सुंदर उजेडाला मिठी मारीत असतो. हा ग्रंथ या देशातील क्रांतीला प्रारंभ कुठून करावा तेच जणू समजावून सांगत आहे. परंपरावादी आणि प्रबोधनवादी असे समाजाचे द्विध्रुवात्मक विभाजन परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यावश्यक असते. फुले–आगरकरांच्यानंतर पुन्हा या ग्रंथाच्या निमित्ताने नव्या तीव्रतेने हे घडले आहे म्हणून या ग्रंथाचे आभार मानायला हवेत.

## ७ हिंदू धर्म आणि डॉ. आंबेडकर

डॉ. आंबेडकर हिंदू आईवडिलांच्या पोटी जन्माला आले होते. हिंदू म्हणून ते जगणारही होते आणि हिंदू म्हणून ते मरणारही होते. १९३५ पर्यंत सामान्यत: '**मी प्रोटेस्टंट हिंदू आहे**' अशी त्यांची भूमिका होती. हिंदू धर्माची सुधारणा घडवून आणावी, त्यातील मनुष्यत्वमारक बाबी काढून टाकाव्यात आणि त्याला एक प्रगमनशील स्वरूप द्यावे हा त्यांचा मानस होता. हिंदूकोडबिलाची निर्मिती ही या महाप्रकल्पाचाच भाग होती. हिंदू धर्माच्या कायद्याचे संहितीकरण करावे, त्याची नीट ग्रंथबांधणी करावी असे त्यांना वाटे, पण हिंदूधर्मसुधारणेचे आणि हिंदूकोडबिलासंबंधीचे त्यांचे प्रयत्न हिंदुत्ववाद्यांनी फलद्रूप होऊ दिले नाहीत आणि परिणामत: १९३५ पूर्वी मी 'प्रोटेस्टंट हिंदू म्हणून जगेन' ही प्रतिज्ञा '**मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही**' या प्रतिज्ञेत १९३५ साली परावर्तित झाली आणि १९५६ साली म्हणजे तब्बल २१ वर्षांच्या दीर्घ चिंतनानंतर त्यांनी धर्मांतर केले. आणि याच वर्षीच सहा डिसेंबर रोजी त्यांचे निधन झाले. या ग्रंथाचे लेखन धर्मांतरापूर्वीच १९४२ च्या सुमारास त्यांनी केले आहे.

## डॉ. आंबेडकरांची भूमिका

रिडल्स इन हिंदुइझम या ग्रंथातील 'राम आणि कृष्ण' याच्यासंबंधीचे कोरे प्रक्षिप्त आहे, ते बाबासाहेबांनी लिहिलेले लेखन नव्हे असे प्रारंभी प्रतिपादन

केले गेले. पत्रकार पुरंदरे यांनी तर राम आणि कृष्णासंबंधीचे हे लेखन एस. डी. नाडकर्ण्यांचे असल्याचे लोकसत्तेतून लिहिले. पण हे लेखन बाबासाहेबांचेच आहे हे घनश्याम तळवटकरांनी दिलेल्या पुराव्यावरून स्पष्ट झालेले आहे.

रामासंबंधी बाबासाहेबांनी या ग्रंथात सप्रमाण लेखन केले आहे. 'रिडल्स संबंधीच्या आपल्या लेखात दुर्गाबाई भागवतांनी एकोणिसाव्या शतकात जर्मन पंडितांनी सुरू केलेल्या चिकित्सापद्धतींचा निर्देश केला आहे. त्या म्हणतात : '**या अभ्यासामध्ये अर्थातच तपासावयाच्या ग्रंथातल्या पात्रांची स्वत:च्या काळातले नैतिक दंडक लावून केलेली नैतिक चिकित्सा अभिप्रेत नसे तर ती पात्रे, प्रसंग, स्थानवर्णने यांचा शोध मुख्यत: असे !**' हे सांगून त्यांनी हायर क्रिटिसिझम, लोअर क्रिटिसिझम आणि हर्मेन्यूटिक्स अशा तीन चिकित्सापद्धतींची वैशिष्ट्ये सांगितली आहेत आणि "**फुले काय किंवा डॉ. आंबेडकर काय या प्रकारच्या किचकट कामात पडत नाहीत त्या दोघांनाही प्रश्न पडला की राम आणि कृष्ण यांना देव का मानतात किंवा मानावे ?**" (लोकसत्ता : १३-१२-८७) इथे दुर्गाबाई हे विसरतात की राम आणि कृष्ण यांना देव मानणे हाच फुले आणि डॉ. आंबेडकर यांना पडलेला किचकट प्रश्न आहे. आणि लोक ज्यांना आणि ज्या कारणामुळे देव मानतात ते त्याच कारणामुळे देव ठरत नाहीत हेच तर आंबेडकरांना सिद्ध करावयाचे आहे. कारण राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे, "रामायण, महाभारत आणि पुराणे यातील अद्भुत कादंबऱ्यांनी आज निदान अडीच हजार वर्षे हिंदुस्थानातील हिंदुसमाजाचे नियंतृत्व पत्करलेले आहे." (राजवाडे लेखसंग्रह : नवी दिल्ली, १९५८ पृ. २७२) आंबेडकरांपुढे हाच नियंतृत्वाचा प्रश्न आहे.

लोक रामाला आणि कृष्णाला परमपूजनीय मानतात. रामाने "...आपल्या आचरणाने सर्व प्रकारचे आदर्श उभे केले. उच्च नैतिक आचरणाच्या अंतिम मर्यादा प्रस्थापित केल्या म्हणून तो मर्यादापुरुषोत्तम ठरला. आज हजारो वर्षे भारतीय समाज श्रीरामाला त्याचदृष्टीने पाहात आला आहे व पूजीत आला आहे. आणि पुढेही तसाच पूजीत राहणार आहे." (श्री. मा. कुळकर्णी : लोकमत २-१२-८७) हे परंपरावादी हिंदूचे प्रातिनिधिक मत आहे, एवढे तरी राम आणि कृष्णाचा बचाव करायला 'न' निघालेल्या दुर्गाबाई मानतील असा विश्वास वाटतो. आणि त्यामुळेच रामकृष्णाची समीक्षा म्हणजे केवळ प्राचीन ग्रंथांची समीक्षा नव्हे. म्हणूनच स्वत:च्या काळातले नैतिक दंडक लावून केलेली नैतिक चिकित्सा कदाचित केवळ प्राचीन ग्रंथांच्या समीक्षेच्या संदर्भात पुरेशी पडू शकेल.

पण रामायण आणि महाभारत या ग्रंथातील राम व कृष्ण या पात्रांना देवत्व प्राप्त झाले आहे; चिरंतन पूजनीयत्व प्राप्त झाले आहे तेव्हा राम आणि कृष्णाच्या कालचौकटीबाहेर रामकृष्णाला काढून त्यांना चिरंतन पूजनीयत्व बहाल केले जात असेल आणि त्यांनी प्रकाशित केलेले आदर्श कोणत्याही काळासाठी सारखेच पूजनीय ठरत असतील तर कोणत्याही काळातील नैतिक दंडकांना राम आणि कृष्ण पुरून उरले पाहिजेत पण दुर्गाबाई आजच्या काळातील नैतिक दंडक राम आणि कृष्णाला लावू नयेत असे म्हणून राम आणि कृष्णाचे देवत्वच तात्कालिक ठरवून टाकतात आणि सगळ्या परंपरावाद्यांचा पराभव अधोरेखीत करतात. खरे तर कोणतीही मूल्ये लावून तपासा आमचे देव त्यांना पुरून उरतील असा आत्मविश्वास परंपरावाद्यांनी व्यक्त करायला हवा पण लोक त्यांच्या देवांच्या समीक्षेला भिवून आपणच आपल्या देवांचे देवपण पुसून टाकतात ही मोठी गमतीची गोष्ट आहे.

आणि या सर्व समजुतींच्या पहाडाखालून हिंदू समाजाला सोडवावे म्हणूनच तर डॉ. आंबेडकरांनी हे लेखन केलेले आहे.

"It is intended for the common mass of Hindus who need to be awakened to know in what quagmir the Brahmins have placed them and to lead them on to the road of rational thinking." हाच तर त्यांच्या लेखनाचा हेतू आहे. दुर्गाबाई रामायणाला केवळ ग्रंथालयातील एक पुस्तक समजत आहेत. बाबासाहेबांची भूमिका गंभीरपणे समजून न घेता त्या बाबासाहेबांवर टीका करीत आहेत. डॉ. आंबेडकर लोकमानसातील रामाची चिकित्सा मूळ रामायणाच्या पुराव्यांवरच करीत आहेत. लोक मानतात त्याप्रमाणे राम मुळात नाही हेच तर आंबेडकर सांगतात. त्यामुळेच 'वाल्मिकीचा राम वाल्मिकीच्या उत्तम पुरुषाच्या दंडकाबरहुकूम आहे की नाही ते तपासायला हवे होते' ही दुर्गाबाईंची ग्रंथसमीक्षेची भूमिका बरोबर असली तरी लोकमानस-समीक्षेची भूमिका असलेल्या आंबेडकरांना तिच्याशी कर्तव्य नाही हे लक्षात घेतले पाहिजे. वाल्मिकीचा उत्तम पुरुष विसाव्या शतकातील लोकांसाठीही उत्तमपुरुष ठरणे कसे गैर आहे हेच तर आंबेडकर सांगत आहेत. दुर्गाबाई समाजप्रबोधनाच्या बाजूकडे पाठ फिरवून केवळ निरुपद्रवी ग्रंथसमीक्षेची तरफदारी करीत आहेत. पण राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे हे हिंदू समाजाचे नियंत्रण करणाऱ्या रामायणासारख्या ग्रंथाच्या संदर्भात कसे शक्य आहे? याचा विचार दुर्गाबाईंनी करायला हवा.

" The criticism of religion is a begining of all criticism." असे मार्क्सचे प्रसिद्ध वचन आहे. राम देव म्हणून पूजनीय आहे आणि रामायणाला धर्मग्रंथाचा सन्मान प्राप्त झाला आहे. त्यामुळेच रामायणाची चिकित्सा एक काव्यग्रंथ म्हणून करणे आणि एक धर्मग्रंथ म्हणून करणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. डॉ. आंबेडकर रामायणाची आणि रामाची मीमांसा धर्ममीमांसा म्हणून करीत आहेत. ही धर्म मीमांसा आज उद्याच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, नैतिक अशा सर्व क्षेत्रातील वास्तवांच्या मीमांसाची पूर्वतयारी म्हणून आंबेडकरांनी गृहित धरलेली आहेत.

"Without this liberation India has no future" हेच तर आंबेडकरांना ठामपणे वाटत आहे म्हणूनच दुर्गाबाईंच्या इच्छेनुसार डॉ. आंबेडकर ही समीक्षा ग्रंथसमीक्षक ठरण्यासाठी करीत नाहीत तर भारतीय समाजाच्या उज्वल भवितव्यासाठी धर्मसमीक्षा आणि लोकश्रद्धांची समीक्षा करून येथील जनसामान्यांना विवेकनिष्ठ जीवनमार्गावर चालायला प्रवृत्त करू पाहण्याची जिद्द बाळगतात. हे बाबासाहेबांनी केले आणि ज्योतिबा फुल्यांनी यासाठीच आयुष्य वेचले. म्हणून तर "राम आणि कृष्णाऐवजी ज्योतिबा फुले आणि डॉ. आंबेडकर यांना कधीच आम्ही निवडले आहे." असे माधव गडकरी (लोकसत्ता: १३–१२–८७) म्हणतात. ते आपण सर्वांनीच लक्षात घ्यायची गरज आहे. डॉ. आंबेडकर हे बुद्धिप्रामाण्यवादी तत्त्वज्ञानी होते. म्हणूनच "They who do not feel the darkness, will never look for the light."..."On this account it is, that although the acquisition fresh knowledge is the necessary precursor of every step in social progress, such acquisition must itself be preceded by a love of inquiry, and therefore by a spirit of doubt; because without doubt there will be no inquiry and without inquiry there will be no knowledge." ही Buckle ची भूमिका आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ ते उद्धृत करतात आणि "...Brahmins have left no room for doubt,..." असे ते म्हणू शकतात.

(Dr. Ambedkar : Riddles in Hinduism : Introduction p 8.)
समाजाच्या प्रगतीसाठी नवे ज्ञान लागते, जिज्ञासा आणि संशयवृत्तीशिवाय नवे ज्ञान प्राप्त होत नसते, संशयाशिवाय शोध संभवणार नाही आणि शोधाशिवाय ज्ञान संभवणार नाही ही आंबेडकरांची भूमिका भौतिकवादी विचारवंतांची भूमिका

आहे. विज्ञानवाद्याची भूमिका आहे. समाजाचा विकास हा त्यांचा ध्येयवाद आहे. त्यासाठी नवी ज्ञानक्षेत्रे हस्तगत केली पाहिजेत, त्यासाठी चिकित्सक बुद्धी हवी हे त्यांचे मत आहे, आणि त्यासाठीच ते धर्मचिकित्सा करताहेत. समाजप्रगतीमधील अडसर म्हणून, चिकित्साबुद्धी निर्माणच होऊ न देणारी श्रद्धा म्हणून डॉ. आंबेडकर हिंदुधर्मातील कोडी अधोरेखित करीत आहेत. अतार्किक आणि समाजाला मागे ओढून नेणारी सामग्री विचारार्थ पुढे ठेवीत आहेत. रामासंबंधीचे कोडे हे त्या अनेक कोड्यांपैकी एक आहे.

### ५. रामासंबंधीचे कोडे

रामजन्माविषयीची घटना, वाली आणि शंबूकाच्या वधाच्या घटना, रामाने सीतेशी केलेले वर्तन, त्याचे विलासी जीवन व त्याचे अनेकपत्नीत्व या गोष्टींचा रामायणाच्या आधारेच उहापोह करून जे रामाला पूजनीय देव मानतात त्यांनी या तथ्यांचा विचार करावा असे आंबेडकर सांगतात. राम देवच नव्हे असे बाबासाहेब म्हणत नाहीत तर रामायणातीलच संबंधित गोष्टींचा विचार करून राम देव होऊ शकतो काय ते तुम्हीच ठरवावे असे डॉ. आंबेडकर सांगतात, तेव्हा ते लोकांवर लादीत काहीच नाहीत, त्यांनाच विचार करायला प्रवृत्त करतात. ही मला वाटते संशोधन क्षेत्रात महत्त्वाची ठरावी अशी बाब आहे.

**रामजन्माचे कोडे** : बाबासाहेबांच्या मते "शृंगमुनीने दिलेल्या पिंडापासून राम जन्मला हे सुचविणे म्हणजे एका नग्न सत्यावर प्रतिकात्मक काचेचे आच्छादन घालणेच होय. हे नग्न सत्य असे की कौसल्या व ऋष्यशृंग हे पतीपत्नी नसले तरी कौसल्येला ऋष्यशृंगापासून राम झाला. या जन्मामुळे मूलतः रामाची काहीच अपकीर्ती होत नसली तरी तो निश्चितपणे अनैसर्गिक होय एवढे खरे." (रिडल्स इन हिंदुइझम : पृ. ३२४)

यातून बाबासाहेब आपणाला वास्तवाकडे नेत आहेत. चमत्कार, दैवयोग या गोष्टी आपण स्पष्टीकरण म्हणून स्वीकारल्या तर चर्चाच थांबते. म्हणून रामजन्माच्या घटनेचा वास्तव अर्थ काय असावा याचा विचार डॉ. आंबेडकर करतात. जुन्या वाङ्मयातून वापरलेल्या प्रतिकांचे वास्तव अर्थ लक्षात घेण्याचे महत्त्वही बाबासाहेब सांगत आहेत. 'पुत्रकामेष्टी यज्ञात ऋष्यशृंग ऋषींनी पौरोहित्य केले आणि प्रसाद म्हणून तीनही राण्यांना पिंड दिले. दैवयोगाने राण्या गरोदर राहिल्या.' (सुमती क. कानडे : लोकसत्ता, १३-१२-८७) ही भाविक मनाने रामाकडे पाहणाऱ्यांची प्रातिनिधीक भूमिका आहे. "पिंड हे नव्या जन्माचे

प्रतीक आहे. हिंदूलोक दसपिंड करतात. कारण गर्भधारणेनंतर (चंद्रमासाप्रमाणे) दहाव्या महिन्यात मूल जन्मते. तेव्हा प्रत्येक महिन्याचा एक-एक पिंड घेऊन दहा दिवसांनी दहा पिंड दिले याचा अर्थ आत्मा नवा जन्म घेऊन उडून गेला असा आहे. ही कदाचित आताच्या हिशेबाने अंधश्रद्धा असेल पण रामायणकाळी ते ठाम सत्य होते. लोकांचा त्यावर दृढ विश्वास होता आणि या विश्वासाचे फळ म्हणून मूल होणे अगदी अशक्य आहे असे नव्हे.'' (दुर्गाबाई भागवत : लोकसत्ता, १३-१२-८७) हे आणखी दुसरे पण परंपरावाद्यांचेच प्रातिनिधीक मत आहे.

पण ही श्रद्धाळू मते वास्तव बगळूनच उभी असतात. '**नवसे कन्यापुत्र होती तरी का करणे लागे पती**' हे तुकोबांचे म्हणणे विसरून कसे चालेल ? दैवयोग किंवा चमत्कार म्हणजे पुरावा नव्हे. त्यातून जाणारी वाट अंधश्रद्धेच्या डोहात शिरते. दैवयोगाने आधीच राण्यांना 'दशरथापासून' मुले व्हायला हवी होती. दुसरे असे की, आपण पिंड नव्या जन्माचे प्रतिक मानला तरी या श्रद्धेने पिंडामुळे मूल होईल काय ? दुर्गाबाई 'आताच्या हिशेबाने अंधश्रद्धा असेल पण रामायणकाळी ते ठाम सत्य होते' असे विधान करतात तेव्हा नवल वाटते. ठाम सत्य या संदर्भात पुढे अंधश्रद्धा कसे होते ? श्रद्धा असली काय, नसली काय पिंडाने केव्हाही मूल झालेच पाहिजे. पण मूल होण्याशी ज्यांचा संबंध नाही त्या गोष्टी कितीही श्रद्धेने केल्या तरी त्यांच्यामुळे मूल कसे होईल ? पण असे मानणे ही अंधश्रद्धा होय एवढेच आंबेडकर सांगतात. रामजन्म तर्काच्या निकषावर जोखतात. व्यवस्था सांगते म्हणून अंधपणे विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतः विचार करून निर्णय घ्यावा, सत्याचा सन्मान करावा हे बाबासाहेबांना म्हणायचे आहे.

## १०. रामाचे एकपत्नीत्व

वाल्मिकी रामायणात रामाच्या अनेक स्त्रियांचा व त्याच्या ठेवलेल्या स्त्रियांचाही उल्लेख आहे. मंथरा कैकेयीजवळ रामाच्या या स्त्रियांचा उल्लेख करते. 'हृष्टा खलु भविष्यन्ति रामस्य परमः स्त्रियः। अपकृष्टा भविष्यन्ति स्नुषास्ते भरतक्षये (अयो८-१२), सर्वसीमन्तिनीभ्यश्च सीता सीमन्तिनीवराम। (१६-४०) इथे आणि युद्धकांडातही (सर्ग १२) रामाभोवती असलेल्या अनेक स्त्रियांचा निर्देश येतो. बाबासाहेब ही तथ्ये पुढे ठेवून लोकांनाच रामाच्या एकपत्नीत्वासंबंधी निर्णय घ्यायला लावतात. श्रद्धाळू असे म्हणू शकतील की आंबेडकर सत्य सांगत असले, वाल्मिकी रामायणातही ते असले तरी आम्ही ते मानणार नाही. पण शशिकान्त पवार म्हणतात त्याप्रमाणे मूळ वाल्मिकी रामायण बहुजन समाजाला कुणी सांगितलेच नाही (ब्लिट्झ : ५-१२-८७) हे सत्य ध्यानी

[illegible] आता बाबासाहेब सांगत आहेत ते सत्य कबूल करायला हरकत नाही. [illegible] यात मूळ रामायण जाणून घेण्याची प्रक्रिया गर्भित आहे.

### ११. वालीचा वध

वालीशी रामाचे कोणतेही भांडण नसताना नि:शस्त्र वालीला मारणे हे [illegible] भ्याडपणाचे आहे. हा योजनाबद्ध खूनच होता असे बाबासाहेब म्हणतात. [illegible]कडून वाली मेला याची खात्री सुग्रीवाने करून घ्यायला हवी होती किंवा [illegible] मुलाला–अंगदाला त्याने राजा करावयास हवे होते. पण हे काहीही न [illegible] त्याने वालीचे राज्य बळकावले. वाली किष्किंधेत परत येतो तेव्हा राजा [illegible] सुग्रीवाला आणि प्रधानमंत्री असलेल्या हनुमंताला बेइमान समजून तो [illegible] लावतो. हे दोघे पुढे वालीकडून राज्य परत मिळविण्यासाठी मित्रांच्या [illegible] होते. तसे रामलक्ष्मणही सीतेचा शोध घेत फिरत होते. भेटीत या दोन [illegible] परस्पर सहकार्याचा करार होतो. सीतेच्या शोधात सुग्रीव आणि [illegible] रामाला मदत करावी व वालीकडून राज्य मिळवण्यासाठी रामाने [illegible] मदत करावी असे ठरले. रामसुद्धा वाली आणि सुग्रीवाच्या पूर्वेतिहा- [illegible] विचार करीत नाही. केवळ आपल्याला मदत मिळते म्हणून तो निरपराध [illegible] खून करतो. या खुनामागे कोणतेही तत्त्व नाही. आहे केवळ स्वार्थ. इथे [illegible] [illegible]चाच वध केला असे विवेकी वाचकाला वाटेल. पण राम म्हणतो, "[illegible] मारण्याचा मला अजिबात पश्चात्ताप होत नाही. कारण शेवटी तू वानर. [illegible]कडून मरण्यापेक्षा तुला मी अधिक सन्मानाने युद्धात बाणाने मारले." पण [illegible] युद्धही नाही. या मरणात वालीचा सन्मानही नाही. मेलेल्या वालीला अशा [illegible] घातपाती वधाने सन्मान कसा वाटणार? मागील हजारो वर्षांपासून [illegible] का मारले गेले, मला मारणारा देव कसा ठरला? असा जळता प्रश्न [illegible] वाली विचारतो आहे. आपण वालीला काय उत्तर देणार? रामाला [illegible] मानणाऱ्यांनी वालीचा प्रश्न टाळू नये असेच आंबेडकर सांगताहेत.

### १२. शंबुकाचा वध

शंबुकाचा वध म्हणजे रामाच्या हातून घडलेला अपराध होय असे बाबा- [illegible] म्हणतात. ब्राह्मण मुलगा अकाली मरतो. ब्राह्मण, मुलाचे प्रेत नेऊन रामा- [illegible] तक्रार करतो. राज्यात कुठेतरी पाप घडले म्हणून हा मुलगा मेला तेव्हा [illegible] त्या पाप्याला शिक्षा करावी. मुलाला जीवंत करावे. अन्यथा प्राण देईन. [illegible] सांगतो. अधिकार नसताना तप करणाऱ्या शंबुकाची माहिती नारद [illegible] देतो. आणि शंबुकाच्या तपामुळे ब्राह्मण मुलाचा मृत्यू झाला हे रामाला

पटते आणि शंबुकाला कोणतीही सूचना न देता, त्याचा निषेध न करता कोणतेही स्पष्टीकरण न देता, तो त्याचे डोके उडवितो. इकडे ब्राह्मण मुलगा जीवंत होतो. देव व अगस्तीमुनी रामावर पुष्पवर्षाव करतात. शंबुकवधाचा असाही अर्थ लावला जातो की, "जन्माने शूद्र असून शंबुक जेव्हा तपस्वी जीवन जगत आहे. तेव्हा रामाने त्याला तु आता शूद्र नाही. तो जन्म तुझा संपला. तू आता ज्ञानसंपन्न आर्य झालास असे सांगितले, हा शंबुकाचा वध नसून तो त्याचा उद्धार आहे." (सौ. सुमती क. कानडे; लोकसत्ता १३-१२-८७) इथे प्रश्न असा की ब्राह्मण पुत्र मरण पावल्यानंतरच शंबुकाचा उद्धार रामाने का केला ? पण हा उद्धार आहे की वध आहे हे इतर कोणी सांगण्यापेक्षा शंबुकाला काय वाटले असेल याचा निर्णय होणे आवश्यक ठरते आणि शंबूक म्हणेल मी धर्माची चौकट मोडली त्यामुळे माझ्या हातून पाप घडले. ब्राह्मण पुत्र मरण पावला. वर्णव्यवस्था व ब्राह्मणवर्चस्वाचा भक्त असलेल्या रामाला माझ्या तपापेक्षा आणि उद्धारापेक्षा ब्राह्मणाचा मुलगा महत्वाचा होता. वर्णधर्माची चौकट पूजनीय होती" लोकांनी वर्णबाह्य वर्तन केल्याने ब्राह्मणांची मुले मरतात हे कोणत्याही काळात कसे शक्य आहे ? पण राम याचा विचारच करीत नाही. कारण इंग्रजी राजवटीपासून ब्राह्मणांपासून अंत्यजांपर्यंत सर्वांनी वर्णबाह्य वर्तन करण्याची स्पर्धा आरंभिली आहे. शंबूक बहूजन समाजाचा मनुष्य होता. ज्याच्यावर मनापासून प्रेम करावे असा तो विद्रोही होता. मनुष्याला स्वातंत्र्य नाकारणारी वर्णचौकट नाकारण्याचे काम त्याने त्यावेळी जीवाचे मोल देवून केले. त्याने गुलामी नाकारली त्यामुळे त्याला रामाने मृत्यूचे पारितोषिक दिले. स्वातंत्र्याची साधना रामाने अशी चिरडून टाकली. आजच्या लोकशाहीप्रधान भारतीय लोकांना शंबूकाचा सवाल आहे की ज्याला तुम्ही देव मानता त्याने माझा खून का केला ? सर्व उच्चवर्णीयांना आणि बहूजन समाजातील त्याच्या नातेवाईकांनाही तेव्हापासून शंबूक हा प्रश्न विचारतो आहे, कोण त्याच्या प्रश्नाला उत्तर देईल ? निदान आंबेडकरांनी शंबुकाला उत्तर दिले आहे. आंबेडकर म्हणतात, रामाने एवढा मोठा अपराध केला आहे की जगाच्या इतिहासात त्याला तोड नाही. ही घटना शूद्र शंबुकाचा वध म्हणून प्रसिद्ध आहे.

डॉ. आंबेडकरांनी शंबूकाची दुर्लक्षित तक्रार पुन्हा एकदा भारतापुढे मांडलेली आहे. रामाला देव मानण्याआधी लोकांनी शंबूकाच्या तक्रारीला उत्तर द्यावे एवढेच आंबेडकरांचे म्हणणे आहे.

### १३. आदर्श राजेपण

राम आदर्श राजा होता ही समजूतही डॉ. आंबेडकर प्रश्नार्थक करून टाकतात. राज्यकारभार भरत बघत होता. राम केवळ नाममात्र राजा होता. वाल्मिकी रामायणानुसार राम 'सकाळपासून दुपारपर्यंत धार्मिक विधी, समारंभ व होमहवन यात गुंतलेला असे. तर दुपारचा वेळ तो आल्टून पाल्टून विदूषक व जनाना यांच्या संगतीत घालवीत असे... अशोकवन नामक उद्यानात हा जनानखाना होता. तेथेच राम भोजन घेत असे... त्यात मांस, फळे व मद्य यांचाही समावेश असे. तो मद्य भरपूर पीत असे आणि सीताही या मद्यपानाच्या कार्यक्रमात सामील होत आहे ना याकडे त्याचा कटाक्ष असे. रामाच्या जनानखान्यात अप्सरा, उरग आणि किन्नरी होत्या... वाल्मिकी रामाला रामो रमयतां वरः असे म्हणतो. ही रामाची नियमित दिनचर्या होती. याचाही विचार वाचकांनी करावा आणि रामाचे देवपण पडताळून पाहावे, असे आंबेडकरांचे म्हणणे आहे.

### १४. सीता त्याग

रावण वधानंतर प्रथम रामाने सीतेकडे जायला हवे होते. पण तो तसे करीत नाही. सीतेला घेऊन यायलाही हनुमानाला सांगत नाही. लोकापवादाला बळी पडून तिचा त्याग करतो. छोट्या मुलांना घेवून सीता १२ वर्षेपर्यंत वाल्मिकीच्या आश्रमात राहते पण रामाला त्याचे काहीच वाटत नाही. "मी येथे आलो तो रावणाला मारण्यासाठी व माझी अप्रतिष्ठा धुवून काढण्यासाठी. मी काही हे कष्ट तुझ्यासाठी घेतले नव्हते," असे राम सीतेला उद्देशून म्हणतो आणि आपल्या पराक्रमाचे गोडवे गातो. तिच्या चारित्र्याबद्दलही शंका घेतो. रामाने सीतेला दिलेली ही वागणूक बाबासाहेबांना अत्यंत क्रूर वाटते या संदर्भात "अशी ही सीतेची शोकांतिका आणि असा देव रामाचा अपराध!" असे बाबासाहेब म्हणतात. हे त्यांचे म्हणणे खोटे आहे काय? ह्याचा विचार करायची वेळ आलेली आहे. आजवर परंपरावाद्यांनी रामासंबंधी जे मानले त्यापेक्षा त्या त्या घटितांची वेगळी स्पष्टीकरणे परंपरावाद्यांनी लक्षात घेतली नाहीत आणि गैरसोयीची सामग्री लोकांपुढे येऊन दिली नाही. सर्वसामान्य लोकांना हा दडवलेला भागही कळायला हवा. यासाठी बाबासाहेब आंबेडकर प्रयत्न करताहेत. डॉ. आंबेडकर हे वाईट करीत आहेत काय? याचा विचार व्हायला हवा. ज्यांनी रामायणातील गैरसोयीचा भाग लोकांपासून दडवून ठेवला त्यांनी वाईट केले की,

ही दडवलेला भाग लोकांपुढे आणणारे आंबेडकर समाजाचे चांगले करीत आहेत याचाही विचार व्हायला हवा. ते झाले तर आंबेडकर आपल्या भल्यासाठीच हे सर्व करीत आहेत, हेच लोकांना पटल्यावाचून राहणार नाही.

### कृष्णासंबधीची कोडी

पुतना वध, तीन महिन्याचा असता शकट मोडणे, गोपींची वस्त्रे पळविणे, राधेशी अनैतिक संबंध असणे, गोवर्धन पर्वत उचलणे, युधिष्ठिराला 'अश्वत्थामा मारला गेला' असे खोटे म्हणायला लावणे, त्याला सोळा हजार एकशे आठ बायका असणे आणि त्याच्या संतानांची संख्या एक लाख ऐंशी हजार असणे, हजारो वेश्यांना द्वारकेत नेऊन ठेवणे, रासक्रीडा इत्यादी कोडी कृष्णाच्या संदर्भात बाबासाहेबांनी अधोरेखित केली आहेत.

### समारोप

लोकहितवादी, फुले, आगरकर आणि गाडगेबाबा यांचा हा महाराष्ट्र आहे. या बंडखोरांच्या, या समाजसुधारकांच्या आणि धर्ममीमांसकांच्या परंपरेला गौरव वाटावा असे आंबेडकरांच्या विचारातील विद्रोही वैभव आहे. शशिकान्त पवार म्हणतात त्याप्रमाणे बहुजन समाजाला मूळ रामायण सांगितलेच गेले नाही हे खरे. लोक अंधश्रद्ध होतील एवढ्याच गोष्टी सांगितल्या गेल्या. "**त्यामुळे राम व कृष्ण यांना देवपण प्राप्त झाले. लोकांची त्यांच्यावर श्रद्धा बसली आहे आणि आता ती घालवणे कठीण**" हे खरे असले तर या विघातक श्रद्धा घालविण्याचा प्रयत्न होऊ नये काय ? असे प्रयत्न पवार मान्य करतील की नाही ? आणि आंबेडकर हाच प्रयत्न करीत आहेत. अधिकारवाणीने करीत आहेत. सामान्यांना ते त्यांच्या हितासाठीच दुखवित आहे. ऑपरेशन सुखदायी नसते पण निरोगी-पणासाठी ही दुःखद गोष्ट करावी लागते. आंबेडकर म्हणतात. "... Purpose of this book is to draw attention of the Hindu masses to the devices of the Barahmins and to make them think for them-selves how they have beecn deceived and misguided by the Brahmins." (Riddles in Hinduism : form introduction.) तेव्हा या ना त्या संदर्भात, इतिहासाच्या या ना त्या टप्प्यावर जे नागवले गेले त्यांच्यासाठी आंबेडकर आपल्या शब्दातून मुक्तीचेच अभियान खोदीत आहेत. आंबेडकर त्यांच्या सूर्योदयाचाच शब्द उच्चारीत आहेत. समाजक्रांतीसाठी देव आणि धर्म या संकल्पनाची मीमांसा विचारवंतांना करावीच लागते. वरील गोष्टींच्या मनाशी

बसलेल्या गाठी सोडवूनच समाजाला गतिमान करता येते. देव आणि धर्म समाजाला एका ठिकाणी बांधून ठेवून त्याचे कालानुरूप परिवर्तन नाकारीत असेल तर आपल्या उज्ज्वल अस्तित्वासाठी वरील गोष्टींचा विचार समाजाला करावाच [illegible]. "देवदानवा नरे निर्मिले." हे मराठीतील सूर्यकुलाच्या कवितेच्या जनकाने [illegible] होते ते लक्षात घ्यायला हवे. धर्मकल्पनेत धर्मभोळेपणा, मूर्तिपूजा, हटवादी-पणा किंवा स्वमताग्रह ढोंगीपणा, पंथप्रवृत्ती, दैववाद, व्यक्तीवाद, गूढवाद, [illegible]वाद आणि अज्ञान यांना थारा नसावा असे बाबासाहेबांचे मत होते. त्यामुळे विभूतिपूजा, मानवाचे दैवीकरण याबरोबरच कर्तव्यच्युती या गोष्टींमुळे हिंदू समाजाचा नाश झाला. भारत देशाच्या भयानक अधःपातालाही याच गोष्टी जबाबदार आहेत असा निष्कर्ष बाबासाहेबांनी काढला होता. पुराणमतवादी धार्मिक दृष्टिकोण सोडायला हवा. परमेश्वराच्या अवतारावर विसंबून राहून [illegible] सामाजिक कर्तव्य टाळू नये. धर्माचा केंद्रबिंदू ईश्वर व मनुष्य यांत असण्या-[illegible] तो माणसामाणसात असला पाहिजे. हे मत सांगणारे आंबेडकर या देशातील [illegible]च्या उत्थानाचेच तत्त्वज्ञान मांडत होते. म्हणूनच माधव गडकऱ्यांसारखे [illegible]कार म्हणतात की, "राम आणि कृष्णाऐवजी ज्योतिबा फुले आणि डॉ. आंबेड-कर यांना कधीच आम्ही निवडले आहे." (लोकसत्ता : १२-१२-८७) यातच बाबासाहेबांचे मोठेपण समर्पक शब्दात व्यक्त होते. स्वातंत्र्याच्या पाईकांनी त्यांच्या स्वातंत्र्याची लढाई लढणारे आंबेडकर समजून घ्यावेत अशी विनंती करून आणि [illegible] मला हे बोलण्याची संधी दिल्याबद्दल संयोजकांचे आभार मानून आपली रजा घेतो.

□ □

# रिडल्स : राम आणि कृष्ण : २

काल दिनांक १६ नोव्हेंबर १९८७ रोजी विश्वमान्य महापंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "रिडल्स इन हिंदुइजम" या संशोधनपर ग्रंथामधील राम आणि कृष्ण यांच्यासंबंधीचे लेखन असलेले परिशिष्ट वगळण्यात आल्याची अधिकृत घोषणा महाराष्ट्र शासनाने केल्याचे वृत्त दूरदर्शनवर ऐकले आणि शासनाच्या या धडक निर्णयाने मन खिन्न झाले.

डॉ. आंबेडकरांच्या राम आणि कृष्ण या लेखनाने समाजातील एका मोठ्या भागाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. डॉ. बाबासाहेबांबद्दल सरकारला आदर आहे. "पण समाजा–समाजातील तणाव वाढू नये एवढ्याच हेतूने आम्ही ही कृती केली आहे" असे स्पष्टीकरण हे परिशिष्ट वगळण्याच्या संदर्भात शिक्षणमंत्र्यांनी दिले आहे. डॉ. बाबासाहेबांबद्दल आदर असलेल्या शासनाने बाबासाहेबांचे हे परिशिष्ट वगळले त्याचे कारण शासनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपेक्षाही परंपरावाद्यांबद्दल अधिक आदर आहे हे आहे. एरव्ही सत्य लक्षात न घेणाऱ्या धर्मवाद्यांच्या ओंजळीने पाणी पिऊन शासनाने डॉ. आंबेडकर या विश्वविख्यात महापंडिताचा अपमान केला नसता.

हे परिशिष्ट वादग्रस्त आहे म्हणून ते वगळले गेले आहे ही भूमिका शासनाने घेतली आहे, पण हे परिशिष्ट वादग्रस्त आहे म्हणजे काय आहे ? या परिशिष्टामधील पुरावे आणि या पुराव्यावरून डॉ. आंबेडकरांनी काढलेले निष्कर्ष यांची शहानिशा विद्वानांची समिती नेमून शासनाने करायला नको होती काय ? मूळ रामायणातील पुराव्यांचा अपलाप केला गेला आहे किंवा हे पुरावे मूळ रामायणात किंवा महाभारतात नाहीतच आणि या पुराव्यांवरून आंबेडकरांनी काढलेले निष्कर्ष निघू शकत नाहीत, हे सिद्ध केल्याशिवाय या परिशिष्टाची वादग्रस्तता शाबित करता यायची नाही. सनातन्यांना या परिशिष्टातील लेखन आवडले नाही किंवा त्यातील लेखनामुळे परंपरावाद्यांच्या भावना दुखावल्या एवढ्या कारणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे लेखन वादग्रस्त कसे ठरू शकते ? परंपरावाद्यांच्या भावना दुखावणे आणि एखादे लेखन वादग्रस्त असणे या दोन गोष्टी फार भिन्न आहेत. कारण अत्यंत निर्विवाद लेखनामुळे सुद्धा

परंपरावाद्यांच्या भावना दुखू शकतात. शासनाला परत अत्यंत नम्रपणे सुचवावेसे वाटते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन सत्याच्या कसोटीवर उतरणारे आहे. रामायण, महाभारतातील पुराव्यांवरूनच डॉ. आंबेडकरांनी निष्कर्ष काढले आहेत. या पुराव्यांवरूनच हे निष्कर्ष निघणे अटळच आहे. त्यामुळे हे लेखन सत्य आहे, निर्विवाद आहे. हे शासनाने कबूल करावे आणि हे लेखन सत्य असले, निर्विवादच असले तरीही काही परंपरावाद्यांच्या भावना या लेखनामुळे दुखवल्या असल्यामुळे डॉ. आंबेडकरांचे सत्य व निर्विवाद लेखन आम्ही वगळत आहोत हे सांगण्याची हिंमत ठेवावी. पण बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन वादग्रस्त आहे म्हणून बाबासाहेबांवर अन्याय करू नये. परंपरावाद्यांचा सन्मान करू नये. सत्यवादी आंबेडकरांचा अपमान करू नये. निदान शासनाकडून हे अपेक्षित नाही.

दुसरे असे की, राम आणि कृष्णासंबंधीचे 'रिडल्स इन हिंदुइझम' या ग्रंथातील लेखन डॉ. आंबेडकरांचे नव्हेच म्हणून ते वगळावे ही मराठा महासंघाची भूमिका मराठा महासंघाला शोभली तरी शासनाला शोभण्यासारखी नाही. हे लेखन संशोधक आणि प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकरांचेच आहे. अनुक्रमणिकेमध्ये मुळात या लेखनाचा उल्लेख नाही त्यामुळे हे लेखन आंबेडकरांचे नव्हे ही भूमिका अत्यंत तकलादू आहे. ग्रंथाच्या विषयाची प्रकृती, ग्रंथलेखनाचे, प्रयोजन, ग्रंथातील विवेचनाची कक्षा या गोष्टींचा ग्रंथलेखन–शिस्तीच्या आणि संशोधन–शिस्तीच्या दृष्टीने विचार केला तरी राम आणि कृष्णासंबंधीचे या ग्रंथातील लेखन हे या ग्रंथाचा अविबंधात्मक भाग आहे, सेंद्रिय घटक आहे, हे कोणाही सुबुद्ध माणसाच्या लक्षात येईल. ग्रंथप्रकृतीच्या दृष्टीने व लेखनप्रयोजनाच्या दृष्टीने राम-कृष्णासंबंधीचे लेखन ग्रंथाशी एकजीव असेच वाटते, ते कुठल्याही अर्थाने उपरे, निःसंदर्भ आणि विसंगत वाटत नाही. याशिवाय डॉ. आंबेडकर या महापंडिताची अत्यंत सुंदर अशी संशोधनपद्धती आहे. ही जशी त्यांच्या इतर ग्रंथांमधून आढळते. तशीच 'रिडल्स् इन हिंदुइझम' या ग्रंथातूनही आढळते आणि राम–कृष्णाविषयक लेखनातूनही हिच संशोधनपद्धती कार्य करताना दिसते. याशिवाय बाबासाहेब आंबेडकरांची एक विवक्षित विश्लेषणपद्धती आहे. विषय हाताळण्याची, तो मांडण्याची एक आंबेडकर–पद्धती आहे. आणि बंडखोर आंबेडकरांची, संशोधक आंबेडकरांची एक संपृक्त अशी नवविचारप्रवर्तक अशी शैली आहे. या शैलीवर आंबेडकर या प्रज्ञावंताच्या ठायी ठायी मुद्रा उमटलेल्या आहे. या विवक्षित शैलीचे नाव आंबेडकर असे आहे. या विवक्षित विश्लेषण पद्धतीचे नाव आंबेडकर विश्लेषण–पद्धती असे आहे आणि हे या सर्व लेखनातून वादळासारखे प्रकट होते. त्या व्यक्तिमत्वाचे नावही

आंबेडकरच आहे. तेव्हा राम आणि कृष्ण या लेखनातूनही हीच आंबेडकरी प्रज्ञा, हीच आंबेडकरी विश्लेषणपद्धती, हीच आंबेडकरशैली मुखरीत झालेली आहे. अशा कोणत्याही अंगाने अभ्यासकाने अभ्यास केला तरी हे लेखन आंबेडकरांचेच आहे या मुद्याला कुठे बाधा येत नाही. तेव्हा हे लेखन आंबेडकरांचे नव्हे म्हणून गाळतो आहोत ही बालबोध चतुराईची भूमिका कोणालाच घेता यायची नाही. हे लेखन आंबेडकरांचेच आहे हे मान्य करूनच वगळायचे असेल तर हे लेखन वगळायची कृती शासनाने करावी.

शासनाने हे लेखन चुकीचे आहे, वादग्रस्त आहे, असत्य आहे हे सिद्ध न करता किंवा हे लेखन डॉ. आंबेडकरांचेच कसे नव्हे हे सिद्ध न करता हे लेखन वगळण्याचा निर्णय घेणे ही कृती सत्यालाच अप्रतिष्ठित करणारी ठरते. या कृतीमुळे केवळ आंबेडकरांचाच पराभव झाला असे नाही तर आपल्या समग्र प्रबोधनाचाच पराभव झाला आहे. आज आंबेडकरांचाच पराभव झाला नाही तर अवघ्या विवेकवाद्यांची नाचक्की झाली आहे. आंबेडकर म्हणजे आपल्या प्रबोधनाचा कळस. पण हे परिशिष्ट वगळल्याने आपल्या प्रबोधनाचा आज शिरच्छेद झाला आहे. या निर्णयाने सर्व परिवर्तनवादी विचारवंतांचीच बेअब्रू झालेली आहे. विचारस्वातंत्र्याचे आज सहज मढे निघाले आहे. लोकशाही प्रश्नार्थक झाली असून उच्चारस्वातंत्र्याची नर्म्नाधिंड काढली गेली आहे. इंग्रजी राजवटीतही लोकहितवादी, फुले, आगरकर हे थोर सुधारक निर्भयपणे बोलले. त्यावेळी सुद्धा परंपरावाद्यांना कोणाही सुधारकाचा शब्द थोपवता आलेला नाही. विद्रोहाचा उच्चार कुणाला रोखता आला नाही. त्यावेळीही धर्ममीमांसा संकटात आली नाही. आणि आज मात्र धर्ममीमांसेला आणि तत्त्वमीमांसेला आपल्या समाजात कोणतेही संरक्षण उरलेले नाही. शासनाच्या या निर्णयाने आपले प्रबोधन अनाथ झाले आहे. सत्य आता वनवासी झाले आहे. निर्वासित झाले आहे. सत्याला आज ताठ मानेने जगण्याचा काळ संपला आहे. परंपरावाद्यांना पटणार नसेल, त्यांच्या श्रद्धेला ते पचणार नसेल, पण त्यामुळे आंबेडकरांचे बोलणे खोटे ठरत नाही. लोकांना सत्य पचत नाही म्हणून सत्य सांगण्याचा आंबेडकरांचा अधिकार कसा हिरावला जाऊ शकतो. 'तुका म्हणे सत्य सांगे। येतील रागे येतील ते।। या तुकारामी बाण्याने सत्य सांगू पाहणाऱ्यांना आज अपमानित व्हावे लागत आहे. "लोकशाहीमध्ये जनमत ही अखेरची निर्णायक शक्ती असल्याने ते डोळस व प्रभावी बनविणे हे वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यासंगी कार्यकर्त्यांचे आद्यकर्तव्य आहे. कल्याणकारी राज्यात तर संमती आणि स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आर्थिक सुरक्षितता,

समानता आणि बंधुभाव इत्यादी मूल्ये सर्वांनी प्रमाण मानलेली असतात. तेव्हा आपल्या देशातील निरनिराळ्या संस्थांची घडण व कार्यपद्धती ही आपल्या सामाजिक उद्दिष्टांशी कितपत सुसंगत आहेत याची विचारवंतांनी वारंवार छाननी केली पाहिजे. सर्वसामान्य लोकांची दृष्टी बहुधा तात्कालिक प्रश्नांवर खिळलेली असते. कोणत्याही गोष्टीचे दूरगामी परिणाम सहसा त्यांच्या लक्षात येत नाहीत. भोवतालची परिस्थिती अधिकाधिक बिकट व गुंतागुंतीची होऊ लागली, की ते गोंधळून जातात. अशावेळी योग्य मार्गदर्शन न लाभल्यास लोक प्रवाहपतित किंवा प्रतिगामी बनण्याचा संभव असतो. म्हणून या बाबतीत विचारवंतांची जबाबदारी मोठी आहे." (प्रबोधनातील पाऊलखुणा, १९७८, पृ. २) हे प्रा. गं. बा. सरदारांचे म्हणणे काय ? किंवा परंपरेने प्राप्त झालेली परलोक-परायण विचारसरणी जशीच्या तशी स्वीकारून या जगात जगण्याचे स्वातंत्र्य मिळणार नाही... आता सर्व तत्त्वज्ञानांच्या अग्निपरीक्षेची वेळ आली आहे... हे राष्ट्र तत्त्वज्ञानशून्य बनण्याची शक्यता वाढत आहे असे वैदिक संस्कृतीच्या विकासात म्हणणाऱ्या लक्ष्मणशास्त्री जोशांचे "भूतकाळातील परिस्थितीला ध्येय समजून जे वर्तमानकाळात प्रयत्न करतात त्यांना भविष्यकाळ नसतो. नव्या काळात नवी ध्येये व नवी साधने निर्माण करणारेच लोक थोर भवितव्याचे कर्ते बनतात. भूतकालीन विचाराची पायरी पायाखाली घातल्याशिवाय नवविचाराचे उच्चतम स्थान गाठता येत नसते." (हिंदुधर्माची समीक्षा, १९४०, पृ. २३४) हे म्हणणे काय आपल्या समाजातील लोकांनी लक्षात घेण्याचे का टाळावे ? सत्य लक्षात न घेता कुणाच्या भावना दुखत असतील तर सत्याशी दोस्ती करणाऱ्या निराळ्या भावनांच्या घडणीची प्रक्रिया सुरू करावी लागते. परंपरावाद्यांनी धर्मचिकित्सा नाकारली तरी चिकित्सा प्रक्रिया थांबत नसते. इंग्रजी राजवटीतही ही चिकित्सा थांबली नाही पण स्वतंत्र भारतात मात्र धर्मचिकित्सेला हद्दपार केले गेले आहे.

डॉ. आंबेडकर पुराव्याशिवाय बोलत नाहीत. एका कठोर संशोधकाच्या प्रतिज्ञेचा वसा त्यांनी घेतलेला होता. वाल्मिकी रामायणातूनच बाबासाहेबांनी राम चितारला आहे. रामासंबंधीचे बाबासाहेबांचे लेखन एखाद्या उत्कृष्ट साहित्य-समीक्षेचा नमुना ठरावा. एक आदर्श उपयोजित समीक्षा-लेख ठरावा. इतके ते लेखन सहज आहे. बाबासाहेबांनी चितारलेल्या रामाला आणि कृष्णाला रामायण आणि महाभारत या ग्रंथांमध्येच आधार आहेत. हिंदूंनी पुजिलेला राम रामायणातील रामासारखा नसेल तर त्याचा अर्थ काय आहे ? रामाला देव ठरवण्यासाठी त्याला रामायणापासून वेगळे का काढले जाते ? सत्यापासून असे दूर पळण्यापेक्षा

आमच्या मनातील रामाचा रामायणातील रामाशी काहीही संबंध नाही असे तरी या प्रतिभावंत परंपरावाद्यांनी म्हणावे. असे जर झाले तर डॉ. आंबेडकरांचे रामायणातील पुराव्यावर आधारलेले लेखन आक्षेपार्ह समजण्याचे कारणच संपून जाईल. दुसऱ्या बाजूने परंपरावाद्यांच्या मनातील रामासंबंधीचेही हे लेखन असणार नाही.

'रिडल्स इन हिंदुइजम' या ग्रंथातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राम–कृष्णासंबंधीचे लेखन शासनाने वगळून टाकण्यामुळे आपल्या देशात विचारस्वातंत्र्याचा मुद्दा प्रकर्षाने चर्चेला घेण्याची वेळ आलेली आहे. भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना एकोणिसाव्या कलमानुसार भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे. हा अधिकार देणाऱ्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. पण आज घटनेच्या विरोधात जाऊन घटनाकाराच्याच अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा मुद्दा पाडला गेला आहे. विचार आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणणे हे घटनेच्या विरोधात आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात कोणाचे लेखन गाळण्याचा असा प्रकार आजपर्यंत घडला नाही आणि अशी पाळी पहिल्यांदा या देशाच्या घटनाकारावर यावी या गोष्टीचे या देशातील किती लोकांना दुःख होते ते तपासून पाहण्याचीही वेळ आलेली आहे. आजवरच्या आपल्या प्रबोधनाचा इतिहास डोळ्यापुढे धरला तर आंबेडकर हे या प्रबोधनाचे परम् इत्यर्थ होत. या प्रबोधनाला अधिकच लखलखीत करणारे ते सर्वश्रेष्ठ प्रबोधनकार होत डॉ. आंबेडकरांनीच अत्यंत अपरिहार्यपणे आपल्या प्रबोधनात बुद्धिवादाचा प्राण भरून दिलेला आहे. निरीश्वरवादाचे रणमैदान आपल्या प्रबोधनाच्या प्रवासापुढे आपल्या प्रज्ञाशक्तीने त्यांनी आंथरून ठेवलेले आहे. या अशा महापुरुषाचे बोलणे खरे तर या देशाने जीवाचा कान करून ऐकायला हवे होते. डॉ. आंबेडकरांचे बोलणे या देशाने आपल्या भवितव्याच्या वाटचालीत सखासांगाती म्हणून विश्वासाने निवडायला हवे होते. खरे तर आंबेडकरांचे या देशाने न ऐकण्यात आंबेडकरांचे कोणतेच नुकसान नाही. आंबेडकर स्वतःसाठी हा प्रज्ञेचा किरण–पिसारा फुलवीत नव्हते, त्यांच्या प्रज्ञेचा किरणपिसारा या देशातील अंधाराच्या नावाने फुलत होता. या देशाच्या वाटेवरील गतिरोधकांच्या नावाने ही प्रज्ञा पेटत होती. आंबेडकर स्वतःसाठी बोलत नव्हते. आंबेडकरांच्या एकेका शब्दात या देशाच्या सौंदर्याची समीकरणे मांडलेली आहेत. आंबेडकर या देशाच्या सौंदर्याखातर बोलत होते. बाबासाहेबांचा या राष्ट्रासंबंधीचा हा सौंदर्यप्रकल्प या समाजातील अंधारभक्त डोळ्यांनी पाहणे नाकारले. विचारस्वातंत्र्य आज

कोमेजून गेलेले आहे आणि विचारस्वातंत्र्याच्या खुणाचाही मुद्दा इतर कोणा-च्याही संबंधाने उपस्थित होण्यापेक्षा डॉ. आंबेडकरांच्या, या देशाच्या घटना-काराच्या निमित्ताने उपस्थित व्हावा या गोष्टीचा आपल्या प्रबोधनाने गंभीर विचार करायची गरज आहे. आणीबाणीच्या काळामध्ये काही वर्षांपूर्वी काही साहित्यिकांनी आणि विचारवंतांनी विचारस्वातंत्र्याच्या नावाने एक आघाडी उभी केली होती, पण आज या देशाच्या घटनाकाराचे बोलणेच पुसून टाकण्याची कृती घडलेली आहे. त्यावेळच्या विचारस्वातंत्र्याच्या या पुरस्कर्त्यांनी, या सवर्णांनी आज अधिकच भव्य आघाडी उभारण्याची गरज आहे, पण असे का होत नाही ?

एखाद्या धर्माच्या लोकांच्या भावना दुखावल्या की, त्याला कारण ठरलेले लेखन प्रकाशितच होऊ द्यायचे नाही हा मुद्दा वाटतो तितका सोपा नाही. समाजा-पुढे आणि शासनापुढे हा मुद्दा अनंत प्रश्न उभे करू शकतो. जेवढे वाङ्मय आज उपलब्ध आहे ते सगळे वाङ्मय आता इतर कोणाच्याही भावना दुखावित नाहीत. फक्त आंबेडकरांचेच वाङ्मय तेवढे पहिल्यांदाच एका समाजगटाच्या भावना दुखवणारे ठरले आहे हा मुद्दा सिद्ध करता येत नाही. वेगवेगळ्या धर्मियांच्या भावना कोणकोणत्या उपलब्ध वाङ्मयामुळे दुखावतात त्याची चौकशी न करून कसे चालेल ? ज्ञानेश्वरी, गुरुचरित्र, रामदासांचे वाङ्मय, सावरकरांचे डॉ. आंबेड-करांच्या धर्मांतरासंबंधीचे लेखन, लोकहितवादी, फुले, आगरकर यांचे लेखन, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशांचे हिंदुधर्माविरील लेखन, भास्करराव जाधवांचे रामायणासंबंधीचे लेखन, गोळवलकरांचे लेखन अशी केवढी तरी मोठी यादी पुढे करता येईल. वगळून टाकणे हा मुद्दा इतर कोणाहीसंबंधी उपस्थित न होता फक्त आंबेडकरांसंबंधीच का उपस्थित होतो याही प्रश्नाचा गंभीरपणे विचार करावा लागेल. शासनाने फुले, आगरकर, आंबेडकर यांचे विचारप्रवर्तक लेखन छापल्याचा अभिमान बाळगला पाहिजे.

वरील लेखकांचे लेखन छापून शासन या लेखकांवर उपकार करीत नाही तर स्वतःचा गौरव करून घेते हे शासनाने समजून घ्यावे. आपला समाज फुले, आगरकर, आंबेडकर या सुधारकांच्या हाकामागून जावा यासाठी शासनाने शिकस्त करायला हवी. लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर ही नावे या देशाच्या लौकिकात चंद्र–सूर्य शोभावीत अशी नावे आहेत. या सुधारकांच्या कृती–उक्तींनी आपला समाज प्राचीन मूल्यव्यवस्थेतून आधुनिक मूल्यव्यवस्थेत शिरला. काहीही केले तरी या महापुरुषांचे ऋण शासनाला फेडता यायचे नाही आणि आपल्या समाजानेही कायम कृतज्ञ राहावे असेच या महापुरुषांचे कार्य आहे. आजच्या

जगात सन्मानाने जगता येईल असा शक्तीसौष्ठवयुक्त जीवनशब्द या महापुरुषांनीच या देशाला दिला आहे. आणि कुणाच्याच भावना न दुखावताच केव्हा तरी कुठे तरी प्रबोधन झाले आहे काय ? न पटणारे विचार मान्य न करण्याचा अधिकार लोकांना आहे पण असे विचार नष्ट करण्याचा व प्रकाशितच न होऊ देण्याचा अधिकार परंपरावादी लोकांनी आपल्या हातात का घ्यावा ? डॉ. आंबेडकरांनी सहस्रबुद्धे या ब्राह्मण गृहस्थाच्या हस्ते मनुस्मृती जाळली पण मनुस्मृती जाळणे म्हणजे आपल्या प्रबोधनापुढील पहाड नष्ट करणे. आपल्या समतेच्या चळवळी-पुढील खंदक बुजविणे आणि बाबासाहेबांचा ग्रंथ जाळणे म्हणजे आपल्या प्रबोधनालाच फासावर लटकवणे होय. आपल्या समतेच्या चळवळीला वाळवंटात नेऊन सोडणे होय. मनुस्मृती जाळणे आणि डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ जाळणे या दोन गोष्टींमध्ये मूल्यपातळीवरचा प्रचंड प्रकार भेद आहे. या देशाच्या राज्यघटनेने देशापुढे ठेवलेल्या ध्येयवादावर मनुस्मृती केवळ मारेकरी घालू शकत होती तर आंबेडकरांचा ग्रंथ या समाजाला बुद्धिप्रामाण्यवादाची, मुक्त विचार मीमांसेची आणि राष्ट्रविकासाची दीक्षा देणारा ग्रंथ आहे. म्हणूनच बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रंथ या देशाने येथील लोकांनी आपल्या विकासाचा जाहीरनामा म्हणून मनःपूर्वक वाचायला हवा होता.

शासनाने 'रिडल्स इन हिंदुइझम' या ग्रंथातील राम–कृष्णासंबंधीचा भाग वगळण्याचा निर्णय घेतला आहे. आता एवढेच नम्रपणे सांगावेसे वाटते की परंपरावाद्यांनी आंबेडकरांचा पराभव केला तरी महाराष्ट्रातील आणि या देशा-तील विचारवंतांनी डॉ. आंबेडकरांचा पराभव होऊ देणे प्रबोधनाच्या दृष्टीनेही, विचारस्वातंत्र्याच्या दृष्टीनेही आणि विचार करणाऱ्या कोणाच्याही दृष्टीने धोक्याचे आहे. म्हणून या समाजातील विचारवंतांनी आंबेडकर सत्य सांगताहेत हे एकमुखाने सांगितले पाहिजे. आंबेडकरांचा पराभव निदान विचारवंतांच्या, विवेकवाद्यांच्या देशात तरी होता कामा नये.

या देशाच्या सांस्कृतिक इतिहासात डॉ. आंबेडकरांच्या या ग्रंथाने एक वादळ भडकवले. एका निर्णायक बिंदुवर आपल्या समाजातील मानसिकतांची विभागणी केली. म्हणून विचारवंतांनी मूलभूत मंथन करणाऱ्या या ग्रंथाचे आभार मानले पाहिजेत.

'रिडल्स इन हिंदूइझम' या ग्रंथाचे भारताच्या उज्ज्वल भवितव्याची काळजी बाहणाऱ्यांनी यासाठी आभार मानायचे आहेत, की या ग्रंथाने फुले आणि

आगरकरांच्यानंतर आपल्या समाजाचे परंपरावादी आणि प्रबोधनवादी अशा दोन छावण्यांमध्ये स्पष्टपणे विभागणी केली आहे. या ग्रंथाने पुन्हा एकदा मूलभूत पातळीवरून आपल्या पुरोगामी विचारवंतांना, बुद्धिप्रामाण्यवाद्यांना आणि प्रबोधनाच्या पाईकांना त्यांचा कस आणि कुवत वास्तवाच्या कसोटीवर तपासून घेण्याची घडी सिद्ध केली आहे. प्रबोधनाचा एक हात संस्कृतीमंथन करीत असतो आणि दुसरा हात सुंदर भविष्याला मिठी मारीत असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान ज्या ताकदीने आपल्या राष्ट्राला सुंदर भवितव्याशी जोडू शकते ती ताकद आज कोणाही तत्त्वज्ञानाच्या अंगात नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या ग्रंथामुळे आपल्या समाजातील क्रांती–विरोधी जाणिवा अत्यंत तीव्रपणे उफाळून येत आहेत. ही गोष्ट क्रांतिविरोधी जाणिवांचे स्वरूप, या जाणिवांची शक्ती तपासून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत उपकारक झालेली आहे असेच म्हटले पाहिजे. क्रांतीकारक कॅरेक्टर अशाच कुठल्या तरी निमित्ताने आपले खरे स्वरूप प्रकट करते. त्यामुळे एरव्ही वरवर शांत असणाऱ्या अवस्थेत जे नेमकेपणाने पकडता येत नाही ते अशाच एखाद्या पावनक्षणी आपला धगधगीत परिचय करून देते. आपल्या समाजातील मार्क्सवाद्यांना, सुधारणावाद्यांना, बुद्धिप्रामाण्यवाद्यांना आणि एकूणच या देशाच्या समतासौंदर्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना हा ग्रंथ या देशातील क्रांतीला कुठून प्रारंभ करायचा तेच जणू स्पष्टपणे समजावून सांगत आहे, आणि मार्क्सवादी समजतात, इतर समाजवादी समजतात किंवा इतरही क्रांतीवाले मानतात त्याप्रमाणे क्रांती इथे सरळ सोपी नसून ती इथे कशी बिकट आहे, इथे तिचा कार्यक्रम कसा वेगळ्या पद्धतीने आखला पाहिजे त्याचीच रूपरेषा या ग्रंथाच्या निमित्ताने निर्माण झालेला उफाळ जणू सांगत आहे. 'रिडल्स् इन हिंदूइझम' या ग्रंथाने परंपरावादी आणि परिवर्तनवादी या गटात आपला समाज स्पष्टपणे मांडलेला आहे. फुले, आगरकरांच्यानंतर इतक्या तीव्रपणे हे प्रथमच घडत आहे. प्रबोधनाच्या दृष्टीने समाजाचे असे द्विध्रुवात्मक प्रकाशन अत्यंत आवश्यक असते. 'रिडल्स इन हिंदुइझम' या ग्रंथाने हे युगप्रवर्तक कार्य केलेले आहे. यासाठी 'रिडल्स इन हिंदुइझम' या ग्रंथाचे आणि या ग्रंथाचे महापंडित लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शतशः आभार या देशातील प्रबोधनवाद्यांनी मानायचे आहेत.

'रिडल्स् इन हिंदुइझम' या ग्रंथाच्या निमित्ताने अमरावती येथील काही धर्मनिष्ठ लोकांनी शासनाविरुद्ध कोर्टात दावा केल्याचे वृत्त प्रकाशित झाले आणि

अमरावती येथे मराठा महासंघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वरील ग्रंथाचे दहन केल्याचेही प्रसिद्ध झाले आहे.

'रिडल्स् इन हिंदूइझम' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथासंबंधी अशा प्रतिक्रिया उमटण्यामागची कारणे शोधली जाणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रतिक्रियांच्यामागील मनोवृत्तीची तपासणी केली पाहिजे .अशा प्रतिक्रिया सत्यप्रियतेतून जन्माला आल्यात काय ? राजकारणातील हितसंबंधाच्या परि-पूर्तीचा भाग म्हणून जन्माला आल्यात काय ? धार्मिक अंध:श्रद्धेच्या पोटी या प्रतिक्रिया जन्माला आल्यात काय ? कुठल्या तरी व्यक्तिगत अन्यायाचा परिणाम म्हणून शासनावर घ्यावयाच्या सूडाच्या पोटी या प्रतिक्रिया जन्माला आल्यात काय ? की हिंदुधर्माचा त्याग करून निरीश्वरवादी बुद्धधम्माचा स्वीकार करणाऱ्या डॉ. आंबेडकरांवरील रागातून आणि अत्यंत निर्भयपणे विद्रोहाची भाषा बोलणाऱ्या आणि नव्यानेच समर्थ स्पर्धक म्हणून समोर उभ्या राहिलेल्या दलितांवरच्या रागातून या प्रतिक्रिया जन्माला आल्या आहेत. या सर्व प्रश्नांचाही विचार होण्याची गरज आहे. परिशिष्ट वगळल्याने प्रश्न सुटला नाही. आपल्या प्रबोधना-पुढे हजारोहजार प्रश्न निर्माण झाले आहेत.

'रिडल्स् इन हिंदुइझम' या ग्रंथातील राम आणि कृष्ण यांच्यासंबंधीचा भाग वगळण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. शासनाने या निर्णयाची अंमलबजावणी करू नये. लोकहितवादी, फुले, आगरकर आणि आंबेडकर यांच्या महाराष्ट्राला शासनाने समजावून सांगावे, पटवून द्यावे की आंबेडकर नावाचे सत्य खोटे बोलणे शक्य नाही. श्रद्धेपोटी रामा–कृष्णासंबंधी मनात आंधळी भक्ती बाळगण्यापेक्षा त्यांनी उज्ज्वल भवितव्याकडे जाताना यशस्वी होण्यासाठी आता आंबेडकरांचाच शब्द प्रमाण मानण्याची गरज आहे. आंबेडकर प्रज्ञावंत आहेत, महापंडित आहेत, संशोधक ग्रंथकार आहेत. त्यांच्या शब्दांच्या उरापोटात नव्या भारताचे सौंदर्यशास्त्र उत्कटून फुललेले आहे. राम–कृष्णापेक्षा आज–उद्याच्या भारताला प्रज्ञासूर्य आंबेडकरच विकासाची, विजयाची हमी देऊ शकतात. राम आणि कृष्ण यांच्यापेक्षा डॉ. बाबासाहेबांची वैचारिक योग्यता कितीतरी पटीने अधिक आहे. पण हे केवळ विवेकवादी दृष्टीलाच समजू शकेल. त्यामुळे शासनाने विवेकनिष्ठ जाणिवेची जागृती केली पाहिजे. लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर या विवेकवादी प्रबोधनकारांची दीपमाळ महाराष्ट्र शासनाच्या पाठीशी उभी आहे. या शासनाने आंबेडकरांच्या लेखनासंबंधी असा निर्णय घेणे योग्य व्हायचे

नाही. घटनेनेच दिलेल्या विचार–स्वातंत्र्याच्या विरोधी ही घटना प्रमाण मानणाऱ्या शासनानेच या घटनेचे जनक असलेल्या डॉ. आंबेडकरांचेच विचार–स्वातंत्र्य धोक्यात आणणे योग्य व्हायचे नाही. परंपरावाद्यांच्या स्थितिशील भावनांपुढे मान तुकवून आपल्या प्रबोधनाची अशी धिंड काढणे योग्य व्हायचे नाही. विचार–स्वातंत्र्याला तुरुंगात कोंडणे आपल्या शासनाच्याच, अर्थात घटनेच्याच मार्गदर्शक तत्त्वांशी विसंगत आहे. तेव्हा महाराष्ट्र शासनाला माझ्या स्वतःच्या वतीने आणि आपल्या सर्व विवेकवाद्यांच्या वतीने मी नम्र विनंती करतो की, 'रिडल्स् इन हिंदुइझम' या ग्रंथातील रामा–कृष्णासंबंधीचा भाग वगळण्यासंबंधीच्या आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा. त्याची कार्यवाही करू नये. जनतेला आंबेडकर नावाचे सत्य पटवून द्यावे. या सत्याचे हेतू समजावून सांगावेत. आंबेडकर म्हणजे समाजसौंदर्याचे शास्त्र देणारे थोर सौंदर्यशास्त्रज्ञ आणि ज्यांच्या हाकामागून आपण भविष्याच्या वाटा चालाव्यात असे ते आपले सर्वात विश्वासार्ह मार्गदर्शक आहेत. ते केवळ आपल्या भल्यासाठी बोलतात हे लक्षात घेऊन तरी लोकांनी त्यांचे चिंतन लक्षात घ्यावे. ही गोष्ट शासनाने लोकांना पटवून द्यावी. विचारवंतांची थोर परंपरा महाराष्ट्राला आहे आणि आजच्या काळातही प्रबोधनाचे ध्वज पेलणारे अनेक विचारवंत आहेत. त्यांचीही मदत शासनाने घ्यावी. आणि आपल्या संबंधित निर्णयाचा फेरविचार करावा.

□ □

# रिडल्स : राम आणि कृष्ण : ३

दि. २५ नोव्हेंबर १९८७ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चौथ्या खंडातील राम आणि कृष्ण यांच्या संबंधीचे परिशिष्ट गाळण्यासंबंधीच्या निर्णयाचा १५ जानेवारी १९८८ पर्यंत फेरविचार करण्यात येईल असे जाहीर केले आहे.

अर्थात फेरविचार करणे याचा अर्थ सदर परिशिष्ट गाळण्यासंबंधीचा दि. १६–११–८७ रोजी घेतलेला निर्णय बदलून घेतला जाईल असा होत नाही. कदाचित फेरविचार केल्यानंतर म्हणजे विचारान्ती आपला पूर्वीचाच निर्णय रास्त होता असेही शासन म्हणू शकणारच नाही असे नाही. कारण याच शासनाने ते परिशिष्ट वगळण्याचा निर्णयही घेतला होता. पण शासनाने निर्णय बदलावा, बाबासाहेबांचा शब्दही त्यांच्या लेखनातून वगळू नये. शासनाने प्रबोधनाच्या बाजूने उभे राहावे. खंबीरपणे आता शासनाने सत्याची बाजू घ्यावी. शासन या दिशेने पावले टाकीत आहे याबद्दल मी या देशातील समग्र विवेकवाद्यांच्यावतीने शासनाचे अभिनंदन करतो. आभार मानतो.

कुणीही उठावे आणि काहीही बोलावे असल्या कोटीतले डॉ. आंबेडकरांचे व्यक्तित्व नव्हे. या महापुरुषाने फुले–आगरकरांच्या नंतर आपल्या प्रबोधनाला नवे तत्त्वज्ञान दिले आहे. या देशाला समतेचा ध्येयवाद देणाऱ्या उजेडाच्या घटनेचे ते शिल्पकार आहेत. आपल्या विचार परंपरेला नवे विद्रोही आयाम देणारे, नवनवी क्षितिजे उघडून देणारे ते सर्जनशील विचारवंत आहेत. आपल्या देशात घडलेल्या प्रबोधनाचे ते बेस्ट प्रॉडक्ट आहेत, हे सार्थपणे म्हणता येईल असेच आंबेडकरांचे दैदिप्यमान व्यक्तिमत्त्व आहे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यात उभ्या असलेल्या या देशाने पुढे जाण्यासाठी पाथेय म्हणून आंबेडकरांचा शब्दच सोबतीला घ्यावा, अशी शक्ती आंबेडकरांच्या विचारांमध्ये आहे. समतापूजन, स्वातंत्र्यपूजन, बंधुतापूजन, विकासपूजन आणि विवेकपूजन ही पंचप्रकाशपूजने डॉ. आंबेडकरांच्या विचार कर्तृत्वाची पंचशीले होत. आंबेडकर या देशाला विकासाचाच महामंत्र सांगताहेत. या देशाला ते अंधःश्रद्धेतून बाहेर काढू इच्छित आहेत. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले सर्वच लेखन विचारप्रक्षोभक आहे.

आपल्या विचारांनी देश ढवळून निघावा आणि त्याने अधिक उन्नत, विवेकी जगण्याला सुरुवात करावी हीच त्यांच्या या प्रक्षोभक लेखनामागची प्रतिज्ञा होती. 'सत्यासाठी माझी शब्दविवंचना ! जोडील्या वचनांचे ते हे नव्हे' अशीच त्यांची तुकोबा पद्धतीची भूमिका होती. डॉ. आंबेडकरांचे लेखन अक्षरश: प्रकाशात येणे आवश्यक आहे. तो या देशातील ज्ञानमीमांसेचा गौरव आहे. तो या देशातील बुद्धिवादी परंपरेचा ठेवा आहे.

निर्विवाद वाङ्मय कोणते आहे ? निर्विवाद तत्त्वज्ञान कोणते आहे ? निर्विवाद अशी मते कुठे पिकतात ? कोणती व्यक्ती निर्विवाद आहे ? अर्थात वादग्रस्त नाही असे कुठे काही असत नाही. या मताभिमानांना 'ती' मते आवडत नाहीत. 'ती' मते मांडणारे लोक आवडत नाहीत आणि 'ती' मते प्रमाण असणाऱ्या लोकांना विरुद्ध बाजूची मते, तत्त्वज्ञाने आणि तत्त्वज्ञ वादग्रस्त वाटतात. वादग्रस्त असले की वगळणे ही प्रक्रिया असेल तर 'आहे ते' सर्व निर्विवाद उरलेले आहे असे म्हणावे लागेल; पण परिस्थिती तशी नाही. जी मंडळी राम–कृष्णासंबंधीचे बाबासाहेबांचे लेखन वादग्रस्त असल्याने वगळून टाकावे म्हणतात त्या मंडळींना बाबासाहेब आंबेडकरांचे बाकीचे सर्व लेखन निर्विवाद वाटते काय ? आणि राम आणि कृष्ण यांच्यासंबंधीचे लेखन वगळून बाबासाहेबांचे इतर सर्वच लेखन ज्यांना निर्विवाद वाटते त्यांना हे उरलेले लेखन निर्विवाद वाटते याच एका कारणामुळे राम आणि कृष्णासंबंधीचे बाबासाहेबांचे लेखनही वादग्रस्त वाटण्याचे कोणतेच कारण नाही. बाबासाहेब आंबेडकरांचे राम आणि कृष्णाव्यतिरिक्तचे लेखन वाचल्याने जी विचार कलह पेलण्याची ताकद समाजात येईल ती ताकदच राम आणि कृष्ण यांच्या संबंधीचे लेखनही पेलू शकली पाहिजे पण हे होताना दिसत नाही. याचा अर्थ काय ?

'लोकसत्ते'मध्ये राम आणि कृष्णासंबंधीचा लेख बाबासाहेबांचा नसून कोणा एस. डी. नाडकर्णी या लेखकाचा होय. अशी माहिती पत्रकार श्री. पुरंदरे यांनी दिलेली आहे. समाज समता संघाने १९३२ साली नाडकर्ण्यांचे ७५ पानांचे 'ऑन रामराज्य ॲण्ड स्लेव मेन्टॅलिटी ऑफ ऑर्थोडॉक्स' हे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. राम–कृष्णासंबंधीचा भाग त्यातील असावा असा अंदाज व्यक्त केला गेला आहे. त्या पुस्तकातील राम आणि कृष्णासंबंधीचा भाग बाबासाहेबांच्या पुस्तकामध्ये परिशिष्ट म्हणून अगदी शब्दश: आला आहे काय ते बघायला हवे. पण केवळ काही निष्कर्ष सारखे येतात म्हणून बाबासाहेबांच्या ग्रंथात येणारे लेखन नाडकर्णी यांचे ठरत नाही. पण पुढील गोष्टींचाही विचार करावा की वरील

पुस्तक बाबासाहेबांच्याच भारतभूषण प्रिन्टिंग प्रेसमध्ये छापले गेलेले आहे. तेव्हा नाडकर्ण्यांचे एकतर बाबासाहेबांशी संबंध असावेत. त्यांच्या चर्चा होत असाव्यात आणि बाबासाहेबांचे निष्कर्षच नाडकर्ण्यांनी मांडले असावेत. तेव्हा अक्षरशः तेच असेल तरच ते लेखन नाडकर्णींचे मानावे लागेल आणि हे नाडकर्णी कोण त्याचाही तपास घ्यावा लागेल. (की बाबासाहेबांनीच या नावाने लिहिले ?) पण हा सर्वच खटाटोप राम आणि कृष्णासंबंधीचे 'रिडल्स इन हिंदूइझम'मधील लेखन वगळण्यासाठी होत असेल तर ही बाब चिंतनीय आहे असेच म्हणावे लागेल. हे लेखन वगळण्यासाठी विरोधकांनी खूप युक्त्या प्रयुक्त्या केल्या. हे लेखन बाबासाहेबांचेच नव्हे, अशा पातळीवर येऊन बाबासाहेब लेखन करीत नाहीत अशी एक सबब पुढे केली गेली. संपादक मंडळाने अनुक्रमणिकेत या लेखनाचा अंतर्भाव नसल्याचे लिहिल्यामुळे आणि ते परिशिष्टात टाकल्यामुळेसुद्धा हे लेखन बाबासाहेबांचे नव्हे अशी सबब पुढे केली. आता ते लेखन एस. डी. नाडकर्ण्यांचे असावे अशी सबब पुढे केली जात आहे. आणखी एखादी सबब बाहेर येईल. पण हे सगळेच प्रयत्न लेखन वगळले जाण्याच्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न होत असेच म्हटले पाहिजे. शैलीदृष्ट्या व विश्लेषण दृष्ट्या या लेखनाचा अभ्यास करण्याचे का टाळले जावे ? याचा उघड अर्थ आहे की विरोधक अटळ सत्याला घाबरतात आणि मनातील श्रद्धेला सत्यापासून वाचवण्याच्या इच्छेने या वेगवेगळ्या असत्यांचा व भ्रमांचा आश्रय घेतात.

राम आणि कृष्णासंबंधीच्या बाबासाहेबांच्या निष्कर्षांचा विरोधकांनी अत्यंत शांतपणे विचार करावा. डॉ. रूपाताई कुळकर्णी यांनी मूळ वाल्मिकी रामायणातील अवतरणे देऊन बाबासाहेब आंबेडकरांचे निष्कर्ष कसे खरे आहेत ते लोकमतमधल्या (२५-११-८७) आपल्या लेखात स्पष्ट केलेच आहे. बाबासाहेब आंबेडकरांनीही आपल्या लेखात वाल्मिकी रामायणातून दाखले दिले आहे. तेव्हा विरोधकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगताहेत ते विचार सत्य आहेत ते कबूल करावे. आणि शेवटी बाबासाहेब आंबेडकर हे सत्य कशासाठी सांगत होते ? हा देश अंधश्रद्ध राहावा म्हणून की विवेकवादी व्हावा म्हणून ? बाबासाहेब आपल्या समाजाला आधुनिक जगात नेण्याचा प्रयत्न करतात. आपण विचारसंपन्न व्हावे. भ्रम उराशी बाळगण्यापेक्षा आपण विवेकवादी व्हावे. आणि सगळे राष्ट्रच प्रगतीच्या महामार्गावरुन झपाट्याने जावे. हेच त्यांच्या लेखनामागचे प्रयोजन आहे.

त्यामुळेच हिंदुधर्मियांनी कुठला आकस न ठेवता शांतपणे बाबासाहेबांचे विचार समजावून घ्यावेत. या देशातील सगळ्या पीडितांनाच नव्हे, तर या

देशातील उच्चवर्गीयांनाही आंबेडकरांचा विचारच अंतिमत: आपल्या हिताचा आहे, असेच वाटेल. विरोधकांच्या नेत्यांनी या संदर्भात सामंजस्याची भूमिका घ्यावी. लोकांना उजेडाच्या मार्गाने जाण्यास प्रवृत्त करावे. लोकहितवादी, फुले, आगरकर, शाहू महाराज, गाडगेबाबा यांचा वारसा ज्या समाजाला आहे त्या समाजाची काही एक तयारी आहे हे लक्षात ठेवून ही तयारी द्विगुणीत करावी. जनतेला आपण मागे न्यायचे नाही, पुढे न्यायचे आहे. आंबेडकर समाजाला थांबवणारा, मागे जाण्यास उद्युक्त करणारा, अंधःश्रद्धेत गुंतून पडण्यास प्रेरणा देणारा, पुराणमतवादी असणे समर्थनीय मानणारा शब्द कधीच बोलणार नाहीत. या देशातील गरीब हिंदूंनी आपल्या समाजातील उपेक्षित पीडितांनी, जंगलातल्या अंधारात राहणाऱ्या आदिवासींनी आणि बेघर, बेगाव भटकणाऱ्या भटक्या विमुक्तांनी, बहुजन समाजातील शोषितांनी आंबेडकर त्यांच्या हिताचे बोलत आहेत हे समजावून घ्यावे. फुल्यांच्या समाजाने फुल्यांच्या मनाने समजावून घ्यावे की आंबेडकर त्यांच्या हिताचाच शब्द उच्चारीत आहेत. लोकहितवादी, न्या. रानडे, आगरकर, केशवसुत आणि हरिभाऊ आपटे यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगून त्यांच्या गोरगरीब समाजाने समजावून घ्यावे की आंबेडकर त्यांच्या हिताचेच महावाक्य उच्चारीत आहेत. शाहू महाराजांच्या आणि गाडगेबाबांच्या समाजाने हे समजावून घ्यावे की, शाहू महाराज आणि गाडगेमहाराज यांचाही इथल्या परंपरांनी छळच केला आहे हे इतिहासात नमूद आहे. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा प्रसंग तर एक जखम म्हणूनच इतिहासाने गळ्यात माळला आहे. आणि छत्रपती शाहू महाराजांच्या बंडखोरपणामुळे उद्भवलेला वेदोक्त की पुराणोक्त हा कालपरवाच निर्माण झालेला वाद आपल्या समाजातील शोषण-व्यवस्थेचे विषारी वाक्य अधोरेखित करून गेला आहे. शिवाजी महाराजांचा, शाहू महाराजांचा, फुल्यांचा, गाडगेबाबांचा समाज हे सर्वच इतक्या लवकर कसा काय विसरून गेला ? बाबासाहेब आंबेडकर यांचा शब्दही वरील मान्यवरांच्या परंपरेतलाच शब्द आहे. याचा विचार वरील सर्वच लोकांनी करायचा आहे. काल आपण काय होतो त्याचे चित्र डोळ्यापुढे आणावे आणि आजचे आपले असणे हे लोकहितवादी फुले, आगरकर इत्यादी सुधारकांच्यामुळे शक्य झाले आहे, त्या त्या काळात प्रतिगाम्यांनी आपल्यासाठी झटणाऱ्या सुधारकांचा छळ केला आहे. आपण या सुधारकांचे कृतज्ञ असले पाहिजे. आणि आंबेडकरही आपल्या मुक्तीचेच महाद्वार उघडून देत आहेत, हे शांतपणे आपल्या भगिनीसमाजानेही लक्षात घेण्याची गरज आहे. या ना त्या संदर्भात इतिहासाच्या या ना त्या टप्प्यावर आपल्या

समाजात जे जे नाडले गेले त्या सर्वांनी लक्षात घ्यायचे आहे की आंबेडकर त्यांच्या मुक्तीचेच अभियान आपल्या शब्दांमधून खोदीत आहेत. त्यांच्या मनावर चुकीने असे बिंबवले जाते आहे की, आंबेडकर त्यांचे शत्रू आहेत पण आपल्या दृश्यादृश्य शोषणाकडे डोळेझाक करणारांनी समजावून घ्यावे की आंबेडकर त्यांच्या सूर्योदयाचा शब्दच उच्चारीत आहे. आंबेडकर त्यांच्या उत्थानाचे विश्वासार्ह सांगाती आहेत. त्यांचे जीवलग मित्र आहेत. फुल्यांचे वैचारिक आंदोलन लक्षात घ्यावे म्हणजे इतिहासातही आपण कोण होतो, कसे होतो आणि आजही आपण कोण आहोत आणि कसे आहोत हे ओळखण्याची गुरुकिल्ली त्यांना लाभेल. शोषितांना आपले शोषण होत आले आहे हे कळत नसेल, तर त्यांच्या उरावरील पहाड दूर करू पाहणारा हात त्यांना शत्रूसारखा वाटत असतो. आणि आंबेडकर या शोषितांना त्यांचे शोषण कसे झाले ते समजावून सांगत आहेत. शिवाजीच्या, फुल्यांच्या, शाहू महाराजांच्या, गाडगेबाबांच्या समाजांना आणि भटक्या आदिवासींना शंबुक आणि एकलव्य यांची व्यथा आपली व्यथा का वाटत नाही ? त्यांच्यावर झालेला अन्याय आपल्यावर झालेला अन्याय का वाटत नाही ? आणि डॉ. आंबेडकरांनी जर हे सांगितले तर हे खरेच आहे, हे सांगणे आपल्याला अस्मितादायक आहे असे या सर्वांना का वाटत नाही ? आंबेडकर आपल्याला आपल्यावरील अन्याय ओळखायला शिका हा युगमंत्र देत आहेत. तो युगमंत्र या समाजातील अन्यायग्रस्त जर नाकारीत असतील तर त्याचा अर्थ काय ? तेव्हा हिंदू समाजातील बंधू–भगिनींनी डॉ. आंबेडकरांचे म्हणणे शांतपणे लक्षात घ्यावे. त्यांचा राष्ट्रवर्धक हेतू लक्षात घ्यावा. मनुष्यतावर्धक प्रयोजन लक्षात घ्यावे आणि आंबेडकरांचा शब्द हा विघातक शब्द नाही तो उद्धारक शब्द आहे हे मनोमन पटवून घ्यावे.

१६–११–८७ रोजी कुठल्या का होईना दबावाखाली येऊन शासनाने ' रामा–कृष्णा ' संबंधीचे परिशिष्ट वगळण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय फेरविचाराला घेण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. महाराष्ट्र शासनाने आता हे परिशिष्ट आहे तसेच ठेवण्याचा निर्णय घ्यावा. ते आंबेडकरांचे लेखन आहे. विश्वविख्यात महापंडिताचे ते लेखन आहे. ते एका अनन्य साधारण प्रज्ञापुरुषाचे लेखन आहे. या देशाच्या घटनाकाराचे आणि या देशातील तत्त्वज्ञानपरंपरेतील युगपुरुषाचे ते लेखन आहे. बाबासाहेबांचा शब्द या देशातील शब्दप्रपंचातला जतन करावा असा शब्द आहे. आंबेडकरांचा हा शब्द तो आहे त्या रूपात पुढल्या सर्व पिढ्यांकडे पोचता करणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. हे शासन या कार्यामुळे इतिहासात गौरवान्वित होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. शंकररावजी

चव्हाण आणि इतरही मंत्री महोदयांनी या शासनाच्या आणि आपल्या समाजाच्या पाठीशी लोकहितवादी, फुले, शाहू, आगरकर, आंबेडकर या प्रबोधनकारांची प्रेरणाशाली दीपमाळ उभी आहे. आपले शासन या प्रबोधनाच्या प्रकाशनाकडे आपली पाठ फिरवणार नाही याची काळजी मुख्यमंत्र्यांनी घ्यायची आहे. परंपरावाद्यांच्या मागण्या या नेहमीच प्रबोधनाचे पाय कापण्याचे काम करीत असतात. मागल्या शतकातल्या प्रतिगाम्यांनी ज्याचा छळवाद केला तो आपल्या प्रबोधनाचा इतिहास डोळ्यासमोर ठेवावा. शासनाने हेही लक्षात असू द्यावे की, परंपरावाद्यांचा मान राखून कोणतीच सुधारणा व्हायची नाही. परंपरावाद्यांच्या ओंजळीने पाणी पिऊन समाज फक्त एकाच ठिकाणी गाडला जाऊ शकतो. विधवा-विवाहाचा कायदा, सतीबंदीचा कायदा, बालविवाहबंदीचा कायदा, अस्पृश्यता निर्मूलनाचा कायदा हे सगळेच कायदे परंपरावाद्यांच्या भावना जपून कधीच करता येत नसतात. तेव्हा शासनाने आपल्या धर्मचिकित्सा करणाऱ्या लोकहितवादींचे, फुले, आगरकर आणि आंबेडकरांचे ऐकावे की प्रवाहपतित आणि स्थितिशील अशा लोकांचे ऐकावे. विचारस्वातंत्र्याचा ध्वज आंबेडकरांच्या निमित्ताने निर्माण झालेल्या या संघर्षात खाली पडता कामा नये. इतर कुणाहीपेक्षा तो शासनाला स्वतःचा अपमान वाटला पाहिजे. आंबेडकर ही या राष्ट्राची दौलत आहे. या देशातल्या कुणा एकाची ती मक्तेदारी नव्हे. आंबेडकर आपल्या समाजाच्या उज्ज्वल भवितव्याचे शिल्पकार आहेत. शासनाच्या परीक्षेची ही वेळ आहे. शासनाची दिशा काय ? शासनाचा ध्यास काय किंवा शासनाची घटना काय ? या प्रश्नांची उत्तरे निश्चित होण्याची ही वेळ आहे. बाबासाहेबांचे ते परिशिष्ट वगळले गेले तर या देशात एका अंधार युगाला प्रारंभ होईल. विचार-समीक्षेचा काळ अस्ताला जाईल. नव्या विचारांचा आणि बंडखोर चिंतनाचा द्वेष करण्याला पाठबळ मिळेल. महाराष्ट्र शासन बंडखोर विचारवंतांचा गौरव करणारे शासन आहे. यावेळी शासनाने आंबेडकरांच्या बाजूने उभे राहावे नि स्वतःला प्रकाशमान करून घ्यावे. यावेळी ब्राह्मणांपासून भटक्या-विमुक्तांपर्यंतच्या आपल्या समाजातील सर्व पुरोगाम्यांनी एकत्र येऊन शासनाचे हात बळकट करावे. गतिवादाचा पक्ष घ्यावा. परिवर्तनाला अभय द्यावे. आंबेडकर या देशातील सूर्यकुलाचे महान विचारवंत आहेत. तेव्हा आपल्या समाजातील सर्व प्रकाशपूजकांनी अर्थात सूर्यकुलाच्या सर्व सभासदांनी एकत्र येऊन विचारस्वातंत्र्याचे पावित्र्य राखावे. प्रबोधनाची बेअब्रू होऊ देऊ नये. हा संघर्ष जातींमधला नाही. दोन्ही प्रवृत्तींमधला आहे. पुरोगामी आणि प्रतिगामी किंवा परंपरावादी आणि परि-

वर्तनवादी या दोन प्रवृत्तींमधला हा लढा आहे. छत्रपती शिवाजींपासून फुले, आगरकर, शाहू, आंबेडकरांपर्यंतचे आपले सर्व आदर्श परिवर्तनवादी होते हे लक्षात घ्यावे आणि प्रतिगामी आणि पुरोगामी यांच्यातील या संघर्षात आपण पुरोगामी प्रवृत्तीची बाजू सबळ करावी. १५ जानेवारी ८७ पर्यंत शासन राम आणि कृष्ण या परिशिष्टासंबंधी शासनाने ते परिशिष्ट आहे तसेच ठेवण्याचा निर्णय घ्यावा. आणि विचारस्वातंत्र्याचा व प्रबोधनाचा महोत्सव करावा. आपण प्रकाशपूजक आहोत हेच सिद्ध करावे. हीच आपल्या राष्ट्रसौंदर्याची आराधना ठरेल.*

□ □

* पुढे हे परिशिष्ट वगळायचे नाही असा अभिनंदनार्ह निर्णय शासनाने घेतला.

# आपल्या शिक्षणाची दिशा

मित्रांनो, शिक्षण म्हणजे काय ? तर माणसाच्या अंत:शक्तीचा अर्थपूर्ण मानवत्वाच्या दिशेने विकास घडवून आणण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण. कोणते संस्कार अनर्थपूर्ण व कोणते अर्थपूर्ण ते शिक्षण शिकविते. पुनरावृत्तीवर अंधपणे विश्वास ठेवणे हे स्वत:ला नष्ट करण्याइतके विघातक असते हे शिक्षण सांगते. विचाराच्या जिवंत प्रक्रियेत सहभागी होणे ह्यातच जीवनाच्या निर्माणाचे मर्म दडलेले आहे हे मनावर ठसविणे ही शिक्षणाची कर्मप्रतिज्ञा असते. भौतिक आणि नैतिक या दोन्ही दृष्टींनी व्यक्तीचा व समाजाचा विकास हेच खऱ्या शिक्षणाचे ध्येय असते. Development of character or mental power असा शिक्षण या शब्दाचा जो अर्थ सांगितला जातो त्यातूनही हा व्यक्तित्वनिर्माणाचा आशयच ध्वनित होतो.

शिक्षण ही याप्रकारे मानवी व्यक्तित्वाला प्रकाशमान करणारी, व्यक्ती-मधील "इनर सन"ला अभिव्यक्त करणारी साधना आहे. ती प्रत्येकच व्यक्तीच्या लेखी स्वत:चे खरे निर्माण वा स्वत:चे नवनिर्माण करण्याची प्रक्रिया आहे. यामुळेच जीवन अर्थपूर्ण करण्याचा मानवाच्या आजवरच्या धडपडीचा इतिहास व्यक्तीपुढे खाचाखळग्यांसहित अंथरणे आणि व्यक्तीला अधिक उन्नत पातळीवरून जगण्याच्या प्रेरणांनी उत्तेजित करणे हे कार्य शिक्षणाचे जन्मकार्य असते. जीवन अर्थपूर्ण करण्याच्या प्रक्रियेतील असलेले आणि शक्य असलेले धोकेही लक्षात आणून देण्याचे कार्य शिक्षण करीत असते. एका इंग्रजी लेखकाने म्हटल्या-प्रमाणे– "जे राष्ट्र आपल्या भूतकाळाला विसरते त्या राष्ट्राला आपल्या भूतकालीन चुकांची पुनरावृत्ती करण्याचे प्रायश्चित्त भोगावे लागते." त्यामुळेच या प्रायश्चित्तापासून माणसाला वाचविण्याचा पैजेचा विडा शिक्षणाला उचलावा लागतो. मानवी इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर शिक्षणाला यासाठी नवनव्या आशयसौंदर्याने अन्वर्थक करून घ्यावे लागते. असे होते तेव्हाच 'शिक्षण म्हणजे सुसंस्कार' या व्याख्येने शिक्षणाला विभूषित होता येते. तेव्हा व्यक्तित्व-निर्माणाच्या आणि अर्थपूर्ण मनुष्यत्व प्रकाशित करण्याच्या प्रक्रियेत सहभागी झालेला जीव म्हणजे मनुष्य आणि ही प्रक्रिया त्याला अधिक सुकर करण्यासाठी मार्गदर्शन करणारी शक्ती म्हणजे शिक्षण होय.

खरे तर मनुष्यत्व ही बाब आपल्याला आपोआप मिळणारी बाब नसते. ती मिळवावी लागणारी बाब असते. अर्जित असते. म्हणजेही मूळात आपण सारे पशूच असतो. मनुष्यत्व हे आपण कष्टांनी व प्रयत्नांनी साध्य केलेले उन्नयन असते. मृत्यु, नैसर्गिक आपत्तीची निघृण विलसिते वा अंतराळाची विराटता लक्षात घेता आपण आणि मुंगी, आपण आणि असेच लक्षावधी क्षुद्र जीवमात्र यात तफावत नाही. आपल्या पायाखाली जशी मुंगी चिरडली जाते तितक्याच सहज सदयता-निर्दयताविहीन बेमुर्वतखोरपणे आपणही एखाद्या संकटाच्या निरुद्देश टाचेखाली चिरडले जात असतो या पातळीवर आपणही इतर जीवमात्रांइतकेच निरर्थक आणि यःकश्चित असतो. मनुष्यत्व संपादनाची वा मानवत्वाच्या सिद्धीची प्रक्रिया वजा केली तर इतर पशूपक्षांत व आपणात काहीही फरक नसतो. मनुष्यत्व संपादनाची, वा मानवत्वाची सर्जना हा आपल्याला इतरांपासून वेगळे करणारा आपला विशेष आहे, त्यामुळेच इतर पशूमध्ये आपण वेगळे आणि सभ्यतासर्जक पशू ठरतो. पशूत्वाची कोटी ओलांडून मनुष्यत्वाची कर्तृत्वशिल्पे खोदणारे मानव आपण ठरतो. हा आपला विशेषपणा मानवाने हजारो वर्षात अधिकाधिक अर्थपूर्ण करीत आणलेला आहे. याप्रकारे या मानवी जीवनाच्या अर्थपूर्णत्वाच्या साखळीचा आपणही एक दुवा असतो. एक कडी असतो. हे नातेच आपल्यावर काही जबाबदाऱ्या टाकते आणि मागिलांनी हा प्रवास जिथवर आणला तिथून पुढे त्याला नेण्याचे आवाहनही आपल्याला मनुष्य म्हणून टाळता येत नसते.

मानवी जीवनाचा पट कोट्यवधी वर्षांचा आहे. या पटसंदर्भात आपले अस्तित्व परमअणूहूनही लहान आहे. कोट्यवधी पिढ्यांनी आजवरच्या जीवनाचे हे वैचित्र्यपूर्ण सुखःदुखात्मक आणि लोभसवाणे सणंग विणलेले आहे. येथे पुढेही अशाच कोट्यवधी पिढ्या येतील. अनंत अनंत जीवने प्रकाशतील. येथे अब्जावधी जीवने फुलतात कोमेजतात. ही सर्वच प्रक्रिया मोठी अचाट आहे. आपले हे इवलेसे जगणे या अथांग अंतराळाच्या संदर्भात आणि ज्ञात–अज्ञात मानवी जीवनेतिहासाच्या संदर्भात अत्यंत यःकश्चित असे जगणे आहे. आपण ज्या मानवी समाजाचा भाग म्हणून जन्माला आलो तो मानव वरील सर्व बाबी खऱ्या मानल्या तरी मोठा बहाद्दर आहे. यःकश्चित मनुष्य एरवी निरर्थक असलेल्या जीवनाला अर्थवत्ता बहाल करतो. स्वतःची अस्फुट ऊर्जा फुलवितो. पणाला लावतो. या ऊर्जेचा थक्क करणारा पिसारा अनंत पातळ्यांवर फुलवितो. या ऊर्जेला असंख्य अंगांनी सक्षम आणि संपन्न करणे हेच तर माणसाचे पर्यायाने तुमचे आणि माझे सर्वांत महत्वाचे वैशिष्ट्य आहे. हे वैशिष्ट्य अधिकाधिक समृद्ध आणि अनेक आयामी

करण्याची प्रक्रिया ज्यामुळे सुकर होते त्या नवनवोन्मेषशालीनी शक्तीचे नाव शिक्षण असे आहे.

मानव म्हणून आपण आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वशाली खांद्यांवर उभे असतो. आपण अनायास भोगतो ती संपन्नस्थिती आपण कमाविली नाही. आपल्या वाटयाला आलेल्या जीवनावस्थेच्या या घडणीत मागील हजारो पिढ्यांचे हात सहभागी झाले आहेत. हजारो पिढ्यांची बुद्धी या उभारणीत सहभागी झाली आहे. हजारो प्रयत्न यासाठी झटले आहेत. आपण ही सुंदर भाषा बोलतो, कपडे घालतो, कुठल्या तरी घरात राहतो. विशिष्ट पद्धतीने आणि पातळीवरून विचार करतो. अशी नानापातळ्यांवरची भौतिक सुखसाधने उपभोगतो. पण यातले काहीही तुम्ही आम्ही निर्माण केलेले नाही. ज्यांनी ते निर्माण केले ते आपल्या एवंगुणविशिष्ट वर्तमानाचे घटनाकार लाखो, हजारो व शेकडो वर्षांच्या पडद्याआड अंतर्धान पावले आहेत. कुठलीही अपेक्षा न करता ही सर्व साधनसामग्री आपल्या-साठी निर्माण करून जाणाऱ्या बुद्धिमान माणसांचे वारस आपण आहोत. त्यांचे असे वारस असण्यातही आपल्याला केवढा तरी गौरव सहजच प्राप्त होऊन जातो. पण हे वारसपण आपल्यावर एक जबाबदारीही टाकते. आजवरच्या आपल्या पूर्वजांनी विकसित केलेल्या सभ्यतेला अधिक पुढे नेऊन विकसित करणे ही ती जबाबदारी होय. या आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेला भौतिक जीवनाचा व नैतिक जीवनाचा पसारा आहे तसा केवळ जपणे एवढीच ती जबाबदारी नाही तर वरील द्विविध पसारा पुढीलांसाठी अधिक विकसित करणे, त्याच्या ऊर्जेचे आणखी काही नवे प्रांत उद्‌घाटित करणे असे त्या जबाबदारीचे स्वरूप आहे. कोणत्याही पिढीच्या माणसापुढे आपल्या पूर्वजांचे वारस सिद्ध होण्याचा किंवा किंवा त्यांच्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एकमेव मार्ग असतो. हा मार्ग त्यामुळे आपल्याला कळतो ज्यामुळे आपले वारसपण अधिक संपन्न करण्याची शक्ती आपणास लाभते, त्या घटनेला शिक्षण असे म्हणतात.

भारतातील शिक्षणप्रणालीचे स्वरूप निश्चित करण्याआधी भारताला कुठे जायचे आहे आणि कुठल्या परिस्थितीतून जायचे आहे या प्रश्नांचा विचार होणे आवश्यक आहे. म्हणजे एक राष्ट्र म्हणून भारताचे येथील मनुष्यांसंबंधी काही विशिष्ट स्वप्न असावे काय ? ते स्वप्न कसे असावे ? त्या स्वप्नाप्रत भारताला जायचे असेल तर त्याच्या मार्गात येणाऱ्या अडचणी कोणत्या ? त्यांचा निरास कसा करायचा ? या प्रश्नांचा विचार करणे अटळ आहे.

शिक्षण हा मानवी विकासाचा बीजमंत्र आहे. मानवी मनाच्या अधिक अर्थपूर्ण आणि बलशाली धडपडीतून मानवी जीवनाचा विकास होतो. शिक्षणाने मानवी जीवनाची अंगोपांगे सौंदर्याने आणि सामर्थ्याने झगमगून उठायला हवीत. मानवाची प्रज्ञा आणि प्रतिभा नवनव्या क्षितिजांचा वेध घेण्याच्या बलवत्तर व मृत्युंजय प्रेरणांनी झळाळून उठायला हवी. याचे भान शिक्षणप्रणालीला नसेल तर ती शिक्षणप्रणाली स्वतःच पांगळी आहे असे नव्हे तर ती केवळ पांगळ्या पिढ्यांची आणि पांगळ्या शतकांचीही पैदास करू शकते हे खात्रीने समजावे.

भारतीय समाजाच्या संदर्भात बोलायचे झाले तर भारतीय मनाला त्याचे पंख आणि भवितव्याच्या कांक्षा कापून टाकणाऱ्या स्थितिशील परंपरांपासून मुक्त केले पाहिजे. हे मन बंधमुक्त झाले पाहिजे. परंपरेच्या जोखडाखालून त्याला सोडवले पाहिजे. त्याची माणुसकी व मानवी कर्तृत्व यांचा संकोच करणाऱ्या दळभद्री संस्कार-छावण्यांपासून त्याला तातडीने तोडले पाहिजे.

भारतीय विद्यार्थ्यांचे मन ही वाच एक ज्वलंत विचारप्रक्रिया झाली पाहिजे. आहे त्या चौकटीत आपल्या मेंदूची आहुती देणे, मागे जायची प्रेरणा देणारा मागासलेला शब्द पाठ करणे, थकलेल्या मागच्या पिढ्यांनी समाजाला पांगळे करणाऱ्या मंत्रांचे गाठोडे जिथे टाकले तिथून पुढे पुढील पिढ्यांनी ते वाहून नेणे असे आजच्या शिक्षणप्रणालीचे स्वरूप आहे. त्यामुळे भारतीय मनाला सतत विकासविन्मुख राहावे लागत आहे.

अभ्यास-क्रमात आपले प्रबोधन नायकपदी असावे. आपल्या प्रबोधनाचा ध्येयवाद, भारतीय घटनाकाराच्या समाजस्वप्नाचा ध्येयवाद आपल्या शिक्षणातून साकार व्हावा. आज क्वचित अभ्यासक्रमात प्रबोधनवादी लेखनाचा अंतर्भाव केला जातो. पण आपला जुन्यात रुतलेला शिक्षक या अल्पस्वल्प प्रबोधननिष्ठ अंगाचे वाटोळे करून टाकतो. प्रचलित समाजव्यवस्थेची पायाभूत जन्मजात उच्चनीचतेची कल्पना हीच समूळ उखडून टाकली पाहिजे. कनिष्ठ वर्ग हे विचारसंपन्न नसल्यामुळे त्यांनी ह्या मानसिक गुलामगिरीच्या दावणीत आपली मान अडकविली. अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रकाश. शिक्षण हे सर्व सुधारणेचे मूळ आहे. कनिष्ठ वर्गातील लोकांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार केला तर समतेच्या कल्पनेने कनिष्ठ वर्गातील लोक सामाजिक समतेसाठी बंड करून उठतील. ही शिक्षण या शक्तीविषयी फुल्यांची भूमिका होती. चांगली आणि वाईट गोष्ट कोणती, हितकारक आणि अहितकारक काय ते

सांगणारे शिक्षण लोकांना दिले गेले पाहिजे. हक्कांसाठी लढण्यासाठी त्यांची मने जागली पाहिजेत. यासाठी शेतकरी वर्गातील शिक्षक नेमावेत. प्रचलित माध्यमिक शिक्षण सर्वसामान्यांच्या जीवनदृष्टीने अव्यवहार्य व अयोग्य आहे. कारकून आणि शिक्षक निर्माण करणे एवढाच त्याचा उपयोग आहे. विद्यार्थ्यांना भावी जीवनात स्वतंत्र व समर्थ करील असे शिक्षण असावे असे ज्योतिराव फुले या क्रांतिकारक तत्त्वज्ञाचे म्हणणे होते.

लोकहितवादी यांना भौतिक सामर्थ्याची जोड करून देणाऱ्या शिक्षणाची तहान लागलेली होती. आपल्या माणसांनी आपल्यातील अज्ञान, जातीभेद स्त्री-पुरुष विषमता नष्ट होण्यासाठी नवीन ग्रंथ लिहिले पाहिजे. असे ग्रंथ लिहिण्यासाठी मनुष्य निर्भय असावा लागतो. विचारशून्यता चांगली नव्हे असे लोकहितवादी सांगतात. आपल्या शिक्षकांना लोकहितवादींचा हा संदेश विसरून शिक्षकपणावर हक्क सांगता यायचा नाही.

बाबासाहेब आंबेडकरांना तर सत्याचा शोध व मानवतेची निर्मिती ही शिक्षणाची उद्दिष्टे वाटतात. शिक्षक अभ्यासू व संशोधक असावा. त्याने विद्यार्थ्यांमधील अंतःशक्ती फुलवाव्या. विद्यार्थ्यांनी नवी जीवनमूल्ये अंगिकारावी. त्या मूल्यांसाठी, यातून सूचित होणाऱ्या ध्येयासाठी त्यांनी जगावे. विद्यापीठ म्हणजे ज्ञानगृह होय ते कारकून तयार करण्याचे केंद्र नव्हे. ज्ञान हेच परमपवित्र होय असे वाटते. 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा ' या क्रांतिप्रक्रियेतील पहिली पायरी म्हणून त्यांनी शिक्षण मानले आहे. लोकहितवादी, ज्योतिबा फुले व डॉ. आंबेडकरांनी असा विकासोन्मुख शिक्षणाचा आग्रही पुरस्कार केला. तळागाळाला आपल्या हक्कांची जाणीव व्हावी. त्यासाठी त्यांना प्रश्न विचारण्याची शक्ती लाभावी आणि मानवी हक्क मिळविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण व्हावे हा ध्येयवाद आपल्या प्रबोधनकारांनी मांडला. परंतु हा ध्येयवाद आजवरचा शिक्षक मुख्यत्वे पारंपरिक पठडीचा वाहता, पुरस्कर्ता आणि संरक्षण असल्याने प्रत्यक्षात उतरवू शकला नाही.

आपल्या समाजाचा शिक्षणाच्यादृष्टीने इतिहास बघितला तर ब्रह्मानंदी टाळी लागावी अशीच घृणास्पद परिस्थिती आहे. प्राचीन भारतातले शिक्षण कुठलाही पशू वागणार नाही याप्रकारे इथल्या खालच्या थरातील लोकांशी वागले आहे. सर्व ब्राह्मणेतर शिक्षणापासून वंचित होते. त्या शिक्षणाला त्यामुळे शिक्षण ही संज्ञाच लावता येत नाही. अर्थ न कळून जुने शब्द पाठ करणे याला शिक्षण

म्हणण्यासाठी हिंमत कुठून आणायची ? परत अर्थ लक्षात घेऊनही शब्द पाठ केले तरी ते सुद्धा काही कमी निरर्थक नव्हते.

इहवादाचा द्वेष, भौतिकवादाचा तिरस्कार, प्रवृत्तीचा राग, मानवी संसाराचा आणि त्याच्या कर्तृत्वाच्या विकासाचा उपमर्द आपल्या समाजात प्राचीन काळी मुख्यत्वे झालेला दिसतो. याला कारण अध्यात्म. अध्यात्माने या समाजाची जाणिवच बधीर केली. येथील सामाजिक व आर्थिक विषमतेला वर्ण-व्यवस्थेने चिरंजीव केले आणि वर्णव्यवस्थेला अध्यात्माने पावित्र्याचे आशिर्वाद दिले. परिणामत: येथील बहुसंख्य माणसांचे माणूस म्हणून जगणे मरण पावले त्याची सृजनशक्ती जळून गेली. आणि शतकाशतकात या बहुसंख्यांकांचे साकार झाले ते मनुष्यत्वाला लाजेने खाली मान घालायला लावणारे पशुत्व. या पशुत्वाच्या सिद्धीसाठी प्रस्थापिताने सर्व कडांसहित ईश्वर वापरून घेतला. वर्ण-व्यवस्था ईश्वरमुखातून सांगितली गेली. कर्म–विपाकाच्या सिद्धान्ताच्या आकृती–आशयबंधातून सांगितली गेली. येथील बहुसंख्य सामान्य माणसांच्या शोषणाचे पुढे हजारो वर्षे बाधा येणार नाही असे हत्यार येथील उच्चवर्णाला मिळाले. आणि त्यामुळे त्याला पुढे सर्जनाची गरज उरली नाही. या प्रकारे वर्णव्यवस्थेच्या जहराने येथील सामान्यांचीच सर्जनशीलता मारली नाही तर त्याने प्रस्थापिताची सर्जनशीलताही मारली आणि ज्याक्षणी मानवाची सर्जनशीलता मरते त्या क्षणा-पासून त्याचे माणूस म्हणून जगणेही संपून जाते.

हजारो वर्षांच्या या परिस्थितीमुळे या समाजाला काही दुर्धर आजार जडलेले आहेत. अज्ञान, अंधश्रद्धा, लाचारी, दारिद्र्य, सहनशीलता, वर्ण आणि जाती, दैव आणि दैववाद आणि या सर्वांची पूजा करणारी अत्यंत भयावह परंपरावादी वृत्ती हे ते आजार होत. आपल्या समाजाचे प्रश्न, अगदी आजचे आपले जगणे हैराण करणारे प्रश्न आपल्या अध्यात्मवादी परंपरेने निर्माण केलेले आहेत हे आपण शांतपणे लक्षात घेण्याची गरज आहे. या अध्यात्माने येथील माणसाला दुभंगवून टाकले आहे. हा माणूस सतत दोन जगात विभागलेला आणि अंतरंगाच्या चिंध्या झालेला असाच दिसतो. तो सर्व आधुनिक सोयींचाही भोक्ता आहे आणि परंपरेतील जात–दैव–देव अशा विषारी कल्पनांचाही भक्त आहे.

आजचा शिक्षक असाच आहे. त्याचे मन मंदिरात आणि चित्त संसारात आहे. विद्याव्यासंग हे शिक्षकाचे जीवन व्हायला हवे. परिवर्तनाचा तो वाचस्पती असायला हवा पण कोणताही विषय शिकवीत असो तो फक्त मनुस्मृतीच शिक-वीत असतो अशी स्थिती आहे.

आपला समाज बदलत नाही. झपाट्याने क्षितिजांतर करीत नाही. मूल्यांतर करीत नाही याचे कारण येथील शिक्षक होय. शिक्षकाने कसे सर्वथा सतत वाहते असायला हवे. परिवर्तन, जागृती, नवसर्जन, नवनव्या प्रेरणांनी फुलणारे झाड, एक कायम जिवंतता हे शिक्षकाचे वर्णन आहे. शिक्षक म्हणजे दर नव्या पिढीला नव्या युगाची दीक्षा देणारा जागर आहे. परिवर्तनशाली जाणिवांनी कोसळणारा युगंधर पाऊस तो आहे. शिक्षक हे विद्रोहाचे, प्रबोधनाचे आणि क्रांतीचे नाव आहे. शिक्षण हे एका पिढ्या घडवणाऱ्या महाशक्तीचे व चिकित्सकपणाचे रान उठवत निघालेल्या वादळाचे नाव आहे. असे म्हटले जाते की " कनिष्ठ दर्जाचा शिक्षक कथन करतो व बहुतेक शिक्षकांचा कथनाकडे कल असतो, चांगला शिक्षक स्पष्टीकरण करतो, उत्तम शिक्षक दिग्दर्शन करतो आणि असामान्य शिक्षक प्रेरणा देतो." मोठे सुंदर वचन आहे हे. आपल्या शिक्षकांनी या वचनाचा गंभीरपणे विचार करावा असेच हे वचन आहे. आपला शिक्षक ही अत्यंत क्रांतिविन्मुख अशी घटना आहे. एक तृप्ती, एक आळस, एक सुस्ती, एक भयानक समाधान असे या शिक्षकाचे स्वरूप आहे. वरील वचनांच्या संदर्भात आपल्याकडील शिक्षकांची लायकी मोजून पाहावी. म्हणजे आपली शिक्षण–प्रणाली कोणत्या शिक्षकांना पोसते आणि समाजपरिवर्तन मारण्याची प्रक्रिया कशी जारी ठेवते ते आपल्या लक्षात येईल. आपल्याकडे जोतिराव फुले शिक्षकांचे आदर्श ठरू शकतात. त्यांचे शैक्षणिक विचार तर क्रांतीचे मूलमंत्र आहेत. आगरकर, लोकहितवादी, डॉ. आंबेडकर, प्रा. गं. बा. सरदार ही आपली प्रबोधनकार मंडळी आपल्या आजउद्याच्या शिक्षकांचे आदर्श असायला हवीत.

एक जातीवर्गविहीन व समता, स्वातंत्र्य, बंधुतायुक्त भौतिकविकासाची श्रीमंती लाभलेला, बुद्धिवादी असा समाज आणि सुंदर व संपन्न भारत आजच्या रक्तबंबाळ परिस्थितीतून आपणास घडवायचा आहे. आपल्या प्रबोधनकारांच्या स्वप्नातील भारत आपणाला या मातीवर उभा करायचा आहे. त्यासाठी जुने संस्कार बदलणारे आणि लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर परत परत जन्माला घालणारे शिक्षण आपणाला हवे आहे. त्यातून नव्या भारताचा नवा चिकित्सक विद्यार्थी, नवे राष्ट्रीय चारित्र्य साकार करणारा विद्यार्थी घडेल.

व्यावसायिक शिक्षणाची आपल्याला नितांत गरज आहे. पण आपल्या समाजातील दुर्बल घटकांना समान संधी नव्हे तर विशेष संधी लाभण्याचीही गरज आहे. सर्व आधुनिक तंत्रज्ञाने, संशोधने आपल्या समाजाने मुक्त मनाने अंगीकारायला हवीत. नव्या ऊर्मीशी अठराव्या, एकोणिसाव्या शतकातील प्रति-

गामी समाजाप्रमाणे वागू नये. शिक्षक, प्राध्यापक नेमताना त्याची वैचारिक दिशा, त्याचे संस्कार, त्याच्या मनाची ठेवण या बाबी दुर्लक्षू नयेत. अन्यथा परंपरावादाशिवाय, अध्यात्माशिवाय कोणताही विषय शिकवताना वेगळे काहीच शिकवले जात नाही. म्हणून विद्यापीठांना 'प्रेतांचे कारखाने' असे म्हटले जाते.

अलिकडच्या काळात शिक्षणासंबंधी बरीच चर्चा होताना दिसते. पण या चर्चेत ग्रामीण भाग आणि इतर तळागाळाचा समाज यांना मिळावे त्या प्रमाणात प्राधान्य मिळत नाही. या भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने विशेष संधी उपलब्ध करून द्यायला हवी.

आजच्या समाजाच्या सर्व क्षेत्रांमधील भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा, अनीती, उथळपणा आणि, अर्थधार्जिणीवृत्ती यांचे हवाले देऊन नैतिक शिक्षणाचा तोडगा मोठ्या हुशारीने सुचवला जातो. नैतिक शिक्षण म्हणजे अर्थातच आध्यात्मिक शिक्षण असे स्पष्टपणे म्हटलेही जाते. यात धार्मिक प्रार्थना, आरत्या, मेडिटेशन अशा मार्गांनी मुख्यत्वे धर्माच्या पुनरुज्जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले जाते. या राष्ट्राचे नाव भारत हे आहे. इथे अनेक धर्मांचे लोक राहतात. या सर्व धर्मांच्या मंडळींना बुद्धिप्रामाण्यवादाकडे, उज्ज्वल भवितव्याकडे न्यायचे आहे. आधुनिकत्वाचा जागर त्यांच्यात निर्माण करावयाचा आहे. एका सुंदर व संपन्न उज्ज्वल अशा भारताकडे त्यांना न्यायचे आहे. या संदर्भात भारतीय संविधानाने सांगितलेली राज्यधोरणाची निदेशक तत्त्वे आपल्या शिक्षणाचा ध्येयवाद असायला हवीत. या तत्त्वांनाच आपल्या शिक्षणाने धर्म मानायला हवे, आणि शिक्षणाने या धर्मांचेच शिक्षण द्यायला हवे. या धर्मांचेच संस्कार लोकांच्या मनावर करायला हवे हा संविधानप्रणित धर्म असा आहे :–

"ज्या समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था, होईल तितक्या परिणामकारक रीतीने प्राप्त करून देऊन व तिचे संरक्षण करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील." ३८ (१) आणि "विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे" ५१ (ज).

या दोन कलमांमध्ये अर्थात निदेशक तत्त्वांमध्ये सांगितलेला जीवनधर्म हा भारतीय संविधानाचा प्राण आहे. तो त्याचा ध्येयवाद आहे. या देशाच्या सौंदर्यसिद्धीचे ते तत्त्वज्ञान आहे. भारतीय संविधानाने भारतीय समाजापुढे हा जीवनधर्म उभा केलेला आहे. आपल्या शिक्षणाचाही हाच धर्म असला पाहिजे. शिक्षणाने

जीवनातील निरर्थकता आणि अनर्थकता अधोरेखित करून शिक्षणाने अर्थपूर्ण जगण्याच्या वाटा समाजापुढे अंथरल्या पाहिजे. भारतीय संविधानाने सांगितलेला जीवनधर्म शिक्षणाने घरोघरी पोचवला पाहिजे. या प्रक्रियेद्वाराच शिक्षण नवा भारत व नवा मानव घडवू शकेल.

त्यामुळेच नैतिक शिक्षणाचा संबंध कोणत्या का होईना धर्माशी लावणे उचित नाही. कोणत्याही धर्माच्या आश्रयाला न जाताही उद्याचा नवा भारत घडविण्यासाठी आपल्याला नैतिक शिक्षण देता आले पाहिजे. विकासोद्भव असा आधुनिक इह–भौतिकवादी व तंत्रज्ञानसमृद्ध भारत घडवायचा असेल तर यापुढच्या काळात शिक्षण आणि अध्यात्म, शिक्षण आणि देवदैववाद, शिक्षण आणि नियतीवाद, शिक्षण आणि वरील सर्व बाबी शिकविणारा धर्म यांचा संबंध आपणाला तोडावा लागेल. वरील सर्व बाबींशी संबंध तोडूनही आपणाला उद्याच्या नव्या-निराळ्या भारतासाठी नीतिशिक्षण देता आले पाहिजे. ज्याकाळात अध्यात्म प्रबळ होते, देवदैववाद मुक्तीभक्तीचा गजर चालत होता ते काळ मोठे आदर्श होते या म्हणण्यात अर्थ नाही. त्या काळात हे सर्व मानूनही भ्रष्टाचार, बनवाबनवी, शोषण नव्हते असे म्हणता येत नाही. एवढेच नव्हे तर वरील सर्व कल्पनांच्या बळानेच मुख्यत्वे त्या काळातील शोषण निर्विघ्नपणे चालले होते. तेव्हा नीतिशिक्षणाचा मुद्दा मी समजू शकतो. पण अध्यात्म आणि नीती यांची सांगड निरपवादपणे घालता येत नाही. अध्यात्म म्हणजे नीतीच असे म्हणता येत नाही. भारतातील अध्यात्मवाद्यांचा इतिहास याला पुरावा म्हणून पुढे करता येत नाही. अध्यात्मवाद्यांनीही तर मुख्यत्वे चार वर्णांची नीती सांगितली आहे. तेव्हा भौतिक, ऐहिक पातळीवरची मनुष्याला ईश्वरी धाकापासून मुक्त करणारी स्वयंशासित नीती आपणाला घडवता आली पाहिजे. यासाठी आपण नास्तिक नीतीचा अंगिकार केल्यावाचून गत्यंतर नाही. असा विज्ञाननिष्ठ नैतिकतेचा वारसा धुंडाळण्यासाठी आपणाला भारतभूमीच्या बाहेरही जाण्याची गरज नाही. इथेच, भारतातच नास्तिकनिष्ठ नीतीचा वारसा आपल्याला मिळू शकतो. हा वारसा आपल्या भौतिकवाद्यांचा आहे, भारतीय संविधानानेही निदेशक तत्त्वांमधून तो पुरस्कारिला आहे.

वरील वारसा जर आपण आजच्या शिक्षणप्रणालीशी जोडू शकलो तरच आणि तरच आपणाला नवा भारत घडवणारा नवा माणूस घडवता येईल. आपले जातीय व वर्गीय समाजवास्तव, भूतकाळाने कुरूप केलेले वास्तव, नव्या समाज-सौंदर्याच्या संकल्पांना प्रत्यक्षात उतरू न देणारे वास्तव शिक्षणाने विद्यार्थ्यांच्या

मनावर एक दुःस्वप्न म्हणून बिंबवले पाहिजे. त्याने परिवर्तनभान चेतवले पाहिजे. सर्वंकष अंधत्वाचा प्रचार शिक्षणाने थांबवला पाहिजे. असे झाले तर जगाच्या दर नव्या पावलाबरोबर हा भारत पाऊल टाकू शकेल. मी आधीही आणि नंतरही, आताही आणि केव्हाही भारतीयच आहे असा राष्ट्रीय एकात्मतेचा कलिजा उरात बाळगणारा माणूस आणि अशा माणसांचा नवा भारत आपणाला घडविता येईल. आपली शिक्षणप्रणाली या ध्येयाने पेटून उठावी असेच मला मनापासून वाटते.

□ □

# आपल्या शिक्षणाचा आशय

**समताप्रेमी नास्तिक विद्यार्थी बांधवांनो**

स्टुडन्टस् फेडरेशन ऑफ इंडियाच्या राजव्यापी मेळाव्याचा उद्‌घाटक आणि आपला ध्येयबंधू आपणास मोठ्या स्नेहादराने अभिवादन करीत आहे. आपण या राज्यव्यापी विद्यार्थी मेळाव्याचे उद्‌घाटन करायचा सन्मान बहाल केला त्याबद्दल आपणासंबंधी मनापासून कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

बांधवांनो, या मेळाव्याचे उद्‌घाटन करण्याआधी या देशातील शोषितांचे संस्कृतीपुरुष असलेल्या जोतिबा फुल्यांना मी हार्दिक अभिवादन करतो. महाराष्ट्रात प्रथम त्यांनी आपणाला शिक्षणाची महती सांगितली.

" विद्येविना मति गेली; मतीविना नीति गेली; नीतीविना गति गेली ! गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले ".

शिक्षणाचा अभाव हे आपल्या गुलामीचे कारण होय हे जोतिरावांनी आपणाला पहिल्यांदा कळकळीने सांगितले आणि शिक्षणाला क्रांतिकारी परिवर्तनाशी जोडले. शोषणव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाचा अंगार फुलविणारी शक्ती म्हणून त्यांनी शिक्षणाकडे पाहिले. अंधश्रद्धा, अज्ञान, लाचारी, अडाणीपणा यांच्याद्वारा येथील गोरगरिबांवर राज्य करणाऱ्या गुलामगिरीची दुर्गंधी मुळासकट नष्ट करण्याचा आणि हा देश माणुसकीच्या सुगंधाने सुंदर करण्याचा प्रबोधनप्रकल्प त्यांनी इथे सुरू केला. आपल्या शिक्षणाच्या या आदिनाथाला मी विनम्र अभिवादन करतो आणि त्यांना दुर्गंधी म्हणून आपल्या परिवर्तनाच्या चळवळीचा घोर अपमान करणाऱ्या गांगलांचा व सोबतकार ग. वा. बेहरे यांचा मी माझ्यावतीने आणि आपणा सर्वांच्यावतीने अत्यंत तीव्र शब्दात जाहीर निषेध करतो.

मित्रांनो, विद्यार्थी ही अनेक शक्यतांची घटना असते. विद्यार्थ्यांनी उफाळत्या शक्तीसारखे वागायला हवे. समता ही त्याची जिंदगी आणि सौंदर्य हीच त्याची जीवनदृष्टी असायला हवी. बंधुता हे त्याला जिवाहून प्यारे असे मूल्य आणि न्याय हा त्याचा राष्ट्रवाद असायला हवा. सर्वधर्मातीत असलेल्या या विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल मनुष्यता एवढाच धम्म असावा. या उज्ज्वल मनुष्यतेचा अपमान हा

विद्यार्थी सहन करूच शकत नाही. मग हा अपमान करणारा एखादा धर्म असेल, एखादे तत्त्वज्ञान असेल, ग्रंथ असतील, परंपरा असतील वा कोणी ईश्वर असेल. हा विद्यार्थी या सर्वांनाच कचरा पेटवून द्यावा त्याप्रमाणे पेटवून देण्याचे धाडस बाळगतो.

विद्यार्थी म्हणजे नव्या संस्कृतीचे बियाणे. विद्यार्थ्यांची दृष्टी स्वच्छ असावी. त्याच्या प्रस्थापिताच्या आजारापासून मुक्त असलेल्या नजरेला समाजातील विषमता तीव्रपणे दिसावी. त्या विषमतेच्या विषारी कक्षेतून विद्यार्थ्यांनी बाहेर पडायला हवे. आपल्या पारंपरिक समाजरचनेने पसरविलेल्या आजारांपासून मुक्त असायला हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले होते, "मानवी जीवनातील वैचारिक आणि नैतिक मूल्ये कधीच स्थिर राहत नाहीत. ती कालमानानुसार प्रत्यही बदलतच नाहीत तर प्रगतही होत जातात. भारतीय विद्यार्थ्यांनी निर्माण होणाऱ्या या नवनव्या जीवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे. ती आचरणात आणण्यास सिद्ध राहिले पाहिजे !" स्वतःचे व नव्या मनुष्यतेचे निर्माण करण्यासाठी आपण सतत मनाने प्रवाही असले पाहिजे. गतिशील असले पाहिजे. पेरिस्ट्रायका (पुनर्रचना) आणि ग्लासनॉस्त (खुलेपणा) या नव्या संकल्पनांच्या द्वारा गोर्बाचेव ही गोष्टच जगाला सांगत आहेत.

विद्यार्थी म्हणजे सृजनशील संवेदनशीलता. ही संवेदनशीलता स्वभावाने उत्कट आणि तीव्र असते. भल्याबुऱ्याचा अत्यंत पोटतिडीकेने ती निर्णय घेऊ शकते. भारतीय समाजात ही शक्ती ज्या दिशेने पाहील त्या दिशेने केव्हाही सूर्योदय होऊ शकेल. ही शक्ती कुठल्याही शक्तीला जन्म देऊ शकते. असा विद्यार्थ्यांचा चेहरा असतो तसाच चेहरा राष्ट्राच्या भवितव्याला लाभत असतो. विद्यार्थी ही एक ऊर्जा आहे. या ऊर्जेच्या पंखावर बसूनच वर्तमानाचा निरोप घेत समाज भवितव्याच्या हातात हात गुंफीत असतो. त्याचे तेजस्वी जाणीवविश्वच समाजासाठी सर्वच संदर्भात निर्णयशाली ठरत असते. विद्यार्थी म्हणजे समाजाचे प्रगतीमापक यंत्र. अत्यंत तरल, तीव्र व स्वतंत्र अशी ती सौंदर्यपूजक व समताकांक्षी अशी घटना असते. प्रतिगामी समाजाचे अमानुष रखवालदार विद्यार्थ्यांची ही विद्युतशक्ती विषमतेच्या कुप्या वाटण्यासाठी वापरीत असतात. विद्यार्थी ही शक्ती मोठी अद्भुत आहे. ती बेसावध असली तर मनुष्यतेच्या विरोधी गर्व से नारे लावत राष्ट्राचा चेहरा बेढब करू शकते. पण ही शक्ती जागी असेल तर या सर्व प्रतिगाम्यांच्या विरोधात पोटी परिवर्तन बाळगणारे घोंगावते वादळ ती होऊ

शकते. पंचविसाव्या वर्षी लोकहितवादींनी शतपत्रांतून समाजक्रांतीच्या ठिणग्या फुलवल्या. याच वयात जोतिराव फुल्यांनी आमूलाग्र क्रांतीचा वणवा उभारला. तिच्याच मागेमागे आगरकरांनी समाजव्यवस्थेची अधिष्ठानभूत मूल्ये बदलण्यासाठी संगर उभारले. या वयापासूनच आंबेडकरांनी आमूलाग्र समाजक्रांतीची मांडामांड करायला प्रारंभ केला. विद्यार्थ्यांचे मन आणि वय हे परिवर्तनाशी गोष्टी करण्याचे वय आणि मन असते. विषमतेची सामग्री जाळण्याचे धाडस करण्याचे हे वय असते. आपली दिशाभूल करणारा, आपणाला वर्णा-जातीत रुतवणारा, गोरगरिबांचा द्वेष शिकविणारा विचार वा मनुष्य ओळखून त्याची कबर बांधण्याचे हे वय आणि मन असते. प्रकाशाची आराधना करण्याचे हे वय असते. जे वय ईश्वर-दैव या मूर्ख गोष्टी मानते ते वय वा मन विद्यार्थी नसते. विद्यार्थी ही मानसिकता कन्फमिस्ट नसते. परावलंबी वा ईश्वरावलंबी मन 'विद्यार्थी' असू शकत नाही. लोकांना गुलामीतून काढणाऱ्या, त्यांची अस्मिता चेतवणाऱ्या व त्यांच्यात क्रांतीचे बियाणे पेरणाऱ्या चळवळींना विरोध करणारे मन विद्यार्थी असणे शक्य नाही. विद्यार्थीमन हे मैत्री व करुणा यांनी फुलणाऱ्या प्राजक्तासारखे असते पण अनेकदा आपला दुरुपयोग केला जातो आहे हे या वयाला कळत नाही. कारण इतर अनेक सडक्या वयांच्या संपर्कात आल्याने याही वयाच्या आकाशातील चंद्रसूर्य आंधळे झालेले असतात. "नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली निर्मितो नव-क्षितिजे पुढती" अशी ऊर्जा असलेले त्याचे कोलंबसपण प्रतिगामी समाज परंपरेच्या वीतभर सडक्या डबक्यात कुजवून टाकतो हे त्याच्या लक्षातच येत नाही. हा त्याच्या नवनिर्माणशील व्यक्तित्वाचा व त्याच्या सौंदर्यजीवी विद्यार्थीपणाचा घोर अपमान असतो हेही त्याला कळत नाही. समाजापुढे प्रश्नांचे घाणेरडे उकिरडे माजतात ते केवळ विद्यार्थ्यांच्या बेसावधपणामुळे. ज्या राष्ट्राचे विद्यार्थीपण झोपलेले असते त्या राष्ट्राचा वर्तमानकाळ जागा असूच शकत नाही. ज्या राष्ट्रातील विद्यार्थी धर्मबाबांच्या जहरी संस्कारांच्या भजनात दंग आहे ते राष्ट्र निरोगी असूच शकत नाही. सामाजिक विषमतेचे-वर्णव्यवस्थेचे आणि सतीप्रथेचे समर्थन करणाऱ्या धर्मगुरूला पूजनीय मानणारे मन विद्यार्थ्यांचे असूच शकत नाही. ज्याच्या पावलांना माणुसकी तुडवण्याचाच शौक आहे तो धर्म स्वतःला धर्म म्हणवून घेण्याची योग्यता गमावून बसलेला असतो. अशा कोणत्याही धर्माबद्दल गर्व बाळगणे ही आपल्या प्रबोधनाशी भयानक बेईमानी असते.

विद्यार्थी मित्रांनो, तुम्ही धर्मवादी आहात की मनुष्यवादी आहात, तुम्ही विषमतावादी आहात की समतावादी आहात, तुम्ही परंपरावादाचे अभिमानी

आहात की परिवर्तनाचे शिल्पकार आहात, तुम्ही रूढींचे गुलाम आहात की प्रबोधनाचे प्रेमी आहात, तुम्ही ईश्वराला मानता की माणसाला मानता, तुम्ही स्वतःला जातीवर्णविहीन करू इच्छिता की जातीवर्णपूजक करू इच्छिता, तुम्ही गरिबांचे मित्र आहात की भांडवलदारांचे भक्त आहात, तुम्ही बंधविमोचनाच्या प्रकाशप्रक्रियेचे कुटुंबीय आहात की परिवर्तनाला बांध घालणाऱ्या सरंजामी व भांडवली दरोडेखोरांचे पाळीव हस्तक आहात या प्रश्नांचा तातडीने निर्णय आपण घ्यायला हवा. भांडवली व सरंजामी अशा द्विविध फॅसिझमच्या आगीत देश सापडला आहे. सफदर हाश्मीसारख्या लोककलावंताची हत्या होते. जोतिबा फुल्यांच्या क्रांतीकार्यावर गरळ ओकले जाते. प्रबोधनाचा तिरस्कार करायचे शिकवणारी केंद्रे धर्मान्ध शक्ती उघडीत आहेत. परिवर्तनवादी व्यक्तींना नामोहरम करण्याचे, नष्ट करायचे तंत्र अवलंबिले जात आहे. भारतीय लोकशाहीला धर्मांधतेचा गळफास आवळला जातो आहे. यावेळी आपण ठोस भूमिका घेण्याची, सर्वांनी आमूलाग्र क्रांती या एकाच ध्येयाने पेटून उठण्याची गरज आहे.

आजची शिक्षण व्यवस्था व शैक्षणिक धोरण हे 'जैसे थे' वाद्यांचे हित-संवर्धन करणारे आहे. पस्तीस कोटी जनता आज दारिद्र्यरेषेखाली पशूपातळी-वरचे जीवन भोगत आहे. दरवर्षी देशात दीड कोटी लहान मुले उपासमार व निकृष्ट आहार यामुळे मृत्यूमुखी पडतात. बेरोजगारांची संख्या तीन कोटींच्यावर आहे. पाच ते पंधरा या वयोगटातील चार पॉईंट चार कोटी मुलांना शिक्षणाला वंचित होऊन बालकामगार म्हणून राबावे लागत आहे. आपल्यावर चाळीस हजार कोटींचे विदेशी कर्ज आहे. दहा टक्के श्रीमंतांकडे ५१ टक्के संपत्ती एकवटली आहे तर शेवटच्या दहा टक्के गरिबांकडे संपत्तीचा शून्य पॉईंट एक टक्का भाग आहे. टाटा–बिर्लाची १९४७ च्या सुमारासची संपत्ती शंभर कोटी होती ती आता पाच हजार कोटी झाली आहे. या देशातील काही बड्या मंडळींनी स्विस बँकांमध्ये पंचवीस हजार कोटींहून अधिक रुपये दडवलेले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनिर्बंध खाजगी संपत्तीला आळा घालणारे ३१ वे कलम त्यावेळच्या भांडवलदारधार्जिण्या लोकांनी बदलले. समाजवादी अर्थरचनेचा भारताच्या लोकशाहीप्रधान घटनेतच समावेश व्हावा यासाठी त्यांनी आकाशपाताळ एक केले. हा समाजवाद अपरिवर्तनीय असावा आणि कायदे मंडळाला कोणत्याही कायद्याने त्यात बदल करता येऊ नये ही त्यांची भूमिका होती. हुकूमशाहीविरहित आणि संसदीय लोकशाहीसह स्टेट सोशॅलिझम हे बाबा-

साहेबांचे ध्येय प्रत्यक्षात आले असते तर या देशात आज निर्माण झाली ती अशी विलक्षण आर्थिक विषम स्थिती निर्माण झाली नसती.

शिक्षण अन्याय पाहणारा डोळा देते. अन्याय नष्ट करण्याची शक्ती देते त्यामुळे जैसे थे वाद्यांसाठी शिक्षणव्यवस्था प्रतिगामी असणे, मूठभरांच्या हिताची असणे व बाकीच्या कोटयवधींना शिक्षणापासून वंचित ठेवणे आवश्यक असते. आजची शिक्षणव्यवस्था या देशातील उपेक्षितांना 'जैसे थे' वादाच्या तुरुंगात डांबणारी आहे. अशिक्षित, अडाणी व अंधश्रद्ध बेरोजगारांची मेंढरे प्रस्थापित व्यवस्थेला सोयीची असतात.

आर्थिक विषमतेमुळे वीस टक्के विद्यार्थी शाळेचे तोंडच पाहू शकत नाही. प्राथमिक अवस्थेतच ६३.१ टक्के विद्यार्थी शाळा सोडतात. माध्यमिक पातळीवर ७७.१ टक्के विद्यार्थी शिक्षणाला पारखे होतात. १०० पैकी १२ मुले दहावी पास होतात व पाच मुले महाविद्यालयात जातात. त्यातील केवळ दोन मुले पदवी-धर होतात. हे सर्व घडते ते गरीब लोकांच्या हिताचे कसे असेल ? या व्यवस्थेत दलित आदिवासी, भटके, विमुक्त यांचे काय आहे ? हे शिक्षण मूठभर उच्चवर्णीय व उच्चवर्गीयांचे कुरण झाले आहे.

मित्रांनो, खाजगी शिक्षणसंस्थांनी शिक्षणाचा व्यापार सुरू केला आहे. भ्रष्ट लोकांच्या हातातील शिक्षणसंस्थांमधून ना धड बाणेदार शिक्षक जगू शकत ना ह्या संस्थेतून तेजस्वी विद्यार्थी निपजू शकत. शिवाय अभ्यासक्रम तयार करणारेही या अमानुष व्यवस्थेचेच प्रतिनिधी असतात. त्यामुळे सामान्य माणसाला अंध करण्याचीच काळजी या शिक्षणातून घेतली जाते. शिक्षकही त्या व्यवस्थेचे अंधभजन करतो, हे सर्वच गती मारणारे आहे. त्यामुळे आपण विद्यार्थ्यांनी वरील सर्वच संदर्भात जागे झाले पाहिजे. आपल्याला नवा मनुष्य–जातीधर्मविहीन, अंधश्रद्धाविहीन मनुष्य निर्माण करायचा आहे. समता, स्वातंत्र्य बंधुता न्याय आणि बुद्धिप्रामाण्य ही मूल्ये आपली मार्गदर्शक मूल्ये मानणारा मनुष्य निर्माण करा-वयाचा आहे. त्यासाठी या देशातील सर्व शोषितांना त्यांचे शोषण कसे कुठे होते आहे व ते एकाच शोषणव्यवस्थेचे बळी कसे आहेत ते समजावून सांगून त्यांना एकत्र आणले पाहिजे. शोषण विद्रोहाला जन्म देतेच असे नाही. शोषणाचे तीव्र भान व संताप यातून मात्र विद्रोहाचा अंगार फुलतो.

याबेळी विद्यार्थ्यांनो आपण सळाळून उठून आपले तरुणपण जाहीर करा. मित्रांनो प्रश्न माणसाच्या राष्ट्रीयत्वाचा आणि राष्ट्राच्या माणुसकीचा आहे.

अवघे राष्ट्र या विषमज्वराचे आज धुमसत आहे. कोट्यवधी गरिबांचे जीव मूठभर धनवंत गुंडांच्या हातात सापडले आहेत. या लांडग्यांच्या अनिर्बंध समाजात कुणी बाई सुरक्षित नाही. मनुष्य सुरक्षित नाही. मित्रांनो हे मूल्यांचे धिडवडे थांबवणे आपल्या हातात आहे. आपण जागे तर राष्ट्र जागे. आपण मनुष्य तर राष्ट्र मनुष्य. आपण प्रकाशमान तर राष्ट्र प्रकाशमान. आपण बुद्धिवादी तर राष्ट्र बुद्धिवादी. आपण चारित्र्यवान तर राष्ट्र चारित्र्यवान. राष्ट्राला केवळ आपला चेहरा असतो मित्रांनो. विद्यार्थ्यांनो राष्ट्राला केवळ तुमची शान असते. राष्ट्र तुमच्या पायांनी चालते. राष्ट्र तुमच्या डोक्याने बोलते. तुमच्या मनातील प्रकाशाने राष्ट्र सुशोभित होते. सन्मानित होते. राष्ट्र, राष्ट्र होते. ''ही हलवेला जल्शाची का पुसा मनाला'' असे आपले महाकवी केशवसुत म्हणाले होते. आपणास अत्यंत कळकळीच्या शब्दात मी सांगतो की राष्ट्राची जमीन वेडीवाकडी पेटून उठण्याची शक्यता आहे. यावेळी आपण देशातील नाडलेल्यांच्या व उपेक्षितांच्या पाठीशी उभे राहावे. माणुसकीसाठी आपण आज निर्वाणीची प्रतिज्ञा घ्यायची गरज आहे, प्रतिगामी व विषम व्यवस्थेला हतबल करण्याची गरज आहे. तुमचे बळ प्रतिगामी व्यवस्थेच्या बाजूने नसले तर ती व्यवस्था धुके संपावे तशी संपून जाईल. तिचा कणाच मोडून पडेल तेव्हा वेळ आपल्या माणुसकीच्या अग्निपरीक्षेची आहे. विसाव्या शतकात प्रवेशायला आणि माणूस म्हणवून घ्यायला आपण योग्य ठरण्यासाठी या परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

तत्त्वज्ञान आणि आचार यात फारकत होऊ दिली नाही तर विजय आपला आहे ही खात्री देतो आणि या मेळाव्याचे उद्घाटन झाले असे जाहीर करतो. धन्यवाद !

□ □

# समता

आज आपल्या समाजातील स्तरांचे संबंध पाहिले, या समाजात घडणाऱ्या जातीय दंगली पाहिल्या, दलित, आदिवासींच्या हत्या आणि अशाच अमानुष अत्याचारांच्या कहाण्या वाचल्या की आपल्या समाजसंस्थेच्या चारित्र्याचे किती अध:पतन झाले आहे. याची खात्री पटते. फुल्यांच्या आणि आंबेडकरांच्या काळात सुरू असलेली सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया १९५६ नंतर थांबली आहे असेच प्रत्ययाला येते. सर्व शोषितांना परिवर्तनसूत्रात बांधण्याचा प्रयत्न वरील दोन्ही महापुरुषांनी केला; पण आज शोषितांमध्ये युद्धभाव निर्माण करण्यात येथील शोषणव्यवस्था यशस्वी झाली आहे असेच दिसते. असे आजच नाही तर या समाजाच्या इतिहासात अनेकदा घडले आहे. प्रत्येकच समाजक्रांतिकाराला प्रत्येकच वेळी त्याच त्या प्रश्नांपासून प्रारंभ करावा लागलेला आहे. प्रत्येकच समाजक्रांतिकारकाला हा शाप टाळता आला नाही. परिवर्तनाला येणारी नवी पालवी अगत्याने अशी का खुडली जाते ? क्षितिजाच्या पोटातच समाजक्रांतीच्या सूर्याची अशी भ्रूणहत्या का केली जाते ?

येथील प्रत्येकच मनुष्याचे शारीरिक वय कमीजास्त असले तरी सांस्कृतिक वय सारखेच म्हणजे पाच हजार वर्षांचे असते. आपल्या येथील प्रस्थापितालाच भूतकाळ पूज्य वाटतो असे नाही, तर येथील शोषितही भूतकाळाच्याच भजनात दंग झालेला असतो. प्रत्येकच जण इथे वेगवेगळ्या पद्धतीने, पण निद्रासम्राटच असतो. या प्रकारे विस्थापितही जेव्हा प्रस्थापित संस्कृतीचेच गोडवे गातो तेव्हा निर्माण होणारा प्रश्न हा क्रांतीपुढला सर्वात जटिल प्रश्न होऊन बसतो. विस्थापिताला आपण शोषित आहोत, लुबाडलेले आहोत हे कळत नसते तेव्हा शोषणमुक्तीसाठी क्रांती करणारे लोकही या गुलामांना शत्रूच वाटत असतात. त्याच्या उरावरील पहाड उचलू पाहणारे मित्रहातही त्यांना मरणाच्या जबड्यासारखे वाटत असतात. आपल्या इथे जन्माला आलेला प्रत्येक जण 'मनुष्य' होण्याची प्रक्रिया होण्यापेक्षा 'जात' होण्याच्या उद्योगाला लागतो, नव्या संदर्भाचा जनक होण्यापेक्षा जुन्या संदर्भाचा दास होण्याच्या मार्गाला लागतो, प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे इतरांचे रक्त पिण्याच्या मोहिमेत तो सामील होतो. तेव्हा आहे त्या परिस्थितीतून

बाहेर पडायचे असेल तर शोषितांची ही मानसिकता बदलावी लागेल. त्यांच्यामध्ये ही मानसिकता निर्माण करणाऱ्या यंत्रणेचे षड्यंत्र समजून घ्यावे लागेल. शतकानुशतके हे शोषण विनाप्रतिकार चालू राहण्यासाठी ह्या यंत्रणेने कोणता आवश्यक क्लोरोफॉर्म दिला तेही समजून ज्यावे लागेल.

आजच्या परिवर्तनापुढले सगळे घाणेरडे प्रश्न तुम्ही जिला आदरणीय मानता त्या संस्कृतीने, तुम्ही ज्याला सन्माननीय मानता त्या धर्माने आणि तुम्ही ज्यांची पूजा करता त्या देवी-देवतांनी व संत-महंतांनी निर्माण केलेले आहेत.

शोषणाच्या विचाराला शोषणव्यवस्था जेव्हा पावित्र्य देत असते तेव्हा तो विचार विलक्षणच घातकी विचार ठरत असतो. जो मनुष्य सत्य सांगत असतो तो केवळ सत्य सांगतो या हिंमतीवरच इतरांना विचार करायलाही सांगत असतो. पण आपल्या समाजात, सतत, विचार न करता जे सांगितले असेल ते वंदनीय मानायला शिकवले गेले आहे. याचा सरळ अर्थ असा की, आपल्या संस्कृतीने आणि इथल्या धर्माने आपल्याला सत्य सांगितलेच नाही. आपण विचार करायला लागू नये यासाठीच समग्र इतिहास प्रयत्न करतो आहे. विचार करण्याची प्रक्रिया नव्या संस्कृतीच्या निर्माणाकडे जाते. विचारसंघर्ष होतो हे टाळण्यासाठी विचार करणेच बंद केले गेले. विचार करणे बंद झाले की, मनुष्याचे अनुभव व भावना यांनाही शोषितांच्या सोयीच्या अर्थाहून वेगळे अर्थ प्राप्त होत नाहीत. परिणामतः, जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील सर्जनाला व्यक्ती पारखी होते. विचाराला व सर्जनाला पारखी झालेली व्यक्ती एलिनेटेड होते. अशा व्यक्तींचा समाज आणि असे पशुपातळीवर जगणारे सर्वच समाज एलिनेटेड असतात. भारतातील ९५ टक्के लोकांसाठी हे एलिनेशनच एका सामूहिक महामृत्यूचे नाव झाले आहे.

आजही या महामृत्यूचा उत्सव आपल्या समाजात सुरू आहे. येथील नागवलेले लोकही शोषकांच्या गुऱ्यातील अंमली विचारच वापरतात. यामुळेच मागल्या पाच हजार वर्षांमध्ये इथला शोषित जनसमूह केवळ आपल्या मरणाचा आविष्कार करीत आला. त्याची विचार-वंचितता म्हणजे त्याचे मरणच होय.

कालवरही हे चालतच आले आणि आजही आपल्या समाजात परंपरावाद, दैववाद, मंत्रतंत्र, जन्मसिद्ध उच्चनीचता यांचीच हुकूमशाही सुरू आहे. या हुकूमशाहीमुळे आपल्या प्रबोधनाच्या इच्छेतला आणि राज्यघटनेच्या ध्येयवादातला समाजवाद निषिद्ध मानूनच हा समाज भूतकाळातील मूर्ख हिंमतीनेच वर्तमानकाळातून चाललेला आहे. हा समाज बदलायचा असेल तर इहवादी जीवनमूल्यांचे,

परस्परसहकार्याचे, मनुष्य व राष्ट्रविषयक जबाबदारीचे संस्कार व्यक्तीवर करायला हवेत आणि समाजात मूलगामी बदल घडवून आणण्यासाठी मूठभरांच्या हिताच्या अध्यात्मनिष्ठ मूल्यांची पूजा करणे पुढे उचित ठरणार नाही, हेही लक्षात घ्यायला हवे.

भोवती नवनव्या संदर्भांनी भीषणता साकार होते आहे. भयंकर महागाई आहे. बेकारी आहे. भ्रष्टाचार आहे. गटबाजी आणि संधिसाधू वृत्ती आहे. दंभ आणि अमानुष स्वार्थ आहे. या सगळ्या भयानक बाबी आहेत. त्यांच्यामुळे आपला समाज जखमांचे बहुभाषिक, बहुप्रांतिक जंगल झाला आहे. एखाद्या उच्च घरातील सर्वच लोक बडे नोकरदार असतात, तर कुठे सर्वच बेकार असतात. पण आपला समाज शतकानुशतके मारून टाकलेला समाज आहे. तो हे सर्व ज्या बळाने सहन करतो आहे ते बळ अत्यंत विषारी आहे, आत्मघातकी आहे. या समाजाची ही मूर्ख सहिष्णुता पाहिली की कोणालाही वाटावे हा समाज सर्व प्रश्नांवर विजय मिळ-विलेला समाज आहे आणि आता शांतपणे वर्तमानाच्या झुल्यावर निवांत झोके घेत बसला आहे. त्याला मध्ययुगीन मूल्यांचे पेनकिलर्स मिळणारी आध्यात्मिक स्टोअर्स इथे जोवर आहेत तोवर हा समाज अशांत होणार नाही. आपल्या समा-जाची ही मूग गिळून बसण्याची प्रवृत्ती मोठी क्रांतिमारक आहे.

जातिव्यवस्था हा आपल्यावर पाच हजार वर्षे राज्य करणारा आपला सर्वांत मोठा शत्रू आहे. या जातिसंस्थेने आपल्या समाजाला समाजपण लाभू दिले नाही. या राष्ट्राला राष्ट्रपण लाभू दिले नाही. माणसाला माणूसपण लाभू दिले नाही. इथल्या माणसाची, समाजाची, विचाराची, साहित्याची, तत्त्वज्ञानाची आणि राष्ट्राचीही माणुसकी या जातिसंस्थेने कुरूप केली आहे. या जातिसंस्थेने माणसांच्या परस्परसंबंधांमध्ये तेजाब कालवले आहे. इथली मनुष्यताच महारोगी झालेली आहे. अत्यंत घाणेरडे प्रश्न या संस्थेने आपल्या समाजापुढे उभे केले आहेत. फुले, आंबेडकर यांनी तर या निर्लज्ज संस्थेवर अत्यंत मूलगामी मारा केला, तरी आपले परंपरावादी मन त्या नरकवाड्यातून बाहेर पडले नाही. या बाबतीतही आपण आपल्या शत्रूंचेच ऐकले. आपल्या मारेकऱ्यांचे जयजयकार आपण केले. आपण क्रांतिकारी जाणिवेचे असण्याऐवजी जोवर कुठल्यातरी जातीचे आहोत तोवर आपणच आपल्या उत्थानाचे आणि क्रांतीचे शत्रू आहोत हे आपण सर्वांनीच समजून घ्यायला हवे.

लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर अशा नेतृत्वाची उणीव आज मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. ' जो जो उठे तो तो नेता ! सारी लंब्याचवड्या

वाता, परि हुल्लडीचा नियंता, कोणी नाही !!' अशी मोकाट परिस्थिती आज आहे. परंपरेत गुरफटलेले, अध्यात्माने रंगलेले मंदिरमनस्क नेतृत्व ही आपल्या समाजाच्या विकासातील मोठीच धोंड आहे. क्रांतीला गरज असते त्या तत्त्वज्ञानाच्या अत्यंत विरोधी अशी या नेतृत्वाची मानसिकता आहे. तथाकथित मार्क्सवादी हिंदू नेतृत्व असो की बहुजन समाजातील वा दलित समाजातील नेतृत्व असो; हे सगळेच नेतृत्व सारखेच तत्त्वज्ञानशून्य आणि क्रांतिविरोधी आहे. आज बुद्धिप्रामाण्यवादी नेतृत्वाची गरज आहे. समाजातील अपप्रवृत्तींवर, क्रांतिविरोधी संस्कारांवर, फुले-आंबेडकरांच्या आवेशाने, तरीही मातेच्या ममतेने प्रहार करणारे असे नेतृत्व हवे आहे. अशा नेतृत्वाच्या अभावी आपले प्रबोधन आज संपूर्ण निष्फळ होऊ लागले आहे. इथे नव्या पालवीचे वादळ उठायचे असेल तर आता निधड्या छातीच्या, त्यागधुरंधर आणि बुद्धिप्रामाण्यवादी नेतृत्वाची गरज आहे. कारण, शतकानुशतकांच्या या आपल्या पांगळ्या समाजात विचारही पांगळा झालेला आहे, विचाराची आणि परिवर्तनाची जबरदस्त भीती या समाजाने घेतली आहे.

आजही असे घडते आहे याला कारण आपले अद्भुत शिक्षण होय. शिक्षण हे मुख्यत्वे मंदिर, विद्यामंदिर आणि गृहमंदिर यांच्याद्वारा मिळते. अजूनही आपण गुरुसंबंधीची आपली परमार्थप्रवण कल्पना बदलत नाही. फुले, आगरकर, आंबेडकर यांना गुरुस्थानी मानणे अजूनही आम्हाला जमत नाही, हे फार बोलके नि भयानक वास्तव आहे, त्यामुळेच आजच्या वरील तिन्ही शिक्षाकेंद्रांमधून फुले-आगरकरांच्या, गाडगेबाबा नि आंबेडकरांच्या कल्पनेतला माणूसच निर्माण होत नाही. वेगळा विचार करू पाहणारे मन नष्ट करणे, व्यवस्थेच्या गुलामीचे जू खांद्यावरून फेकू पाहणारे मन संपविणे हेच कार्य वरील तिन्ही क्षेत्रांतील शिक्षण करते. त्यामुळे परत परत आपल्याला गुलामी देणारा भूतकाळच भेटतो. भूतकाळाला आपण सोडत नाही आणि आपल्याला भूतकाळ सोडत नाही, असे हे जीवघेणे आदर्शप्रेम आहे.

आजचा आपला उच्चवर्ग तीन भागांत वाटता येतो-(१) उघडपणे परिवर्तनाला विरोध करणारा प्रतिगामी (२) स्वतःला क्रांतिकारी म्हणवणारा, पण पुस्तकी मार्क्सवादी वगैरे, आणि जुन्याशी फारकत न घेणारा आणि (३) निखळ परिवर्तनवादी. हेच गट दलित व बहुजनसमाजाचेही पाडता येतील. या सर्व कुरूपतेमधून, दुभंगलेपणातून आणि विसंगतीच्या करवतीखालून बाहेर पडायचे असेल आणि क्रांतीने आपल्याला हाका मारीत यावे असे वाटत असेल, तर प्रथम

आपल्याला आपल्या शत्रू-भूतकाळाने दिलेले व शोषकांच्या मूल्यांची आरती करणारे आपले मन बदलावे लागेल. या मनाचे स्वरूप तपशिलवार सांगता येईल. ते कसे बदलायचे याबाबतीतही खूप सांगता येईल. आपल्या शिक्षणाच्या तिन्ही अंगांतील आशयद्रव्य बदलावे लागेल. मानसिक प्रबोधनाची निरंतर मोहीम उघडावी लागेल. या मनाची पाटी अशी कोरी करावी लागेल. तीव्र नकार आणि तीव्र स्वीकार यांनी युक्त विद्रोही मन घडवायला लागेल. उत्कट अशी चिकित्सा-बुद्धी, बुद्धिप्रामाण्यवादी मनुष्यस्वभाव विकसित व्हायला हवा. या देशाचा इतिहास विषमतेच्या उत्सवाचा इतिहास आहे, कर्मविपाकाचा विचार या देशातील विषमतेचा मॅनिफेस्टो आहे. आणि या मॅनिफेस्टोनेच या देशातील विषमतेच्या संस्कृतीला प्रारंभ झाला आहे. हे विषमतेचे घाणेरडे तत्त्वज्ञान पूज्य करायला व्यवस्थेने ज्या धर्माची नियुक्ती केली त्याचे नाव हिंदूधर्म आहे. या धर्मानेच इतिहासात समतेच्या विरोधात कार्य केले आहे. समता नष्ट करण्यासाठी या धर्माची प्रतिभा पणाला लागली आहे. समता आणि हिंदूधर्म या दोन गोष्टी एकत्र राहूच शकत नाहीत. म्हणून आपल्या एवंगुणविशिष्ट अस्तित्वासाठी हिंदूधर्माने प्राणपणाने समतेवर हल्ले केले. हिंदूधर्माचे जगणे असे समतेच्या मृत्यूशी बांधलेले आहे. ज्या ज्या वेळी समता दुर्बल झाली, ज्या ज्या वेळी समता मृतवत् झाली त्या त्या वेळी हिंदूधर्म खुशीत राहिलेला आहे.

समता म्हणजे सर्वांची उंची सारखी ठेवणे नव्हे. समता म्हणजे सर्वांच्या हाफपँटी सारख्या ठेवणे नव्हे. एखाद्या बिनडोक माणसाप्रमाणे इतर सर्वांनी विचार करणे थांबवणे म्हणजेही समता नव्हे. पण समता म्हणजे कुणालाही आपल्या व्यक्तित्वाचा विकास करण्याची सर्व प्रकारची संधी असणे होय. आपल्या देशातील अध्यात्मवादी परंपरा याच समतेच्या निर्मूलनासाठी मागील हजारो वर्षे प्रयत्न करीत आहेत. आणि मागल्या हजारो वर्षांत ज्यांना पायाखाली चिरडले गेले त्यांना वरिष्ठांच्या संदर्भात विशेष संधी दिढी-दुपटीने देणे म्हणजे आजच्या संदर्भातील समता होय. ही समता आज आपल्या समाजातील जातीच्या, अध्यात्माच्या आणि आर्थिक विषमतेच्या वणव्यात जाळली जात आहे. या समतेच्या प्रस्थापनेसाठी जाति-अध्यात्ममुक्त मन घडायला हवे, इतरांचे रक्तशोषण करण्याच्या मोहिमेत सहभागी न होणारे मन सिद्ध व्हायला हवे, आणि इतरांच्या माणुसकीच्या संवर्धनातच आपल्याही माणुसकीचे संवर्धन आहे असे मानणारे मन सिद्ध व्हायला हवे. कारण, समता हे मूल्य मूल्यांचेही मूल्य आहे. समता नाही तर स्वातंत्र्य नाही, बंधुता नाही, न्याय नाही. समता हे सर्व मूल्यांचे प्रवर्तक मूल्य आहे. जो

मनुष्य समतेची साधना करतो, तो आपल्या माणुसकीचीच साधना करतो, जो समाज समतेची साधना करतो तो समाज स्वत:च्या माणुसकीलाच उजळून घेत असतो, आणि जे राष्ट्र समतेची साधना करते त्यालाच राष्ट्र म्हणवून घेण्याचा हक्क पोचतो.

□ □

# राष्ट्रीय एकात्मतेपुढील आव्हान आणि आवाहन

आपल्या देशाचे नाव भारत आहे आणि आपण भारतीय आहोत याचा केवळ खऱ्या राष्ट्रवाद्यांना गर्व वाटणे साहजिकच आहे.

राष्ट्र एकात्म असणे ही बाब राष्ट्राच्या उज्ज्वलतेसाठी आवश्यक असते. पण एकात्मता माणुसकीशिवाय अशक्य आहे. राष्ट्रातील व्यक्तींमध्ये परस्पर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय असणे म्हणजे माणुसकी. वर्णजातींची व आर्थिक विषमतेची पूजा बांधणाऱ्या समाजात राष्ट्रीय एकात्मता जन्माला येणे अशक्य. इंग्रजी राजवटीद्वारा आपल्याकडे आलेल्या आधुनिक मूल्यांमुळे वर्णजातींची समाजसंस्था क्रमाने कोसळू लागली आणि या कोसळणीपोटी राष्ट्रीय एकात्मतेचा जन्म झाला. एकात्मतेचा वृक्ष वाढू लागला. सामाजिक व आर्थिक विषमतेची ओझी झुगारून देऊन कालपर्यंत दडपले गेलेले स्तर आता माणुसकीची आराधना करू लागले. बंधुत्वाच्या पातळीवर राष्ट्र एकात्म होऊ लागले. पण वर्ण–जाती व आर्थिक विषमता असणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय, असे ज्या अंध महाभागांना आजही वाटते तेच केवळ आज राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आली आहे असे म्हणू शकतात.

भारताला एकात्मतेसाठी खूप प्रयत्न करायला हवे आहेत. राष्ट्रीय एकात्मतेची सवय नसलेल्या पुराणमनस्क लोकांचा हा समाज आहे. एकात्मतेसाठी एकात्मतेचा शत्रू असलेला समाजाचा जुना ढाचा पार नष्ट करायला हवा. हा ढाचा वैचारिक–तात्त्विक असतो. शासनाची एकात्मतेसाठी काही पावले पडत असली, याबाबतीत शासन तसे उदार असले तरी एकात्मताविरोधी समाजाचा तात्त्विक पायाच नष्ट करण्याचा मूलगामी कार्यक्रम शासन प्रत्यक्षात राबवीत नाही हे खरे आहे. काही प्रमाणात समाजवादी चळवळीची व मार्क्सवादी प्रयत्नांची नोंद करायला हवी. पण आधुनिक भारतात एकात्मताविरोधी समाजाचा तात्त्विक पाया सामर्थ्याने नष्ट करण्याचे तत्त्वज्ञान डॉ. आंबेडकरांनी व त्यांच्या या तत्त्वज्ञानापासून प्रेरणा घेतलेल्या साहित्यिकांनी मुख्यत्वे साकार केले असे म्हणायला हवे.

आज राष्ट्रीय एकात्मतेला सर्व जातीवादी, परंपरावादी व धर्मांधशक्ती आव्हान देत आहेत. ज्याच्या मनात जात आहे व आर्थिक शोषणाचा आचार-विचार आहे तो एकात्मतेच्या विरोधी असल्याने राष्ट्रद्रोही आहे. ज्याच्या मनात भेदभाव करणारा धर्म आहे, तो एकात्मतेच्या विरोधात आहे.

हिंदुराष्ट्र ही संकल्पना संविधानद्रोही राष्ट्रद्रोहीही आहे याचा अर्थ ती मानवताद्रोहीसुद्धा आहे. खरेतर घटना ही धर्मसंस्थेला उल्लंघून जाणारी आहे. ५१ व्या कलमामध्ये सुधारणा, विज्ञानदृष्टी आणि आधुनिकता हा ध्येयवाद घटना ठेवते याचा अर्थ स्पष्ट आहे, पण प्रत्यक्षात अनेक धर्म इथे अस्तित्वात असतील तर अन्याय्य धर्म सोडून दुसऱ्या धर्मांच्या आश्रयाला जाण्याची वा धर्मविहीन होण्याची मुभा असलीच पाहिजे. समतेसाठी धर्मान्तर हे राष्ट्रान्तर होत नाही. ते विषमतेचा पुरस्कार केल्याने होते. कारण राष्ट्र समतेला आदर्श मानते.

आपण विविधतेत एकात्मता स्थापू शकतो पण ही विविधता केवळ नैसर्गिक पातळीवरची असायला हवी. मानवनिर्मित विविधता ही शोषणासाठी निर्मिली असल्याने हिच्या प्रकृतीतच विविधता जन्माला येणे अशक्य आहे. जाती-अस्पृश्यता या गोष्टी शोषकांनी निर्माण केलेली साधने होत. या गोष्टी कायम ठेवून एकात्मता साधतो म्हणणे केवळ दांभिकता होय.

एकात्मतेला सर्वात मोठा अडथळा हिंदू धर्माचा आहे. ह्या धर्माने वर्णांना-जातींना, गरिबीला व श्रीमंतीला पावित्र्य दिले आहे, दैवी मानले आहे. याचा अर्थ एकात्मतेसाठी या धर्माची संस्कारसत्ताच उद्ध्वस्त करायला हवी. ती प्रबोधनाने, मानसिक परिवर्तनाने होणे शक्य आहे.

हिंदूराष्ट्रवाद म्हणजे हिंदूधर्माची नैतिकता राष्ट्रात नियंत्रक असणे, वर्ण-जाती, अंधश्रद्धा व या सर्वांची मिळून पेशवाई साकार होणे म्हणजे हिंदू-राष्ट्रवाद. हिंदू म्हणजे नेमके कोणीच नव्हत. हिंदूधर्मात जाती आहेत, हिंदू कोणीच नाही. एखाद्याने मी हिंदू आहे असे म्हटल्याने ऐकणाऱ्याचे भागत नाही. तो जात विचारतो आणि मिळालेल्या उत्तराने तृप्त होतो. किराणा दुकानात विविध वस्तू असतात, पण किराणा नावाचा पदार्थ नसतो तसे हे आहे.

ज्या धर्माच्या लोकांची संख्या जास्त त्यांचा मुख्य प्रवाह ही बाब मूल्यात्मक दृष्ट्या अत्यंत फालतू आहे. या देशाला एकात्म करण्याचा म्हणजे बंधुत्वात, समतेत व न्यायात बांधण्याचा प्रयत्न करणारा विचारप्रवाहच संविधानदृष्ट्या

मुख्य विचारप्रवाह मानायला हवा. बुद्ध, फुले, रानडे, आगरकर, आंबेडकर हा प्रबोधनवाद्यांचा, सुधारकांचा व क्रांतिकारकांचा प्रवाहच आपल्या समाजात मुख्य विचारप्रवाह मानायला हवा.

मी भारत आहे. मी जात नाही. धर्म नाही. प्रांत नाही. परंपरावाद नाही. मी भारत आहे. मी भारतीय आहे ही वृत्ती अंगी बाणविणे हे अत्यंत आवश्यक आहे. जात की राष्ट्र, संप्रदाय की एकात्मता, धर्म की एकात्मता, अंधश्रद्धा की राष्ट्र अशी निवड हे राष्ट्र आपल्यास करायला सांगत आहे. या निवडीवर कोणाचा राष्ट्रवाद किती पाण्यात आहे ते ठरणार आहे. राष्ट्रवादासाठी राष्ट्रवाद कोणाचा व जाती-धर्मासाठी, वर्चस्वासाठी राष्ट्रवाद कोणाचा ? ते ठरणार आहे. राष्ट्राला आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी, अहंकारासाठी इतरांना तुच्छ लेखून छळण्यासाठी कोण वापरतात ते स्पष्ट होणार आहे. आणि राष्ट्रासाठी माणुसकीच्या प्रवासास कोण निघतात ते ठरणार आहे. राष्ट्रासाठी कोण जात सोडून, धर्म त्यागून आणि सर्व विषमता त्यागून पुढे येतो आहे ते ठरणार आहे. हा सूर्य हा जयद्रथ, कोण सोने कोण पितळ ते उघड होणार आहे. आम्ही स्पष्टपणे 'गर्वसे कहो हम भारतीय है' या पक्षात सामील आहोत. असे म्हणणाऱ्यांची संख्या वाढावी यासाठी प्रयत्न करणार आहोत.

□ □

# आंबेडकरवाद हा आमूलाग्र क्रांतीचा जाहीरनामा

आंबेडकरी चळवळ म्हणजे आंबेडकरी तत्त्वज्ञानानुसार चालणारी समाज-क्रांतीची चळवळ. पारंपरिक भारतीय समाजसंस्थेच्या आमूलाग्र परिवर्तनाची आंबेडकरी विद्रोहाच्या प्रकाशातून चालणारी चळवळ म्हणजे आंबेडकरी चळवळ होय. समाजक्रांतीला अत्यंत प्रतिकूल असलेल्या या पुराणमनस्क समाजातील आपल्या शोषणाचे भान नसलेल्या शोषितांच्या मुक्तीसाठी, माणुसकीच्या प्रतिष्ठेची प्रस्थापना करण्यासाठी जातीवर्गविहीन समाजसौंदर्याच्या निर्मितीसाठी आणि सुंदर व समर्थ मनुष्यतेच्या सर्जनासाठी आंबेडकरी तत्त्वज्ञानानुसार चालणारी मनुष्यक्रांतीची एकमेव बुद्धीप्रामाण्यवादी चळवळ म्हणजे आंबेडकरी चळवळ होय.

**चळवळीची घटक तत्त्वे**

आंबेडकरी चळवळीची शिक्षणकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्यकारण, राजकारण आणि धर्मकारण ही घटकतत्त्वे मानायला हवीत. या सर्व घटकतत्त्वांमधील कालबाह्य आशय वजा करून त्यांच्यात आमूलाग्र क्रांतीचा आशय भरणे ही आंबेडकरी चळवळीची अध्याहृत भूमिका आहे. वरील सर्वच घटकतत्त्वांमधील आशय आजवर परंपरांची विषारी बाग फुलवीत आहे. तेव्हा परंपराखंडन आणि क्रांतीमंडन करणारा बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोन वरील सर्व घटकतत्त्वांमध्ये प्रज्वलित करणे हे आंबेडकरी चळवळीचे सारतत्त्व आहे. नवनव्या युगाचे प्रश्न वरील घटकतत्त्वांमधील विज्ञानाच्या सामर्थ्याने सुटू शकतील यासाठी दर नव्या काळात स्वतःला अन्वर्थक करून घेणारा आशय त्यांच्यात भरणे व या सर्व घटकांमधील वस्तुस्थिती कायम क्रांतिशील बनविणे व त्यातून नवी विज्ञाननिष्ठ समता-संस्कृती उभारणे हा या आंबेडकरी चळवळीचा जन्म-ध्यास आहे.

**आंबेडकरी तत्त्वज्ञान कोणते?**

आंबेडकर हेच खरे तर एका अभूतपूर्व रिव्होल्युशनचे लाडके नाव आहे. आंबेडकरवाद हा आमूलाग्र क्रांतीचा जाहीरनामा होय. आंबेडकरांच्या भौतिकवादी

तत्त्वज्ञानाचा माणूस हाच केंद्रबिंदू होता. 'शुन रे मानुष भाई सभार उपर मानुष, तहार उपर नाही' हीच आंबेडकरवादाची जन्मप्रतिज्ञा आहे. मानवाच्या पार्थिव आयुष्य–विश्वावर आंबेडकरांच्या प्रज्ञेची प्रखरता पिसारलेली आहे. जन्मपूर्वता किंवा मरणोत्तरता या बाबी या तत्त्वज्ञानाला शोषणव्यवस्थेच्या चलाखीचा भाग वाटतात. निरीश्वरवादी, अनात्मवादी आंबेडकरवादात मोक्ष, भक्ती, पूजा या अनैतिक गोष्टी बसत नाहीत. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि बुद्धिवाद ही आंबेडकरवादाला मनुष्यतेची पंचशीले वाटतात. आंबेडकर धर्मवादी नाहीत. बुद्धाचे तत्त्वज्ञान त्यांनी ईश्वरप्राप्तीचा धर्म म्हणून अंगिकारले नाही, तर वरील पंचशीलांच्या तेजोमय मंजिलाकडे घेऊन जाणारी वाट म्हणून हे तत्त्वज्ञान त्यांनी अंगीकारले आहे. समाजक्रांतीच्या दिशेने यशस्वीपणे झेप घेण्यासाठी भारतीय संस्कृतीमधील हा एवढाच वारसा त्यांना प्रदीप्त करावासा वाटला. हुकूमशाही-विहीन आणि लोकशाहीप्रधान अशा घटनेतून साकार होणारा 'आंबेडकरी–समाजवाद' मार्क्सच्या समाजवादापेक्षा आणि भारतीयांच्या परंपरावादी समाज-वादापेक्षाच नव्हे, तर जगातील कोणत्याही समाजवादापेक्षा हा खास आंबेडकरी प्रज्ञेने निर्मिलेला समाजवाद आहे. हिंदुकोडबिलासकट त्यांच्या समग्र लेखनातील चिंतनक्षेत्रे या आंबेडकरी समाजवादाची अंगोपांगे होत. या सर्वांतून समतापूजक, स्वातंत्र्यपूजक, बंधुतापूजक, न्यायपूजक आणि बुद्धिप्रामाण्यपूजक असा सर्वस्वी प्रकाशपूजक आंबेडकरवाद साकार होतो. हा आंबेडकरवाद भारतीय सूर्यकुलाच्या परंपरेचा आजचा सर्वश्रेष्ठ तात्त्विक आविष्कार होय. आंबेडकरांनी भारतीय प्रबोधनाला समाजक्रांतीचे विशुद्ध जडवादी तत्त्वज्ञान दिले. या आंबेडकरी तत्त्व-ज्ञानानुसार अर्थात आंबेडकरवादानुसार चालणारी आमूलाग्र समाजक्रांतीची चळवळ मी आंबेडकरी चळवळ मानतो.

आंबेडकरी चळवळ केवळ दलितांच्याच बंध विमोचनाची चळवळ नाही. ती या देशातील सर्वच पीडितांच्या बंधमुक्तीची चळवळ आहे. ही चळवळ देशव्यापी करणे, प्रांतोप्रांती तिच्या छावण्या उभारणे आणि या चळवळीवर हे राष्ट्र फुलवणे ही जबाबदारी ज्यांना समाजक्रांतीची तहान लागलेली आहे त्या सर्व दलितेतर पुरोगामी विचारवंतांची, दलित नेतृत्वाची आणि दलित समाजाची होती. हैदराबादेच्या पहिल्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात भार-ताच्या सर्व प्रांतांमधील दलित साहित्यिक एकत्र आले होते. आंबेडकरांचे क्रांती-विज्ञान प्रांतोप्रांती पोचवण्याच्या प्रतिज्ञा या लेखकांनी केल्या याचा अर्थ आंबेडकरी चळवळ अशी सर्व प्रांताचे गडकिल्ले सर करीत आहे. ही एका बाजूने दिलासा

वाटावा अशी बाब आहे. इतर प्रांतांध्ये ही चळवळ कशी पोचते याचा विचार करण्यासाठी आणखी पाचपंचवीस वर्षांचा कालावधी लोटावा लागेल. पण ज्या महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळीचे तत्त्वज्ञान पिकले त्या महाराष्ट्रात विशुद्ध तात्त्विक पातळीवरून ही चळवळ किती प्रमाणात फलद्रूप झाली असा प्रश्न आहे आणि या प्रश्नाचे उत्तर मोठ्या प्रमाणात यातनादायी आहे हे आधीच सांगून टाकायला हवे.

संघर्ष करण्यासाठी संघटित व्हा आणि संघटित होण्यासाठी शिका, याप्रकारे शिक्षण हा आंबेडकरी चळवळीचा पाया होय. पण समग्र क्रांतीची इमारत ज्या पायावरती उभारावी लागते त्या पायाचा विचार बाबासाहेबांनंतर दलित नेतृत्वाने आणि समाजाने गांभीर्याने केलाच नाही. शिक्षण हा आंबेडकरोत्तर दलित चळवळीचा खरे तर एकमेव चिंतनविषय व्हायला हवा होता. शिक्षणाचे गुणवंतपंख दलित समाजाला लाभले असते तर आंबेडकरी चळवळ आज दिसते तशी निर्गुण निराकार दिसली नसती. केवळ शिक्षणाचा ध्यास मागल्या पन्नास वर्षांत दलित समाजाने घेतला असता तर हा मूठभर दलित समाजच क्रांतीमान झाला असता. त्याचे तेजच आपल्या समाजक्रांतीचे बळ ठरले असते. पण दलित समाजाच्या शिक्षणाचेही पुरेसे धिंडवडे आज निघत आहेत. दलित शिक्षकांना, प्राध्यापकांना आणि नेत्यांनाही शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा वाटतच नाही. आंबेडकरी समाजाचा विद्यार्थी आपल्या शैक्षणिक गुणवत्तेने जीवनाच्या नभोवितानात सूर्यासारखा तळपायला हवा. पण मोठ्या प्रमाणात शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत ते उलकांचे काफिले. बाबासाहेबांना अपेक्षित असे शिक्षणाचे वादळ आंबेडकरोत्तर दलित चळवळ उभारू शकली नाही आणि प्रचलित शिक्षणाचा प्रत्यक्षात आशय फिरवू शकली नाही. आंबेडकरी तत्त्वज्ञानानुसार समाजकारण साकार व्हायला हवे होते. सर्व सामाजिक चळवळ, बुद्धीप्रामाण्यवादाने प्रबोधित व्हायला हवी होती. सामान्य दलित माणसे सोडाच पण सुशिक्षित आणि लेखक बाया-माणसेही बुद्धाची पूजा करतात. भिक्खुचीही पूजा करतात. नवस बोलतात. काही दलित लेखक–लेखिकांकडे हिंदू देवतांची देव्हारा भरून गर्दी असते. हिंदूचे सण, व्रतवैकल्ये, उपास–तापास ही मंडळी करतातच. हे खरे तर दलित समाजाने आंबेडकरी चळवळीचे काढलेले धिंडवडे होत. एकूण आंबेडकरी तत्त्वज्ञान जाणून न घेता केवळ जयभीम म्हणण्याने आंबेडकरांसंबंधीचा आदर व्यक्त करता येत नसतो. अशा आदराने मनातील श्रद्धेची तहान भागत असली तरी चळवळ पाण्यावाचून मरत असते. पण शपथ घेतल्याप्रमाणे दलित नेते या संदर्भात बोलत

नाहीत. अर्थकारणाचा मुद्दा लखलखीत शैक्षणिक गुणवत्तेशी आणि उद्योगधंद्यांच्या चिकाटीशी निगडीत आहे. पण चार दोन लखोपती नेते सोडले. दलित समाजातील हे बडे भांडवलदार सोडले तर मोजके दलित हे बऱ्यापैकी अर्थसंपन्न जीवन जगतात. काही खाऊनपिऊन सुखी आणि बाकीच्यांची दारिद्र्याशी झुंज चाललेली अशी अवस्था आहे. दलित नेतृत्वाजवळ या हलाखीच्या निर्मूलनासाठी योजना आखण्याची इच्छा नाही. दलितांचे राजकारण म्हणजे जुगाऱ्यांचा अड्डा झाला आहे. ते झोळपांचे राजकारण झालेले आहे. तत्त्व, चारित्र्य आणि व्यासंग या सर्वच बाबतीत दलित नेतृत्व खुजे आहे. मिळेल तेवढे पदरात पाडून घ्यावे, तळीराम गार करावा आणि आंबेडकरांच्या नावाने दुकानदारी करावी अशी या नेतृत्वाची खासीयत आहे. आज दलित समाज राजकारणाच्या दृष्टीने अनाथ आहे. आंबेडकरोत्तर दलित चळवळीने राजकारणाची अशी बेअब्रु केलेली आहे. दलितांची साहित्य चळवळ आता अंतर्गत हेव्यादाव्यामुळे आणि या साहित्यिकांच्या मनातील आंबेडकर विझत चालल्यामुळे पश्चिमेला झुकलेली आहे. परंपरावाद्यांशी छुपे संबंध ठेवून असलेले दलितांमधील काही लोक दलित साहित्यातील निखारे विझवण्याचे काम करीत आहे. ढसाळांच्या कवितेतील लैंगिकतेला आणि अध्यात्मतेला दलित कवितेचे श्रेष्ठत्व म्हणून वाजवणाऱ्या या लोकांनी दलित साहित्याची दिशाभूल केलेली आहे. आपल्याला डोईजड होणाऱ्या प्रतिभावंतांना मार्क्सवादी म्हणून हिणवण्यात त्यांना यश आले तरी त्यामुळे दलित साहित्याचे त्यांनी नुकसान करून घेतले आहे. दलितांच्या धर्मकारणांची अवस्थाही दयनीय आहे. दीक्षाभूमीकडे बाबासाहेबांनी अंगार फुलवणारी भूमी म्हणून पाहिले पण दीक्षाभूमीवरून बाबासाहेबांचे अनुयायी अंगारा घेऊन जाताना दिसतात. भिक्षूंच्या पाया पडणे आणि मेणबत्त्या व पानेफुले फेकून बाबासाहेबांची पूजा करणे हे दीक्षाभूमीवर चालते. बुद्ध, आंबेडकर भक्तीचे विषय झालेले आहेत. ही दीक्षाभूमी महार समाजामधीलही पोटजातींचा पसारा जाळू शकली नाही. बुद्धाचे तत्त्वज्ञान असे धर्म म्हणून निर्जीव करण्यापेक्षा क्रांती म्हणून ते पुढे घेऊन जाणारे मन दीक्षाभूमी घडवू शकलेली नाही आणि दलित नेतृत्वही या कोणत्याही संदर्भात जागृत नाही. आंबेडकरी चळवळ या दलित नेतृत्वाने लखलखीत करीत न्यायला हवी होती पण दलित नेतृत्व या संदर्भात पुरेसे अनभिज्ञ असल्याने आंबेडकरोत्तर दलित चळवळ ही विखुरलेली, फुटलेली आणि व्यक्तित्वशून्य झालेली आहे. आमूलाग्र समाजक्रांतीच्या आंबेडकर तत्त्वज्ञानाशी या चळवळीची फारकत झालेली

आहे. त्यामुळे ही चळवळ आज तरी विझलेल्या निखाऱ्यासारखी दिसते. पुढेमागे शिक्षणाचे वादळ उठले, आमूलाग्र समाजक्रांतीच्या आंबेडकरी तत्त्वज्ञानाने मने पेटलीत आणि तत्त्वनिष्ठेने हा समाज उजळून निघाला तर आणि तरच आंबेडकरी चळवळ या देशात क्रांतीचे नेतृत्व करू शकेल. आणि तोवर क्रांतीही इथे होऊ शकणार नाही. आंबेडकरी चळवळीवर ही ऐतिहासिक जबाबदारी आहे.

□ □

# सामाजिक विषमता आणि धर्मांतर

मागल्या काही दिवसात दलित शोषित मंडळींपैकी अनेक लोक धर्मांतर करीत आहेत. ही बाब समग्र देशभर एक चिंतेचा विषय अनेकांसाठी झालेली आहे.

हिंदुधर्मातील अनेक जाणती मंडळी आधुनिक काळामध्ये इसाई, बौद्ध, इस्लाम झाली. ह्या धर्मांतरात बौद्धधम्माचा स्वीकार हे अलीकडील काळातले ऐतिहासिक धर्मांतर होय.

मध्ययुगात भारतातील दीनदलित समाज इस्लाम धर्मामध्ये बहुसंख्येने गेला. ही सगळी धर्मांतरे आणि डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या लक्षावधी लोकांसोबतचे अलीकडील धर्मांतराच्या पार्श्वभूमीवर आज होत असलेल्या इस्लाम धर्म स्वीकाराची मीमांसा झाली पाहिजे.

इस्लामचा स्वीकार भारतामध्ये प्रारंभीच्या काळात इस्लाम आले तेव्हा वर्णव्यवस्थेच्या पायाखाली चिरडल्या जाणाऱ्यांनीच केला होता. मलीक अंबर आणि मलीक खुसरो हे मूळचे अस्पृश्यच. पण इस्लाम धर्म स्वीकारल्यानंतर झालेले राजे.

इस्लामने त्या काळात ह्या समाजाची समतेची भूक तहान भागविली. आजची बहुतांश इस्लामधर्मीय मंडळी हे मूलत: मागच्या काळातील दीनदलित आणि अस्पृश्य होत. येथील दलित अस्पृश्यांचे आणि मुसलमानांचे शतकानुशतकांचे ऋणानुबंध आहेत, हे इतिहाससिद्ध झाले आहे.

दलितांना इस्लामबद्दल जिव्हाळा वाटतो त्याचे कारण एकाबाजूने हे नाते आणि दुसऱ्या बाजूने शहरातील, खेड्यातील दलितेतरांबद्दल त्याला कायम मिळणारी तुच्छतेची वागणूक आणि तिसऱ्या बाजूने देशभर दलितांचे होणारे शिरकाण अशी ज्वलंत पार्श्वभूमी ह्या धर्मांतरामागे आहे.

धर्मांतर फक्त बौद्ध न झालेलेच दलित करीत नाहीत तर काही प्रमाणात बौद्धधम्म स्वीकारलेलेही इस्लाम धर्म स्वीकारीत आहेत. एकाच वेळी कुठेतरी बौद्धधम्म तर कुठे तरी हिंदूधर्म सोडला जातो आहे म्हणजेच इथला मुद्दा केवळ हिंदु धर्माच्या चिकित्सेचाच नाही तर डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या बौद्ध धम्माच्या

चिकित्सेचा होऊन जातो. ह्या संदर्भात बौद्ध धम्म न घेता इस्लाम धर्म घेण्याची गरज बौद्धधम्माची जगातील प्रतिष्ठा लक्षात घेऊनही दलितात निर्माण झाली असेल तर ही निश्चितच एक ऐतिहासिक घटना आहे असेच म्हणावे लागेल.

बौद्ध धम्माच्या स्वीकारापेक्षा इस्लाम धर्माचाच स्वीकार हिंदू सनातन्यांना अधिक चिंतास्पद वाटतो आहे. मध्ययुगापासून आतापर्यंत जेव्हा जेव्हा माणसे इसाई, इस्लाम व बौद्ध झाली तेव्हा तेव्हा हिंदू धर्मीयांनी धर्मांतरास विरोध केलेला आहे. सावरकरांसारखी अनेक माणसे बाबासाहेबांना बौद्ध होऊ नका असे सांगत होती. पण बौद्धधर्म घेतल्यानंतर मात्र ह्या सर्वच हिंदुत्वनिष्ठांनी बौद्ध धर्म हा हिंदूधर्माचाच एक भाग आहे असे सांगून समाधान मिळविले.

इस्लामची स्थिती तशी नाही. मध्ययुगातील हिंदूशी जो इस्लामचा संबंध आला तो सगळा संदर्भ इस्लामच्या विरोधाच्या मुळाशी उभा असतो आणि म्हणून बौद्ध धर्माचा स्वीकार आणि इस्लामचा स्वीकार ह्या दोन गोष्टी एकाच मापाने मोजता येणार नाहीत हे हिंदूंनी मान्य केले पाहिजे. त्याशिवाय काही ते या निमित्ताने एवढे भयभीत झाले नसते.

ह्या देशातील बहुसंख्यांकाच्या सामूहिक इस्लाम स्वीकारामुळे देशाच्या भवितव्यावर आमूलाग्र प्रभाव पडू शकतो. धर्मनिष्ठ असलेल्या ह्या देशामध्ये कुठलाही पुरोगामी कार्यक्रम व लोकशाहीसुद्धा यशस्वी व्हायची असेल तर हिंदू धर्माला तुल्यबळ असा विरोधी धर्म असला पाहिजे. ह्यामुळे एका बाजूला हिंदू धर्माच्या सुधारणेला मदत होईल. ह्या धर्मविग्रहामधून नवा माणूस. नवी संस्कृती, नवा समाज उजळून निघेल.

बौद्ध धम्माचा स्वीकार आणि इस्लाम धर्माचा स्वीकार ह्या दोन्हीमागील प्रेरणा न्यायाची, समतेची, सुरक्षिततेची आहे. परंतु बौद्ध धम्माचा स्वीकार एका महान नेत्यांच्या आदेशाचा भाग होता तर इस्लामचा स्वीकार एका परिस्थितीच्या आदेशाचा भाग आहे.

पैशाच्या लोभाने हे धर्मांतर होत आहे हा दांभिक प्रचार आहे. ज्या आशेने ही मंडळी इस्लामकडे जात आहेत, ते जर हिंदू समाजव्यवस्थेतच त्यांना मिळाले तर धर्मांतराचा प्रश्नच निर्माण होणार नाही. धर्मांतराची गरज ही माणुसकीच्या-समतेच्या तहानभुकेतून निर्माण झाली आहे हे नाकारता येत नाही.

धर्मांतर हा राष्ट्रद्रोह आहे किंवा ते राष्ट्रविघातक कृत्य आहे अशी जर कोणी भूमिका घेत असेल तर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे ह्या

घडलेल्या द्रोहाची जबाबदारी दलितांपेक्षा ज्यांनी मानवताद्रोह केला, दलितांचे शिरकाण केले व माणुसकीचा घात केला त्या हिंदुत्ववाद्यांची अधिक आहे.

दलितांनी धर्मांतर करू नये असे सांगणे म्हणजे तुम्ही तिरस्कृतच राहा, आमचा अन्याय सहन करीतच राहा. समतेचा, न्यायाचा तुम्हाला अधिकार नाही आणि ह्या विषमतारूपी नरकातच तुम्ही सडत रहा असे दलितांना सुचवणे होय असे मला वाटते.

□ □

# राष्ट्रीय एकात्मता : एक अन्वयार्थ

'राष्ट्रीय एकात्मता,' या दोन शब्दातील एकात्मता हा शब्द वापरणे प्रबोधनप्रियांना योग्य वाटू नये. एकात्मता शब्दात आत्मा हा शब्द आहे आणि ही येथील अध्यात्मातील कर्मविपाकाशी संबंधित म्हणजे वर्णव्यवस्था प्रमाण मानणाऱ्या व्यवस्थेशी संबंधीत कल्पना आहे. आत्मा न मानता वर्णव्यवस्था मानता येणे कठीण. वर्ण, जाती या गोष्टी आत्मतत्वानेच जन्माला येऊ शकतात. टिकू शकतात म्हणून येथील चिरंतन विषमतेच्या मुळाशी अमर आत्म्याची कल्पना आहे. आत्मा हा शब्द त्यामुळेच प्रबोधनप्रियांना अत्यंत भयानक आहे असे वाटले तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.

एकात्मता हा शब्द दुसऱ्या अर्थी वापरून पाहिला तर भारत एकात्म आहे म्हणजे एकच एक परम आत्मा इथल्या चराचरात भरला आहे. हे सर्व व्यापूनही तो उरला आहे असे स्पष्ट होते. म्हणजे मग चिद्‌विलासवादच. चैतन्यवादच. म्हणजे ब्रम्हवादच. म्हणजे पुन्हा परमात्मशक्ती सर्वकर्ती म्हणून मान्य करावी लागते. ती सर्वकर्ती म्हणून मग जीवनातील सगळ्या प्रकारची वास्तवे तिनेच निर्माण केली आणि तीच त्यांचे नियंत्रण करते. ही सर्व वास्तवे मग ईश्वरकृत म्हणून रास्तच नव्हे तर न्याय्यच ठरतात. मग बदल करण्याची भाषा बंद होते. सुधारणा शब्द बाद होतो. क्रांती या शब्दाला वांझपण बिलगते कारण प्रत्येकात परमात्म्याचा अंश म्हणजे आत्मा आहे. ह्या अर्थाने या देशात नेहमीच एकच आत्मा सर्वत्र असल्याने एकात्मता होतीच, आहेही. परमात्म्याचा अंश असलेले आत्मे पूर्व जन्मातील कर्मफले भोगीत असतात. दुःखे, दैन्य उपमर्द भोगीत असतात. कोणी अस्पृश्य असतात, कोणी आदीवासी असतात. नरकात जगत असले तरी असतात ते एकाच परमात्म्याचे अंश म्हणजे आत्मे. एकाच परमात्म्याची आत्मारूपी रूपे म्हणून सर्वत्र एकात्मता असतेच. मग एकात्मता प्रस्थापित करण्याचा मुद्दाच उपस्थित होत नाही. उरते फक्त एकच काम ज्या कोणी जाती, वर्ण तोडण्याचा, विषमता संपवण्याचा प्रयत्न केला ते फुले असोत, बुद्ध असो किंवा आंबेडकर असोत त्यांनीच वरील अर्थाच्या एकात्मतेला जखमा केलेल्या असतात. या असल्या पाखंड्यांनी केलेले कुसंस्कार पुसून टाकणे, त्यांनी केलेल्या कार्यावर बोळा फिर-

विणे एवढेच कार्य राष्ट्रीय एकात्मता सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने उरलेले असते. पण मग आपण एकात्मता या शब्दाचा वरील अर्थ स्वीकारणार आहोत काय असा प्रश्न उभा राहतो. ती एकात्मता स्वीकारायची असेल तर (आणि अनेक जणांची या देशात राष्ट्रीय एकात्मता आहेच, होतीच ही आग्रही भूमिका आहे) मग आगरकर, फुले, आंबेडकर, बुद्ध हे या एकात्मतेचे शत्रू होत असेही मानावे लागेल आणि असे मानणारे लोक आपल्या आजूबाजूला नाहीतच असे नाही.

पण जे आपण स्वतःला पुरोगामी समजतो, क्रांतीकारी समजतो त्यांनी वरीलप्रमाणे भूमिका घ्यावी का? एकात्मता जी अध्यात्मवाद्यांना आहेच असे वाटते–आणि त्यांना तसे वाटणे रास्तच आहे–ती एकात्मता स्वीकारायची काय? आत्मा शब्द असलेला एकात्मता हा शब्द आपण स्वीकारला की वरील प्रकारची एकात्मता गृहीत धरावीच लागते. प्रश्न उरतच नाही. उरतात फक्त उत्तरे. म्हणूनच मग विषमता असलेली समाजरचना एकात्म राष्ट्र म्हणून स्वीकारावी लागते. वर्णव्यवस्थायुक्त रचना एकात्म राष्ट्र म्हणून स्वीकारावी लागते. वर्णव्यवस्थायुक्त समाज हाच एकात्म समाज होय. आणि विविध जातींनी-युक्त, विषमतांनी ठसठसणारा समाज हा एकात्म समाज होय असे म्हणावे लागते. आणि होणारे अत्याचार, होणारे अन्याय हे एकात्म समाजातील न्याय्य असे परमेश्वरी शासन होय असे मानावे लागते. फुले, आंबेडकरांना ते या दैवी शासनाविरुद्ध बोलले म्हणून थोर अपराधी ठरवावे लागते.

पण आपणापैकी काहींना हे निश्चितच पटणार नाही. जाती ठेवून, वर्ण ठेवून, विषमता ठेवून एकात्मता आहे असे प्रतिगाम्यांनी, अध्यात्मवाद्यांनी म्हटले तर आपणास ते पटणार नाही. जाती नको, वर्ण नकोत, विषमता नको असेच आपण म्हणणार. आणि असे आपण म्हणणार असू तर एकात्मता हा शब्दही आपण वर्ज्य ठरवून आपण ऐक्य शब्द वापरू किंवा एकोपा शब्द वापरू.

आता प्रश्न असा की या देशात ऐक्य आहे काय? तर वेडा नसलेला कुणीही माणूस किंवा मूर्ख नसलेला कुणीही या देशात ऐक्य नाही असेच म्हणेल. भावनांच्या संदर्भात या देशातील माणसे अनेक हवाबंद बेटांवर विभागलेली आहेत. जेवढ्या जाती या देशात आहेत तेवढ्याच या देशाला जखमा आहे. एकेक जात म्हणजे एकेक जखम, हा असा जखमांचा देश आहे. वेदनांचा देश आहे. एकेक जात म्हणजे एकेक वेदना. या देशात ऐक्य आहे हे पटवून घेता येणे कसे शक्य आहे? धर्मावरून माणसे रक्ताचा पाऊस पाडतच आहेत. जातीवरून माणसे

एकमेकांची घरे-आयुष्ये जाळतच आहेत. सामाजिक-सांस्कृतिक अहंकाराची कडक दारू पिऊन माणसे एकमेकांची मने जाळीतच आहेत. स्त्रियांची धर्माच्या नावाखाली कुचंबणा होतेच आहे. परवाच एका सावित्रीला जबरदस्तीने पतीच्या चितेत जाळले गेलेच आहे. आदिवासी आहे तिथेच आहे. कोणी धर्मदत्त जागा सोडली की त्याला आयुष्यातून उठवण्याच्या योजना कार्यान्वित होतच आहेत. रक्त, चिध्या, राख, यातना, जखमा, क्रूरपणे सगळे सुरूच आहे. ते राष्ट्रीय ऐक्य असल्यामुळेच काय ?

काही महाभागांची विषमतेचे समर्थन करण्याची शैली मोठीच जिदातिली-स्मात असते. तिला मौडी शैली असे म्हणतात. या देशातील विविधतेचा त्यांना अपार अभिमान असतो. अशी विविधता जगाच्या पाठीवर कुठे आहे काय असा चकित करणारा मूलभूत प्रश्नही ते आग्रहाने टाकत असतात. विविधता म्हणजे काय ? तर सामाजिक-आर्थिक स्तर, जाती, अस्पृश्यता, वर्ण, श्रीमंती, दारिद्र्य, वैभव आणि हाल, अंधार आणि उजेडाचा गैरवापर, दुःखाचे डोंगर आणि सुखांची नासधूस. ही देखणी विविधता म्हणजे अभिमानाची बाब होय असे अनेकांना या देशात वाटते. आता विविधतेचा अभिमान म्हणजे जाती-वर्णव्यवस्थेचा अभिमान, विषमतेचा सुंदर म्हणून अभिमान. अस्पृश्यतेचा सुरेख म्हणून अभिमान आणि विविधतेचे पुरस्कर्ते हे मनापासून मानतही असतात.

तेव्हा एकता जपायची म्हणजे विविधता जपायची. विविधता जपायची म्हणजे वर्ण जपायचे. विविधता जपायची म्हणजे जाती जपायच्या. विविधता जपायची म्हणजे सर्व प्रकारचे पंथ, धर्म जपायचे. देव-दैवते, मंदिरे, मशीदी, चर्चेस जपायच्या. विषमतेचा तिरस्कार करणारे अल्पसंख्य आणि विषमतेचा पुरस्कार करणारे बहुसंख्य धर्मग्रंथ, वाङ्मय, महापुरुष, परंपरा, संस्कृती जपायची. विविधता जपायची म्हणजे वरील सर्वांनी या देशाच्या काळजाला केलेल्या जखमा जपायच्या. विविधता जपायची म्हणजे वंदनीय म्हणत म्हणत अन्याय, अत्याचार जपायचे. सर्व अमानुष प्रवृत्ती, प्रतिगामी शक्ती जपायच्या. बहुसंख्यांकांमधील देवभोळेपणा, अडाणपणा अंधश्रद्धा या गोष्टी जपायच्या. विविधता जपायची म्हणजे पेशवाई जपायची.

भारतीय अध्यात्माच्या कृपेत बहरणाऱ्या काही धूर्तांनी या विविधतेचा एकता म्हणून उलटा प्रकार सुरू केला आहे. विविधता वंदनीय मानणाऱ्यांचे हेतू समतेच्या निर्माणाचे असत नसतात. समता निर्माणाचे हेतू बुद्ध-फुल्यांचे-आंबेडकरांना मानतात काय ? विविधता मानणारे बुद्धाला-फुल्यांना-आंबेड-

करांना मानतात काय ? आणि बुद्ध–फुले–आंबेडकर जर ते मानत असतील तर विषमता सांगणाऱ्यांना ते कसे मानू शकतात ? **बुद्ध आणि मनु यांना एकाच वेळी मानता यायचे नाही.** बुद्ध आणि ईश्वर–कर्मविपाक एकाच मनात कसे ठेवता येतील. आंबेडकर आणि ज्ञानेश्वर, रामदास एकाच हृदयात एकत्र कसे राहतील ? म्हणजे निवड करावी लागेल. काळे, गोरे वेगवेगळे करावे लागतील, मागे जाणारे आणि पुढे येणारे, स्थितीवादी आणि गतीवादी असे विभाग पाडावे लागतील. कुठला तरी एक विभाग मानावा लागेल. राष्ट्रीय ऐक्याचा आधार समता-स्वातंत्र्य-बंधुता हीच मूल्ये असतात. कर्मविपाक, वर्णव्यवस्था व जाती ही मूल्ये राष्ट्रीय ऐक्याचा आधार कुठल्या सबबीवर होऊ शकतात ? कुठल्याही तर्काने ही मूल्ये राष्ट्रीय एकतेचा आधार–प्राण होऊ शकत नाही. ही मूल्ये ऐक्याचा जीव फक्त यशस्वीपणे घेऊ शकत असतात. राष्ट्राचे राष्ट्रपण विषमतेच्या जुगारात मांडत असतात. ही मूल्ये राष्ट्रीय ऐक्याची केव्हाही शत्रूमूल्येच असतात. तेव्हा राष्ट्रीय ऐक्य मारणारी राष्ट्रीय ऐक्याची शत्रूमूल्ये प्रस्थापित व्हावी, जन्मावी असे वाटत असेल तर या मूल्यांना जाळून किंवा पुरून टाकावे. या मूल्यांची बाजू घेणारे जे जे, ज्या ज्या रूपात असेल ते ते सर्व–ऐक्याचीच एवढी चूज असेल तर–मनामनातून गाडून टाकावे. आणि राष्ट्रीय ऐक्य जन्माला आणू शकणारी, त्यांना जगवू शकणारी मूल्ये जी असतील त्यांची यादी करावी आणि मनामनात ती शुभमूल्ये म्हणून पेरण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा.

अस्पृश्यता पाळणाऱ्याला शासन शिक्षा करते. पण अस्पृश्यता ज्यांनी निर्माण केली, पाळली, पोसली त्या धर्मग्रंथांना कोणती शिक्षा असू शकते ? अस्पृश्यता पाळणारे, समर्थिणारे महापुरुष आणि ईश्वर, आणि परंपरा यांनाही कोणकोणत्या प्रकारे शिक्षा दिल्या जाऊ शकतात त्याचाही विचार व्हावा. पण जाती पाळणे, विषमता सांगणारे देव, धर्म, परंपरा, धर्मग्रंथ मनात जपणे आणि राष्ट्रीय ऐक्याची भाषा बोलणे हा प्रकार फक्त विनोदाची लव्येत बुरस्त करू शकेल. हे लक्षण फक्त दांभिकता या भयानक रोगाचे असते. ते ऐक्याचेच नाही तर राष्ट्राचेही दुष्मन असतात. ते राष्ट्र पंगू करतात. देश बुडवतात. ते फक्त स्वार्थाच्या गावांचे नाबाडी असतात. ते समाजच नव्हे तर समाजाचे चारित्र्यही कुरूप करीत असतात. त्यांना राष्ट्रीय एकता नकोच असते. राष्ट्रीय एकता नको असलेले कुणी म्हणू नये म्हणून ते राष्ट्रीय एकतेचा मंत्र बुद्धयाच बरळत असतात. मनातून हवा असतो, पूजनीय असतो तो परंपरावाद. आणि सर्वठाई परमात्मा हीच राष्ट्रीय एकात्मता त्यांच्या लेखी असते आणि तीच त्यांना हवी असते.

राष्ट्रीय एकता म्हणजे परस्पर बंधुता, परस्पर सहकार, परस्पर सद्भाव या गोष्टी ज्या एका विशिष्ट भूभागातील समाजात असतात त्या समाजालाच राष्ट्र असे म्हणतात. ऐक्य नाही तिथे राष्ट्र नाही. आणि राष्ट्र असेल तर ऐक्य असलेच पाहिजे. या देशात बंधुभाव फक्त झाडांमध्ये आहे. गुराढोरांमध्ये ऐक्य आहे. ती परस्परांच्यामध्ये अस्पृश्यता, जाती पाळीत नाहीत. तेव्हा आपल्या देशात ऐक्य नसेल तर केवळ ऐक्यच प्रस्थापित करून राष्ट्र सिद्ध करता येते. 'राष्ट्रीय ऐक्य' हे शब्द 'गाईचे गोमुत्र' या शब्दांसारखे आहेत. किंवा रायटिंगमध्ये लिहून दिल्यासारखे आहेत. राष्ट्र वेगळे उभारावे लागत नसते, नवराष्ट्र वेगळे सिद्ध करावे लागत नाही. परस्पर स्नेह, बंधुत्व, सहभाव निर्माण झाला, असे ऐक्य निर्माण झाले की राष्ट्र वेगळे असे बांधावे, घडवावे लागत नाही. विजेचे बटन एकीकडे ऑन केले की नंतर ट्यूबला किंवा बल्बला जशी आगपेटीची काडी लावून पेटवावे लागत नाही तसे हे आहे.

आज धर्मसंस्थेचे कार्य संपलेले आहे. ती गतार्थ झाली आहे. ज्यावेळी शासन नव्हते. नियंत्रक राज्यसंस्था नव्हती तेव्हा लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी धर्मसंस्था उपयोगी होती. पण धर्मसंस्थेचा आपल्या देशात खूप चमत्कारिक पद्धतीने उपयोग करून घेतला गेला आहे. विषमता पोसून स्वार्थ भाजण्यासाठी काहींनी या धर्मसंस्थेला अंगाखाली घेतले त्या प्रमाणात येथले जीवन जडमूढ झाले, अगतिक झाले. आता शासन आहे, सरकार आहे, आता धर्माची गरज काय ? कर्मविपाकाचाच कायदा पाळायचा असेल तर न्यायसंस्था, पोलीस विभाग कशासाठी ? एखादा बदमाश एखाद्या बाईवर बलात्कार करतो. प्रत्येकामध्ये आत्मरूपाने ईश्वर आहेत याचा अर्थ एक ईश्वर दुसऱ्या ईश्वरावर बलात्कार करतो. कुणीतरी कुणालातरी अस्पृश्य मानतो. याचा विटाळ त्याला होतो. याचा अर्थ एका परमेश्वराचा दुसऱ्या परमेश्वराला विटाळ होतो. एखादा माणूस दारू पिऊन घरच्या बाईला झोडपतो म्हणजे एक ईश्वर दारू पिऊन दुसऱ्या ईश्वराला झोडपतो. एखादी बाई वेश्या–व्यवसाय करते म्हणजे परमेश्वर वेश्या व्यवसाय करतो. एखादा तरुण चिडीमारी करतो म्हणजे परमेश्वरच चिडीमारी करतो. एखाद्याच्या हाताने एखाद्याला मृत्यू येतो म्हणजे एकाच्या हाताने एक परमेश्वर मरून जातो. आणि ही सुद्धा राष्ट्रीय एकात्मताच होय. ती प्रतिगाम्यांच्या मनात घर करून राहिलेली असते. अशावेळी शासन गुन्हेगारांना शासन करते याचा अर्थ शासन कर्मविपाक मानत नाही. ईश्वराच्या विरुद्ध जाते. बुद्ध–फुल्यांच्या–आंबेडकरांच्या ऐक्याच्या कल्पनेला अनुसरते. ईश्वरी कर्मविपाकाच्या शासनाला पूर्वजन्मानुसार भोगाव्या लागणाऱ्या

भोगाला न्याय समजून शासन शांत बसत नाही. याचा अर्थ शासन कर्मविपाक मानत नाही. ऐक्यासाठी बुद्ध–फुले–आंबेडकर–आगरकर झगडले. शासनही त्यासाठीच कार्यतत्पर आहे. फुले–आंबेडकरांची मूल्येच ऐक्याचा आधार ठरतात. कर्मविपाक, विषमता, ईश्वर, वर्ण–जातीव्यवस्था ही मूल्ये काही जणांची असतील, काही गटांची असतील, कुण्या धर्माचीही असतील पण एकतेची ही मूल्ये नसतात. हे आजच्या शासनानेही मान्यच केले आहे. तेव्हा पर्यायाने हे स्पष्ट होते की राष्ट्रीय एकतेच्यासाठी फुले–आंबेडकर यांनी पुरस्कारलेली जीवनमूल्येच उपयुक्त आहेत–पुरस्करणीय आहेत. इतर नाहीत.

# प्राध्यापकांचे रामचंद्राला साकडे

प्राध्यापकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्याची प्रभू रामचंद्राने सरकारला सद्‌बुद्धी द्यावी म्हणून अर्थात शासनाचा एक सन्माननीय भाग असलेले ना. नरसिंहराव यांचे मन:परिवर्तन करण्यासाठी रामटेक येथे प्रभूला साकडे घालण्यात येईल ही बातमी परवाच्या (१८-८-८७) दै. लोकमतमध्ये वाचली आणि कालच्या लोकमतात साकडेकरी प्राध्यापकांचा फोटोही बघितला. या बाबींमुळे एक दु:खद कृतार्थता वाटली. साकडेइलाज बारहातेंना उशिरा सुचला याचे दु:खही वाटले. हा रामबाण उपाय आधीच सुचला असता तर संप करायची गरजच भासली नसती. इतके दिवस संप करीत राहण्याचेही प्रयोजन उरले नसते. पण उशिरा का होईना नूटाचे सचिव डॉ. बारहाते यांना हा जालीम साकडे-इलाज सुचला त्यामुळे मन खिन्नतेने प्रफुल्लीत झाले.

ही बातमी वाचून प्रथम वाटले की कुठलाही विलंब न लागता आता मागितलेल्या व न मागितलेल्या आणि पुढील काळातीलही सर्व प्राध्यापकांच्या मागण्या फट्‌दिशी मान्य होणार. कारण प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र म्हणजे काही प्राध्यापकांचा खेळ नव्हे. यासंदर्भात आठवला तो रामाचा शंबूकासकट अनेकांना मारणारा पराक्रम. शत्रूंची मुंडकी उडत आहेत. शरीरांची धुडे पडत आहेत असे मोठे वीरश्रीयुक्त चित्र दिसले. आणि प्राध्यापक बांधवांच्या या साकड्यामुळे एखादेवेळी कुणाचा आधुनिक शंबूक होईल की काय या चिंतेने मन भांबावूनही गेले. पण लगेच वाटले असे होणे शक्यच नाही कारण हे टाळण्यासाठी विद्यापीठ परिसरात एखादा महायज्ञ करण्याचाही निर्णय प्राध्यापक घेऊन टाकतील. त्यामुळे अनर्थ असा काहीच घडायचा नाही. शिवाय पुढल्या काळात दरवेळी रामाला साकडे घालायला रामटेकला जायला प्राध्यापकांना शक्य होणार नाही म्हणून भारतातील प्रत्येक विद्यापीठात, डॉ. बारहाते असल्याने विशेषत: नागपूर विद्यापीठात रामाचा वानर, राक्षस व दंडकारण्य यांच्यासह तपशिलवार पुतळा उभारण्यात यावा असेही वाटले.

दुसऱ्यांदा असे वाटले बारहाते आणि इतर सर्व साकडेकरी प्राध्यापक यांनी साकडे घालण्याचा निर्णय फार विचारपूर्वक घेतला असे वाटत नाही. कारण

अन्यायग्रस्तांची आणि भक्तांची दु:खे दूर करण्यासाठी भारतात आता संतोषी माता हीच सर्वात एकमेव प्रसिद्ध अशी देवता आहे. पुराव्यादाखल भारतात सर्वात जास्त चाललेला संतोषी माता हा चित्रपट पाहिला तरी वरील विधानाबद्दल संशय उरणार नाही. भाविकांचे आजच्या जमान्यातले सर्वात विश्वासार्ह आश्रयस्थान आता संतोषी माता झाली आहे. संतोषी माता तातडीने मदत करते (पहा किंवा ऐका : मदत करो संतोषी माता हे गीत). याचा अर्थ भाविकांच्या आजच्या युगाचे नाव संतोषी माता हे झाले आहे. तेव्हा बारहातेंना या असूरमर्दिनी चमत्कारविलासिनी आणि सर्वशक्तीशालीनी संतोषी मातेचे नाव साकडे घालायला आठवू नये याबद्दल वाईट वाटले. पारडसिंग्याची सती अनूसया तसेच टाकळघाटचे विक्रू हे संतोषी मातेच्या तुलनेत ज्युनिअर लेक्चरर वाटतात. याना या संपात ओढले गेले नाही हे बरेच झाले. पण संतोषी माता या पोस्ट ग्रज्युएट देवतेचा विसर बारहातेंना पडावा ही गोष्ट प्राध्यापकांच्या हिताची नाही हे भारतातील सर्व दूरदृष्टीच्या प्राध्यापकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

पुढे वाटले, रामाचा विद्यापीठाशी काय संबंध ? रामचंद्र काय विद्यापीठपती आहेत ? पण संबंध आहे. प्राध्यापकांच्या संपासंबंधी अत्यंत युगप्रवर्तक निर्णय अत्यंत सन्माननीय पद्धतीने घेणारे ना. नरसिंहराव हे रामटेकच्या रामाच्या कृपनेच निवडून आलेले आहेत. हा सूक्ष्मसंबंध मनात बाळगावा नि हेही लक्षात ठेवावे की इथेच बारहाते दुसराही थिसीस सूचीत करीत आहेत तो हा की कोणालाही निवडून येण्यासाठी रामटेकच्या प्रभूरामचंद्राची कृपा प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढे विदर्भाचा फायदा एवढाच होणार आहे की कोणत्याही निवडणुकीच्या वेळी रामटेकला उमेदवारांच्या भजनमंडळांची गर्दी होईल. आणि रामटेकाला 'निवडणूक उमेदवारांचे पंढरपूर' अशी पदवी मिळणार. नागपूर विद्यापीठाला ही बाब अंतिमत: भूषणावहच ठरणार आहे.

प्राध्यापकांचा मागल्या अनेक दिवसांपासून चाललेला संप भारतातील राजकारणी, समाजकारणी, शिक्षक आणि विद्यार्थी अशा काही निवडकांपुरताच मर्यादित होता. पण आता या साकड्याच्या निमित्ताने संपाची वार्ता सर्व मानवेतर देवतांमध्ये आपोआपच पसरली आहे. साकडे घातल्याने प्रथम ही वार्ता रामाला व आपातत: रामाशी निगडीत वानर, राक्षस, भरत, लक्ष्मण आणि अशाच स्वर्गातील सर्वच देवीदेवतांनाही कळणार आणि या संपाची चर्चा जशी मानवलोकात चाललेली आहे तशीच ही चर्चा आता देवलोकातही धडाक्याने सुरू

होणार तिकडील वर्तमानपत्रेही या चर्चेने भरून निघणार, त्यामुळे एकाच वेळी या संपाची स्वर्ग, मृत्यू आणि पाताळातही जाहिरात होणार.

लोकमतचे आभार यासाठी की ही मार्मिक बातमी लोकमतद्वारा आमच्यापर्यंत आली. मागील अनेक वर्षांमध्ये अशी मौलिक नि गंभीर बातमी वाचली नव्हती. या तोलामोलाची एक बातमी मागे काही वर्षांपूर्वी वाचली होती ती विजेच्या संदर्भात. वीज रामटेकच्या मंदिरावर पडली. (म्हणजे पडली नाही.) मोठ्या नाट्यमय पद्धतीने पडली. उत्कृष्ट दिग्दर्शन आणि अंगभूत अभिनयकौशल्य यांची जोड विजेला मिळाल्याने तिने रामाच्या मंदिराला प्रदक्षिणा घातली आणि रामाच्या चरणाजवळ ती जाऊन पडली. कुठेच कुणाला, कशाला इजा नाही. हा रामभक्त वीज होती. त्यावेळी वाटले होते इतर विजांनीही या विजेचे अनुकरण करावे. आपले जीवन याच्यावर पड त्याच्यावर पड, याला मार त्याला मार या अतिरेकी पद्धतीने घालवण्यापेक्षा या विजेप्रमाणे आपल्या आयुष्याचा उद्धार करून घ्यावा. प्रभूला प्रिय होणे जमेल असे पडावे. अन्यथा इतर साध्या पडण्यांना कोण विचारतो? तेव्हा आपला प्राध्यापक या युगातही कोणत्या सुखात आहे ते लोकमतच्या या वार्तेशिवाय आम्हाला कळले नसते. म्हणून लोकमतचे आभार.

देवीदेवतांच्या नादात केवळ आमजनताच नादावत असते असे नाही तर आपला भारतीय प्राध्यापकवर्ग या आमजनतेलाही नागे टाकण्याचे सामर्थ्य याबाबतीत बाळगून आहे असेच हे साकडे-प्रकरण छातीठोकपणे सांगत आहे.

आपल्या मागण्यांसाठी खेडूत माणूस देवाकडे धाव घेतो हे आपण ऐकतो. पण प्राध्यापक म्हणजे बुद्धिजीवी, विचारवंत, पिढ्या घडवणारा विवेकवादी, डोळस. पण हा प्राध्यापकही एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभा राहून आपले सर्व आधुनिक ज्ञान देवादिकांची दारे ठोठावण्यासाठीच वापरीत आहे. या देशातला देवभोळा अडाणी मनुष्य आणि प्राध्यापक यांच्या जाणिवेत कोणताही फरक नाही. अडाणी मनुष्य प्राध्यापकासारखा वागतो आहे की प्राध्यापक अडाणी माणसासारखा वागतो आहे? नेमके काय होते आहे?

प्राध्यापक हा पिढ्यांचा शिल्पकार व बुद्धिजीवी असल्याने या 'साकडेकरी' प्राध्यापकांची कृती देशातील सर्व क्षेत्रातील लोकांपुढे मॉडेल म्हणून ठेवण्यात यायला हवी. परंतु कोणत्या क्षेत्रातील लोकांनी कोणकोणत्या देवापुढे साकडी घालावी याचाही तपशील निश्चित होणे आवश्यक आहे. कारण हे झाले नाही

तर काही देवांवर अन्याय होणार. तर काहींच्या कामाचा बोजा वाढणार. मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध अशा वेगवेगळ्या लोकांनी कोणाकोणापुढे साकडी घालावी तेही ठरवून द्यायला हवे. आणि जे कोणाही देवापुढे साकडे घालू इच्छिणार नाही अशा लोकांनी इतर साकडे घालीत असतील तेव्हा काय करावे तेही स्पष्ट निर्देशिले जायला हवे. अरविंद बारहाते यांनी हे केले असते तर त्यांच्या वक्तव्याला पूर्ण थिअरीचे रूप आले असते. आहे त्या स्वरूपात त्यांचा विचार अत्यंत त्रोटक आहे असेच म्हटले पाहिजे.

पुढे असेही वाटले की देशाच्या संरक्षणाचा प्रश्न, पंजाबचा व आसामचा प्रश्न, लंकेचा व दलित आदिवासींचा प्रश्न, आणि शिवाय स्त्रियांचे अत्यंत भयानक असे नाना प्रश्न आहेत आणि त्यांच्या सोडवणुकीसाठी विविध माणसे, संघटना उगीचच शक्ती खर्च करीत आहेत. मानवी प्रयत्नांनी हे प्रश्न सुटतच नाहीत. ते लोंबकळतच राहतात. तेव्हा हे सर्व प्रश्न अन्यायकर्त्यांना सद्बुद्धी लाभून तडकाफडकी सुटावे यासाठी साकडे–कार्यक्रम हा महत्वाचा एकमेव उपाय ठरू शकेल. तेव्हा मानवी प्रयत्नांना रद्दबातल ठरवून या साकडेउपायाचा सर्व देशवासियांनी अवलंब करावा. घटनेत तसे कलमच घालावे. त्याशिवाय इतर उपाय कोणी केले तर त्याला फाशी नाही तरी अद्दल घडेल अशा महत्वाच्या शिक्षा देण्याची कठोर तरतूद करावी. या साकडे उपायाचा विविध प्रचार-माध्यमांच्या द्वारा सतत प्रचार करावा व हा उपाय लोकप्रिय करावा. कारण त्याशिवाय काही समाजाचे प्रश्न सुटत नाहीत.

आजवरच्या प्रज्ञा–प्रतिभांना जे सुचले नाही ते या संपामुळे बारहाते यांना सुचले, या संपाच्या समुद्रमंथनातून हे ' साकडेरत्न ' या देशातील लोकांना मिळाले. आता चिंता नाही. त्यामुळे या संपाचे व रामभक्त बारहाते यांचे सर्वत्र अभिनंदन केले पाहिजे.

□ □

# विशाल हिंदू संमेलन, हिंदू व्होट बँक

### प्रश्न : श्याम पाढरीपांडे

(१) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आजकाल हिंदू व्होट बँक संकल्पनेचा धडाक्याने प्रसार करीत आहे व हिंदूंनी हिंदू म्हणून मतदान करावे, जो उमेदवार हिंदू हितरक्षणाची हमी देईल त्यालाच मते द्यावीत असे आवाहन करीत आहे. भारतीय जनता पक्ष देखील हिंदुत्वाची भाषा उघडपणे बोलत असून संघ व भाजप आता संयुक्तपणे जाहीर सभा व इतर कार्यक्रमांचे आयोजन करीत आहेत. ह्याबद्दल आपली प्रतिक्रिया ?

(२) शासनाने व शासकपक्षाने सातत्याने अल्पसंख्यांकांचा अनुनय केला असून ह्या तुष्टीकरणाच्या धोरणामुळे फुटीरतेस प्रोत्साहन मिळून देशाचे नुकसान झाले आहे अशी संघाची भूमिका आहे. ह्याबद्दल आपला अभिप्राय ?

(३) अल्पसंख्यांनी आपल्या गठ्ठा मतांच्या शक्तीचा वापर करून फायदे मिळवून घेतले आहेत परंतु हिंदू समाजाने असे आजपर्यंत न केल्यामुळे त्याचे नुकसान झाले आहे. आपल्या स्वतःच्या देशातच उपरे, परके अशी स्थिती हिंदू समाजाची झाली आहे. सर्व अल्पसंख्यांकांची बेरीज एका बाजूला आणि हिंदू समाज एका बाजूला अशा स्थितीत हिंदूच अल्पसंख्य ठरतील अशी स्थिती झाली आहे हे प्रतिपादन आपणास मान्य आहे काय ?

(४) हिंदू सहनशील व सहिष्णु आहे हे खरे नाही काय ?

(५) मुसलमान व ख्रिश्चनांनी फक्त हा देश आपला आहे असे मानून ह्या देशाच्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील व्हावे, देशाबाहेर निष्ठा ठेवू नयेत, आपले वेगळेपण गोंजारू नये असे संघाचे म्हणणे आहे. ह्यात आपणास काय गैर वाटते ?

(६) हिंदूंना आपला धर्म, संस्कृती व खुद्द आपल्या आपल्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे असे वाटते. ही भीती साधार की निराधार ?

(७) संघ जैन, शीख आणि बौद्ध ह्यांना हिंदूच मानतो. महारांवर अन्याय झाला हे मान्य करतो. अस्पृश्यता पाप मानतो. तरीही हरिजन, बौद्ध व अनुसूचित जाती जमातींनी संघाबद्दल आकस ठेवणे कितपत योग्य आहे ?

## उत्तरे

(१) हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख व बौद्ध या धर्मांतील सर्वांनीच आपापल्या धर्मजाणिवेचे विसर्जन क्रमाने करीत 'आपण भारतीय आहोत' हे भान वाढवायला हवे असे मला वाटते. या देशाच्या आजउद्याच्या उज्ज्वलतेसाठी आपण धार्मिक असणे हे अंतिमत: धोक्याचे असून आपण राष्ट्रीय असणे हेच सर्वस्वी हिताचे आहे असे मला वाटते. आपल्या राष्ट्रीयत्वाचे अधिष्ठानभूत तत्त्वज्ञान, सुधारणा, आधुनिकता व विज्ञानदृष्टी (भारतीय संविधान अनु. ५१) आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हेच असले पाहिजे, या राष्ट्रीय ध्येयवादाच्या आड येणारे धर्म राष्ट्रीय हितासाठीच आपण क्रमाने प्रभावशून्य करीत जायला पाहिजे. उज्ज्वल राष्ट्रीयत्वाचा मोठा सुंदर आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितला आहे. ते म्हणाले होते–"आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती जनतेच्या मनात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची होय. **आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदू, मुसलमान, सिंधी वा कानडी अशी भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमत: भारतीय व नंतरही भारतीयच आहोत** अशी भावना निर्माण केली पाहिजे. हा आदर्श दृष्टीसमोर ठेवायचा असेल तर ज्यामुळे संकुचित प्रांताभिमानाची व पक्षाभिमानाची वाढ होईल अशा सर्व गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत." तेव्हा हा आदर्श डोळ्यापुढे ठेवला तर येथील प्रत्येक माणसाला हा देश तुला तुझा धर्म प्रिय आहे की राष्ट्र, तुला तुझी जात प्रिय आहे की राष्ट्र, तुला तुझा प्रांत प्रिय आहे की राष्ट्र, तुला तुझा पक्ष प्रिय आहे की राष्ट्र, तुला वर्णव्यवस्था प्रिय आहे की राष्ट्र, तुला अंधश्रद्धा प्रिय आहे की राष्ट्र, तुला विषमतेच्या परंपरा प्रिय आहेत की राष्ट्र ? असे निर्वाणीचे प्रश्न विचारीत आहे. या प्रश्नांमधील राष्ट्रविघातक बाबी त्यागून राष्ट्राची निवड करणे यात आपल्या राष्ट्रीयत्वाची कसोटी आहे. आपण किती आणि कोणत्या अर्थाने राष्ट्रीय आहोत याचेही उत्तर वरील निवडीतून आपणास मिळणार आहे. मी स्वत: बुद्ध–आंबेडकर यांचे निरीश्वरवादी तत्त्वज्ञान या राष्ट्राच्या उज्ज्वलतेसाठी सर्वाधिक उपकारक आहे असे मानत असल्याने वरील

प्रश्नांमधील सर्व पर्यायांमधून राष्ट्राची निवड मी करीन. इतर सर्वांनीही हीच निवड करावी असेच मला मनापासून वाटेल.

त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची हिंदू व्होट बँकची कल्पना मला राष्ट्रघातकी वाटते, जो उमेदवार हिंदू रक्षणाची हमी देईल त्यालाच मतदान या भूमिकेपेक्षा जो भारतीयत्वाच्या रक्षणाची, राष्ट्रीयत्वाच्या रक्षणाची वरील अर्थाने हमी देईल त्यालाच मतदान हीच भूमिका कोणत्याही राष्ट्रवाद्याने घेणे मला राष्ट्राहिताचे वाटते. संघ असो, भाजप असो भारतीयत्वाच्या, राष्ट्रीयत्वाच्या संविधानदत्त ध्येयवादाकडे पाठ फिरवून, त्याचा अवमान करून देशाला धर्माहंकाराचे विष पाजणे योग्य व्हायचे नाही असे मला वाटते. आपण राष्ट्रीय उन्नयनाचा जरा दूरवर नजर ठेवून विचार करावा. आपल्या भूमिका व्यापक असाव्या, तिचे दूरगामी परिणाम लक्षात घेऊनच त्या राष्ट्रहिताच्या भूमिका म्हणून मांडाव्या असे मला वाटते.

(२) शासनाने सर्वांना सारखे वागवावे. कोणाचा अनुनय करू नये हे खरे. पण या संदर्भात कोणालाही प्राप्त परिस्थिती नजरेआड करून भूमिका घेणे योग्य ठरायचे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरच या संदर्भात म्हणतात ते काळजीपूर्वक लक्षात घेण्याची गरज आहे. ते म्हणतात–"जेथे सर्व लोक सारख्या सपाटीवर असतील तेथे त्यांना सारख्या रीतीने वागविण्यास हरकत नाही, नव्हे तेच योग्य होईल, पण जेथे मुळातच लोक असमान आहेत तेथे त्यांना समानतेने वागविणे अन्याय्य होणार आहे. वास्तव प्रजेतील सर्व जणांना सारख्या सपाटीवर आणणे ही जर सरकारच्या धोरणाची दिशा असेल तर जे वर्ग सपाटीच्या खाली असतील त्यांना विशेष सवलत देऊन वर आणणे ह्यातच न्याय आहे." देशात आज राष्ट्रवृत्तीचा लोप होत चालला असून धर्मान्धतेची वृत्ती तीव्र होते आहे. आधी राष्ट्रीय असणे म्हणजे काय ते शासनाने ठरवावे आणि सर्वांना राष्ट्रीयतेच्या निशाणाखाली एकत्र आणावे. त्यासाठी निरंतर वैचारिक प्रबोधनाची गरज आहे. शासनाने ही प्रबोधनाची चळवळ त्यासाठी आपली पहिली जबाबदारी म्हणून चालवली पाहिजे. थोडा कालावधी ह्याला लागेल पण धर्माच्या नावाने येणारी फुटीरता टाळता येईल. ज्याला त्याला मर्जीप्रमाणे ज्याचा त्याचा धर्म चढला तर फुटीरतेशिवाय, अध:पाताशिवाय दुसरे काय प्राप्त होईल ?

(३) हिंदू समाजाचे अल्पसंख्याकांनी आपल्या गठ्ठा मतांचा वापर करून फायदे मिळवून घेतल्याने नुकसान झाले असे विधान करण्यापूर्वी हिंदूचे नुकसान

म्हणजे कोणाचे नुकसान या प्रश्नाचा विचार करायला हवा. दलित–आदिवासी, भटके–विमुक्त यांना हिंदू म्हणून काय मिळत होते ? काय मिळत आहे ? मग त्यांचे नुकसान कसे होणार ? इंग्रजी राजवट आली तेव्हा देश गुलाम झाला असे आपण म्हणतो पण या देशातील गुलामांचे मालक आणि गुलाम दोघेही गुलाम झाले असा त्याचा अर्थ आहे. एवढेच नव्हे तर देशातील ९५ टक्के गुलामांची गुलामी नष्ट होण्याची प्रक्रियाही त्यामुळे सुरू झाली. यासंदर्भात अल्पसंख्य फायदे उपटतात म्हणून हिंदूंचे नुकसान झाले या विधानाचा अर्थ केला पाहिजे. या देशात आजपर्यंत बहुसंख्यांकांनी हिंदू असण्याचे फायदे केवळ उच्च वर्णाला मिळाले आहेत. उर्वरीत हिंदू केवळ साधन आहेत. आपले वर्चस्व कायम ठेवण्या-साठी उच्चवर्गाला बाकीच्या बहुसंख्य लोकांना हिंदुत्वाशी जखडून ठेवणे भाग आहे. त्यामुळे ब्राह्मण ब्राह्मणेतर असे वर्गीकरण ब्राह्मण वर्गाला मोठे गैरसोयीचे ठरते. परंपरावादी आणि पुरोगामी असे वर्गीकरणही मोठे अडचणीचे ठरते. ब्राह्मण वर्णाचा वर्गीय स्वार्थ साधला जाण्यासाठी धर्माच्या नावाने सिद्ध होणारे वर्गीकरणच ब्राह्मण वर्गाच्या हिताचे आहे. सर्व हिंदू असणे म्हणजे समान असणे नव्हे. हिंदू असणे म्हणजे भेदभावावर उभारलेल्या जाती असणे. हिंदू असलेल्या सर्वांची मुंज व्हावी. परस्पर बेटीव्यवहार असावा. सर्वांच्या चालीरीती समान असाव्यात. परस्परांपासून कोणीच कोणाला वेगळे मानू नये. पण असे होत नाही. हिंदूंचे अल्पसंख्यांकामुळे नुकसान होते याचा अर्थ हिंदूंमध्ये जो वर्ग वरच्या जागी आहे त्याचे नुकसान होते आणि ते नुकसान टाळायचे तर साधन म्हणून बाकीच्यांनी स्वतःला काहीही मिळत नसले तरी हिंदू म्हणवून घेत राहावे. असा या भूमिकेचा अर्थ आहे.

(४) एका तासाला दलितांवर या देशात १२५ ठिकाणी अत्याचार होतात. अशी माहिती प्रसिद्ध झालेली आहे. बेलछी, किलावेनमानी, कारमचेडू, ब्राह्मणगाव, धाकली, मराठवाडा (नामांतर आंदोलन) अशा अनेक ठिकाणी हिंदूंनी दलितांवर अत्याचार केले. १९८९ या वर्षाच्या प्रारंभीच बिहारमध्ये १६ दलितांची हत्या झाली. प्राचीन काळातील चार्वाकांच्या, बुद्धांच्या संदर्भातील घटना सोडा पण फुल्यांचा व सावित्रीबाईंचा छळवाद हिंदूंनीच केला. आगर-करांची प्रेतयात्रा कोणी काढली ? रिडल्ससंबंधी आंदोलन कोणी उभारले ? बाबासाहेबांच्या पुतळ्यांची अनेक ठिकाणी कोणी विटंबना केली ? प्रबोधनाच्या, देशाच्या राज्यघटनेच्या विरोधी जाऊन हे सर्व करणारे लोक सहिष्णू आहेत असे कसे म्हणता येईल ? हे लोक असहिष्णू आहेत आणि ही असहिष्णुता प्रति-

गाम्यांची आहे. क्रांतिविरोधकांची आहे. मानवतावादाला, समतेला, बंधुतेला व न्यायाला विरोध करणारांची असहिष्णुता आहे.

(५) संघाचे म्हणणे मुसलमानांनी व ख्रिश्चनांनी या देशाच्या राष्ट्रीय प्रवाहात यावे, आपले वेगळेपण गोंजारू नये असे असेल तर राष्ट्रीय प्रवाह म्हणजे काय ते निश्चित झाले पाहिजे. हिंदूधर्म म्हणजे किंवा संघाची भूमिका म्हणजे राष्ट्रीय प्रवाह काय होय ? आम्ही असे मानतो की राष्ट्रीय प्रवाह म्हणजे आपला प्रबोधनाचा प्रवाह होय. संविधान या प्रवाहाला पोटात घेऊनच पुढे जात आहे. आपले प्रबोधन लोकहितवादींपासून सुरू झाले आणि आंबेडकरांपर्यंत निरीश्वरवादापर्यंत येऊन पोचले. याचा अर्थ विशुद्ध बुद्धिप्रामाण्यवाद आणि समतादी मूल्ये हा आपला आजचा राष्ट्रीय प्रवाह आहे. मुसलमान आणि ख्रिश्चन यांना या सुधारणावादी, विज्ञानवादी (भारतीय संविधान अनु. ५१) राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न आपणा सर्वांनी व शासनाने करावा. देश म्हणजे माती वा दगड धोंडे नव्हेत. देश म्हणजे मूल्ये. मानवी कल्याणाची जीवनमूल्ये सर्वांनी या मूल्यांना देश मानायला हवे. वर्णव्यवस्था, जातीसंस्था, परंपरावाद, आर्थिक सामाजिक विषमता, अंधश्रद्धा. प्रतिगामित्व म्हणजे देश नव्हे. आमचे म्हणणे असे की, ख्रिश्चन–मुसलमानांनीच नव्हे तर या देशातील सर्व हिंदूंनीही वरील प्रकारच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले पाहिजे. वरील मानवी मूल्यांना आपला देश मानावा. या अर्थानेच सर्वांनी राष्ट्रीय होण्याची गरज आहे. किमान या राष्ट्रीय प्रवाहात दलितांबरोबर आणि इतर परिवर्तनवाद्यांबरोबर हिंदू जरी आले आणि दलित–आदिवासी यांच्यावरील अत्याचार थांबले तर या एकजुटीचे बळ मुसलमानांना आणि ख्रिश्चनांना राष्ट्रीय प्रवाहात आणायला पुरेसे ठरेल असे वाटते. मुस्लिम व ख्रिश्चन यांच्या भयाचे निमित्त सांगून हिंदूंना दलितां-विरुद्ध म्हणजे परिवर्तनाच्या चळवळीविरुद्ध एकत्र करण्याचा चाललेला प्रयत्न राष्ट्रीय हिताचा नाही, तो राष्ट्राला मागे नेणारा आहे. संविधानापासून राष्ट्राला तोडणारा आहे. म्हणून दलित चळवळीशी नाते जोडू पाहणाऱ्या बहुजन समाजा-तील लोकांना मुस्लिमांच्या वा ख्रिश्चनांच्या संदर्भात परिवर्तनापासून तोडण्या-पेक्षा सर्व वरिष्ठ हिंदूंनी परिवर्तनाचा विचार स्वीकारून दलितांसोबत जाण्याची प्रतिज्ञा करावी. यात राष्ट्राच्या उज्ज्वलतेची हमी आहे. प्रतिगामी राहून मुस्लिम व ख्रिश्चनांशी मुकाबला करण्यापेक्षा परिवर्तनवादी होऊन दलितांची सोबत जोडता येईल. दोन परंपरावादामधील झगडा होण्यापेक्षा (हिंदू–मुसलमान, हिंदू–ख्रिश्चन हा झगडा असा आहे) परंपरावादाविरुद्ध परिवर्तनवाद असा झगडा

व्हावा. त्यात राष्ट्राचेही भवितव्य उज्ज्वल आहे. मानवी समतेचे भवितव्यही उज्ज्वल आहे.

(६) हिंदूंना आपला धर्म व संस्कृती यांना धोका निर्माण झाला आहे असे वाटणे साधार की निराधार या प्रश्नाचा विचार करण्याआधी नीट चर्चा व्हावी यासाठी हिंदूंच्या धर्माचे व संस्कृतीचे स्वरूप ध्यानात घेतले पाहिजे. आपल्या प्रबोधनामुळे, संविधानातील सुधारणावादामुळे वा आंबेडकरांच्या निरीश्वरवादी व समतानिष्ठ चळवळीमुळे हिंदूधर्माला धोका निर्माण झाला असेल तर हा धर्म सुधारणाविरोधी आहे असा त्याचा अर्थ होईल. समतेच्या चळवळीला विरोध करण्याचे आमचे स्वातंत्र्य धोक्यात आले असा त्याचा अर्थ होईल. ख्रिश्चन, मुस्लिम यांच्या धर्मांच्या अनुषंगाने हा धोका निर्माण झाला असे म्हणणे असेल तर हिंदू, ख्रिश्चन व मुसलमान हे तिन्ही धर्म चैतन्यवादी परंपरेतील आहेत. त्यांची तत्त्वज्ञाने एकाच ईश्वरनिष्ठ तत्त्वज्ञानांच्या गटातील आहेत. त्यामुळे चैतन्यवाद्यांची एक तुकडी दुसऱ्या तुकडीला मिळाली तर दोन तुकड्या मिळून मोठी ताकद सिद्ध होऊ शकते. पण हे संभवत नसेल तर दोन चैतन्यवादी तुकड्यांमधील भांडण तत्त्वाचे नसून व्यवहाराच्या स्वार्थी पातळीवरचे आहे असा त्याचा अर्थ होईल पण संघाचे म्हणणे असे तात्त्विक भूमिकेच्या संदर्भातले नाही. ते व्यावहारिक पातळीवरचे आहे.

(७) संघ जैन, शीख व बौद्ध यांना हिंदू मानतो की काय मानतो हा प्रश्न नाही. त्यांना तो काय म्हणून वागवितो हा प्रश्न आहे. आणि दुसऱ्या बाजूने संघाचे असे मानणे जैन, शीख व बौद्ध यांना मान्य आहे काय असा प्रश्न आहे महारांवर अन्याय झाला हे संघ मान्य करतो एवढे म्हणून प्रश्न सुटत नाही. हा अन्याय कशामुळे झाला, होतो आहे, त्याच्या पाठीमागे कोणत्या तत्त्वज्ञानाने निर्माण केलेली मानसिकता आहे, परंपरा व नैतिकता आहे याचा विचार झाला पाहिजे. त्या तत्त्वज्ञांच्या, परंपरां च्या व नैतिकतेच्या संदर्भात पूज्यबुद्धी बाळगून महारांवर अन्याय झाला हे म्हणणे निरर्थक आहे. तसेच अस्पृश्यतेचे ! कालवरची अस्पृश्यता पाप होती पण आजही अस्पृश्यता पाळली जाते. तिचे स्वरूप बदलले पण ती पाळली जाते. संघाच्या शाळा–कॉलेजेसमधून किती अस्पृश्य शिक्षक आहेत ? त्यांना कटाक्षाने टाळले जाते की नाही ? क्वचित घेतले गेले तर त्यांचा छळवाद केला जातो की नाही ? अस्पृश्यता पाळण्याचे पाप करण्याने तोटा नाही कारण पाप नष्ट करणारे देव, मंदिरे आणि गंगास्नाने या गोष्टी आहेत. हा ब्राह्मण तो मराठा. तो अमुक जात, वर्णव्यवस्था व यांची तत्वज्ञाने या सर्व गोष्टी संघ पूजनीय

मानतो की नाही ? परिवर्तनाच्या चळवळींशी संघ विरोधाचे नाते ठेवतो की नाही ? संघ जुनी समाजव्यवस्था व देवदैवते प्रमाण मानतो की नाही ? असे असेल तर परिवर्तनाकडे जाऊ इच्छिणाऱ्या हरिजन, बौद्ध, अनुसूचित जाती-जमातींनी संघाबद्दल कोणती भूमिका घ्यावी ?

सर्व हिंदू बांधवांना आणि हिंदूमधील राष्ट्रीय स्वयंसेवक बांधवांनाही मला अत्यंत कळकळीने आणि स्नेहभावाने हे सांगायचे आहे की आपण सर्व एकत्र येऊन या राष्ट्रासाठी झटू. हा देश आपला सर्वांचा आहे. तो कर्तृत्वाने समर्थ आणि समतेने सुंदर झाला पाहिजे. तो बुद्धिप्रामाण्यवादी झाला पाहिजे. भूतकाळात जे झाले ते परत परत उगाळण्यात राष्ट्राच्या हितासाठीच आता आपण सर्वांनीच टाळले पाहिजे. तुम्हाआम्हाला एकत्र आणणारे, बुद्धिप्रामाण्यवादी करणारे आणि समता शिकविणारे तेवढेच भूतकाळातील संदर्भ आपण वर्तमानात स्वीकारायला हवेत. बाकीचे संदर्भ आपण सर्वांनीच टाळले पाहिजेत. आणि आपल्या प्रबोधनातील बुद्धिप्रामाण्यवादी, समतावादी वारसाच यापुढे आपण समृद्ध करीत नेला पाहिजे. ही आपल्याला माणुसकीने घातलेली शपथ आहे असे आपण मानले पाहिजे. या देशाच्या संविधानाचा इत्यर्थ हीच दिशा उरात बाळगितो त्यासाठी आपण आंबेडकरांच्या प्रबोधनविचाराची कास धरली पाहिजे. पण विषमतेच्या-अंधश्रद्धेच्या परंपरा आणि आंबेडकर यापैकी कोणतीतरी एकच गोष्ट आपणाला नेता येईल. हेही लक्षात ठेवले पाहिजे.

□ □

# आंबेडकरी चळवळ

१

दलित चळवळ ही माणसाला माणूस म्हणून जगण्याची सनद सिद्ध करणारी चळवळ आहे. या चळवळीने भारतीयांच्या समग्र वल्गनाशील प्राचीन मूल्यांना मोडीत काढले आहे. अस्पृश्यता या नावाचे पशूंनाही लाज वाटावी असे शोषण आहे. जातीच्या हवाबंद उतरंडी आहेत. त्यांची गौरवगती गाणारे धर्म, संस्कृती, संत, ईश्वर म्हणून मान्यता आणि पूज्यता पावलेले आहेत. समाजाच्या उपासनेत हे साहित्य अजूनही पूजनीय ठरले राहावे. यात दलित, आदिवासी स्त्रीया यांचे दास्यामुळे काय होत असेल ते सोडा, पण ही समता, न्याय, स्वातंत्र, बंधुता, माणूसपण आदी मूल्यांची निर्लज्ज टिंगल आहे. या विधानात वाद करायची सोय नाही.

२

१९५७ सालापर्यंत जवळजवळ या चळवळीची वैचारिक जडणघडण होत आलेली आहे. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, स्वतंत्र मजूर पक्ष, भारतीय रिपब्लिकन पक्ष, सामाजिक लोकशाही, बुद्ध जीवन प्रणालीचा स्वीकार, सांसदीय पद्धतीने राज्य समाजवाद, या सर्व मांडणीतून एक मूल्यभाव साकार होत होता. तो मूल्यभाव म्हणजे समता–स्वातंत्र्य–बंधुता, न्याय, विज्ञान. स्वातंत्र्यपूर्वकाळी आणि नंतरही या चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तित्वाचा आकार आणि आशय आहे. प्राचीन भारतीय संचितापैकी बुद्ध-विचारांचा ही चळवळ वारसा सांगते. अर्वाचीन भारतात ही चळवळ सामाजिक, सांस्कृतिक आंदोलनाचा, विशेषत: फुल्यांच्या दृष्टिउड्डाणाचा वारसा सांगते.

३

प्राचीन भारतात बुद्धाच्या वारशाचा अर्थ, वैदिक तत्वप्रणालीचा त्याग असा आहे. वैदिक प्रणालीचा त्याग म्हणजे अध्यात्म, कर्मविपाक आदि मूल्यांचा त्याग आणि भौतिक विज्ञाननिष्ठ मूल्यांचा स्वीकार. स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही समाजवादाच्या प्रस्थापना–कार्यात बौद्ध धम्माचा स्वीकार अटळ आहे काय ? असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होणे स्वाभाविक आहे, तसा तो काही

विचारवंतांनी केलेलाही आहे. आणि हा प्रश्न निर्माण होण्यामागे काही ठोस आशय उभा आहे. निरीश्वरवाद, अनात्मवाद, मूर्तिपूजा वा कर्मकांडरहितता, भौतिकता आणि मानवी समानतेची नीती हा जर बुद्धाचा आशय असेल तर या विचाराचा अंगिकार करण्यात चूक आहे असे मला वाटत नाही. प्रबोधन, सुधारणा, बदल, आपल्या समाजातील माणसांची समानतेच्या न्यायाच्या अंगाने मांडणी हे जर गृहीत असेल तर बुद्धाचा वारसा सांगण्यात काही चूक होत आहे असे वाटत नाही पण बुद्धाचा वारसा सांगणे म्हणजे बुद्धविरोधी मूल्यांचा वारसा नाकारणे. (आता सामान्य बुद्धधम्मीय माणसाचा बुद्धधम्म हा हिंदुधर्माच्या आशय आकृतीपेक्षा वेगळा नाही हे खरे. बुद्ध धम्माला स्वीकारणे बाबाहेबांना अपेक्षित विज्ञाननिष्ठ भौतिकवादी मन का आकारले नाही ? एक मूलभूत मन:परिवर्तन सार्वत्रिक रूपात का घडले नाही हा चर्चेचा वेगळा मुद्दा आहे. पण तात्त्विक पातळीवरून आपण बुद्धतत्त्वाशयाची चर्चा करीत आहोत.) समाजवादी समाजरचना, जातीवर्गविहीन समाजरचना ज्यांचा ध्येयतारा असेल त्यांनी या ध्येयप्राप्तीच्या मार्गातील अडचणींची नोंद घेतलीच पाहिजे. जाती, जातीय मनोवृत्ती ही वृत्ती जन्माला घालून संवर्धित करणारे संस्कार. ह्या संस्कारांची केंद्रे असलेला धर्म, धर्मग्रंथ, ईश्वर, आत्मा. सर्व स्वर्ग–नरकाच्या भयकथा. यातील प्रत्येक गोष्ट प्रचंड गुंतागुंतीची. एक दुसरीला जन्म देते, दुसरी तिसरीला आणि सर्वच मिळून एका जातीय हवाबंद मनाला. या मनाचे काही प्रबोधन व्हायचे असेल आणि धर्म हा येथील जीवनाचा मर्मबिंदू असेल तर धर्मासारखा पण प्रबोधन कार्यास सहाय्यभूत ठरणारा कार्यक्रम समाजापुढे ठेवता आला पाहिजे. धर्माशिवाय जगणे ही गोष्ट या देशात अशक्यप्राय गोष्ट दिसते. अशावेळी कुठल्या आशयाचा धर्म त्याचा पुढे ठेवावा हाच चर्चेचा मुद्दा व्हायला हवा. त्यावेळी प्रबोधनाला उपकारक ठरेल, असाच धम्म देणे आवश्यक आहे इथवर यावे लागेल आणि असा धम्म भारतात फक्त गौतमाचा आहे हे कबूल करावे लागेल. धर्मविहीनतेकडे, धर्मधिक्काराकडे, निधर्मी उद्दिष्टाकडे नेणारा धम्म जनतेला द्यायचाच तर तो बुद्धाचाच द्यावा लागेल.

८

ही चळवळ दुसरा वारसा फुलेप्रणीत अर्वाचीन प्रबोधनाचा सांगते. हा असा वारसा सांगण्याचे कारण काय ? ज्योतिबांनी आपल्या विषम समाजातील उपेक्षित आणि पीडितांच्या उत्थानासाठी कार्य केले हे एवढेच कारण यामागे नाही. तर ज्योतिबांनी या संदर्भात घेतलेली मूलगामी भूमिका हे त्यामागचे कारण आहे.

ज्योतिबांनी पूर्वकालीन विषमतेच्या आंदोलनांना अधोरेखित केले तसे दुसऱ्या बाजूने समतेच्या आंदोलनांची स्पष्ट नोंद केली. चार्वाका–बुद्धाची भारतीय संचितातील क्रांतिस्थळे म्हणून गौरव केला. बाकी सर्व मूर्तिपूजक विषमतावर्धक व चमत्कारिक पुराणपरंपरांशी फारकत घेतली. विषमतेची चाके असलेल्या रथावर बसून समतेचा प्रवास शक्य नाही. ही जाण गौतमाने जशी व्यक्त केली, तशी ज्योतिबांनी व्यक्त केली. दलित चळवळीची मांडणी करताना डॉ. बाबासाहेबांनी वरील दोन परंपरांशी आपली नाळ जोडली ही बाब आपल्या समाजप्रबोधनाला कणा देणारी ठरली आहे. प्रबोधनाचा आशय अधिक सर्जक, अधिक मूलगामी, आणि सर्वांगपरिपूर्ण करणारी ठरली आहे.

५

बुद्ध आणि ज्योतिबांचा विचार वर्गविचार होता यात वाद नसावा. पण या वर्गविचाराचे स्वरूप मार्क्सिस्ट वर्गविचारापेक्षा भिन्न आहे. हा वर्गविचार भारतीय समाजजीवनाच्या संदर्भात सिद्ध झालेला आहे. या वर्गविचाराचा पाया आर्थिक नाही. तर सांस्कृतिक वर्गविचारांच्या मांडणीतून अत्यंत मूलभूत लढा इथे उभारला गेला. ह्या लढ्याच्या पोटात असलेला समतेचा आणि नीतीचा विचार माणसांमधील सर्वप्रकारच्या समतेला भिडणारा आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी हा सांस्कृतिक वर्गविचार विसाव्या शतकात आपल्या प्रज्ञेने विकसित आणि स्पष्ट केला.

६

दुर्दैव असे की बुद्धाच्या सांस्कृतिक वर्गविचारातले सत्त्व कर्मकांडाच्या मार्गाने पुढिलांनी खर्ची केले. आणि हिंदू धर्म विरुद्ध बौद्ध धर्म असा धर्मविग्रह सिद्ध झाला. मूल्यविग्रह विझवला गेला. हे सनातन्यांच्या पथ्यावरच पडले. बुद्धाची मूळ विचार–ध्येयप्रणाली निकोप ठेवण्याचा, त्या ध्येयप्रणालीची मानसिकता सिद्ध करण्याचा आणि सर्व लढा मूल्यपातळीवरून लढवत ठेवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी बुद्धोत्तर बुद्धिस्टांनी अत्यंत निरर्थक अधर्मविग्रह मांडला आणि मूळ संघर्षप्रश्न नजरेआड झाला.

७

हे असे बुद्धाच्या बाबतीत घडले तसे फुल्यांच्याही बाबतीत घडले. ज्योतिबांनी उभारलेल्या सांस्कृतिक वर्गविग्रहाला ब्राह्मण ब्राह्मणेतर असे जातीय विग्रहाचे रूप फुल्यांनंतर दिले गेले. ब्राह्मणेत्तर ते सर्व पुरोगामी, क्रांतिकारक, समतेचे पुजारी आणि ब्राह्मण तेवढे प्रतिगामी आणि विषमतेचे पुजारी हे गृहीत

धरून लढा जातीय पातळीवर आणला गेला. ह्या प्रक्रियेत ज्योतिबांच्या ध्येय-दर्शित्वाचा गाभाच दुर्लक्षिला गेला. याही चळवळीतील मूल्यवर्गीयत्व धुडकावले गेले. आपल्या जातिबद्ध मानसिकतेला वरील मूल्यबद्ध बगलबच्चाला नष्ट करणे सहज शक्य झाले. हे आपल्या जन्मदत्त--जातिदत्त स्वभावाला अनुसरूनच झाले. प्रतिगामी मनाचा मूल्यभाव आणि पुरोगामी मनाचा मूल्यभाव यातील अंतर्विरोध वाढवीत नेणे आवश्यक होते, त्यातील पुरोगामी आणि प्रतिगामी दोन्ही मूल्य-भावांची स्पष्ट मांडणी समाजापुढे ठेवणे अत्यंत आवश्यक होते. पण ते फुल्यांच्या नंतरच्या चळवळीत झाल्याचे दिसत नाही. आणि जातिवर्चस्वाचे विरूप या लढ्याला प्राप्त झाले. हे सर्व जाणिवपूर्वक केले गेले काय ? हा चर्चेचा स्वतंत्र प्रश्न आहे. पण हे झाले हे सत्य आहे.

८

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीत बुद्ध–फुल्यांचे दुर्लक्षित सूत्र पुन्हा पकडण्याचा प्रयत्न केला असे स्पष्टपणे आपणास दिसते. मनुस्मृतीचे दहन, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना, भारतीय रिपब्लीकन पक्षाची स्थापना, लोकशाही समाजवाद आणि बुद्धतत्त्वविचार, फुल्यांबद्दलचा श्रद्धाभाव या सर्व घटनातून एक मूलगामी क्रांतीप्रकल्प, एक सांस्कृतिक वर्गविग्रह सिद्ध होतो आहे. या प्रकल्पातील घटकांमध्ये कुठे परस्परविरोध निर्माण होत नाही. हे सर्व घटक काही एक मूल्यव्यूह उभारीत आहेत असेच आपणास दिसेल.

९

स्वातंत्र्योत्तर काळातील दलित चळवळीचे स्वरूप तपासण्याआधी बुद्ध–फुल्यांच्या विचारवारसा मागणाऱ्या आणि डॉ. आंबेडकरांच्या प्रज्ञाप्रतिभेतून साकार झालेल्या या क्रांतीप्रकल्पाचे स्वरूप प्रथम लक्षात घेतले पाहिजे. हा क्रांती-प्रकल्प म्हणजे भारतीय समाज प्रबोधनाचा नेतृत्व प्रकल्प आहे असे मला वाटते. भोवतीच्या समाजजीवनाचे सांस्कृतिक वास्तव, राजकारण, धर्म आणि अर्थकारण यांचे घट्ट संदर्भ मनात बाळगूनच आंबेडकर प्रणित चळवळीचा आशय सिद्ध झाला आहे.

१०

मनुस्मृतीचे दहन ही बाबासाहेबांच्या आयुष्यातील एक शुभारंभाची बंड-खोर घटना. ही घटना अनेक सत्यांचे प्रकाशन करते. मनुस्मृतीने ज्यांच्या हाडामांसाचा आणि मताचा चिखल करून ह्या संस्कृतीची भव्य इमारत उभी केली

होती त्या इमारतीच्या भिंतीतील पायातील रक्तामांसाच्या व मनांच्या कणांनाच मनुस्मृती जाळून त्यांनी जणू तेजःकण व्हायला सांगितले. एखादा बंडखोर येईल आणि मनुस्मृती जाळून टाकील असे भविष्य फुल्यांनी वर्तविले होते. ज्योतिबांच्या कल्पनेतील बंडखोर आंबेडकरांच्या रूपाने साकार झालेला आहे. आर्थिक शोषणासाठी रचण्यात आलेला वरील सांस्कृतिक डावपेच बाबासाहेबांनी असा अग्निमुखी दिला. ह्या दहनामागे मनूने दहन केलेल्या स्त्रीशुद्रांना–अतिशुद्रांना जळती जाळती हाक होती. मूल्यपातळीवर एक सेना उभारण्याची आकांक्षा होती. हिंदूकोडबिलाची प्रज्ञाशाली निर्मिती ही कुण्या एका जातीसाठी नव्हती. ही निर्मिती; बहिष्कृत भारताच्या उदयाची मीमांसा मांडणारी बंडखोर निर्मिती होती. चेहरे मारलेल्यांच्या मुस्तरूप चेहऱ्यांचे विज्ञान हिंदुकोडबिल घेऊन आले होते. त्यांत स्त्रीमुक्तीचे वादळ होते. दलित, आदिवासी आणि नरकोन्मुख अनंतानंत जिण्यांच्या उठावाची तुफाने होती आणि हे बिल मनूच्या मुलखात पास होत नाही म्हणून बाबासाहेबांनी केन्द्रीय कायदेमंत्रीपदाचा राजिनामा दिला. हा राजिनामा बाबासाहेबांची सर्वांगीण आणि कक्षाविहीन मानवताच अधोरेखित करतो. हा त्याग एका जातीसाठी नव्हे. ह्यातून एका मूल्यवर्गाच्या उभारणीची त्यांची स्वप्नशीलता दिसून येते. त्यांच्या वैचारिक अंतराळाची अफाटता, त्यांच्या प्रतिभापंखाची अनिर्बंध मानवताच त्यातून दिसते.

११

स्वातंत्र मजूर पक्षाची स्थापना हा सत्यशोधक समाजाच्या ध्येयधोरणाशी नाते सांगणारा पण समकालाच्या संदर्भात साकार झालेला बाबासाहेबांच्या प्रज्ञाप्रतिभेचा पुन्हा लक्षणीय आविष्कार आहे. हा आविष्कार भारतीय संदर्भात फुल्यांशी सख्य सांगतो आणि दुसऱ्या बाजूने भांडवलशाहीच्या कुपरिणामाच्या संदर्भात मार्क्सशी नाते सांगतो. लोकशाही समाजवाद हे ध्येय बाबासाहेबांच्या डोळ्यांपुढे होते. लोकशाही समाजवादात केवळ राजकीय लोकशाहीच अनुस्यूत नाही तर सामाजिक–आर्थिक समता म्हणजे सामाजिक–आर्थिक लोकशाहीही अनुस्यूत आहे. समता–स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, विज्ञान ही बाबासाहेबांची लोकशाही समाजवादाची संकल्पना आहे. ही संकल्पना साक्षात करायची तर हिंदूविचारव्यवस्था–कर्मविपाक ईश्वर अध्यात्म ह्या स्वभावतःच विषमतेचा गजर करणाऱ्या बाबी–नाकारल्या पाहिजेत. लोकशाही आणि विषमता, लोकशाही आणि कर्मविपाक, लोकशाही आणि वर्णवर्चस्व, लोकशाही आणि जातीगौरव ह्या गोष्टी एकत्र राहूच शकत नाहीत त्यामुळे लोकशाही समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी श्रमिक–शोषि-

तांचा उपेक्षितांचा एक पक्ष त्यांनी स्थापन केला. दलित अल्पसंख्य असल्याने ते पक्ष स्थापन करू शकतील पण आंदोलने यशस्वी करू शकणार नाहीत. म्हणून सगळया उपेक्षितांचा व श्रमिकांचा शक्तीसमन्वय करणारा पक्ष त्यांना काढणे आवश्यक वाटले. हे १९३६ सालचे त्यांचे प्रकल्पन आहे. १९५६ साली भारताची लोकशाही बाल्यावस्थेत आहे. हे जाणून त्यांनी या लोकशाहीच्या चारित्र्य उभारणी-साठी दुसरे प्रकल्पन सिद्ध केले. ते म्हणजे अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष. हा सत्ताधारी पक्षावर अंकुश म्हणून, सर्व पुरोगामी शक्तींना एकत्र आणावे म्हणून, भारतात एक मूल्यवर्ग सिद्ध व्हावा म्हणून बाबासाहेबांनी संकल्पिलेला पक्ष होय. हा पक्ष प्रत्यक्षात त्यांच्या मृत्यूनंतर सिद्ध झाला. परंतु ह्या पक्षाचा समग्र आराखडा हा बाबासाहेबांच्या एका दूरदर्शी क्रांतीप्रकल्पाचे द्योतन करणारा आहे. हा प्रकल्प जर प्रत्यक्षात आला असता तर भारतीय राजकारणाचे, समाजकारणाचे आणि जीवनवास्तवाचे चित्र आज वेगळे दिसले असते. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडमध्ये मजूर पक्ष सत्तेवर आला होता. हा पक्ष क्रांतिकारक होता. भारताला स्वातंत्र्य देण्यात त्यांचाही मोठा वाटा होता. त्याचा आदर्श डोळयासमोर ठेवून बाबासाहेबांनी ही पक्षबांधणी उभारण्याचा प्रयत्न चालविला होता. सांसदीय लोकशाहीच्या माध्यमातून लोकशाही समाजवाद हे त्यांचे स्वप्न होते. मजूर, सर्व डावे, पुरोगामी अशा समग्रांचा हा पक्ष असणार होता. हा पक्ष सिद्ध झाला असता, यशस्वी झाला असता तर कदाचित डाव्यांचे–पुरोगाम्यांचे शासन या देशा-वर स्वातंत्र्याच्या बालपणीच आले असते. प्रश्न आणि प्रणालीतील विरोधनाट्य बघण्याची दुःखद वेळ आली नसती आणि आपल्या समाजप्रबोधनाला ते मोठे वरदान ठरले असते. ही एका प्रकारे सांस्कृतिक वर्गबांधणीची रूपरेषा होती. मूल्यवर्गाचीच संरचना होती. समतेचा गाभा असलेली आर्थिक क्रांती ही भारतात तरी सांस्कृतिक क्रांतीच्या पोटीच जन्माला येऊ शकते. हे ओळखून बाबासाहेबांनी सांसदीय लोकशाही आणि बुद्धविचार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. धर्माशिवाय सामान्य जनतेचे जीवन चालत नाही. तेव्हा धर्म तर द्यायचा पण प्रबोधन जखमी होणार नाही, लोकशाही समाजवादाचा आशय दुभंगून जाणार नाही या पद्धतीने दिला पाहिजे. या संदर्भात बुद्ध धम्माची योजना आपण समजून घेतली पाहिजे. प्रबोधन रक्तात पेरायचे, समाजाच्या मनात बदलाची बिजे रुजवायची तर असे टप्प्याटप्प्यानेच गेले पाहिजे. हिंदुत्वाच्या विचार–संस्कार कक्षेतून बाहेर काढण्यासाठी बुद्धाचा निरीश्वरवादी आणि कर्मविपाक न मानणारा धम्म देणे ही कृती क्रांतीकार्यातील एक प्रस्तुत कृती ठरते. हिंदुत्वाच्या जातीबद्ध

व्यवस्थेतून बाहेर काढल्याशिवाय सांस्कृतिक मूल्यवर्गही इथे कल्पिता येत नाही. ही गोष्ट एकीकडे आणि धर्माशिवाय सामान्य माणूस जगू शकत नाही ही गोष्ट दुसरीकडे म्हणून बुद्धविचाराचा दुवा त्यांनी मांडून ठेवला. ह्या सर्व संरचनेत एका समर्थ इहमूल्यवर्गाची, क्रांतीमूल्यवर्गाची समता स्वातंत्र्य विज्ञान न्याय बंधुता मानणाऱ्या मूल्यवर्गाची स्थापना करण्याच्या आकांक्षा विखुरलेल्या आहेत. बुद्ध डि-रिलिजन अवस्थेकडे नेऊ शकतो. हिंदू अध्यात्म–कर्मविपाकवादी मनापेक्षा वेगळ्या मनाची घटना सूचित करतो म्हणून इ. स. पूर्व सहाव्या शतकातील डावा बुद्ध आजच्या डाव्यापुढील प्रश्नांचे काही पेच नक्कीच सोडवू शकेल.

१२

लोकशाही समाजवादाचा एक अत्यंत अभिनव समाजरचनाप्रकल्प बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांच्या मनात रुजवण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजाच्या अभ्युदयाच्या, समता, न्याय आणि बंधुत्वाच्या दृष्टीने हा समाजरचनाप्रकल्प भारतीय समाजवाद्यांच्या आणि साम्यवाद्यांच्या समाजरचना प्रकल्पाच्यापेक्षा अधिक मूलगामी आणि हितावह आहे. हा समाजरचनाप्रकल्प बाबासाहेबांनी भारतीय समाजाचे वास्तव, त्याची संस्कारशक्ती आणि प्रकृतीचा प्रकार पूर्ण अभ्यासूनच तारतम्याने सिद्ध केलेला आहे. हा समाजरचनाप्रकल्प सिद्ध करताना अत्यंत पूर्वग्रहमुक्त मनाने त्यांनी तो सिद्ध केला. येथील साम्यवादी आणि समाजवादी यांच्या समाजसंकल्पचित्राला, हिंदुत्ववादाच्या आणि जातीवादाच्या अत्यंत दुःखदायक मर्यादा पडलेल्या आहेत. भारतीय समाजाचे एक आदर्श संकल्पन चितारून दाखवताना आंबेडकरांना आपल्या हितसंबंधाचे रक्षण करणाऱ्या कोणत्याच पूर्वसंचिताचे रक्षण करण्याची गरज नव्हती. त्यामुळे एका स्वच्छ, कोऱ्या आणि निर्लेप मनाने ते मानवतेची अव्यंग सजिवाकृती साकार करू शकले.

१३

मानवमुक्ती किंवा मुक्त मानवाचे ध्येय हे या समाजवादाचे अंतरंग आहे. भूक असो, बेकारी असो, जातीय विषमता असो, आर्थिक सांस्कृतिक सापत्नभाव असो, सर्व प्रकारच्या अरिष्टांपासून मुक्त माणूस उभा करणे, पर्यायाने जातिवर्गविहीन समता, न्याय आणि विज्ञान, बंधुता यावर अधिष्ठित समाजमनाचा आशय घडवणे हे या समाजवादाचे ध्येय आहे. राज्यसत्ता काही मौलिक आणि महत्त्वाच्या उद्योगधंद्यांची सूत्रे या प्रणालीत घेईल. त्यामुळे आर्थिक शोषण थांबवून आर्थिक

नियोजन करता येईल. समाजघटकांची उत्पादनक्षमता वाढवता येईल. आणि व्यक्तीला कमी वेळात अधिक उत्पादन शक्य करून तिला आपल्या आवडीप्रमाणे विकास आणि आनंदप्राप्ती करून घेता येईल. या समाजवादात केवळ आर्थिक समतेचेच कलम नाही तर त्यात सामाजिक नीती केंद्रस्थानी आहे. समाजातील चारदोन लोकांच्या हातात संपत्ती गोठू नये पण संपत्तीचे वा मालमत्तेचे राष्ट्रियी-करण करणेही योग्य नव्हे. भांडवलशाहीची ही विधायक बाजू बाबासाहेबांनी लक्षात घेतली आहे. परंतु यांच्यात निर्माण होणारी समाजविघातकता राज्यसत्तेने त्या त्या वेळी नष्ट केली पाहिजे. औद्योगिकरण हा भारतीय जीवनाच्या संदर्भात अत्यंत प्रभावी असा परिवर्तनकारी घटक आहे. हे औद्योगिकरण गतिमान करायचे असेल तर राज्यसमाजवादच आवश्यक आहे.

जातीय, धार्मिक, सांप्रदायिक, लिंग अशा कोणत्याही मुद्यावरून विषमता पाळणे हे या समाजवादात बसत नाही. अध्यात्म, ईश्वर, कर्मविपाक जे जे विषमतेचा प्रसार करतील ते या समाजवादाचे शत्रू ठरतात. हिंदूधर्म, त्याची वर्णजातीव्यवस्था आणि त्याच्या ग्रंथापुराणांनी केलेल्या संस्कारांनी युक्त असा आजचा समाज हे सर्वच बाबासाहेबांच्या राज्यसमाजवादासाठी अत्यंत प्रतिकूल ठरतात. हा लोकशाही समाजवाद शुभफलदायक व्हायचा असेल तर भारतीय समाजाला असलेला हिंदुत्ववादी आशय पुसला गेला पाहिजे. भारतीय माणसाच्या मनाची आधी कोरी पाटी करणे आवश्यक आहे. त्यानंतरच तिच्यावर नव-जीवनाची अर्थपूर्ण आणि अमर बीजाक्षरे कोरता येतील. यासाठी बाबासाहेबांनी सांसदीय लोकशाही आणि बुद्धाचा धर्मविहीनतेकडे जाणारा भौतिकवादी आणि प्राचीन भारतातला एक डावा विचार पुरस्कारिला. लोकशाही समाजवादाच्या सिद्धीसाठी जणू ही साधनशुचिताच बाबासाहेबांनी सांगितली. सांसदीय लोक-शाहीचा आकृतिबंध हा समाजात एक वैचारिक सामंजस्य आणि सुजाण विचार-विनिमय शक्य करील. मुक्त आणि न्याय्य निवडणुका होतील. अहिंसा वा रक्तपात ह्या बाबींना बाबासाहेबांनी प्राप्त भारतीय संदर्भ जमेस धरून दूरच ठेवलेले आहे. मनःचक्रपरिवर्तनाच्या मार्गाने, अहिंसक घटनात्मक मार्गाने समाजाच्या मूल्यव्यवस्थेत प्रवर्तन करीत जावे. सांसदिय लोकशाही व्यक्तीच्या नैतिक गुणांच्या प्रकर्षासाठी बाबासाहेबांना आवश्यक वाटते आणि नैतिक नियंत्रणाच्या दृष्टीनेही आवश्यक वाटते.

१४

याप्रकारे शहरांबरोबर खेड्यांचे औद्योगिकरण, जातीवर्ण वर्गविहीन समाज निर्मिणे, सहकारी शेतीला उत्तेजन देणे आणि सामंजस्याच्या भूमिका घेऊन मुक्त,

अव्यंग आदर्श मानव आणि समाज संसिद्ध करणे हे बाबासाहेबांच्या लोकशाही समाजवादाचे अंतःश्चरित्र आहे. हे एका उच्च मानवी समाजाचे संकलन आहे.

१५

बाबासाहेब आंबेडकरांची खरे तर हीच समाजघटना आहे. सुंदर आणि भव्य अशी राज्यघटना आहे. समता, न्याय, भौतिकता, बंधुता आणि सामंजस्य ही या राज्यघटनेची नीतिमत्ता आहे. या सर्व संकल्पनाव्यूहाचा नायक माणूस आहे. बुद्धाप्रमाणेच त्यांनाही माणसाशिवाय जिच्यासंबंधी विचार करावा अशी गोष्ट जगात दिसली नाही. म्हणून त्यांच्या प्रत्येक शब्दात आणि स्वप्नात माणूस हाच आशय काठोकाठ भरलेला आहे. आणि याच आशयाने बाबासाहेबांच्या हयातीमधील दलितांच्या चळवळीची जिवाकुती सिद्ध केली होती. दलितांच्या, स्त्रियांच्या; आदिवासींच्या अशा सर्व अन्यायग्रस्तांच्यावरील अमानुष अन्यायाचा उगम शोधताना आणि त्यावर इलाज धांडोळताना बाबासाहेबांनी आपला विचार दुःखी माणसाचा विचार बनविला. आपले सर्वच प्रश्न त्यांनी मूल्यांचे बनविले. आणि मूल्यांसाठी काही लढे उभारले. विचार उभारले. वादळे उभारली. आणि दलितांच्या निमित्ताने त्यांनी समतेसाठी लढा दिला. अस्पृश्य आदिवासी स्त्रिया या समग्र दलित उपेक्षितांच्या निमित्ताने त्यांनी न्यायासाठी, माणुसकीसाठी, बंधुते-साठी, पर्यायाने श्रेष्ठ मानवी मूल्यांसाठी, मुक्त मानवाच्या विचार प्रकल्पासाठी सुंदर सुरूप समाजाच्या निर्मितीसाठी लढे दिले.

□ □

# पॅन्थर

९ जुलै १९७२ पासून कालपर्यंतचा काळ हा पॅन्थरचा इतिहासकाळ होय. वर्तमानकाळात पॅन्थरचे एक महाशक्तिशाली रूप सिद्ध व्हावे ही इच्छा असणारांनी पॅन्थरचा भूतकाळ काळजीपूर्वक लक्षात घेण्याची गरज आहे आणि तिला भारतीय समाजक्रांतीची शिल्पकार ठरायचे असेल तर वर्तमानकाळात तिच्या हातून चुका होणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे.

हजारो वर्षांच्या संस्कारांनी भारतीय समाज हा कायम भूतकालनिवासी समाज बनलेला आहे. भूत, वर्तमान व भविष्य असे आपण तीन कालविभाग पाडतो. पण भारतीय समाज भूतकाल या एकाच कालविभागात वावरताना दिसतो. त्याला भविष्य नाही, कारण तो भूतकालाच्या सीमांच्या बाहेर येत नाही. त्याला वर्तमान नाही, कारण भूतकालाने भरलेला नाही असा एकही क्षण त्याच्या वर्तमान मन:कोषात नाही. समता व बंधुता, न्याय व बुद्धिप्रामाण्य यांसाठी जिवावर उदार झालेल्या एखाद्या सैनिकाप्रमाणे लढणाऱ्या भूतकाळाच्या नावाने ध्वज लावायला काहीच हरकत नव्हती. पण या समाजाचा सामाजिक भूतकाळ म्हणजे अमानुषतेची एक अंतहीन यात्रा, विषमतेची एक अखंड भक्ती आणि खुळचटपणाची सश्रद्ध पूजा होय.

अशा समाजाच्या आयुष्यातला कोणताही क्षण क्रांतिकारी संघटनेची धास्ती उरात बाळगीत असतो. म्हणून क्रांतिकारी संघटना जन्मालाच येऊ नये यासाठी असा समाज स्वतंत्र अशी यंत्रणा राबवीत असतो आणि नजर चुकवून एखादी क्रांतिकारी संघटना जन्माला आलीच तर तिचा खून करण्यासाठीही असा समाज स्वतंत्र असा मारेकरी फोर्स वापरीत असतो. अशा संघटनेला फोडून निकामी करण्याचे कौशल्यही या समाजाजवळ भरपूर असते. मूल्यात्मक परिवर्तनाला घाबरणाऱ्या समाजाचा हा स्थायी स्वभाव असतो. त्यामुळे वरील संकटामुळे हार खाणे किंवा वरील संकटांवर विजय मिळविणे या दोनच गोष्टी कोणत्याही क्रांतिकारी संघटनेच्या वाट्याला येऊ शकतात. पॅन्थरच्याही वाट्याला ते आलेच असते.

हेगेलच्या सूत्रातला थिसिस शक्तिशाली व हिकमती असला आणि अँटिथिसिस अपरिपक्व असला तर अँटिथिसिस मार खातो, पराभूत होतो. पँथर अँटिथिसिस होती. पण अतिउत्साह, अतिउतावळेपणा आणि वैचारिक अप्रगल्भता यामुळे या भारतीय अँटिथिसिसला पराभूत व्हावे लागले. पँथर कोणाही बाबा–बुवाने फोडलेली असो, ती या समाजातील थिसिसने फोडलेली असते. आणि थिसिस हे एका न बदलणाऱ्या स्वभावाचे नाव असते.

बाबासाहेब आंबेडकरांचे एक थोर अनुयायी डॉ. म. ना. वानखडे यांच्या ब्लॅकपॅन्थरसंबंधीच्या बोलण्यातून पॅन्थर शब्द परिचित झाला आणि पॅन्थर ७२ साली सिद्ध झाली. आंबेडकरी चळवळ खंड–विखंड झाली. लहान नेत्यांमध्ये मोठे स्वार्थ निर्माण झाले. आंबेडकरी समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक प्रबोधन कोपऱ्यात पडले आणि राजकारणाचा आंधळा खेळ सुरू झाला. ज्ञाना-राधनेचा आंबेडकरी वारसा दुर्लक्षिला गेला. आंबेडकरी चळवळीचे 'गाव वाहून गेले, नाव राहून गेले' अशी स्थिती झाली. अशा सुन्न आणि शून्य काळात पॅन्थरचा जन्म झाला. पण पॅन्थरनेही आर. पी आय. च्या चुकांचीच तारुण्यसुलभ नवी आवृत्ती काढली. शिव्यांच्या सभा सुरू झाल्या. विश्लेषणाऐवजी सेंटिमेन्टॅ-लिझमचा खळाळ मोहक ठरला. प्राप्त कालखंडात गरप भावनांचे वादळ मोठे अपरूप ठरले. प्रारंभीच्या या उफाळकाळात पॅन्थर्सनीही विश्लेषक दृष्टीने पॅन्थरकडे पाहिले नाही. भावनेच्या लोकलाटेवर पॅन्थरही वाहवत गेली. शांत डोक्याने पॅन्थरचे तत्त्वज्ञान निश्चित करण्याचा प्रयत्न करणे, संघटनेच्या मजबूत बांधणीची आधारतत्त्वे निश्चित करणे या गोष्टींकडे पॅन्थरने लक्ष दिले नाही. लोकांचा भावनिक प्रतिसाद आणि धूर्त राजकीय प्रतिसाद अशा दुहेरी प्रति-सादाच्या मृगजळामागे चळवळ धावत गेली आणि समकाळात एखाद्या क्रांतिकारी संघटनेची अर्थवत्ता नेमकी कशात असते हे लक्षात न घेतल्याने अशा अस्तित्वार्था-लाच पॅन्थर पारखी होत गेली.

नेतृत्वविषयक स्वार्थाचा उपःकाल स्थावेळच्या तरुणांमध्ये झालेला पाहताच आंबेडकर की मार्क्स या प्रश्नाच्या हातोड्याने पॅन्थर फोडणे सोपे झाले. पैशांचा चारापाणी टाकून पॅन्थरचा गळा दोरखंडात अडकविता येतो हे मुत्सद्यांच्या लक्षात येताच पुढील कार्यक्रमांच्या केसाने चळवळीचा गळा कापणे सुरू झाले. एका स्वप्नाची समाप्ती झाली. पॅन्थरची चळवळ मातीमोल झाली.

पॅन्थरची आज नितान्त गरज आहे, पण कालच्या पॅन्थरची आज गरज नाही. आज आंबेडकरी पॅन्थरची गरज आहे. आंबेडकरवाद या राष्ट्राच्या

माणुसकीचा सर्वश्रेष्ठ जाहीरनामा आहे. भारतीय समाजक्रांतीची चळवळ आंबेडकरांनी निरीश्वरवादाच्या मैदानावर आणून उभी केली आहे. त्यांनी धर्मसंस्थेचा त्याग केला आणि नास्तिक बुद्ध–विचारांचा अवलंब केला. धम्म ही बुद्धिप्रामाण्यवाद्यांची नीती होय. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या सर्वच मूल्यांचा जीवनाशय बुद्धिप्रामाण्यवादाच्या संदर्भबंधात निश्चित करायला हवा. पॅन्थरने आंबेडकरी प्रबोधनाची ही पायाभूत तत्त्वे आपल्या चळवळीचा प्राण म्हणून स्वीकारायला हवीत आणि त्या दिशेने समाजप्रबोधनाचा अखंड कार्यक्रम आखायला हवा. आंबेडकरवाद हे समग्र समाजक्रांतीचे दर्शन आहे. आंबेडकरी समाजवाद असे त्याचे वर्णन करता येईल. जीवनाच्या सर्व अंगांची मांडणी त्यात आहे. आंबेडकरांचा अर्थविचार त्यांच्या अर्थविचारातच केवळ नाही तर त्यांच्या समग्र राजकीय विचाराला, समाज विचाराला व शैक्षणिक विचारालाही तो व्यापून आहे. त्यांचे समाजचिंतन हे जसे अर्थचिंतन आहे तसे त्यांचे राजकीय चिंतनही अर्थचिंतनच आहे. सांसदीय लोकशाहीच्या माध्यमातून हा आंबेडकरी समाजवाद आहे त्या स्थितीत अधिक प्रभावीपणे साकार होऊ शकेल. ही आंबेडकरवादाची मूळ घटना तपशीलवार लक्षात घेण्याची गरज आहे. त्यामुळे आंबेडकर–मार्क्स हा वाद निर्माण होण्याची गरज पडणार नाही.

आंबेडकरवाद हेच पॅन्थरचे तत्त्वज्ञान व्हायला हवे. येत्या काही वर्षांत त्यामुळे आंबेडकरवादाच्या अंगोपांगांची बौद्धिक चर्चा व मांडणी पॅन्थरने करण्याची गरज आहे. आज सांप्रदायिकतेचे विष या देशाच्या घशात ओतले जात आहे. धर्मान्धतेचा गळफास या राष्ट्राच्या माणुसकीच्या गळयात आवळला जातो आहे. अंधश्रद्धांची देशी–परदेशी दारू पाजून तरुणाईला झिंगत ठेवण्याचे यशस्वी प्रयत्न होत आहेत. शे–दीडशे वर्षांच्या प्रबोधनाच्या काळात प्रतिगामी शक्तींनी डोके वर काढले नव्हते, आज त्या डोके वर काढत आहेत. काऊन्टर रिव्होल्यूशनच्या मगरमिठीत देश हवालदिल आहे. भारतीय खोमेनी शक्तिशाली होत आहेत. अंधार गडद होतो आहे. प्रकाश दुबळा होत चालला आहे, मनुष्यताविरोधी शक्ती अधिकच अमानुष होत आहेत. आणि दलितांसकट या देशातील शोषितांना आपला विचार आणि आपले वर्तन यांची निश्चिती करता येत नाही. पॅन्थरने या ठिकाणाहून प्रबोधनाच्या अग्निध्वजा खांद्यावर घेण्याची गरज आहे. या मार्गाने पॅन्थरच्या गरजेची व अन्वर्थकतेची युद्धपर्वे साकार व्हावीत.

हिंदू धर्माच्या कक्षेतील इतर काही परिवर्तनवादी चळवळी जशा मूलतः क्रांतीविरोधी कार्य करीत असतात, त्यांचे नेतेही जसे एक विघातक व टाईमपास

रोल करीत असतात, त्याप्रमाणे दलितांमधीलही धार्मिक खातेऱ्यात अडकलेली मानसिकताही क्रांतीविरोधी कार्यच करीत असते. बुद्ध, डॉ. आंबेडकर आणि धर्मांतर यासंबंधी 'जात्युच्छेदक निबंध' या पुस्तकात सावरकर काय म्हणतात ते पँथर्सनी दलितांना समजावून सांगायला हवे. असे झाले तर दलितांमधील आर. एस. एस. चा एखादा माणूस 'सावरकरांना दलितांनी बाबासाहेबांइतकेच पूजनीय मानायला हवे' असे चळवळीला तत्त्वच्युत करणारे, चळवळीला प्रतिगाम्यांच्या दारात बांधणारे वक्तव्य करणार नाही. हेडगेवार आणि आंबेडकर यांच्यातील फरक यापुढच्या पँथरने समजावून सांगायला हवा. अन्यथा हेडगेवारांच्या जन्म-शताब्दी समितीचे सदस्य होण्यासाठी दलित माणसांमध्ये चुरस लागेल. गीतेसंबंधी आंबेडकरांची भूमिका काय होती तेही समजावून सांगायला हवे, अन्यथा एखादा परंपराधर 'बाबासाहेबांनी गीतेपासून प्रेरणा घेतली' असे आंबेडकरी चळवळीचा चेहरा कुरूप करणारे वक्तव्य करीतच राहील.

आंबेडकरवादाच्या कक्षेत येत नाही असा प्रश्न दुनियेत नाही. या कक्षेत शेतकरी येतो, भूमिहीन शेतमजूर येतो, अल्पभूधारकांच्या यातना येतात, स्त्रियांच्या सकल समस्या येतात, कामगारांची दुःखे येतात. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अशा सर्व शोषितांच्या प्रश्नांसाठी आंबेडकरवाद आहे. पँथर आंबेडकरवादी असावा आणि कोणतेही शोषण नष्ट व्हावे यासाठी त्याने आकाश-पाताळ एक करावे. धम्म ही नीती आणि बुद्धिप्रामाण्यवाद ही या नीतीची बैठक या गोष्टी पँथरची आधारशिला असाव्यात.

काही चांगल्या गोष्टी पँथरच्या नावावर जमा आहेत. त्या अधिक यशस्वी पातळीवरून पँथरच्या नावावर जमा होणे आवश्यक होते. पण पँथरचे नेतृत्व प्रचंड वैचारिक ताकदीचे असायला हवे. मनुष्यशक्ती तर हवीच, पण त्याहूनही मोठी विचारशक्ती आहे. शोषणसत्ता वरील दोन्हींच्या युतीपुढे मोडून पडत असतात. आपल्यापुढे डॉ. आंबेडकर हा महान नेतृत्वाचा एक आदर्श नमुना आहे. आचार–विचारातील विशुद्ध आंबेडकरवादीपणाच एखाद्या व्यक्तीला पँथरचे यशस्वी नेतेपण बहाल करू शकेल. असा नेता हवा. त्याच्या नेतृत्वावर मोहोरणारी आंबेडकरवादी पँथर हवी. अशा पँथरची गरज आहे. अशा पँथरचीच गरज आहे.

□ □

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गीता

भगवद्गीतेमध्ये आपण चार वर्णांची निर्मिती कशी केली ते कृष्णाने सांगितले आहे.

" चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । "

कृष्णाला ईश्वर मानले जाते पण हा ईश्वर माणसांना उत्तमच गुण देत नाही. हे मौलिक कार्य या परमेश्वराला करता आले असते तर त्याला दुसरे म्हणजे गुणकर्मांच्यानुसार माणसाचे चार वर्ण निर्माण करायची गरजच भासली नसती. आपल्या ईश्वरपणाचा उपयोग माणसांमध्ये चांगलेपणा निर्माण करण्यापेक्षा वाईटपणा वा विषमता निर्माण करण्यासाठी कृष्णाने केला आहे.

गुणकर्मानुसार वर्णव्यवस्था ठरवायची झाली तर मनुष्याच्या मृत्यूपर्यंत त्याचा वर्ण ठरू शकणार नाही. कारण त्याची गुणाविष्कारशक्ती या घटनेने संपुष्टात येते. पण यावेळी माणसाचा वर्ण ठरला तर ती व्यवस्था स्मशानासाठी होते. जिवंत माणसांच्या जगाशी या वर्णव्यवस्थेचा संबंध पोचत नाही. वर्णव्यवस्था अशी निर्माणच करता येत नाही. काही उच्चवर्णीयांच्या हितासाठी वर्णव्यवस्था निर्माण झाली. विषमता नष्ट करू पाहणाऱ्या क्रांतीप्रक्रियेला उत्तर म्हणून ती निर्माण झाली. बुद्धाने चालविलेल्या क्रांतीचा विमोड करण्यासाठी उच्चवर्णाने निर्माण केले त्या तत्त्वज्ञानाचे नाव गीता आहे. बाबासाहेब म्हणतात, " Bhagvat-Gita is fundamentaly a counter revolutionary treatise of the Same Class..." (writings and speeches : vol 3 p. 380) याप्रकारे बुद्धाच्या विरोधात गीता उभी ठाकली होती असे बाबासाहेबच म्हणतात. ब्राह्मण आणि बौद्ध यांच्यामधला लढा या देशात शेकडो वर्षे चालला. इस्लाम धर्म इथे आला नसता तर हा झगडा आणखी पुढे कितीतरी वर्षे चालला असता. बुद्धाने स्वातंत्र्य, समता व बंधुता यांची शिकवण दिली पण बाबासाहेब म्हणतात या क्रांतिविरुद्ध प्रतिक्रांतीने विजय मिळविला. त्यांच्या मते-" पुष्कळ लोकांना भगवद्गीता फार मोठा धार्मिक ग्रंथ वाटतो. मोठ्या खेदाने मला म्हणावे लागते की तसे वाटण्यासारखे मला तरी त्या पुस्तकात काही आढळले नाही. उलट त्या

ग्रंथाने बराच अनर्थ केला आहे. बुद्धीच्या कसोटीला उतरू शकणार नाहीत अशा गोष्टींना तात्त्विक आधार देण्याचा प्रयत्न त्यात केला आहे. "(डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे. खंड १, संपा. गांजरे १९६८ पृ.११९)

गीतेचा जन्म कसा झाला यासंबंधी बाबासाहेब म्हणतात सुमारे "दोन हजार वर्षे ब्राह्मण व बौद्ध यांचा वाद सुरू होता. या वादात निर्माण झालेल्या वाङ्मयाचे स्वरूप धार्मिक नसून राजकीय आहे. **देशातील सत्ताकेंद्रावर आपली हुकुमत चालावी म्हणून गीताग्रंथाचा जन्म झाला.**" (उक्त पृ. १२१) आपली सत्ता गेल्याचे लक्षात येताच पुन्हा चातुर्वर्ण्याचे पुनरुज्जीवन केले. हे काम करण्यासाठी त्यांनी गीतेचा वापर केला. चातुर्वर्ण्य टिकून आहे याला कारण भगवद्गीता होय असे बाबासाहेबांचे म्हणणे आहे. ते म्हणतात–

"It was to save them from the attack of Buddhism that the Bhagvat Gita came into being." (Ibid, p. 363)

बुद्धाने ज्या ज्या गोष्टी शिकविल्या त्या त्या सर्व गोष्टींच्या विरोधात गीतेने आघाडी उघडली. बुद्ध ही क्रांती आहे तर गीता ही प्रतिक्रांती आहे. Counter revolution आहे. ब्राह्मण धर्माला गीतेने मजबूत केले आहे. सामाजिक विषमतेला न्याय म्हणून प्रतिष्ठित केले आहे. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांना गीता हे प्रतिक्रांतीवाद्यांचे हत्यार होय असे वाटते. तरी आंबेडकरी चळवळीत आणि आंबेडकरवादी साहित्यात संघप्रसाराचे कार्य करणारे संघश्री गंगाधर पानतावणे १०–९–८३ च्या नागपूरच्या तरुण भारतात म्हणतात,

"**डॉ. आंबेडकरांचे प्रेरणास्थान भगवद्गीता.**" डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सूज्ञ अनुयायांनी त्यांची दिशाभूल करणाऱ्या अशा आंबेडकरद्रोह्यांपासून सावध राहावे. डोळ्यात तेल घालून ही बाबासाहेबांची चळवळ जपावी. एवढेच इथे आवर्जून सांगावेसे वाटते की बाबासाहेबांच्या अनुयायांनो जागे राहा. रात्र आपल्यातीलच काही वैऱ्यांचीही आहे.

□ □

# डॉ. आंबेडकर आणि सावरकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी आज अधिकच जागृत असण्याची वेळ आलेली आहे. ' रात्र वैऱ्यांची आहे तेव्हा जागा राहा ' असे कळकळीने सांगण्याची गरज आज आहे.

बाबासाहेबांची चळवळ आज केवळ बाबासाहेब आंबेडकरांचा विचार घेऊन चाललेली आहे. या चळवळीला एक श्रीमंत दिशा आणि मौलिक तत्त्वज्ञान मिळाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच या चळवळीचे मार्गदर्शक आहेत. तेच या चळवळीचे प्राणही आहेत.

आज मात्र या चळवळीला संभ्रमित करण्याचे, तिची दिशाभूल करण्याचे आणि या चळवळीला तत्त्वच्युत करण्याचे प्रयत्न काही लोक करीत आहेत. आज प्रतिगामी शक्ती उफाळून येत आहेत. फॅसिस्ट मनोवृत्तीचे वादळ दाटून आले आहे. परिवर्तनवादी चळवळीच्या जिवावर या पुराणमतवादी शक्ती उठलेल्या आहेत. यावेळी नेमके आंबेडकरी चळवळीला चुकीच्या मार्गावर नेण्याचे आणि प्रतिगामी चळवळींना खुष करण्याचे प्रयत्न काही लोक करीत आहेत. हे लोक कोण आहेत ? तर पूर्वास्पृश्य समाजातील हे संघवाले लोक आहेत. आज यांनी बुरखा आंबेडकरी चळवळीचा पांघरला असला तरी यांच्या रक्तातील संघत्व हेच यांचे खरे स्वरूप आहे.

"वीर सावरकरांचे साहित्य आणि सामाजिक सुधारणेचे विचार अत्यंत ज्वालाग्राही होते. मात्र ते विचार अनुयायांना पचले नाहीत. परिणामी त्या विचारांना कृतीची जोड मिळाली नाही. त्या विचारांना कृतीची जोड मिळाली असती तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच वीर सावरकरांनाही दलित समाजाने डोक्यावर घेतले असते." (दै. नागपूर पत्रिका, १८-७-८९)

हे संघनिष्ठ श्री. गंगाधर पानतावणे यांचे म्हणणे खरे आहे काय ? त्यांनी सावरकरांचे लेखन वाचले नाही आणि या संदर्भातले बाबासाहेब आंबेडकरांचेही लेखन वाचलेले नाही. न वाचता बोलण्याने एखादा मनुष्य इतरांची तर फसवणूक करतोच पण त्याहून तो स्वतःला उद्ध्वस्त करून घेतो. वैचारिक शिस्तीत हे बसत नाही. ते वैचारिक बोफोर्स होते.

बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदुधर्माचा त्याग केला यामुळे सावरकर खूपच चिडले होते. त्यांनी बाबासाहेबांच्या नावाने अतोनात चिखलफेक केली. अस्पृश्यांनी हिंदूधर्म सोडू नये यासाठी सावरकर अस्पृश्यांना हिंदुत्वाच्या अफूनीच गोळी चारत होते. ते म्हणाले होते, "जे हिंदुत्व तुमच्या हजारो पिढ्यांनी प्राणापलीकडे हे अस्पृश्यतेचे हाल सोसूनदेखील जतन केले, ते हिंदुत्व धिक्कारून आणि त्या तुमच्याच महार, मांग प्रभृति सोमवंशी कुलातील शतसहस्र पूर्वजांस मूर्खांत काढून आपल्या बापाचे नाव बदलणे होय !" (जात्युच्छेदक निबंध, ११८२, पृ. १२७) हिंदुत्व सोडण्याची भावना अत्यंत नीच भावना होय असेही इथेच सावरकर म्हणतात. बाबासाहेबांनी हिंदुधर्माची चौफेर चिकित्सा केली. तो धर्म सोडायचा निर्णय घेतला. पण "ज्या बुद्धिवादाच्या कसोटीने हिंदुधर्म सोडावासा वाटतो, ती कसोटी लावली असता जगातील आजचा एकही धर्म ग्राह्य ठरणे अशक्य आहे." (जा. नि. १३२) यावरून सावरकरांची दिशा बाबासाहेबांच्या अगदी विरोधी आहे, असे असूनही सावरकरांना दलित समाजाने डोक्यावर घ्यायला हवे होते असे पानतावणे म्हणतात याचे कारण त्यांनी मुळात अभ्यासच केलेला नाही.

हिंदुधर्म सोडणे हा राष्ट्रद्रोह आहे. तो धर्मद्रोह आहे. एवढेच नव्हे तर "जरी आंबेडकर आणि त्यांचे अनुयायी आज परधर्मात गेले तरीही हिंदुसंघटनेच्या जात्युच्छेदक संजीवनीने नवप्रणित झालेल्या हिंदुधर्मात आपणास पुन्हा शुद्ध करून घ्या अशी विनंती डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव थोडक्या वर्षांनी रत्नागिरी हिंदुसभेकडे करतील .." (जा. नि. १३६) सावरकरांची आणखी काही विधाने अशी–

(१) "जसा त्यांचा 'मी' हा त्यांचा स्वतःचा, तशी त्यांची महार जात ही त्यांची स्वतःची, तसाच त्यांचा धर्म हा त्यांचा स्वतःचा धर्म आहे, तो महार धर्म आहे– दुसऱ्या कोणाचा नव्हे." (पृ. १४५)

(२) "पण आमची महार जात अजूनही जातिधर्मास चिकटून आहे. महारची महार आहे. आपल्या जातीचे स्वतंत्र अस्तित्व आणि स्वत्व संरक्षून आहे !" (पृ. १५१)

(३) "महार राहून अस्पृश्यता जाईल तर ती शोभा ! जातच मरून, महारांचे स्वत्वच मारून, वाडवडिलांचा महारवंश असा जगातून नाहीसा करून, निर्वंश करून, जी अस्पृश्यता जाणार ती गेली काय न गेली काय, सोमवंशी महार जातीचे दृष्टीने सारखीच !" (पृ. १५३)

इथे महार जात राहिली पाहिजे असे सावरकर मानतात. ही सावरकरांची सामाजिक दृष्टी मोठी विज्ञाननिष्ठ, मोठी मानवतावादी आणि मोठी निर्मळ होती काय ? असा प्रश्न आहे. पण संघीय पानतावणे यांना तसे वाटते.

(४) सावरकर म्हणतात : "डॉ. आंबेडकर ही व्यक्ती भिक्षु आंबेडकर झाली तरी त्यांचे कोणाही हिंदूस कोणचेही विशेष सोयरसुतक बाळगण्याचे कारण नाही. ना हर्ष ना विमर्ष, जेथे बुद्धाने हात टेकले तेथे आंबेडकर कोणच्या झाडाचा पाला !" (उक्त पृ. २२३)

इथे सावरकर बाबासाहेबांचा अत्यंत खालच्या पातळीवरून उपमर्द करीत आहेत.

(५) सावरकर म्हणतात– "डॉक्टर आंबेडकरांच्या किंवा होऊ घातलेल्या उद्याच्या भिक्षु आंबेडकरांच्या जाणीव थापांना किंवा प्रामाणिक वल्गनांना बळी पडून आमच्या महार धर्मबांधवांनी आपला हिंदुधर्म सोडू नये. आपल्या स्वतःच्या पन्नास पिढ्यांच्या हिंदू पूर्वजांना स्वतःच पाखंड्यात, पतितात किंवा मूर्खात काढू नये." (उक्त पृ. २२५)

इथे सावरकर बाबासाहेब थापा मारीत आहेत असे खोटेच सांगत आहेत आणि महार समाजाला जातीची अफू चारून झोपविण्याचा अपयशी प्रयत्न करीत आहेत.

(६) "जी तुकारामसारख्या साधुसंतांची नीतिवचने त्यांचे वारकरी बंधु गात आहेत, त्यापेक्षा एकही नवे नीतिवचन त्याला बौद्धांच्या भारूडात शिकण्या-सारखे आढळणार नाही." (सावरकर, उक्त. पृ. २२६)

इथे सावरकर मूल्यसंदर्भात मोठीच गल्लत करतात. साधूसंतांची नीति ईश्वरवादावर आधारलेली तर बुद्धाची नीति निरीश्वरवादावर आधारलेली ! या दोन नीतिमध्ये प्रकारभेद आहे. प्रमाणभेद नाही. शिवाय बुद्धाचे काही विचार संतांनी स्वीकारले असे इतिहास सांगतो. सावरकर हे सोयीने उलटे करतात व बुद्धासंबंधी वाईट बोलण्याची हौस फेडून घेतात.

(७) "हिंदुधर्मातच नि समाजातच तेवढ्या भाकडकथा, भावडेपणा नि अनाचार यांचा बुजबुजाट झालेला आहे आणि बौद्धधर्म आणि समाज मात्र त्यांच्यापासून अगदी अलिप्त आहे असा असत्य प्रचार आंबेडकर पक्षाने एकसारखा चालविला असता आणि राम–कृष्णादिकांची निंदा हलकट भाषेतसुद्धा करण्यास

मागे पुढे पाहिले नसता त्यांच्या या अपप्रचाराचा कडक समाचार घेण्यास आज चालू असलेल्या..." (सावरकर : उक्त. पृ. २२८)

इथे सावरकर चिडून बोलताहेत आणि आंबेडकरांनी केलेल्या बुद्धिवादी चिकित्सेस हलकट या शब्दाने अपमानित करीत आहेत.

(८) सावरकर म्हणतात, "बौद्ध धर्म हा केवळ बुद्धिनिष्ठेवरच आधारलेला आहे या आंबेडकरांच्या थापेबाजीला बळी पडणाऱ्यांना म्हणजे विशेषत: आमच्या आजही हिंदू असलेल्या महार बंधुना बौद्ध धर्माची आणि बौद्ध जगताची माहिती जवळजवळ नाहीच म्हटले तरी चालेल. **शेळघात लंगडी गाय प्रधान तसेच बऱ्याच अशिक्षित नि मागासलेल्या लोकांना आंबेडकर** दाखवितील तसेच बौद्ध धर्माचे रूप आहे असे वाटणे साहजिक आहे." (उक्त पृ. २२८)

इथे सावरकर शेळघात लंगडी गाय शहाणी तसे अस्पृश्यात आंबेडकर आहेत असे अत्यंत हीन भाषेत सांगत आहेत. बाबासाहेबांच्या प्रज्ञेचा असा अवमान सावरकर करीत आहेत.

बाबासाहेबांनी बुद्धधम्म स्वीकारू नये, किंवा त्यांच्याबरोबर कोणीही तो धम्म स्वीकारू नये यासाठी सावरकरांनी आटोकाट प्रयत्न केला. अस्पृश्यांना धमक्या दिल्या, जातीची अफू चारली, धर्माची दारू पाजली पण व्हायचे तेच झाले. हजारात दहा लोकही धर्मत्याग करणार नाहीत, बुद्ध होणार नाहीत असे सावरकर म्हणत होते. पण झाले उलटेच. सावरकरांच्या हयातीतच १९५६ साली सहा लाख लोकांनी डॉ. आंबेडकरांसोबत हिंदुधर्माचा त्याग केला आणि बुद्धधम्माचा स्वीकार केला.

हे पाहून लगेच सावरकर उलटले. 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' या बाबासाहेबांच्या प्रतिज्ञेचा उच्चार करून सावरकर म्हणाले, "हिंदुत्वाच्या क्षेत्राबाहेर जाण्यासाठी जी उडी त्यांनी मारली ती सर्वतोपरी फसून हिंदुत्वाच्या सीमाक्षेत्राच्या आतच पडलेली आहे." (उक्त पृ. २३९). याचे कारण ते देतात ते हे की बौद्ध धर्म हा हिंदुत्वाच्या कक्षेतीलच एक अवैदिक पंथ आहे. त्यामुळे म्हणजे बौद्ध धर्म हिंदुधर्माचाच एक भाग असल्यामुळे आंबेडकरांना हिंदू म्हणूनच मरावे लागेल असे सावरकरांनी म्हटले आहे. चित भी मेरी पट भी मेरी ! अशी सावरकरांची वृत्ती आहे. म्हणून ते धर्मांतरापूर्वीही चिडले आणि धर्मांतरानंतरही चिडले.

सावरकरांनी बाबासाहेब आंबेडकरांसंबंधी अत्यंत खालच्या पातळीवरून जे लेखन केले ते सर्व आंबेडकरवाद्यांनी वाचावे. बुद्धासंबंधी व त्याच्या धम्मासंबंधी

अत्यंत बेतालपणे लेखन केले ते वाचावे. बुद्ध निरीश्वरवादी होता. तो ईश्वरवादी हिंदुत्वाच्या कक्षेत कसा काय येतो ? त्याचा विचार करावा. सावरकर कडवे हिंदुत्ववादी आहेत. जीव जगत जगदात्मा हे त्यांचे अध्यात्मवादी सनातन तत्त्वज्ञान आहे. त्यांच्या बुद्धिप्रामाण्यवादाला हिंदुत्वाच्या आणि हिंदू अध्यात्माच्या भयानक मर्यादा आहेत. बाबासाहेबांच्या संदर्भात तर ते सर्वथा ताळतंत्र सोडून बोलत होते म्हणून २ जून १९५६ च्या प्रबुद्ध भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते–

"सावरकर नरक ओकले"

सावरकरांनी काय कोणीही अपप्रचार करण्याऐवजी मला बुद्धासंबंधी उघड विचारावे असे आवाहन बाबासाहेबांनी केले होते ते म्हणाले होते–

"तेव्हा अशा नादान व बेजबाबदार लोकांच्या आपण नादी लागू नये. काही लोक म्हणतात सावरकर विष ओकले पण मी म्हणतो सावरकर आपल्या पोटातील नरक ओकले." (उक्त : २ जून १९५६)

सावरकर बाबासाहेबांसंबधी बुद्ध व बुद्धधम्म यांच्यासंबंधी काय म्हणाले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सावरकरांसंबंधी काय म्हणाले ते पुराव्यांसकट मी मांडले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी ते काळजीपूर्वक लक्षात घ्यावे आणि–

"वीर सावरकरांचे साहित्य आणि सामाजिक सुधारणेचे विचार अत्यंत ज्वालाग्राही होते, मात्र ते विचार अनुयायांना पचले नाहीत. परिणामी त्या विचारांना कृतीची जोड मिळाली नाही. त्या विचारांना कृतीची जोड मिळाली असती **तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच वीर सावरकरांनाही दलित समाजाने** डोक्यावर घेतले असते." या संघश्री गंगाधर पानतावणे (नागपूर पत्रिका १४-७-८९) यांच्या अशिक्षित मताचा विचार करावा. वरील उद्‌गार डोके फिरलेल्याचे उद्‌गार आहेत. असेही आंबेडकरानुयायांना वाटेल पण ते वाटणे खरेच असेल.

□ □

# दलितांवरील अत्याचार

दलितांवर या देशामध्ये हजारो वर्षांपासून अत्याचार होताहेत. त्यांना दलित केले गेले हा त्यांच्यावर झालेला इतिहासातला पहिला अत्याचार आहे. हा पहिला अत्याचार त्यांच्यावर झाला आणि परिणाम म्हणून आजपर्यंत अत्यंत अमानुष अशी अत्याचारपरंपराच अखंडपणे त्यांच्या वाट्याला आली.

आपल्याला या अत्याचार परंपरेतील केवळ काही अत्याचारच माहीत झालेले आहेत, पण कोट्यवधी अत्याचार असे आहेत की जे आपल्याला माहीतच नाहीत. असे अगणित अत्याचार आहेत की ज्यांना बोलायला शब्दही मिळाला नाही. प्रकाशही मिळाला नाही. असे असंख्य अत्याचार अभिव्यक्तीशिवाय इतिहासाच्या अंधाऱ्या दालनांमधून अदृश्यरूपात मुकाटपणे अगतिक होऊन बसलेले आहेत.

एखाद्या व्यक्तीवर, एखाद्या व्यक्तिसमूहावर अत्याचार का होतात या प्रश्नाचे अत्यंत साधे असे उत्तर आहे. गुलामी मुकाटपणे सहन करणारी व्यक्ती किंवा व्यक्तिसमूह यांच्यावर अत्याचार करण्याची गरज प्रस्थापित व्यवस्थेला नसते. वस्तुत: असे मुक्या माणसांचे होणारे शोषण हा अत्याचारच असतो पण या मुक्या माणसांनी या शोषणाला अगतिकपणे का होईना, न्यायाचा, वास्तवाचा भाग मानलेले असते. निसर्गात अनंत गोष्टी घडतात त्या जशा अटळ असतात त्याप्रमाणे आपले शोषण हेही त्यांना न बदलता येणाऱ्या वास्तवाचा एक भागच वाटते. म्हणून अशा गुलामांवर त्यांना गुलाम करण्याचा पहिला अत्याचार शोषणव्यवस्थेकडून झाला, की पुढचे अत्याचार करण्याची गरज व्यवस्थेला भासत नाही. आपल्या देशात याही प्रकारचे अनंत गुलाम आहेत की जे याप्रकारे पुढचे अत्याचार होण्याची गरजच निर्माण होऊ देत नाहीत. दलितावर मात्र आजपर्यंतही अत्याचार होताहेत. त्याला व्यवस्थेने दलित केले. हा पहिला अत्याचार त्याच्यावर केला. पण दलितावर पुढेही अत्याचार करण्याची गरज व्यवस्थेला भासते याचे कारण काय ? याचे कारण जी व्यक्ती व्यवस्थेने लादलेली गुलामी झटकण्याचा सारखा प्रयत्न करते त्या व्यक्तीला सततच व्यवस्थेकडून अत्याचार भोगावे

लागतात. दलितांना मागल्या हजारो वर्षांमध्ये सारखे अत्याचार झेलावे लागत असतील तर त्याचा सरळ अर्थ दलित ही व्यक्ती आणि दलित हा व्यक्तिसमूह प्रस्थापिताने लादलेले दालित्य सतत झुगारून देतो असा आहे.

आर्यांनी दलिताला दलित म्हणजे अस्पृश्य केले त्याचे कारण या माणसाने आर्यांच्या आक्रमणाविरुद्ध निकराचे लढे दिले हे आहे. ज्यांनी तडजोडी केल्या, स्वातंत्र्य विकून सवलती पत्करल्या, अस्मिता गहाण ठेवून सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळविली त्यांना या देशाच्या इतिहासात मानाचे पान मिळाले पण अस्मिता विकायची नाही, स्वातंत्र्य गहाण ठेवायचे नाही, परकीयांच्यापुढे माथा नमवायचा नाही या निकराच्या प्रतिज्ञेने जे भांडले त्याचा सूड म्हणून या लोकांना आर्यांनी अस्पृश्य म्हणून नेहमीसाठी अप्रतिष्ठित करून ठेवले. आपल्या अस्मितेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी या लोकांनी मागल्या हजारो वर्षांत अस्पृश्यतेचा शाप भोगला. स्वाभिमानाने जगण्याची कांक्षा कधीकधी अशी हजारो वर्षे अत्याचाराचा बळी ठरते. या देशातीलअ स्पृश्य हे याचे ढळढळीत आदरणीय उदाहरण आहे.

धाकलीला गवईबांधवांचे डोळे फोडले. अशा डोळे फोडण्याच्या घटना आधुनिक महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी घडल्या आहेत हे डॉ. आंबेडकरांच्या 'जनता' या पत्रामधून दिसते. अस्पृश्य भगिनीची नग्न धिंड एखाद्या ब्राह्मण-गावात काढली जाते पण ही एवढी घटना आपल्या निदर्शनास आली असली तरी अशा कितीतरी घटना मुक्या ओठांनी ठिकठिकाणी उभ्या असतात. बेलछीला, कारमचेडूला, किल्वेनमानीला आणि अशाच शेकडो ठिकाणी दलितांना जाळले गेले आहे. मराठवाड्यामध्ये माणसे कापली गेली, माणसांच्या होळ्या पेटविल्या गेल्या, घरांचीही राखरांगोळी केली गेली. कुठे अस्पृश्यांच्या विहिरीत विष्ठा टाकली जाते तर कुठे मेलेली कुत्री टाकली जातात. कुठे बहिष्कार टाकला जातो तर कुठे मरणाचे फास टाकले जातात. दलितांचे असे शारीरिक शोषण होते. मानसिक शोषण होते, त्यांचे सामाजिक व आर्थिक शोषणही होते. एखाद्या गावावर धो-धो पाऊस कोसळावा तसा दलितांच्या वस्त्यावर अत्याचारांचा पाऊस कोसळत असतो. असंख्य अत्याचार घडतात, कधी सूर्याच्या उपस्थितीत घडतात तर कधी त्याच्या गैरहजेरीत घडतात. हे अत्याचार माणुसकी संपून निर्माण झालेल्या अंधारात घडतात. अनेक अत्याचारदग्ध घटनांचे ओठ शिवलेलेच असतात. अनेक वस्त्यांचा वाचाघातच झालेला असतो. काही उघडलेली तोंडे बंदुकीच्या गोळ्यांनी बंद केली जातात. काही तोंडे ज्वाळांनी मिटविली जातात.

हे जसे अनंत अत्याचार दलितांवर होतात, त्याप्रमाणे इतरही असंख्य अत्याचार होतात.

हजारो वर्षानंतर पहिल्यांदाच दलितांनी आपल्या लाडक्या नेत्याचे नाव एका विद्यापीठाला द्यावे यासाठी मागणी केली होती. आंबेडकर हा त्यांच्या गावातला, त्यांच्या अंधाऱ्या घरांमधूनही उजेड शिंपीत गेलेला सूर्य होता. त्याच्या नावाने दलितांना एक विद्यापीठ हवे होते. 'मला मातृभूमी नाही' असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. दलितांना आमच्या नेत्याच्या नावाचे विद्यापीठही नाही असे आक्रंदन करावे लागले. ही मागणी पहिल्यांदाच या समाजवृक्षावर फुलली होती. पण फुलली आणि अपमानित झाली. पहिलेच पाऊल टाकावे आणि पायगोवा व्हावा तसे झाले. दलितांवर झालेला हा शारीरिक अत्याचार नव्हता. तो त्यांच्या लाडक्या स्वप्नावर झालेला अत्याचार होता. या अत्याचाराने एकाच वेळी त्यांच्या जाणिवेच्या आणि नेणिवेच्याही चिंध्या झाल्या होत्या.

दलितांना भारतीय संविधानाने आरक्षण दिलेले आहे. जोवर आरक्षणाचा उपभोग घेता येणारी माणसे नव्हती तोवर आरक्षणाचा उदारपणा व्यवस्थेने केला पण आज गुणावसाधारक पुढे येताना दिसताच आरक्षण टाळण्याच्या हजारो युक्त्या काढल्या जात आहेत. ब्राह्मणांपासून आदिवासींपर्यंत यापुढे सर्वांनाच लोकसंख्येच्या प्रमाणात टक्केवारीने केवळ नोकऱ्याच नाहीत तर सर्वच प्रकारच्या सोयी मिळाव्यात आणि आरक्षण काढून टाकावे. पण आहे त्या स्थितीत दलितांना जे मिळायला हवे ते नाकारून व्यवस्था दलितांवर भयानक अत्याचार करीत आहे. या अत्याचारामुळे किती लोक उद्‌ध्वस्त होतात ते दिसत नाही एवढेच ! हेच रिडल्सच्या बाबतीत म्हणता येते. एक धर्मान्धता उभी राहते आणि दलितांच्या नेत्याने उभा केलेला बुलंद बुद्धिवाद पराभूत करू पाहते. हा भयानक अत्याचार धर्मान्धतेने दलितांवर केलेला आहे. तसेच धार्मिक अंधश्रद्धांचा निरोप घेऊन दलित बुद्धिप्रामाण्यवादाच्या वाटा चालू लागलेला असताना बुद्ध्याच त्याला चिडविण्यासाठी धार्मिक उत्सवांचा मुद्दामच अतिरेकी गहजब करणे बाबाबुवांचे अधिकच उत्कटपणे देव्हारे माजवणे, अंधश्रद्धांनी अधिकच चेकाळणे या गोष्टी केल्या जातात. हाही अत्याचार प्रतिगामी समाज दलितांवर करीत असतो.

या सर्वच अत्याचारांना आज तीव्रता लाभत आहे. हे सर्वच अत्याचार वाढत आहेत याचे कारण दलित स्वच्छपणे प्रतिगाम्यांच्या विचारांच्या चौकटी फोडून बाहेर पडलेला आहे हे आहे. पण म्हणून हे अत्याचार दलितांवर होतात

असे म्हणण्यापेक्षा ते या देशातील माणुसकी संपादनाच्या प्रक्रियेवर केले जातात. लोकशाही संविधानावर, आपल्या प्रबोधनावर, मानवमुक्तीने अंगिकारलेल्या नैतिक मूल्यांवर आणि पर्यायाने या देशाच्या देशपणावर हे अत्याचार केले जात आहेत असेच म्हटले पाहिजे. माणसाच्या उत्थानाविरोधी कोणतीही कृती राष्ट्रविरोधी असते. दलितांवर अत्याचार करणारे या राष्ट्रावरच अत्याचार करीत असतात. ते माणुसकीचे मारेकरी या अर्थाने राष्ट्राचेच मारेकरी असतात.

□ □

# आता, आधी सामाजिकच!

मागल्या शतकात आधी सामाजिक की आधी राजकीय असा वाद झडला. आधी सामाजिकवाल्यांची बाजू लंगडी पडली. आधी राजकीयवाले शक्तिशाली ठरले. राजकीय सुधारणेकडे अर्थात राजकीय स्वातंत्र्याकडे समाज वेगाने गेला. टिळकांसारख्या आधी राजकीयवाल्या गटाच्या प्रमुखाचे म्हणणे असे होते की राजकीय सुधारणा होताच सुईसोबत दोरा तशा सर्व सामाजिक सुधारणा घडून येतील. हे घडणार नाही हे टिळकांनाही माहीत होते म्हणून ते आधी राजकीय या पक्षाचे होते.

समाजप्रबोधन वा सामाजिक सुधारणा घडून आल्यानंतर मिळणारे राजकीय स्वातंत्र्य समाजातील सर्व घटकांच्या हाती पडते हे होऊ नये असे वाटत असेल तर समाजप्रबोधन घडून येण्याआधीच राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी खटपट करणे आवश्यक असते. असे केल्याने केवळ उच्चवर्णाच्याच खिशात स्वातंत्र्य जाते.

मागल्या शतकात राजकीय स्वातंत्र्याची चळवळ सुधारकांना विरोध करीत होती याचे हेच कारण होय. सुधारक राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरले नाहीत कारण मिळणारे राजकीय स्वातंत्र्य पेलण्यास येथील उपेक्षित समाज समर्थ व्हावा हे होते. पेशवाईचे पुनरुज्जीवन व्हायचे असेल तर झटपट राजकीय स्वातंत्र्य मिळविणे भागच होते आणि खालच्या वर्गांमधील लोक सुबुद्ध होऊन पुढे येण्याआधी स्वातंत्र्य मिळाले तरच पेशवाई परत सुरू होऊ शकते. सुधारकांना विरोध करणारे मन स्वातंत्र्याची उपासना करणारे मन नव्हते तर एका उच्च समाजगटाच्या वर्चस्वासाठी तळमळणारे मन होते.

इंग्रजी सत्ता इथे आल्याने देश गुलाम झाला होता याचा अर्थ पूर्वीच्या काळात इथे जे गुलाम होते त्या नव्वद टक्क्यांचे मालक गुलाम झाले होते. त्यांच्या वर्चस्वावर, अनिर्बंध धार्मिक हुकुमशाहीवर गदा आली होती. इंग्रजांच्या राजवटीमुळे या मूठभर देशी मालकांच्या पारतंत्र्यातून येथील असंख्य गुलामांच्या स्वातंत्र्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला होता. प्रबोधनाची चळवळ या गुलामांच्या स्वातंत्र्याची चळवळ होती आणि राजकीय स्वातंत्र्याची चळवळ या गुलामांच्या मालकांच्या स्वातंत्र्याची चळवळ होती.

सत्तांतर समाजप्रबोधनाशिवाय, मानसिक क्रांतीशिवाय येत असेल तर येथील उपेक्षितांना, येथील शोषित–पीडितांना त्याचा कोणताही उपयोग नाही. त्याचा उपयोग फक्त सत्तासंपादनाच्या मैदानातील खिलाडूंना असतो.

एखादी सत्ता उलथून दुसरा गट सत्तेवर येणे यात सत्तान्तर होईल पण हवे मूल्यांतर नाही. दलित–आदिवासी, भटके विमुक्त यांना अशा सत्तांतराच्या मृगजळामागे धावण्यात आता रस नाही. मिळणाऱ्या सत्तेत त्यांचे स्थान काय असणार याचे उत्तर आज त्याला स्पष्टपणे हवे आहे.

कम्युनिस्टांची एक चळवळ या देशात सुरु आहे. या कम्युनिस्टांनी या देशातील बेस आणि सुपरस्ट्रक्चरचे सत्यस्वरूपच जाणून घेतले नाही. कारण त्यांनाही समाजप्रबोधनाशिवायच सत्तान्तर हवे होते. या पक्षात केवळ उच्चवर्णीय हिंदूंचे नेतृत्व होते. ब्राह्मणी नेतृत्व होते. यांच्या घरातील सणवार, लग्नविधी पारंपरिक हिंदू पद्धतीनेच होत आले. कम्युनिस्ट जाणिवेच्या इतर जातींच्या लोकांबरोबर विवाहसंबंध होण्यापेक्षा जातीय जाणिवेच्या स्वजातीबरोबरच यांचे विवाहसंबंध झाले. मराठवाडा विद्यापीठाच्या आंदोलनात संघाच्या लोकांसोबत हे दलितांच्या जिवावर उठले होते. या देशातील समाजसंस्थेचा बेस आणि तिचे सुरपस्ट्रक्चर यांची सर्वात प्रभावी मांडणी करणारे आंबेडकर यांना आपले नेते वाटत नाहीत. कारण जातिप्रतिष्ठा आणि हिंदुधर्म धोक्यात येतो. हे दलित आदिवासींना कधी नेतृत्व देत नाहीत. अशा स्थितीत प्रत्यक्ष कम्युनिस्टांच्या हातात सत्ता आली तर दलित–आदिवासी आणि भटके–विमुक्त यांचे स्थान कुठे असेल ? की परत हे रयतच ! यांचे प्रजा असणे कधी संपायचेच नाही काय ? हे उपेक्षित लोक सत्ताधारी होतील, हे शासक होतील यासाठी कोणाजवळ काही चळवळ आहे काय ? या देशातील हजारो वर्षे केवळ प्रजा असणारा मनुष्य शासनकर्ता व्हायचा असेल तर मूलगामी पातळीवरून समाजप्रबोधनाची चळवळ राबविली जाणे अटळ आहे. बुद्धिप्रामाण्यवादी संस्कार या देशावर करणे अटळ आहे. निरीश्वरवादाच्या जाणिवांनी या देशाला प्रभावित करणे अटळ आहे. जुन्या जातीय, धर्मीय आणि रूढीय कुसंस्कारांपासून त्याला मुक्त करणे अटळ आहे. त्याला शिक्षणाच्या मध्यधारेत आणून उभे करणे आवश्यक आहे. हे झाले तरच हा समाज, ही प्रजा मागेपुढे शासक बनू शकेल. अन्यथा सत्तांतरे होत राहतील. या प्रजेला वेळोवेळी मालकांची फक्त ती निवड करावी लागेल. हे इतिहासात पुनःपुन्हा घडलेले अमानुष विपरीत टळायलाच हवे आहे आणि ते टळायचे असेल तर झाले पाहिजे ' आता, आधी सामाजिकच !' □ □

# नवे प्रबोधन आणि नवी संस्कृती

भारतीय समाजापुढील आजचा सर्वात महत्त्वाच्या प्रश्न आहे नव्या प्रबोधनाचा आणि नव्या संस्कृतीच्या निर्मितीच्या.

प्रबोधन म्हणजे नवनिर्मिती. नवसंभव. प्रबोधन हा एक स्वभावाचा प्रकार आहे. ती एक मानसिकता आहे. ती विचार करण्याची आण उज्ज्वल मनुष्यतेकडे धावणारे जीवन जगण्याची एक पद्धत आहे. मानवी जीवनाच्या उज्ज्वलतेकडे झेपावणारी नवनवोन्मेषशालिनी सजग मानसिकता म्हणजे प्रबोधन.

नव्या माणसाची निर्मिती, नव्या समाजाची निर्मिती आणि नवनव्या उज्ज्वलतेची निर्मिती ही प्रबोधनाची प्रकृती असते. या प्रकृतीतून मानवी जीवनाच्या खात्यावर जे आदर्श जमा होतात ते आदर्श म्हणजे संस्कृती. उच्च मानवतेची आराधना व्यक्तीच्या व समाजाच्या उज्ज्वल व्यक्तित्वाच्या निर्मितीची प्रयत्नपरंपरा म्हणजे संस्कृती होय.

सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमता म्हणजे संस्कृती नव्हे. वरील विषमतांचा पुरस्कार करणाऱ्या व्यक्ती सुसंस्कृत नव्हत. धर्म असोत, लेखक असोत, देव असोत, तत्त्वज्ञाने असोत विषमतांचा पुरस्कार जे जे कोणी करीत असतील ते सर्वच असंस्कृत होत. प्रबोधन या स्वभावाशी त्यांनी फारकत घेतलेली असते. नवनिर्मितीच्या प्रेरणांशी त्यांचे वैर असते. त्यांचे प्रबोधनाशीही नाते नसते. संस्कृतीशीही त्यांचे नाते नसते. स्वेतरांबद्दल घृणा जागवणारी, घृणा निर्माण करणारे संस्कार करणारी कोणतीही अमानुष प्रक्रिया सस्कृती म्हणवून घेण्याची लायकी गमावून बसत असते. ती केवळ संस्कृतीशून्यता असते. ती मानवी जीवनाला कुरूप करणारी घोर विकृती असते.

माणसुकी ही गोष्ट धर्मापेक्षा, जातीपेक्षा, रूढी-परंपरांपेक्षा आणि प्रांतांपेक्षाही मोठी आहे. राष्ट्राला या माणुसकीचे व्यक्तिमत्व यायला हवे. राष्ट्राला जातीचे व्यक्तिमत्व असणे ही बाब राष्ट्राला निरर्थक करून टाकणारी असते. धर्माचे व्यक्तिमत्व असणे ही गोष्टही राष्ट्राचे जगणे संपविणारी असते. राष्ट्राला परंपरावादाचा चेहरा असण्याने राष्ट्र, राष्ट्र म्हणून अस्तित्वात असण्याचा हक्क गमावून बसत असते.

**डॉ. यशवन्त मनोहर**, एम्.ए., पीएच.डी.

- जन्म : २६.३.१९४३, येरला. जि.: नागपूर
- उत्थानगुंफा काव्यसंग्रहास राज्य पुरस्कार, १९८०
- भारतीय साहित्य अकादेमीच्या मराठी सल्लागार समितीचे सदस्य, १९८२-८७
- जिल्हा साहित्य संमेलनाध्यक्ष, नागपूर, १९८२
- पहिल्या महाविद्यालयीन विद्यार्थी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, नागपूर, १९८५
- भारतीय साहित्य अकादेमीचे प्रवासअनुदान मिळून दक्षिण भारताचा प्रवास, १९८५
- समुचित त्रैमासिकाचे १९८४ पासून संपादक
- विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक, बुलढाणा, १९८६
- सम्यक साहित्य संसदेच्या (मुंबई) पहिल्या दलित साहित्य मेळाव्याचे अध्यक्ष, २७, २८ डिसें. १९८७
- अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ब्रह्मपुरी २७,२८ फेब्रु. १९८८
- पहिल्या विभागीय दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, आर्वी, १३.३.८८
- स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडियाच्या राज्यव्यापी मेळाव्याचे उद्‌घाटक, २०, २१ फेब्रु. १९८९ चंद्रपूर
- मराठी साहित्य संघाच्या दुसऱ्या साहित्यिक मेळाव्याचे अध्यक्ष, २२ व २३ मे १९८९, नागेवाडी-विटा, जि.: सांगली
- आंबेडकरी चळवळीचे व आंबेडकरवादी साहित्याचे सुप्रसिद्ध भाष्यकार
- सध्या नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागात अध्यापनकार्य आणि
- महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष २०.३.१९८९ पासून —



भारतीय समाजापुढला सर्वात महत्त्वाचा प्रश्न नैतिक मूल्यांचा पाया बदलणे हाच होता. भारतीय समाजाच्या वर्तमानाला छळणारे आणि त्याच्या भवितव्याला जाळणारे पेच, हा विघातक पाया अंगिकारल्यामुळेच निर्माण झाले आहेत. भारतीय प्रबोधनाला आता हा विघातक वैचारिक पाया बदलून घेण्यासाठी सर्वशक्तिनिशी प्रयत्न करायला हवे आहेत.

आपली लोकशाही धर्मान्धतेच्या गळफासाने आज मरणोन्मुख झाली आहे. अंधश्रद्धांनी येथील माणसांचे जगणे निरक्षर करून टाकले आहे. दैनंदिन जीवनात भारतीय समाज रूढींचा आणि परंपरांचा इतका अंधभक्त आहे की संस्कृतीदृष्ट्या आणि प्रबोधनदृष्ट्या हा समाज ठार अशिक्षित आहे याबद्दल संशय उरत नाही. त्याला धक्का लावण्याचा ज्या ज्या वेळी प्रयत्न झाला त्या त्या वेळी हा अशिक्षितपणा अधिकच वेड्यावाकड्या पद्धतीने पिसाळला.

हा अशिक्षितपणा व त्याने पूजनीय मानलेला पाया आपल्या प्रबोधनापुढला ज्वलंत प्रश्न आहे. हा प्रश्न टाळून इथे प्रबोधनाची वा क्रांतीचीही सुरवात कोणालाच करता यायची नाही.

- डॉ.यशवंत मनोहर

मुखपृष्ठ: अनिल ढगळे.